**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष श्री. नरहरी झिरवाळ)**

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

**पृ.शी./मु.शी. :** तोंडी उत्तरे

**संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील आंबी दुमाला येथील तलाठी कार्यालय बंद असल्याबाबत**

**(१) * ३८२५५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील आंबी दुमाला येथील तलाठी कार्यालय सन २०१३ या कालावधीत शासनाच्या निधीतून पूर्ण झाले, परंतु अवघ्या काही महिन्यात कार्यालयास टाळे लागले असून अद्याप देखील तलाठी कार्यालय बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोटा, केळवाडी, म्हासवंडी, कुरकुटवाडी, माळवाडी आंबी दुमाला ही गावे आंबी दुमाला येथील तलाठी कार्यालयाअंतर्गत येत असून शेती विषयक वारस नोंदी, दाखले, उतारे, सातबारा दुरुस्ती, सातबारा फेरफार ही सर्व कामे कार्यालय बंद असल्यामुळे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तलाठी कार्यालयात वीज जोडणी झाली नसल्याने तेथे संगणक चालविणे शक्य नसल्याने तसेच वेळे अभावी अनेक अडचणींमुळे कार्यालय बंद असल्याचे तलाठी यांचे म्हणणे आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार, श्री. बाळासाहेब थोरात यांचेकरिता : (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

ता.प्र.क्र.३८२५५...

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरातून हे खरे नाही, असे म्हटले आहे. पण मूळातच पठार भागातील आंबी दुमाला या गावाचा आपण संपूर्ण इतिहास पाहिला तर मागील ८ वर्षापासून येथील किती तलाठी आपण बदलले आहेत ते आपल्या लक्षात येईल. हे तलाठी कार्यालय तर बंदच आहे. अतिरिक्त कारभारावर हे कार्यालय सुरू आहे. त्या ठिकाणी सुरू असलेल्या कारभाराचा इतिहास आपण पाहिला तर ते कार्यालय सन २०१३ पासून बंद होते. सन २०१५-१६ मध्ये तलाठी नेमले गेले होते. पण त्यानंतर ते रजेवर गेले. सन २०१७ मध्ये राऊत नावाचे तलाठी नेमले गेले. पण ते ॲन्टी करप्शनमध्ये अडकले. त्यानंतर साईनाथ ढवळे नावाचे तलाठी आले होते. पण त्यांची बदली झाली. काल विधानसभेत प्रश्न आल्यानंतर माननीय उपविभागीय अधिकारी यांनी त्या ठिकाणी अतिरिक्त कारभार होता तो पुन्हा श्रीमती वाघचौरे यांच्याकडे नियमितपणे दिला आहे. आपण या ठिकाणचा घटनाक्रम पाहिला तर त्या ठिकाणी कायम स्वरुपी तलाठीच नाही. म्हणून माझे स्पेसिफिक ३ प्रश्न आहेत. या तलाठी कार्यालयात वीजेची सोय नसल्यामुळे सध्या ज्या तलाठ्याकडे कारभार होता त्याने सांगितले की, माझ्याकडे फक्त अतिरिक्त चार्ज आहे. त्यामुळे आज शेतकऱ्यांना ७/१२ घेण्यासाठी इतर गावांमध्ये जावे लागते. महसूल खाते मोठ्या आर्विभावात सांगते की, आम्ही डिजिटल कारभार सुरू केला आहे. आता महसूल खात्यामार्फत ऑनलाईन ७/१२

मिळतो. पण त्या तलाठी कार्यालयात वीजेचा पत्ता नाही तर डिजिटल ७/१२ शेतकऱ्यांना कसा मिळणार?

अध्यक्ष महोदय, त्या भागात अवैध गौण खनिजाचे उत्खनन मोठ्या प्रमाणात चालू आहे. त्यामुळे मुद्दाम तेथे तलाठी द्यायचा नाही आणि सर्रासपणे अवैध गौण खनिजाच्या उत्खनन करणाऱ्या माफियांकडे डोळेझाक करायची, असा कारभार चालला आहे. म्हणून या निमित्ताने माझे मंत्री महोदयांना २-३ प्रश्न आहेत. पहिला प्रश्न म्हणजे हे कार्यालय पूर्णपणे सुरू आहे काय, शेतकऱ्यांना ७/१२ त्या गावात

ता.प्र.क्र.३८२५५...

श्री. राधाकृष्ण विखे पाटील...

मिळतो काय की तेथील शेतकऱ्यांना अन्य गावात जावे लागते. त्या कार्यालयात वीजेची सोय नाही, ही वस्तुस्थिती आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना संगणकीकृत ७/१२ मिळतो काय, असे माझे ३ प्रश्न आहेत.

श्री. अब्दुल सत्तार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी आंबी दुमाला येथील तलाठी कार्यालय नियमितपणे सुरू नाही, असे मत या ठिकाणी व्यक्त केले आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की, सन २००८ ते २०१४ पर्यंत तेथे नियमित तलाठी होते. त्यानंतर सन २०१४ मध्ये काही दिवस अतिरिक्त कारभार देण्यात आला. सन २०१४ ते २०१६ या दोन वर्षात नियमित तलाठी देण्यात आले होते. त्यानंतर २०१६ ते २०१९ मध्ये २ वर्षे अतिरिक्त कारभार होता. आता तेथे नियमित कारभार श्रीमती एस.एस. वाघचौरे यांच्याकडे देण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, वीज पुरवठ्याच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, कोरोना संकटाच्या काळात वीज देयक भरले गेले नाही म्हणून तेथे वीज जोडणी नव्हती. परंतु लॅपटॉपच्या माध्यमातून आमच्या तलाठ्यांनी सर्व शेतकरी बांधवांना फेरफार, इतर नकाला व ७/१२ देण्याचे काम केलेले आहे.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी अवैध उत्खनन होत असल्याचे म्हटले आहे. जर अशा पध्दतीचे अवैध उत्खनन होत असेल तर शासन त्याची चौकशी करेल.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

ता.प्र. क्र. ३८२५५

श्री. अब्दुल सत्तार...

तसेच यापुढे कधी लाईट जाणार नाही याचीही दक्षता घेतली जाईल. लाईट का जाते याचे एक कारण मला असे दिसते की, दोन्ही नेते दोन्ही बाजुने असल्यामुळे लाईटची परेशानी होत असेल.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :अध्यक्ष महोदय, मुळात माझा प्रश्न असा आहे की, त्या तलाठी कार्यालयामध्ये शेतकऱ्यांना ७/१२ चे उतारे मिळतात काय ? कारण शेतकऱ्यांना ७/१२ काढण्यासाठी आजही शेजारच्या बोटा या गावामध्ये जावे लागते हे खरे आहे काय ? तसेच माझा दुसरा प्रश्न असा आहे की, गौण खनिजाचे गैर मार्गाने उत्खनन झालेले असून तिथे माफियाचा सुळसुळाट झालेला आहे. त्याची आपण चौकशी करणार आहात काय ?

श्री. अब्दुल सत्तार : अध्यक्ष महोदय, यापूर्वीच मी सांगितले आहे की, लाईट नसल्याकारणाने लॅपटॉपद्वारे सुविधा पुरविण्यासाठी काही अडचणी होत्या. परंतु ७/१२ देण्याची सर्व व्यवस्था केलेली आहे. एकाचाही फेरफार झालेला नाही. कदाचित एकाच व्यक्तिकडे दोन चार्ज असल्यामुळे एखाद्यावेळी अडचण आली असेल. परंतु शक्यतो तिथे तसे काही घडलेले नाही. या व्यतिरिक्त आपल्या ज्या मागण्या राहिल्या असतील त्याचा सहानुभुतीपूर्वक विचार केला जाईल.

श्री. प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या प्रश्नामध्ये तलाठी कार्यालय होणे आणि त्याबाबतच्या भौतिक सुविधा देण्याबाबतचा विषय आहे. त्या अनुषंगाने माननीय मंत्र्यांना माझा असा प्रश्न आहे की, तलाठी कार्यालय सुसज्ज करुन त्यांना ज्या ज्या सुविधा द्यायला पाहिजे त्या देण्यात याव्यात. परंतु तिथे बसलेला तलाठी हा लोकांची किती कामे करतो याचा शासन या नात्याने आपण रिव्हिव घेतला आहे काय ? एक साधी बाब आहे की, एखादा दस्त नोंद करायचा असेल तर त्यासाठी शासनाने कालावधी निश्चित केलेला आहे. परंतु दुर्दैवाने निश्चित केलेल्या कालावधीप्रमाणे एका बाजूला तलाठी, दुसऱ्या बाजूला सर्कल

असुधारित प्रत

ता.प्र. क्र. ३८२५५....

श्री. प्रकाश आबिटकर....

त्यांच्यानंतरची अपिलींग ॲथॉरिटी असताना नायब तहसिलदार या सर्वांकडून प्रचंड असा आर्थिक त्रास सर्वसामान्य लोकांना होतो. तरी देखील त्याचा रिव्हिव घेतला जात नाही. आजच्या प्रश्नाच्या अनुषंगाने माननीय महसूल मंत्र्यांना माझी अशी विनंती आहे की, अशा पद्धतीने दिरंगाई करणाऱ्यांचा रिव्हिव घेऊन, जिल्हाधिकारी तसेच आयुक्तांना त्या पद्धतीचे आदेश देऊन अशा पद्धतीने सामान्य लोकांना विनाकारण त्रास देणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत धोरणात्मक निर्णय आपण घेणार काय ?

श्री. अब्दुल सत्तार: अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, १५ दिवस, १ महिना किंवा २ महिना अशा वेगवेगळ्या कालावधीमध्ये काय करायचे आहे या सर्वांसाठी कालमर्यादा ठरवलेली आहे. त्यानुसार काम होत नसेल तर आता ऑनलाईन सिस्टिम केलेली आहे. त्यामुळे आता अर्ज देऊन त्याच्या तारखा चुकविण्याचे काम होत नाही. आपण जे सांगितले त्याप्रमाणे डिजिटल ७/१२ जसा अचूक दिला आहे त्या पद्धतीने आपल्या बाकीच्या ज्या तक्रारी किंवा फेरफार असतील तर त्याबाबत तलाठी कार्यालयामध्ये वेळेवर कारवाई करण्यात येईल असे आदेश सर्व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येतील.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मी जो प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर राहिलेले आहे. त्या ठिकाणी अवैध पद्धतीने जे गौण खनिजाचे उत्खनन झालेले आहे, त्याची आपण चौकशी करणार आहात काय ? आपण सांगता त्याप्रमाणे वस्तुस्थिती नाही. खरे म्हणजे, आपण जे उत्तर देत आहात ते चुकीचे आहे. ७/१२ उतारा हा बोटा या गावात मिळतो, ही वस्तुस्थिती आहे. तो तालुका माननीय महसूल मंत्री यांचाच असल्यामुळे माननीय महसूल राज्यमंत्री यांना सर्व माफ आहे असे दिसून येते. परंतु माननीय मंत्र्यांनी चुकीची माहिती देऊ नये. यापुढे त्या गावात किमान ७/१२ उतारा मिळायला सुरुवात होईल अशी कार्यवाही आपण करणार काय? तसेच त्या ठिकाणी गौण खनिजाचे उत्खनन झाले आहे, त्याची आपण चौकशी करणार आहात काय ? या प्रश्नाचे माननीय मंत्र्यांनी उत्तर द्यावे.

असुधारित प्रत

ता.प्र. क्र. ३८२५५....

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, मी मंत्री पदावर असल्यामुळे सन्माननीय सदस्य माझ्या तालुक्याची काळजी घेतात याबद्दल मी त्यांचे आभार मानले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, अत्यंत चांगल्या पद्धतीने ७/१२ ची सिस्टिम पूर्णपणे ऑनलाईन करण्यात आलेली आहे. यामुळे आपण कुठेही ऑनलाईन ७/१२ काढू शकतो. कदाचित काही काळात अडचण निर्माण झाली असेल तरी आता ती दूर झालेली आहे. त्यामुळे नागरिक आता कुठेही जाऊन ऑनलाईन पद्धतीने ७/१२ काढू शकतात आणि काढतही आहेत, ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्यांनी गौण खनिजाच्या बाबतीत जो मुद्दा उपस्थित केला त्याबद्दल मी त्यांना सांगू इच्छितो की, या विषयाच्या बाबतीत त्यांना चर्चा करायची करायची असेल तर ती वेगळी करावी, त्यासाठी आमची तयारी आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३८२५५....

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझी उत्तराला हरकत आहे. गौण खनिजाबाबत वेगळी चर्चा करण्याची आवश्यकता नाही. अवैध पद्धतीने गौण खनिजाचे उत्खनन होत आहे, या बाबत चौकशी करणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, आंबी दुमालाचा एक प्रश्न आहे. त्यासंबंधी चौकशी करु.

श्री. प्रकाश सोळंके : अध्यक्ष महोदय, तलाठी कार्यालयात उपस्थित राहत नाहीत. गावात उपस्थित राहत नाहीत हा तक्रारीचा मुद्दा आहे. बीड जिल्ह्यात जवळजवळ सर्वच ठिकाणी तलाठी निवासस्थान कार्यालय बांधले आहे. मंडळ अधिकारी निवासस्थान कार्यालय बांधले आहे. तरी देखील एकही तलाठी कार्यालय गावात, सजामध्ये सुरु नाही. (अडथळा ) मुख्यालयी जर तलाठी राहत नसतील तर त्यांना घरभाडे भत्ता देणे सरकारवर बंधनकारक नाही. मुख्यालयी राहत नसताना देखील तलाठ्यांना घरभाडेभत्ता दिला जातो. जे तलाठी मुख्यालयी राहत नाहीत त्यांचा घरभाडे भत्ता तातडीने बंद करणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, तलाठी हा घटक गावाकरिता व सजाकरिता खूप महत्त्वाचा आहे. राज्यात अनेक ठिकाणी तलाठी कार्यालये सुरु केलेली आहेत. गावात त्यांचा निवास असावा असा प्रयत्न केलेला आहे. तलाठी कार्यालयाजवळ जर घर असेल तर अनेक नवे प्रश्न तयार होतात. सकाळी सात वाजताच लोक सात –बारा मागण्यास त्यांच्या घरात येतात. त्यामुळे तो कदाचित थोडा बाजुला राहत असेल. त्यास आमची हरकत नाही. त्यांची सकाळी पोहे खाण्याची वेळ व ७/ १२ मागण्याची वेळ एकच होते. असे असले तरी तलाठ्यांनी गावातच राहिले पाहिजे. हा प्रश्न खूप मर्यादित स्वरुपात, एका गावाचा आहे. प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला म्हणून मी उत्तर देत आहे. मधील काळामध्ये तलाठ्यांची संख्या बरीच कमी होती. यामुळे अनेकदा त्यांच्याकडे अतिरिक्त चार्ज द्यावे लागले. संपूर्ण ७/१२ मधील जे दोष होते किंवा चुकीच्या नोंदी होत्या त्या कमी

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३८२५५....

श्री. बाळासाहेब थोरात ....

करण्याचे काम तलाठी बांधवांनीच केलेले आहे ही वस्तुस्थिती आहे. अनेकदा त्यांना तालुक्याच्या गावी जाऊन काम करावे लागत होते. यामुळे अशी स्थिती होती की, आपला तलाठी कोठे आहे असे लोकांकडून विचारले जात होते. आता सर्व काम संपलेले आहे. यामुळे तलाठ्यांनी आपल्या गावात थांबले पाहिजे, अशा स्पष्ट सूचना देण्यात येतील.

श्री. प्रकाश सोळंके : अध्यक्ष महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही. मी स्पेसिफिक प्रश्न विचारला होता की, जे तलाठी मुख्यालयी म्हणजे त्यांच्या सजाच्या गावात राहत नाहीत, त्या तलाठ्यांचा घरभत्ता बंद करणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, या बाबत निश्चित विचार करु.

श्री.रणधीर सावरकर : अध्यक्ष महोदय, हा विषय विचार करण्यासारखा नाही. एका गोष्टीमुळे संपूर्ण राज्यात अडचण होत आहे. शेतकऱ्यांना एका-एका कामासाठी जिल्ह्याला जावे लागते. एक तर त्यांचा घरभत्ता फ्रिज करावा लागेल. जे तलाठी घरभत्ता घेतात त्यामध्ये गावातील कोणा व्यक्तीची भाडेपट्टी लावतात. शासन म्हणून त्यांनी ज्या घराची भाडेपट्टी लावली त्या व्यक्तीला डीबीटीद्वारे पैसे हस्तांतरित करणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, मला प्रश्न समजला नाही.

श्री.रणधीर सावरकर : अध्यक्ष महोदय, आपण जेव्हा एचआरए देतो तेव्हा तलाठी व ग्रामसेवकांना भाडेपट्टी लावावी लागते की, मी या घरात भाड्याने राहतो. ते भाडे घरमालकाच्या नावाने जमा केले तर चुकीचे प्रकार आपोआप थांबतील.

अप्रकाशित प्रत

ता.प्र.क्र. ३८२५५....

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, तलाठ्यांनी सजामध्येच थांबले पाहिजे या करिता सक्त सूचना देण्यात येतील. जे तेथे थांबणार नाहीत, त्यांचे घरभाडे बंद करण्यात येईल.

-------

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

**मुंबई उपनगर, जिल्हाधिकारी कार्यालयातील भूमी अभिलेख विभागाकडून तपासणी केली असता काही नकाशे संशयास्पद असल्याबाबत**

**(२) * ३७८४९ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा)** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूमी अभिलेख विभागाकडे त्यांच्या अखत्यारीत परिसराचे अधिकृत नकाशे असून मुंबई उपनगर, जिल्हाधिकारी कार्यालयातील भूमी अभिलेख विभागाकडून उपनगरातील ८८४ नकाशांची तपासणी केली असता त्यातील १०२ नकाशे संशयास्पद असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूमी अभिलेख विभागातील व नकाशांमधील माहिती यामध्ये तफावत आढळून आल्याने हे संशयास्पद बदल कोणी केले याबाबत कागदोपत्री कोणतीही माहिती नसल्यामुळे या प्रकरणी खेरवाडी पोलीस ठाणे येथे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकूण ८८४ नकाशांपैकी १०२ नकाशे बनावट असून त्यावर जुने बांधकाम दाखविण्यात आल्यामुळे नाविकास क्षेत्र, सागरी किनारपट्टी नियंत्रण नियमावली विभागातील (CRZ) बांधकामे नियमित करण्याच्या उद्देशाने हा प्रकार करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता** : (१), (२) व (३) सन २०२० च्या पुर्वी सदर गुन्ह्यातील आरोपीत इसमांनी संगणमत करून उपअधिक्षक, भूमी अभिलेख, मुंबई उपनगर, मुंबई येथील ८८४ नकाशापैकी १०२ नकाशांचे बनावटीकरण करून त्यावर जुने बांधकाम दाखवून त्या नकाशाच्या आधारे CRZ / ND ZONE या प्रतिबंधीत क्षेत्रात जुने बांधकाम नियमित करून प्रतिबंधित

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३७८४९ ...

श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील ...

क्षेत्रातील लोकांचा फायदा करण्यासाठी शासनाची फसवणूक केल्याबाबत उपअधिक्षक, भुमी अभिलेख, मुंबई उपनगर, मुंबई यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार खेरवाडी पोलीस ठाणे मुंबई येथे गु.र.क्र. ४९०/२०२१, भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४०९, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(४) सदर प्रकरणी गुन्ह्याच्या तपासाकारीता उपअधिक्षक, भुमि अभिलेख, मुंबई उपनगर, मुंबई या कार्यालयाकडून सदरचे फेरफार व बनावट तयार केलेले १०२ नकाशे पंचनाम्यातंर्गत जप्त करण्यात आलेले आहेत. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.सुनील राणे : अध्यक्ष महोदय, उप अधीक्षक, भूमी अभिलेख, मुंबई उपनगर या कार्यालयाकडून मुंबई उपनगरातील ८८४ नकाशांची तपासणी केली. त्यामध्ये मुंबई उपनगरातील साधारणपणे १०२ नकाशे बोगस आढळले. हे बनावट तयार केलेले १०२ नकाशे जप्त करण्यात आले. ते नकाशे नेमक्या कोणत्या जागेचे होते, कोणत्या क्षेत्रामधील होते, याचे उत्तर या तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिलेले नाही.

अध्यक्ष महोदय, नकाशाचे बनावटीकरण करुन मुंबई उपनगर क्षेत्रातील प्रतिबंधित क्षेत्रामध्ये जी जुनी बांधकामे होती, ती नियमित करुन याचा फायदा नेमका कोणाला झाला, असा प्रश्न यातून निर्माण होत आहे. सरकारी खात्यामध्ये जणू काही भुताटकीचा प्रकार घडला. ८८४ पैकी १०२ नकाशे बनावट बनवले गेले व सरकारी खात्यामध्ये हे नकाशे समाविष्ट केले गेले.

अध्यक्ष महोदय, डिसेंबर, २०२१ मध्ये खेरवाडी पोलीस स्टेशनमध्ये याबाबत गुन्हा दाखल केला गेला. त्याला ४ महिने उलटून गेल्यावर हा गुन्हा कोणावर दाखल केला असे विचारल्यावर असे उत्तर देण्यात आले की, हा गुन्हा अनोळखी माणसांवर दाखल केला. याचे उत्तर माननीय गृह मंत्री देतील काय?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३७८४९ ...

श्री.सुनील राणे...

अध्यक्ष महोदय, शासकीय कार्यालयातील नकाशात फेरफार झाला. हा फेरफार झाल्या प्रकरणी गोरेगाव पोलीस स्टेशनमध्ये सन २०२० मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा कोणत्या लोकांवर दाखल झाला होता, त्यांची नावे समजतील काय, कोणत्या क्षेत्रामध्ये हे बदल घडले गेले, हे बदल या मुंबईच्या मालवणी परिसरातील होते काय?

श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : अध्यक्ष महोदय, या ८०० नकाशांचे क्षेत्र प्रचंड मोठे आहे. त्या स्पेसिफिक ११२ क्षेत्रांची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु, मालवणी किंवा एरंगळ अशा भागातील हे सर्व नकाशे आहेत. त्या संदर्भात १ वर्षापूर्वी ज्यावेळेस तक्रार करण्यात आली, त्यावेळेस उप अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी याची चौकशी केली. त्या चौकशीनंतर स्वत: उप अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली.

अध्यक्ष महोदय, या १०० च्यावर असलेल्या नकाशांची तपासणी करुन महापालिकेचे अधिकारी व भूमी अभिलेखचे अधिकारी मिळून या सर्व प्रकरणामध्ये जे प्रत्यक्ष घडलेले आहे, त्याची पाहणी करीत आहेत. ती स्थळ पाहणी करुन नेमके १९६० चे नकाशे दाखवून सीटी सर्व्हेच्या आधीचे हे ...(अडथळा)... १९६० चे नकाशे दाखवून या गोष्टी करण्यात आल्या.

अध्यक्ष महोदय, ही माहिती समोर आल्यानंतर शासनाने याबाबत पोलिसांकडे सु-मोटो तक्रार दाखल केली. महसूल मंत्री महोदयांनी जमावबंदी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली. या कमिटीचे टर्म्स अँड रेफरन्सेस ठरले गेलेले आहेत. त्या कमिटीच्या ४ बैठका झाल्या. हे रेकॉर्ड जोपर्यंत महापालिकेकडून उपलब्ध होत नाही. महापालिकेने या जमिनीवरच्या बांधकाम परवानग्या कोणाला दिल्या..... तिथे असणारे जुने एक्झीस्टींग बांधकाम दाखवून नवीन बांधकामाची परवानगी घेण्यात आलेली आहे, हे सत्य आहे.

ता.प्र.क्र. ३७८४९ ...

श्री.अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांच्या उत्तराला माझी हरकत आहे. मंत्री महोदय दुर्दैवाने मुंबई शहरातील या अत्यंत महत्वाच्या प्रश्नाच्या बाबतीत गोलमाल उत्तर देत आहेत. माझ्या ३ स्पेसिफिक प्रश्नांचे उत्तर त्यांनी द्यावे. किती जणांना अटक केली, मुंबई महानगरपालिका कागदपत्र का देत नाही, या संदर्भात तुम्ही काय कारवाई केली?

श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : अध्यक्ष महोदय, मला माझे उत्तर पूर्ण करण्याची संधी द्यावी. हे प्रकरण २-३ महिन्यातील नाही. हे प्रकरण सन २०१० पासून सुरु आहे.

नंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३७८४९...

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील...

११२ नकाशांची तपासणी करावयाची आहे, स्थळ पाहणी करावयाची आहे. गुन्हा दाखल होऊन ३ महिने झाले आहेत. या कालावधीत पोलिसांनी महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या समवेत ११ जागांची स्थळ पाहणी केलेली आहे. आरटीआय मधून नकाशे मागण्यात आले आहेत. आरटीआय अंतर्ग माहिती मागणाऱ्या लोकांना बोलवण्याचे काम सुरु आहे. या प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याने तपासामध्ये दिरंगाई होत नाही. तक्रार आल्यानंतर भूमी अभिलेख कार्यालयाने गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी कोणाला पाठीशी घातले किंवा अटक करण्यात आली नाही, असे म्हणणे सयुक्तिक नाही. या प्रकरणी निश्चितपणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय कोणाला वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत काय, याबाबत माझ्या मनात शंका आहे. माझा त्यांच्यावर पूर्ण विश्वास आहे. हा गंभीर विषय आहे. मुंबईतील त्या जागेवर प्रत्यक्षात बांधकाम नसताना बांधकाम आहे, असे दाखविले गेले आहे ते का दाखविण्यात आले आहे ? सीआरझेड व एनडीझेड क्षेत्रात बांधकाम करता येत नाही. समुद्र किनारी थंडगार हवा घ्यावयाची असेल तर रस्त्याचे काम कसे करणार ? भूमि अभिलेख उप अधिक्षक यांचेकडे सेटींग लावून सीआरझेड व एनडीझेड क्षेत्रात सन १९६० पूर्वीचे बांधकाम आहे, असे कागदोपत्री दाखविल्यास सीआरझेड व एनडीझेडचे नियम लागू होत नाहीत. अशा पध्दतीने बंगले व मदरसे उभे राहिले. मालवणी व एरंगळ या भागात खूप मोठ्या प्रमाणात शुटींगसाठी मोठी बांधकामे उभारण्यात आली आहेत. त्या माध्यमातून दिवसाला १ कोटी रुपये भाडे आकारण्यात येते. मुंबई महानगरपालिका सन २०१० पासून काय करीत आहे ? खोट्या नकाशांच्या आधारे मुंबईमहानगरपालिकेकडून परवानगी मागण्यात आली व ती देताना महानगरपालिकेने उलट तपासणी केली नाही. त्यामुळे अशा पद्धतीचे बंगले, शुटींगचे बांधकाम, मदरसे व इतर अनधिकृत बांधकामे उभी राहिली आहेत. यासर्व प्रकरणात खूप मोठा आर्थिक

ता.प्र.क्र.३७८४९...

ॲड.आशिष शेलार...

व्यवहार झाला आहे. यामध्ये मुंबई महानगरपालिका व भूमि अभिलेख कार्यालयाचे अधिकारी सामील आहेत. या प्रकरणी सीआरझेड कायद्याचा भंग झाला आहे. केंद्रीय कायद्याचाही भंग झाला आहे. या प्रकरणातील सर्व गुन्हेगारांना मोक्का लावला पाहिजे, कारण ही संघटीत गुन्हेगारी आहे. मंत्री महोदय आपण निष्पक्ष कारवाई करावी. या प्रकरणात मालवणी भागातील लोकप्रतिनिधी यांचाही सहभाग आहे. हे लोकांच्या मनातले सत्य आहे. मी आज यावर बोलत नाही. एवढा मोठा भूखंड घोटाळा दुसरा कोणताही नाही. त्यामुळे याप्रकरणी संघटीत गुन्हेगारी अंतर्गत मोक्का लावून चौकशी करणार का ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी म्हटल्याप्रमाणे या प्रकरणाची व्याप्ती मोठी आहे, याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. एखादा गुन्हा सिद्ध करण्यासाठी त्यासंदर्भात कारवाई करीत असताना आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करणे अपेक्षित असते. जमाव बंदी आयुक्त यांचा अहवाल प्राप्त होईल. परंतु त्यापुर्वी आज मी सभागृहामध्ये या प्रकरणातील आरोपिंवर मोक्का लावण्याबाबत घोषणा केली व पुढील काळात त्यांची सुटका झाली तर आपण मला जबाबदार धराल. शासन म्हणनू एखादी घोषणा करुन कारवाई करण्यात येते ती कायद्या पुढे टिकली पाहिजे. या प्रकरणी ज्या गोष्टी आढळून येतील त्यासंदर्भात कायद्यानुसार अभिप्रेत असलेली कारवाई निश्चितपणे करण्याची भूमिका शासनाची राहील.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३७८४९......

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, सदर अहवाल येईल. पोलिसांना चौकशी करण्यासाठी कोणीही थांबविलेले नाही. जर पोलिसांना चौकशी करण्यापासून थांबविले तर याचा अर्थ त्या विभागामध्ये....

(मंत्री महोदय खाली बसून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी असे स्टेटमेंट केलेले आहे. असत्य रेकॉर्डवर येत आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. उक्त प्रकरणामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार झालेला आहे. केंद्रीय कायद्यांचा भंग झालेला आहे. सी.आर.झेड.चे देखील उल्लंघन झालेले आहे. या प्रकरणामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेतील काही अधिकाऱ्यांचा हात असल्याचे मंत्री महोदयांनीच सांगितले आहे. सन २०१० पासून continuing offence आहे. सदर प्रकरणाचा अहवाल आपण घ्यावा. यासाठी आमची कोणतीही हरकत नाही. उक्त प्रकरणी मोक्काअंतर्गत गुन्हा दाखल केला तर संघटितरीत्या सर्वांची चौकशी करता येईल. त्या भागातील आपण कोणालातरी वाचवण्याचा प्रयत्न करीत आहात काय? सर्व अहवाल घेऊन उक्त प्रकरणी मोक्काअंतर्गत गुन्हा दाखल करुन चौकशी करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, उक्त प्रकरणी आपण कोणालाही वाचवण्याची भूमिका घेऊ नका, अशी माझी विनंती आहे. उक्त प्रकरणाची केंद्रीय कायद्यांतर्गत चौकशी झाली तर या सदनातील संबंधित लोकांपर्यंत आच येईल. त्यामुळे आपण उक्त प्रकरणी मोक्काअंतर्गत कारवाई करणार आहात काय, याचे फक्त एका वाक्यात उत्तर द्यावे.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : अध्यक्ष महोदय, उक्त प्रकरणी पोलीस तपास करीत आहेत. तपासणी अहवालामध्ये सकृतदर्शनी कोणी दोषी असल्याचे आढळून आल्यानंतर त्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची सरकारची भूमिका असेल.

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, आताच मंत्री महोदयांनी सांगितले की, उक्त तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल. परंतु यासाठी बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे माझी अशी विनंती

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३७८४९......

श्री.रविंद्र वायकर........

आहे की, हे अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वी जागानिहाय सर्व नकाशांची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहात काय?

अध्यक्ष महोदय, उक्त प्रकरणी किती आरोपींना अटक करण्यात आली होती व त्या आरोपींची नावे काय आहेत? उक्त प्रकरणामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांचा व महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांचा हात असल्याचे आपण सांगत आहात. त्यांची नावे व पदनाम काय आहेत, आपण त्यांच्यावर काय कारवाई केलेली आहे, याबाबतची माहिती देणार आहात काय?

अध्यक्ष महोदय, उक्त प्रकरणी १०२ बनावट नकाशे तयार करण्यात आले होते. परंतु ही बाब लक्षात आल्यानंतर उक्त १०२ नकाशामध्ये शासनाने आवश्यक बदल केले आहेत काय? तसेच १०२ बनावट नकाशे तयार केल्यामुळे कोणत्या विकासकांना किती फायदा झालेला आहे, त्यामुळे शासनाचे किती नुकसान झालेले आहे, संबंधित विकासकांची नावे काय आहेत व त्यांच्यावर शासनाने काय कारवाई केलेली आहे?

(दोन्ही बाजुचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न गृह विभागासह तीन विभागाशी.....

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिलेली आहे. त्यामुळे आपण माझ्या अधिकाराचे संरक्षण करावे. आपण मला बोलण्याची संधी दिलेली आहे, त्यामुळे मला बोलण्याचा अधिकार आहे. सदर प्रश्न गृह विभागाकडे संदर्भित झाला असला तरी.....

(सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव मध्येच बोलण्याचा प्रयत्न करतात.)

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३७८४९......

श्री.योगेश सागर.......

अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांना सांगू इच्छितो की, आपण बोलत असताना मी कधीही अडथळा निर्माण करीत नाही.

असुधारित प्रत

**पॉईंट ऑफ प्रोसिजरबाबत**

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, उक्त प्रश्नावर सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर यांनी प्रश्न विचारण्यास कोणतीही हरकत नाही. परंतु सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र वायकर यांनी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर मंत्री महोदयांनी दिल्यानंतर आपण प्रश्न विचारावा.

(सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर खाली बसून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

अध्यक्ष महोदयांचे काय अधिकार आहेत, हे आम्हाला माहिती आहे. त्यामुळे ते आपणाकडून शिकण्याची आवश्यकता नाही. मी पॉईंट ऑफ प्रोसिजवर बोलत आहे. सभागृहाच्या कामकाजाची पद्धत सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. प्रथम सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर यांनी प्रश्न विचारलेला आहे. त्यांच्या प्रश्नाचे उत्तर दिल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर यांना प्रश्न विचारण्याची संधी द्यावी, अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३७८४९....

## पॉईंट ऑफ प्रोसिजरबाबत

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, मी सुरुवातीला पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा होतो. या सभागृहामध्ये काही निती, नियम आहेत. (...अडथळा...) तुम्हाला सभागृहामध्ये घेतले तेव्हा आपण त्यावर बोलावयास हवे होते. यांना सभागृहामध्ये घेतल्याबद्दल मला बोलावयाचे आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाचा उल्लेख केला गेला. त्यामुळे आता मला त्यावर बोलावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय, या सन्माननीय सदस्यांना सभागृहामध्ये कसे घेतले, यावर मला बोलावयाचे आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने यांना कशा प्रकारे सभागृहात घेतले आहे, यावर मी बोलणार आहे. मी पॉईंट ऑफ प्रोसिजरवर बोलण्यासाठी उभा होतो तेव्हा सन्माननीय सदस्य श्री. योगेश सागर यांनी मला माननीय सर्वोच्च न्यायालयाने कोणती नीतिमत्ता सांगितली आहे, हे सांगितले होते. (....अडथळा....) सन्माननीय सदस्यांना सभागृहात घेतल्याबद्दल माझा आक्षेप नाही.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र सरकारने आणि महाराष्ट्र संसदीय मंडळाने आज लोकशाहीमध्ये संसदीय कार्य मंडळ मोठे का न्यायपालिका मोठी, याबाबत देशाला मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयास सुद्धा संसदीय कार्यमंडळाच्या निर्णयामध्ये हस्तक्षेप करता येत नाही, हे सांगण्याची संधी महाराष्ट्र सरकारने आणि महाराष्ट्र संसदीय मंडळाने गमाविलेली आहे. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावतो आहे. संसदीय कार्यमंडळाच्या निर्णयामध्ये पुढे चालून माननीय सर्वोच्च न्यायालय, माननीय उच्च न्यायालय, जिल्हा न्यायालय आणि कनिष्ठ दिवाणी न्यायालय हस्तक्षेप करेल. या सन्माननीय सदस्यांना सभागृहाने बाहेर काढले होते. माननीय सर्वोच्च न्यायालयाने त्यांना बाहेर काढलेले नव्हते. या सन्माननीय सदस्यांना आतमध्ये घेण्यापूर्वी या सभागृहाचा ठराव व्हावयास हवा होता. त्यानंतरच या सन्माननीय सदस्यांना सभागृहात घ्यावयास पाहिजे. मी विचारु इच्छितो

श्री. भास्कर जाधव ......

की, या सन्माननीय सदस्यांना आपण कसे सभागृहामध्ये घेतले आहे ? आपल्या अधिकारावर यामुळे गदा आणली जात आहे.

अध्यक्ष महोदय, याच सभागृहामध्ये सन १९६५ मध्ये दिनांक ९, १० व ११ डिसेंबर रोजी बैठक झाली होती. संसदेचे अध्यक्ष माननीय श्री. सोमनाथ चॅटर्जी यांनी सांगितले की, माननीय सर्वोच्च न्यायालय मोठे नसून संसदीय पालिका मोठी आहे. मणिपूर विधानसभा अध्यक्ष श्री. बोरा बाबुशी यांनी २१ आमदारांना निलंबित केले होते. त्यावेळेस माननीय सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप केला होता. (....अडथळा....) यांना बाहेर काढले पाहिजे होते.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

**उपाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी आपापल्या जागेवर बसावे.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, यांनी लोकशाहीची विटंबना केली आहे. लोकशाहीची विटंबना केलेल्या लोकांना सभागृहात कसे घेतले ? हे या सभागृहाला जाणून घ्यावयाचे आहे. यावर स्वतंत्र चर्चा झाली पाहिजे. सभागृहाने ठराव करुन या सदस्यांना बाहेर काढले होते. (.....अडथळा.....)

**उपाध्यक्ष :** सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक सकाळी ११.३४ ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.दीपक चव्हाण)**

**तालिका सभाध्यक्ष :** आता प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

**पॉइंट ऑफ प्रोसिजरबाबत**

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, भारतीय जनता पक्षातील माझ्या सन्माननीय सदस्य मित्रांना मी सांगू इच्छितो की, आपणास या सभागृहामध्ये परत घेतले याबाबत मी अजिबात आक्षेप घेतलेला नाही... (अडथळा...)

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे शांतपणे ऐकून घेतल्यास माझा मुद्दा त्यांच्या देखील लक्षात येईल. सन्माननीय सदस्यांना पुन्हा सदनामध्ये का घेतले हा माझा मुद्दा नसून मी सातत्याने बाहेर देखील भूमिका मांडत आलो आहे की, न्यायपालिकेने विधीमंडळाच्या हक्कांवर या माध्यमातून अधिक्षेप केला आहे का, हा खरा प्रश्न आहे. सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात दिलेला निर्णय केवळ महाराष्ट्र राज्यापुरता मर्यादित राहणार नाही तर प्रेसिडेंट म्हणून संपूर्ण देशासाठी लागू होईल.

अध्यक्ष महोदय, भारतीय जनता पक्षाचे सन्माननीय सदस्य हे आमचे दुश्मन नाहीत. मी तर कोणासोबतही व्यक्तिगत दुश्मनी ठेवत नाही... (अडथळा...)

अध्यक्ष महोदय, निलंबित केलेल्या सन्माननीय सदस्यांना आपण कायमचे सभागृहाबाहेर ठेवणार नव्हतो व तसे ठेवू देखील नये हे आजही मी या निमत्ताने सांगू इच्छितो. मुद्दा एवढाच आहे की, तालिकेवर असताना श्री.भास्कर जाधव यांनी घेतलेला नव्हे तर माननीय विधानसभा अध्यक्षांनी घेतलेला निर्णय सर्वोच्च न्यायालयाने बदलला आहे व तो आपण मान्य केला आहे. उद्या कोणीतरी उच्च न्यायालयामध्ये गेल्यानंतर उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय देखील आपण मान्य करणार आहोत का ? त्यापुढे जाऊन जिल्हा न्यायालयामध्ये कोणी गेले व त्या न्यायालयाने देखील आपल्या अधिकारांमध्ये हस्तक्षेप केला तर तो आपण मान्य करणार आहोत का ?.. (अडथळा...) सन्माननीय सदस्यांनी अगोदर माझे म्हणणे ऐकून घ्यावे.

असुधारित प्रत

श्री.भास्कर जाधव.....

अध्यक्ष महोदय, न्यायपालिकेचा या माध्यमातून विधीमंडळाच्या अधिकारांवर अधिक्षेप होत आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकार व विधीमंडळाने ही लढाई लढायला हवी होती, असे माझे स्पष्ट मत आहे... (अडथळा...)

अध्यक्ष महोदय, दुसरी गोष्ट अशी की निलंबित करण्यात आलेल्या सन्माननीय सदस्यांना सभागृहामध्ये घेण्यात आले, ते कामकाजामध्ये सहभागी देखील होत आहेत त्यामुळे तो विषय संपला आहे. परंतु या विषयाचा कधी तरी आपण मुकाबला करणे भाग होते. सभागृहाच्या ठरावानुसार सन्माननीय सदस्यांना निलंबित करण्यात आले होते. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आपण कशाच्या आधारे व कोणत्या कारणास्तव स्वीकारला याबाबत संपूर्ण सभागृहाला अवगत करणे गरजेचे होते व तसे जाणून घेण्याचा सभागृहाचा हक्क आहे, हाच माझा मूळ मुद्दा आहे.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी पॉइंट ऑफ प्रोसिजरच्या माध्यमातून मांडलेल्या मुद्दयावर बोलण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले यांनी देखील काल हा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केल्याचे वर्तमानपत्रातून आमच्या निदर्शनास आले... (अडथळा...) सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले यांना मी सांगू इच्छितो की, मी या ठिकाणी आपल्या परवानगीने आलेलो नाही. आपण खाली बसून बोलू नये.

यानंतर श्री.धुमाळे.....

ॲड आशिष शेलार...

अध्यक्ष महोदय, मी या ठिकाणी जे बोलत आहे ते माझे मत नाही तर माननीय सुप्रीम कोर्ट आणि माझे असे दोन्हींचे एकत्रित मत मांडतो. खऱ्या अर्थाने या निकालावर सभागृहात चर्चा व्हावी की नाही, हाही एक प्रश्न आहे. पण सन्माननीय सदस्यांनी मूळात ४ प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांना एक मागणी केली की, माननीय सुप्रीम कोर्टाने नेमके काय म्हटले आहे, ते या सदनाला समजले पाहिजे. ते जाणून घेण्याचा आमचा अधिकार आहे, हा पहिला मुद्दा त्यांनी मांडला. दुसरा मुद्दा त्यांनी असा मांडला की, आमच्या अधिकाराचे काय, या सभागृहाच्या अधिकाराचे काय, आणि तिसरे म्हणजे आपण जो ठराव केला होता, त्या ठरावाचे काय झाले. जर तो ठराव नसेल तर दुसरा ठराव करुन आपल्याला सभागृहात का घेण्यात आले नाही तसेच आजची नेमकी स्थिती काय आहे, आणि ५ वा विषय त्यांनी मांडला की, समजा अशाच पध्दतीने न्यायालये खालच्या कोर्टापर्यंत गेले तर काय स्थिती होईल, असे ५ मुद्दे सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी उपस्थित केले आहेत.

अध्यक्ष महोदय, भारतीय जनता पक्षाची भूमिका मी अतिशय स्पष्टपणे विषद करतो की, या सदनाच्या अंतिम अधिकाराला... जे तुमचे मत आहे तेच भारतीय जनता पक्षाचे मत आहे. किंबहूना या सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांचे तेच मत आहे की, हे सभागृह सर्वतोपरी आहे. असलेच पाहिजे आणि त्याबद्दल तुमचे आणि आमचे वेगवेगळे मत असण्याचे कारण नाही. हा झाला पहिला विषय आहे. दुसरे म्हणजे आपल्या अधिकरात सुप्रीम कोर्ट आले आहे काय, याच्यावर डिबेट झाले पाहिजे. माझ्या हातामध्ये ८९ पानांचे असलेले ते जजमेंट आहे. त्या जजमेंटमध्ये मला जर कोणी विचारले की, आपल्या अधिकारात कोर्ट आले आहे काय तर याचे उत्तर माझ्या दृष्टीने नाही असे आहे. सभागृहाच्या अधिकारात कोर्टाने हस्तक्षेप केला आहे काय तर नाही, असे माझे त्याला उत्तर आहे. त्याचे कारण मी सांगतो. या ठिकाणी पान क्रमांक ८९ वरील परिच्छेद क्रमांक ७५ मध्ये जे कन्क्लूजन कोर्टाने केले

असुधारित प्रत

ॲड आशिष शेलार...

हे त्याचे वाचन करतो. "In conclusion, we have no hesitation in allowing these writ petitions" म्हणजे आमचे पिटीशन, पुढे असे नमूद केले आहे की, "and to declare that the impugned resolution" म्हणजे आपला ठराव, पुढे असे नमूद केले आहे की, "directing suspension of the Petitioners beyond the period of the remainder of the concerned Monsoon Session held in July, 2021 is *non est* in the eyes of law, nullity, unconstitutional, substantively illegal and irrerational. The impugned resolution is, thus, declared to be ineffective in law, insofar as, the period beyond the remainder" मी पुन्हा सांगतो, "the period beyond the remainder of the stated session in which the resolution came to be passed." याचा अर्थ असा आहे की, आपण जो ठराव मंजूर केला तो ठराव सुप्रीम कोर्टाने illegal, irrational and unconstitutional म्हटला आहे. याचा अर्थ सुप्रीम कोर्टाने ज्या ठरावावरुन आपण प्रश्न उपस्थित करीत आहात त्या ठरावाचे काय झाले तर त्या ठरावाला माननीय सर्वोच्च न्यायालयाने अवैध, अतार्किक व असंवैधानिक आहे, असे म्हटले आहे. तरीही असे म्हणतो की, त्यांनी आपल्या अधिकारात हस्तक्षेप केला नाही. कारण त्यांनी २ ठिकाणी असे म्हटले आहे की, "beyond the period of the remainder of the session" याचा अर्थ सभागृहाला सस्पेंड करण्याचा जो अधिकार आहे तो फक्त remainder of the days of Session पुरता आहे आणि तेवढ्या पुरत्या सभागृहाच्या सस्पेंड करण्याच्या अधिकारामध्ये सुप्रीम कोर्टाने हात घातलेला नाही. for the remainder of the days आणि सस्पेन्शनचा अधिकार या दोन्हीला मी एका अर्थाने म्हटले तर they have held up, त्यांनी योग्य ठरविले आहे. पण त्यानंतर जो कालावधी आहे, जो या ठरावाचा भाग आहे, जो एक वर्षाचा आहे त्या ठरावाला त्यांनी अनधिकृत, अवैध, असंविधानिक म्हटले आहे. हा त्यामधील स्पष्ट मुद्दा आहे. त्यामुळे त्या ठरावाचे काय झाले तर तो अवैध झाला.

ॲड आशिष शेलार...

आपल्या अधिकाराचे काय झाले तर remainder of the session एवढ्या पुरता आपला अधिकार त्यांनी अबाधित ठेवला आहे. आपले म्हणणे होते की, सुप्रीम कोर्टाचे म्हणणे या सभागृहाला सांगावे, तर त्यावर आमची हरकत नाही. सुप्रीम कोर्टाचे जे म्हणणे आहे ते संसदीय कार्य मंत्री यांनी नोट आणून सांगावे किंवा कोणीही सांगावे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

ॲड. आशिष शेलार.....

अध्यक्ष महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्री ॲड. अनिल परब यांना मी सांगू इच्छितो की, हे सर्व सोडून नेमकी काय स्थिती आहे हे मला या ठिकाणाहून बोलणे उचित वाटत नाही. या विषयाबाबत सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांची तळमळ आणि त्यांची प्रामाणिकता ही मी समजू शकतो. एका वादापुरता हा सर्व विषय आपण बाजूला ठेवू. ज्यावेळेला या विषयावर न्यायालयामध्ये केस सुरु होती तेव्हा न्यायालयाने सांगण्यापूर्वी आम्ही तसे केलेच होते. परंतु न्यायालयाने पुन्हा एक तारीख देऊन आम्हाला सांगितले की, "आपण पुन्हा एकदा विधीमंडळाला सर्व्हिस द्या." ती सर्व्हिस आम्ही नस्तीसहित विधीमंडळाला केलेली आहे. आज सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव हे गमावलेली संधी पुन्हा मागत आहेत. विधीमंडळाला नोटीस आणि नस्ती सर्व्ह केल्यानंतर विधीमंडळाने असा निर्णय केला की, आम्ही न्यायालयासमोर बाजू मांडणार नाही किंवा आम्ही न्यायालयासमोर येणार नाही. मग विधीमंडळ न्यायालयासमोर न येता सरकार न्यायालयासमोर आले. त्यामुळे आपण जी न्याहिक व्यवस्था मान्य केली आहे त्यामध्ये विधीमंडळाने आपले म्हणणे मांडण्याची संधी गमावली. दुसरी असे की, मी पुन्हा आपली तळमळ समजू शकतो. पण आपण हे लक्षात घ्या की, ८९ पानाचे, तीन न्यायाधिशांच्या बेंचचे जजमेंट आल्यानंतर सरकारने किंवा विधीमंडळाने त्याला न्यायालयात आव्हान ही दिलेले नाही.

अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये आज जो मुद्दा उपस्थित करीत आहात किंवा सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले सभागृहाबाहेर इम्प्रेशन तयार करण्यासाठी काही मुद्दे उपस्थित करीत आहेत. त्याला कायद्याचा काहीही आधार नाही. नेहमी विपर्यासाचे राजकारण करणे हे काही वरिष्ठ सन्माननीय सदस्यांचे काम आहे. पण मी त्यात आपल्याला गणत नाही. कारण आपण तर कायद्याबद्दल बोलत आहात. ...(अडथळा)...

अध्यक्ष महोदय, माझ्या मते बहुतेक सर्वोच्च न्यायालयाला सुद्धा सभागृहाच्या कार्यवाहीमध्ये यायचे नव्हते. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने चालू केसमध्ये असे

ॲड. आशिष शेलार.....

इंटरिम ऑर्डर दिले की, मागचे अधिवेशन सुरु असताना या सन्माननीय सदस्यांनी विधीमंडळासमोर जावे आणि विधीमंडळाने सुद्धा या सदस्यांचे म्हणणे ऐकावे. तुमच्या ऐकण्यात आणि तुमच्या सुनावणीत आम्हाला यायचे नाही त्यामुळे तुम्ही उरलेल्या काळापुरता या विषयात काय निर्णय घ्यायचा तो तुम्ही आपापसात घ्या. अशा प्रकारची संधी सुद्धा सर्वोच्च न्यायालयाने दिली. आम्ही १२ सदस्यांनी अर्ज केला आणि विनंती केली तेव्हा विधीमंडळाच्या कार्यकाळात आपण साधी सुनावणीची नोटीस सुद्धा काढली नाही. सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीमध्ये एकदा नाही तर  दोन वेळा असे सांगितले की, विधीमंडळ constitutional void म्हणजे संविधानाची अडचण निर्माण करीत आहे. दुसरे असे की, सर्वोच्च न्यायालयाने केवळ स्ट्रिक्चर दिले पण आदेश दिले नव्हते. तुमचे सस्पेंशन is worse than expulsion, तुमचे निलंबन हे एक्सप्लशनपेक्षा गंभीर आहे. या पद्धतीचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्यामुळे सर्वोच्च न्यायालय यामध्ये येण्यासाठी तयार नव्हते. त्यांनी विधीमंडळाला स्वत:ची बाजू देण्याची संधी दिली होती. ती संधी देखील फेटाळून लावली. तसेच अपिल करण्याचा विषय देखील आपण खारीज केला. न्यायालयाने आपल्याला संधी आणि इशारा दिल्यानंतर सुद्धा आपण केवळ अहंकारामध्ये राहिलो आहे. त्यामुळे त्या अहंकारातून हा ठराव illegal, unconstitutional, irrational झालेला आहे. त्यामुळे त्या ठरावाचे काय झाले, हा म्हणण्याचा प्रश्नच येत नाही. त्या पलिकडे जाऊन remainder of the days नंतर म्हणजे जुलै, २०२१ च्या अधिवेशनातील remainder of the days नंतर, तोपर्यंत न्यायालयाने आमचे ही अधिकार काढून घेतले. त्यानंतरचे सर्व अधिकार आम्हाला बहाल केले पाहिजे. अशा प्रकारचा निर्देश सुद्धा न्यायालयाने दिलेला आहे. त्यामुळे रिमाइंड पुरते न्यायालय सस्पेंशनच्या बाजुने आहे. त्यानंतरच्या रिझॉल्युशनमधील ठरावाला विरोध आहे म्हणून तो ठराव इलिगल झालेला आहे. हे त्यातील सत्य मी मांडले आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

ॲड. अनिल परब : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी या ठिकाणी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे वाचन केले. त्यांनी जसा या संबंधी अभ्यास केला तशाच प्रकारे आम्ही देखील या संबंधी व्यवस्थित अभ्यास केलेला आहे. लोकशाहीचे चार स्तंभ आहेत. त्यांनी एकमेकांच्या कामकाजात हस्तक्षेप करायचा की नाही, असा या ठिकाणी मुद्दा उपस्थित झालेला आहे. प्रत्येकाने आपल्याला काय अधिकार आहेत ... सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार काय आहेत, विधानमंडळाचे अधिकार काय आहेत, इतर जे दोन स्तंभ आहेत त्यांचे अधिकार काय आहेत या संबंधी देशभरात आज पर्यंत अनेकदा चर्चा झालेली आहे. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी या ठिकाणी निर्णय वाचला त्या संबंधी त्यांनी आपल्या सोयीने अर्थ काढला, असे दिसत आहे.

अध्यक्ष महोदय, माझे म्हणणे आपण ऐकून घ्यावे. हा प्रश्न निर्माण झाला की, सभागृहात मंजूर झालेला ठराव योग्य आहे की, अयोग्य. या सर्व विषयावर बरीच चर्चा झाली. या संबंधी आतापर्यंत सर्वोच्च न्यायालयामध्ये बरेच निर्णय झालेले आहेत. या देशाच्या संसदेच्या सर्वोच्च पदी असलेले माननीय अध्यक्ष श्री. सोमनाथ चॅटर्जी यांनी त्या वेळी काय भूमिका घेतली होती, सर्वोच्च न्यायालयाचे काय म्हणणे होते या सर्व गोष्टींमध्ये मी आता जात नाही. एक गोष्ट नक्की आहे की, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी आता जो ठराव व इतर काही वाचले या मधील दोन परिच्छेदामध्ये काय नमूद केले, हे मी एका ओळीत सांगतो. या सर्व घटनेचे सर्वोच्च न्यायालयाने निरीक्षण करुन ऑर्डर दिलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाने कोठेही विधीमंडळाने केलेला ठराव अवैध आहे, असे म्हटलेले नाही. सर्वोच्च न्यायालयाने असे नमूद केले आहे की, जी शिक्षा दिलेली आहे, त्या शिक्षेचा कालावधी अवैध आहे. (अडथळा )

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण ):** सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांचे बोलणे ऐकून घ्यावे.

ॲड. अनिल परब : अध्यक्ष महोदय, त्यांचे म्हणणे आपण पूर्ण ऐकून घेतले, आता माझे म्हणणे देखील आपण पूर्ण ऐकून घ्यावे. मी देखील हे वाचलेले आहे. मी

त्याचा सारांश आपल्याला सांगत आहे. यांनी केलेला अपराध किंवा ज्या बद्दल विधिमंडळाने शिक्षा केलेली आहे, ही शिक्षा सर्वोच्च न्यायालयाने मान्य केलेली आहे. शिक्षा म्हणजे फाशी की, जन्मठेप. फाशी नव्हे तर जन्मठेप द्या, अशा भाषेत न्यायालयाने वर्णन केले आहे. शिक्षा देण्याचा विधिमंडळाचा अधिकार होता. विधीमंडळाने ठराव केला असून एक वर्षाच्या शिक्षेचा ठराव आपल्याकडे दिला होता. तो ठराव बहुमताच्या जोरावर मंजूर झाला होता. त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप केला. त्यांनी असे सांगितले की, जी शिक्षा आपण दिली आहे ती जास्त असल्यामुळे.... एखाद्या अपराध्याने एखादा गुन्हा केला व त्याला जर फाशीची शिक्षा दिली व तो जर अपिलामध्ये गेला तर न्यायालयाने असे सांगितले की,त्याला फाशी देऊ नका तर त्याला जन्मठेप द्या. याचा अर्थ त्याचे निर्दोषत्व सिध्द होत नाही. त्याचा गुन्हा मान्य केला जातो. हा गुन्हा सर्वोच्च नयायालयात मान्य झालेला आहे. त्या बाबत कोणताही डंका पिटवण्याचे कारण नाही. कोर्टाने ठराव अवैध आहे, असे ठरवलेले नाही. सर्वोच्च नयायालयाने केवळ शिक्षेचा कालावधी पुरता हस्तक्षेप केलेला आहे. त्यामुळे या ठिकाणी असे पुन्हा पुन्हा सांगितल जात आहे की, सर्वोच्च नयायालयाने यांचा ठराव अवैध ठरविला आहे, हे चुकीचे आहे. केवळ शिक्षेच्या कालावधी बाबत सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप केला आहे. शिक्षेचा जो कालावधी दिला होता तो कमी करावा.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांचे असे म्हणणे होते की, जर एखादी गोष्ट ठरावाने झालेली आहे तर विधिमंडळाच्या प्रथा, परंपरा व नियम या नुसार ती शिक्षा परत घेताना देखील विधिमंडळाचा ठराव व्हावयास हवा होता.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. योगेश सागर आपण खाली बसावे.

ॲड. अनिल परब : अध्यक्ष महोदय, आता हा प्रश्न डिबेटचा झाला आहे. यावर पुन्हा चर्चा घडू शकते की, विधीमंडळाने केलेला ठराव... माझ्या स्वत:चे एक उदाहरण सांगतो. सन २०१० मध्ये विधान परिषदेची निवडणूक झाली. तेव्हा मनसेचे १३ आमदार निलंबित केले होते. या १३ आमदारांनी आत येऊन मतदान केले होते

तेव्हा मी सर्वोच्च न्यायालयात गेलो होतो. तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, सभागृहाच्या आत जे काही होते त्याच्याशी आमचा काही संबंध नाही. हा निर्णय माझ्याकडे आहे. सदनाच्या कामकाजात हस्तक्षेप करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला नाही, असे त्यांनी वारंवार मान्य केले आहे. तरी देखील आपल्या या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने शिक्षेच्या कालावधी बाबत आपले ऑब्जेक्शन घेतले आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

ॲड.अनिल परब ...

तुम्ही त्याचा फायदा घेऊन हा ठरावच अवैध आहे, असे म्हणत आहात. हा ठराव अवैध नाही. आम्ही देखील कायदे तज्ज्ञांचे मत घेतलेले आहे. आम्ही देखील त्याबाबतीत म्हटले आहे. तुम्ही परत अपील करण्याबाबत बोलत आहात. मात्र यावर परत रिव्ह्यू होऊ शकत नाही. त्यामुळे आम्ही राष्ट्रपती महोदयांना पत्र दिलेले आहे. सभागृहाच्या माननीय अध्यक्षांनी व माननीय सभापतींनी आज राष्ट्रपती महोदयांना पत्र दिलेले आहे. राष्ट्रपती महोदयांकडे आम्ही अशी मागणी केली आहे की, राष्ट्रपती महोदय आपण प्रत्येकाचे अधिकार काय आहेत ते ठरवा.

अध्यक्ष महोदय, वेगवेगळया राज्यांच्या सभापती महोदयांच्या व अध्यक्ष महोदयांच्या अधिकारांचे संरक्षण करणे ही आता महामहिम राष्ट्रपतींची जबाबदारी आहे. त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली पाहिजे की, या सर्व कामकाजामध्ये कोणाचा किती हस्तक्षेप असला पाहिजे, नाही तर उद्या एखादा मॅजिस्ट्रेट देखील या आधारावर जजमेंट देऊ शकतो की, तुम्हाला सस्पेंड केले आहे, तुमचे सस्पेन्शन इलिगल आहे. याबाबतीत ठरवणारे मॅजिस्ट्रेट कोण आहेत? आपल्या अधिकारांचे रक्षण.... आपण म्हणत आहात की, ज्यावेळेस परत इंटरीमची संधी दिली.... आपल्याला सुनावणीचे पत्र दिले होते. आपण सुनावणीला आला नाहीत. आपण आला सुनावणीला. आपण फक्त पत्र देऊन गेलात. हे रेकॉर्डवर आहे. आपण फक्त पत्र देऊन गेलात व सांगितले की, आमचे काय होईल ते कोर्टात होईल. आपण माझे म्हणणे पूर्णपणे ऐकून घ्या. या रेकॉर्डवरच्या गोष्टी आहेत, म्हणून माझे मत असे आहे ...(अडथळा)... सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार आपण वकील आहात. आपण मुद्दा मांडला आहे...(अडथळा)...

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण)**: मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ही चर्चा आता आपण थांबवू. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर यांनी सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांचे नाव घेतल्यामुळे हा मुद्दा चर्चेमध्ये आला. ती घटना घडून गेली. आता त्यावर चर्चा करण्यामध्ये काही अर्थ

**तालिका सभाध्यक्ष**...

नाही. तुम्हाला संधी दिली. त्यावर मंत्री महोदयांची उत्तर दिले आहे. त्यामुळे आपण आता ही चर्चा येथेच थांबवू व कामकाजपत्रिकेवरील पुढील कामकाज घेऊ.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री ॲड.अनिल परब साहेब... (अडथळा)...

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, याचा अर्थ त्यांनी त्यांच्या सोईप्रमाणे काढला. आम्ही यावर वेगवेगळ्या कायदे तज्ज्ञांचे मत देखील घेतलेले आहे. त्यामुळे राष्ट्रपती महोदयांच्यासमोर कोर्टात हा निकाल लागण्याची गरज आहे. आम्ही त्यांच्याकडे पत्र दिले आहे. त्यांच्या पत्राच्या उत्तराची आम्ही वाट पाहत आहोत. परंतु, पुन्हा एकदा सांगतो की, या निमित्ताने सभागृहाच्या अधिकाराचे रक्षण करणे हा आपला हक्क आहे आणि ते आपण पूर्णपणे केलेच पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आज बघा सत्ता कोणाची आहे माहीत नाही. परंतु एक लक्षात ठेवा ज्या दिवशी या सभागृहाच्या अधिकारावर सर्व विषय येतील त्या दिवशी मग कोणच त्या पासून वाचणार नाही. माननीय सर्वोच्च न्यायालयाने फक्त शिक्षेच्या कालावधीबद्दलच निरीक्षण केले आहे. ... (अडथळा)... अहो नका सांगू. जजमेंट जरा नीट वाचा. कोणी ठोकले आहे, काय ठोकले आहे, काय वाचले तुम्ही, अहो जजमेंट नीट वाचा. तुम्हाला फक्त शिक्षा कमी केली आहे. फाशीची तुम्हाला जन्मठेप दिलेली आहे. तुम्हाला निर्दोष सोडलेले नाही. त्यामुळे माझे असे मत आहे की, या बाबतीतील इंटरप्रिटेशन आपल्या सोईप्रमाणे करु नये.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार आपण आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री ॲड.अनिल परब यांनी जे मुद्दे मांडले.... खरे तर माननीय मंत्री ॲड.अनिल परब आपण आमचे मित्र आहात. मात्र आपण सभागृहाच्या पटलावर जी माहिती ठेवली ती तद्दन असत्य आहे. मी, आम्ही १२ लोक सुनावणीला आलो नाहीत, हे म्हणणे असत्य आहे. ते रेकॉर्डवरुन

असुधारित प्रत

ॲड.आशिष शेलार ...

काढावे...(अडथळा)... एक मिनिट जेव्हा तुम्ही बोललात त्यावेळेस आम्ही मध्ये बोललो नाही.

अध्यक्ष महोदय, खरे तर मी प्रिव्हिलेजचा मोशन मुव्ह करु शकतो. परंतु, मी करणार नाही. मंत्री महोदय तुम्ही आमचे मित्र आहात. आपण व्हेरिफाय करा, आम्ही हजर झालो. आम्ही आमचे म्हणणे मांडले. ते सदनासमोर नाही तर माननीय उपाध्यक्षांकडे. आमच्याकडे रिसिव्व्हड कॉपी आहे. आपण चेक करावे. आम्ही प्रिव्हिलेज मोशन देखील मुव्ह करु शकतो. परंतु, करत नाही. तुम्ही चेक केल्यावर ते रेकॉर्डवरुन काढा. पाहिजे तर चेक करुन तुमच्या कन्सेंटने काढा.

अध्यक्ष महोदय, मी परिच्छेद क्रमांक ७५ वाचला. सुरुवातीला मी आर्ग्युमेंट केले तेव्हा हे म्हटले की, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव असे म्हणत आहेत, आमचेही मत या सदनाचे अधिकार सर्वतोपरी आहेत ते राहिलेच पाहिजेत या पध्दतीचे आहे. त्यामुळे तुम्ही आम्हाला हे शिकवू नका की, त्यासाठी काय करावे लागेल.

अध्यक्ष महोदय, मी त्या जजमेंट मधील पॅरा क्रमांक ७२ वाचतो. आपले असे म्हणणे होते की, ठराव इलिगल केला नाही. मी फक्त त्याबाबतचाच रिलेव्हंट पॅरा वाचतो. त्यात असे नमूद केले आहे की, "Resultantly, we have no hesitation in concluding that the impugned resolution suffers from the vice of being unconstitutional, grossly illegal and irrational to the extent of period of suspension beyond the remainder...."

नंतर श्री.शिंदे ...

ॲड.आशिष शेलार...

आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे. मी सुद्धा मांडले आहे. रिमाईंडर पुरते आपल्या अधिकाराला शाबूत केले आहे. मी सुरुवातीलाच मांडले आहे. त्यामुळे ठराव लिगल होत नाही. त्यात असे नमूद केले आहे की, "Suspension beyond the remainder of the concerned ongoing Session. Further, it is not a case of mere procedural irregularity committed by the Legislature", ही केवळ procedural irregularity ठराव पास करावयाची नाही. It is violating article 212 (1) of the Constitution. याचा अर्थ हा ठराव घटनेच्या कलम २१२ उप खंड (१) चा भंग करणारा आहे. त्यामुळे हा ठराव irrational आहे असे conclusion करताना देखील म्हटले आहे. त्यांनी फक्त "remainder of the day" पर्यंत दिलेली शिक्षा व या सदनाचे अधिकार आबाधित ठेवले आहेत. हे मी देखील सांगितले आहे. मी काही वेगळे सांगितले नाही. आपण माझ्या पेक्षा वरिष्ठ वकील असल्याने सभागृहातून यामध्ये आम्ही काही तरी राजकारण करु पाहत आहोत, असा बाहेर संदेश जाण्यासाठी सांगितले. त्यामुळे मला आता हे बोलावे लागेल. आपल्या अहंकारामुळे राज्याच्या विधानसभेला ही परिस्थिती आली आहे. राज्याचे दिवाळे माननीय सर्वोच्च न्यायालयात निघाले आहे. आपल्या अन्यायकारक ठरावामुळे आम्हा सर्वांना मान खाली घालावी लागली. मला हे अगोदर बोलता आले असते. परंतु सुरुवातीला बोललो नाही. मी केवळ कायद्यावर बोललो. आपले रेकॉर्डवर म्हणणे आहे की, आम्ही सुनावणीला गेलो नाही, हे खरे नाही. आम्ही लेखी निवेदन दिले आहे. मी व्यक्तीगत गेलो होतो. त्यावेळी आमचे म्हणणे मांडले नाही, हा आमचा अधिकार आहे. अधिवेशन कालावधीत सुनावणी घेण्यास सांगितले होते परंतु त्या काळात आपण ती घेतली नाही, त्यानंतर घेण्यात आली आहे. तरीही आम्ही सुनावणीस हजर राहिलो. या सभागृहाचे व पीठासीन अधिकारी यांच्या खुर्चीचे अधिकार आम्ही जपले आहेत. आपल्या अहंकारी ठरावामुळे पीठासीन अधिकारी यांच्या खुर्चीची बदनामी झाली आहे. एवढेच मला सांगावयाचे आहे.

असुधारित प्रत

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, मी काल सभागृहामध्ये १२ आमदार महोदयांच्या निलंबनाचा मुद्दा उपस्थित केला होता. या सभागृहाचे कामाकाज नियमानुसार चालते. मी त्याबाबत विचारणा केली होती. माननीय सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी निर्णय दिला असून विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांच्या वागणुकीबाबत ताषेरे ओढण्यात आले आहेत.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हण)** : पीठासीन अधिकारी यांनी यापूर्वी निर्णय घेतला असल्याने आता या विषयावर चर्चा होणार नाही. आता पुढील कामकाजास सुरुवात करण्यात येत आहे.

-----------

असुधारित प्रत

**पृ.शी./ मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.शंभूराज देसाई (वित्त राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२१-२०२२ हे प्रकाशन सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : आर्थिक पाहणी प्रकाशन सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे. सदरहू प्रकाशन पेन ड्राईव्हद्वारे सन्माननीय सदस्यांना देण्याची व्यवस्था हजेरी पटाच्या ठिकाणी करण्यात आली आहे. तसेच सदरहू प्रकाशन महाराष्ट्र विधिमंडळाच्या व शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

----------

श्री.दत्तात्रय भरणे (पशुसंवर्धन राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा एकेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधानमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

----------

श्री.संजय बनसोडे (रोजगार हमी राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना यांचा सन २०२०-२०२१ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधानमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

--------

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

ॲड.अनिल परब (परिवहन मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन २०१९-२०२० चा वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** लेखी उत्तरे.
**मु.शी. :** तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवणे.

प्रधान सचिव : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक ३ मार्च, २०२२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष :** दिनांक ३ मार्च, २०२२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

---------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी. :** स्थगन प्रस्तावाच्या सूचना

**तालिका सभाध्यक्ष :** आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावांच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

--------

असुधारित प्रत

## पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, मागील हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांना आचारसंहिता लागू करावी, असा महत्त्वाचा विषय मांडण्यात आला होता. त्या विषयावर मी स्वत: माझे मत व्यक्त केले. तसेच ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी देखील उक्त विषयावर सविस्तर मत व्यक्त केले होते. या अनुषंगाने या विधिमंडळाचे प्रधान सचिव यांनी सन्माननीय सदस्यांच्या आचारसंहितेचा एक मसुदा तयार करुन तो सन्माननीय सदस्यांच्या मान्यतेसाठी ई-मेलवर पाठविलेला आहे. उक्त मसुद्यामध्ये सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये कसे बसावे, कसे उठावे, कसे बोलावे, कोणता विषय बोलावा, कोणता विषय बोलू नये, शब्दप्रयोग कसा करावा, बोलण्यासह वागण्यामध्ये नम्रता कशी असावी, सभ्यता कशी असावी अशा प्रकारचे अनेक विषयांचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच सभागृहामध्ये येताना सन्माननीय सदस्यांचे कपडे कसे असावेत, याबाबत देखील माहिती दिलेली आहे.

अध्यक्ष महोदय, आज देशातील पाच राज्यांच्या निवडणुकांचा निकाल येणार आहे. त्याबाबत आम्हाला देखील आनंद आहे. परंतु कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये येत असताना स्वत:च्या पक्षाची निशाणी असलेले कोणतेही वस्त्र घालून येऊ नये, असा देखील उक्त मसुद्यामध्ये एक क्लॉज आहे. असे असताना देखील आज माझ्या समोर काही सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या पक्षांचा विजय होत असल्यामुळे पक्षाची निशाणी असलेले गमचे घालून आलेले आहेत. त्यांच्या पक्षांचा विजय होत असल्यामुळे आम्ही देखील त्यांचे अभिनंदन करतो आहोत.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य "जय श्रीराम" अशा घोषणा देतात.)

"जय श्रीराम, पहले दाम बाद मे काम" या सभागृहाच्या आचारसंहितेमध्ये पक्षाची चिन्हे असलेले वस्त्र घालून येण्यास अध्यक्ष महोदयांनी परवानगी दिलेली आहे काय? जर परवानगी दिली असेल तर याबाबत माझे काहीही म्हणणे नाही. परंतु परवानगी दिली की नाही हे तालिका सभाध्यक्ष महोदयांनी सांगावे.

असुधारित प्रत

श्री.भास्कर जाधव......

जर अध्यक्ष महोदयांनी अशा प्रकारचे वस्त्र घालून येण्यास परवानगी दिली नसेल तर ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी पक्षाची निशाणी असलेले गमचे घालून आले आहेत, त्या सर्व सन्माननीय सदस्यांना सन्मानाने गमचे काढून ठेवण्याची सूचना करावी, असा माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** तपासून निर्णय घेण्यात येईल. यामध्ये काही चुकीचे असेल तर त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, या सभागृहाच्या १२ निलंबित आमदाराबाबत माननीय सुप्रिम कोर्टाने दिलेल्या निर्णयाबाबत चर्चा झालेली आहे. त्या अनुषंगाने मी माझे म्हणणे मांडत असताना आपण मला थांबविले होते. माननीय सुप्रिम कोर्टाच्या आदेशामध्ये.......

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले मी आपणास सांगू इच्छितो की, उक्त विषयावरील चर्चा संपलेली आहे. आता आपण पुढे गेलेलो आहोत.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, काल विधानसभा अध्यक्षांच्या निवडीबाबत माननीय उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

अप्रकाशित प्रत

श्री. नाना पटोले....

मी माननीय अध्यक्षांना विनंती करतो की, विधानसभा अध्यक्ष पदाच्या निवडीबाबत आपण काहीतरी सांगावे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आता तो विषय संपलेला आहे. आता आपण पुढील कामकाज पुकारले आहे. आपण मांडत असलेल्या विषयावरील चर्चा आता संपली आहे. आता लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

असुधारित प्रत

**पृ.शी. :** मौजे रुखी (ता.वसमत, जि.हिंगोली) या गावातील नॅशनल रोड ते रुखी रस्ता तातडीने दुरुस्त करणे व संबंधितांविरुद्ध कारवाई करणे

**मु.शी. :** मौजे रुखी (ता.वसमत, जि.हिंगोली) या गावातील नॅशनल रोड ते रुखी रस्ता तातडीने दुरुस्त करणे व संबंधितांविरुद्ध कारवाई करणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत ऊर्फ राजु नवघरे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे (वसमत) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, "सन २०१८-२०१९ यावर्षी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मौजे रुखी (ता.वसमत, जि.हिंगोली) या गावातील नॅशनल रोड ते रुखी अंतर्गत रस्ता करण्यात येणे, परंतु, केवळ २ वर्षाच्या कालावधीत संपूर्ण रस्ता उखडला जाऊन सदर रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये उघडकीस येणे, कंत्राटदाराने या रस्त्याच्या बांधकामाकरिता अधिकाऱ्यांशी संगनमत करुन निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले असल्यामुळे रस्त्यावर जागोजागी खड्डे पडून अपघात होऊन नागरिकांच्या जिवीतेचे व मालमत्तेचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास येणे, उक्त रस्त्यावर शासनाने करोडो रुपये खर्च करुनही रस्त्यांची दयनीय अवस्था झाली असल्यामुळे सदरचा रस्ता तातडीने दुरुस्त करण्यात यावा अशी मागणी रुखी ग्रामस्थांनी व मा.स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनाकडे दिनांक २८ फेब्रुवारी, २०२१ च्या निवेदनाद्वारे करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, परिणामी शासनाचा करोडो रुपयांचा खर्च होऊनही अल्पावधीत सदर रस्त्याच्या

असुधारित प्रत

श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे .....

दुर्दशेमुळे नागरिकांना व वाहनचालकांना होत असलेला त्रास, त्यामुळे तेथील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, सबब निकृष्ट रस्ता बांधकामात सामील असणाऱ्या अधिकारी व संबंधित कंत्राटदाराविरुध्द कारवाई करुन सदर रस्ता तातडीने दुरुस्त करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. हसन मुश्रीफ (ग्रामविकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष :** निवदेन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे : अध्यक्ष महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. या सभागृहात निवडून आल्यानंतर मला असे वाटले की, या सभागृहात आम्हाला जनतेचे प्रश्न, त्यांच्या अडचणी मांडता येतील. परंतु येथे आल्यानंतर समजले की, हे सभागृह केवळ गोंधळ घालण्यासाठी आहे. ग्रामीण भागातून, सरपंच, जिल्हा परिषद सदस्य पदापासून आमदार म्हणून आम्ही निवडून आलो आहोत.

**तालिका सभाध्यक्ष :** मी आपण विनंती करतो की, आपण लक्षवेधी सूचनेवर बोलावे.

श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे : अध्यक्ष महोदय, सन २०१८-२०१९ यावर्षी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मौजे रुखी (ता.वसमत, जि.हिंगोली) या गावातील नॅशनल रोड ते रुखी अंतर्गत रस्ता करण्यात येणे, परंतु, केवळ २ वर्षाच्या कालावधीत संपूर्ण रस्ता उखडला जाऊन सदर रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये उघडकीस येणे, कंत्राटदाराने या रस्त्याच्या बांधकामाकरीता अधिकाऱ्यांशी संगनमत करुन निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले असल्यामुळे रस्त्यावर जागोजागी खड्डे पडून अपघात होऊन नागरिकांच्या जिवीतेचे व मालमत्तेचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास येणे, उक्त रस्त्यावर शासनाने करोडो रुपये खर्च करुनही रस्त्यांची दयनीय अवस्था झाली असल्यामुळे सदरचा रस्ता तातडीने दुरुस्त करण्यात यावा अशी मागणी रुखी ग्रामस्थांनी केली आहे व मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे दिनांक २८ फेब्रुवारी, २०२१ च्या निवेदनाद्वारे करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, परिणामी शासनाचा करोडो रुपयांचा खर्च होऊनही अल्पावधीत सदर रस्त्याच्या दुर्दशेमुळे नागरिकांना व वाहनचालकांना त्रास होत आहे. हा रस्ता तातडीने दुरुस्त झाला पाहिजे.

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, ही बाब खरी आहे. सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघातील मौजे रुखी या गावातील रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत केला होता व तो खराब झाला आहे, अशी तक्रार माझ्याकडे केली होती.

**तालिका सभाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्य श्री. राम सातपुते यांना विनंती करतो की, त्यांनी जागेवर बसावे.

असुधारित प्रत

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, मी त्यावर समिती गठीत केली होती. त्या समितीचा अहवाल प्राप्त झाला होता. रस्ता तयार करुन दोन वर्षाचा कालावधी होऊनही कंत्राटदाराने साईडपट्टी केली नव्हती. अतिवृष्टी आणि ऊसाच्या वाहतुकीमुळे तो रस्ता खराब झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी पेढे वाटणे बंद करावे. पेढ्याचा तो बॉक्स सभागृहाच्या बाहेर न्यावा. सभागृहामध्ये पेढे वाटता येत नाहीत.

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, समितीने तपासणी केली होती. खराब झालेला रस्ता व्यवस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या रस्त्याचा खर्च डिफेक्ट लायबिलिटी पिरिअडमध्ये कंत्राटदार करणार असून १५ दिवसांच्या आत या रस्त्याचे काम सुरु करण्यात येईल व ते पूर्ण करण्यात येईल. याबबातच्या सूचना कंत्राटदाराला देण्यात आल्या आहेत. हा रस्ता कंत्राटदाराने स्वखर्चाने केले नसेल तर त्याला काळया यादीत टाकले जाईल.

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

श्री.अशोक पवार : अध्यक्ष महोदय, सद्यस्थितीत मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत 1 MSA क्षमतेच्या रस्त्यांचा समावेश होतो. या रस्त्यांवरुन १० टन क्षमतेची वाहने जाण्याइतपत क्षमता असते. परंतु महाराष्ट्रातील पुणे जिल्हयासह अनेक जिल्हयांमध्ये मोठया प्रमाणात औद्योगिकीकरण झालेले आहे. तसेच साखर कारखाने असल्यामुळे साखरेची व वाळुची देखील वाहतूक मोठया प्रमाणात होत असते. या वाहनांचे वजन २० टनांपेक्षाही जास्त असते. त्यामुळे नव्याने विकसित झालेल्या जिओ टेक्स्टाईल, ५.५ मिटरचे डांबरीकरण, इत्यादी पध्दतींद्वारे सरकार रस्त्यांची बांधणी करणार आहे का ?

श्री.हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, ४० हजार किलोमीटरपैकी १० हजार किलोमीटर रस्ते मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत घेण्याचे ठरले आहे. त्यासाठी एक समिती गठीत करुन त्याद्वारे अनेक सदस्यांची मते आपण अजमावली आहेत. सन्माननीय सदस्य श्री.अशोक पवार यांनी उल्लेख केल्याप्रमाणे ऊस, वाळू, इत्यादी वाहतूक पेलवू शकतील असे दर्जेदार व रुंद रस्ते बांधण्याचे ठरले आहे.

श्री.प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, या योजनेंतर्गत बनविल्या जाणाऱ्या रस्त्यांची वयोमर्यादा ३० वर्षे एवढी असते. त्यासाठी दोन ते चार वर्षांचा defect liability period असतो. एखाद्या खड्डयाचा अपवाद वगळता हे रस्ते तीस वर्षांपर्यंत टिकले पाहिजेत अशा प्रकारचे त्यांचे स्पेसिफिकेशन्स् असतात. परंतु प्रत्यक्षात काम सुरु होऊन संपेपर्यंतच रस्त्यांना खड्डे पडतात. याचा अर्थ असा आहे की, दिलेल्या स्पेसिफिकेशन्सप्रमाणे काम होत नाही. GSB, WBM, MPM चा थर असेल, carpet seal coat या ठरवून दिलेल्या मानकांप्रमाणे काम होत नाही. खासकरुन, डब्ल्यू.बी.एम. चे ७५-७५ चे थर एकत्रित केले तर ते १२५ देखील भरत नाहीत. त्यामुळे माझी विनंती आहे की, या रस्त्यांच्या कामांची इन-कॅमेरा चौकशी करण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, काही अधिकाऱ्यांनी व्हिजिलन्स डिपार्टमेंटला अक्षरश: पंगू करुन ठेवले आहे. रस्त्यांच्या कामांची कधीही तपासणी होत नाही. खरे तर, रस्ता बनवितानाच व्हिजिलन्स डिपार्टमेंटने वेळोवेळी तपासण्या केल्या पाहिजेत

श्री.प्रशांत बंब.....

परंतु तशी कार्यवाही न केल्यामुळे या योजनेवर खर्च करण्यात आलेले पैसे वाया गेले आहेत. रनिंग बिल बनविताना दररोज एम.बी. रेकॉर्ड करावी लागते. त्याच वेळी कनिष्ठ अभियंता यांच्या का लक्षात येत नाही की, स्पेसिफिकेशनप्रमाणे काम सुरु नाही. तसेच उप अभियंता यांच्या देखील ही बाब का लक्षात येत नाही ? कार्यकारी अभियंता देयक अदा करतात त्यावेळी देखील त्यांच्या का लक्षात येत नाही ? त्यामुळे या प्रकरणांची इन-कॅमेरा चौकशी करुन त्याचा अहवाल आम्हाला पाठविल्यास स्पेसिफिकेशनप्रमाणे काम कसे झालेले नाही हे मी आपणास दाखवून देऊ शकतो.

अध्यक्ष महोदय, माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, सदर रस्त्यांची किती दिवसांमध्ये इन-कॅमेरा चौकशी करुन रस्त्याचे काम पूर्ण करुन घेणार आहात ? तसेच ज्यांनी यामध्ये दिरंगाई केली आहे, वेळेवर लक्ष दिलेले नाही... खरे तर, या ठिकाणी एक-दोन रस्त्यांचा विषय येतो परंतु सर्व रस्ते अशाच प्रकारे बनविले जातात. त्यामुळे संबंधितांवर सक्त कारवाई केली पाहिजे. तसेच जिल्हयातील पाच ते दहा रस्त्यांची मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या अधिकाऱ्यांमार्फत नव्हे तर दुसऱ्या खात्यातील अधिकारी किंवा खासगी अभियंत्यांच्या विशेष तपास पथकामार्फत चौकशी करणार का ? तसे करणे अत्यंत गरजेचे आहे. आपणास हे ऐकून धक्का बसेल परंतु हे खरे आहे की ही सर्व कामे स्पेसिफिकेशनच्या बाहेर जाऊन होत आहेत. ती कामे चांगल्या प्रकारे व्हावीत कारण यावर आपण दरवर्षी अरबो रुपये खर्च करतो. दोन-तीन वर्षांमध्ये पुन्हा नवीन रस्ते बनवावे लागतात. त्यामुळे राज्यातील प्रत्येक जिल्हयातील रँडमली चार-पाच रस्त्यांची तपासणी करणार का ? तसेच एक महिन्याच्या आत सदनाला किंवा संबंधितांना तसे कळविणार का ?

श्री.हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, मी या ठिकाणी कोणत्याही राजकीय अभिनिवेशानातून बोलत नाही. परंतु मी सांगू इच्छितो की, मागील सरकारच्या काळात ३० हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचा टप्पा मंजूर झाला होता. महाविकास आघाडी सरकार सत्तेमध्ये आल्यानंतर मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत

असुधारित प्रत

श्री.हसन मुश्रीफ.....

नवीन एका किलोमीटरचेही काम घेतलेले नाही. त्यांनी घेतलेली जुनीच कामे आम्ही करीत आहोत.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. हसन मुश्रीफ...

त्यांचे जे नियम ठरलेले होते, जे ४-५ ग्रेड ठरलेले होते त्याप्रमाणे रस्त्यांची कामे सुरू आहेत. आता आम्ही १० हजार कि.मी. चा दुसरा टप्पा सुरु करणार आहोत. त्यामध्ये एक समिती नेमून मागील कामामध्ये ज्या चुका झाल्या होत्या त्या दुरुस्त करुन आम्ही हे रस्ते दर्जेदार करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

अध्यक्ष महोदय, या रस्त्याबाबत दुसरा जो विषय आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, या रस्त्याच्या तपासणीसाठी आपण टीम नेमली होती. त्यांनी जाऊन त्या रस्त्याची तपासणी केली. डिफेक्ट लायबिलीटीमध्ये या रस्त्याचे काम करायचे आणि महिनाभरात हे काम पूर्ण करायचे आहे. नाही तर त्या कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. जे अधिकारी तेथे गेले होते आणि ज्या ज्या अधिकाऱ्यांनी यापूर्वी तपासण्या केल्या आहेत त्या अधिकाऱ्यांना सुध्दा आम्ही कारणे दाखवा नोटीस काढल्या आहेत.

श्री. चंद्रकांत नवघरे : अध्यक्ष महोदय, ही लक्षवेधी माझ्या मतदार संघातील रस्त्यासंबंधी मी उपस्थित केली आहे आणि म्हणून मला २ मिनिटे बोलण्याची संण्धी द्यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, रुखी रस्त्याचे काम करीत असताना ठेकेदाराने माती मिश्रीत मुरुम वापरल्याने व पाणी कमी वापरल्याने, रोलरने दबाई केल्याने गुणवत्ता पारख होऊ शकली नाही. जागो जागी खड्डे पडले आहेत आणि खड्ड्यांवरील डांबराचे प्रमाण गुणवत्तेसाठी आवश्यक असताना ते प्रमाण वापरले गेले नसल्यामुळे....

अध्यक्ष महोदय, आता मंत्री महोदयांनी उत्तर दिले असले तरी माझ्याकडे एसक्यूएमचा अहवाल आहे. त्यामध्ये राज्य गुणवत्ता विभागाने अतिशय स्पष्टपणे नमूद आहे की हा रस्ता अत्यंत खराब झाला आहे. यामध्ये माती मिश्रीत मुरुम वापरलेला आहे आणि त्यासंबंधी सर्व अहवाल प्राप्त झालेले आहेत. म्हणून मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, या एजन्सीला आपण काळ्या यादीत टाकणार आहात काय आणि हे काम लवकरात लवकर पूर्ण करुन घेणार आहात काय ?

असुधारित प्रत

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, दिनांक १५ सप्टेंबर २०१८ रोजी या कामाला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. दिनांक ७.३.२०१९ रोजी त्या एजन्सीने काम सुरू केले आणि २०२० मध्ये त्याने काम संपविले. त्या कामाबद्दल ज्या तक्रारी आहेत त्यामध्ये त्याने साईडपट्ट्या केल्या नव्हत्या तसेच ऊसाची वाहतूक झाल्यामुळे शिवाय डांबरीकरण सुरू असतानाच ही वाहतूक सुरू झाल्याने हा रस्ता खराब झाला अशी त्याची तक्रार होती. याबाबत सन्माननीय सदस्यांच्या विनंतीवरुन आपण या कामी समिती नेमली होती. या समितीने अनेक दोष दाखविले आहेत. त्यानुसार हा रस्ता डिफेक्ट लायबिलीटमध्ये संबंधित एजन्सीकडून पूर्ण करुन घेणे आणि त्याने तसे केले नाही तर त्याला काळ्या यादीत टाकण्याचे ठरलेले आहे. हा रस्ता पूर्णपणे चांगला होईल याची मी खात्री देतो.

श्री. हरिभाऊ बागडे : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना ही खरे म्हणजे ज्या गावात आपण कधीच पोहोचलो नाही अशा दुर्गम भागात उपयोगी पडावी यासाठी निर्माण केली आहे. जिल्ह्यात एखाद्या वर्षी जेवढे रस्ते या योजनेतून होतात तेवढे ८-१० रस्त्यांचे कंत्राट एकच कंत्राटदार भरतो आणि तो निविदा बिलोने, कमी दराने भरतो आणि एकटाच कंत्राट घेऊन टाकतो. त्याची ऐतप सुध्दा नसते. त्यामुळे हे रस्ते ५-५ वर्षे पूर्ण होत नाहीत. त्यामुळे शासन अशी अट घालीन काय की एका कंत्राटदाराला ३ पेक्षा अधिक रस्त्यांचे काम मिळणार नाही.

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य म्हणाले ते खरे आहे की, अनेक कंत्राटदार अनेक टेंडर्स बिलो रकमेने भरतात. कामे करीत नाहीत आणि केली तरी ती निकृष्ट करतात. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे त्याचा शासन जरुर विचार करीन.

श्री. प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत नवघरे यांनी मांडलेल्या प्रश्नाकडे मंत्री महोदय दुर्लक्ष करीत आहेत, असा माझा आक्षेप आहे. तो आक्षेप एवढ्यासाठी आहे की, हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर आज विधानसभेत तक्रार आली आहे. तेथील शाखा अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता आणि एसक्यूएम यांनी काय केले ? मंत्री महोदयांनी

श्री. प्रकाश आबिटकर...

पहिल्यांदा त्यांना निलंबित करण्याचा निर्णय घेतला पाहिजे. आपण आम्हाला डीएलपी कालावधी सांगत आहात तो प्रक्रियेचा भाग आहे. पहिल्यांदा काय झाले पाहिजे तर हा विषय या सभागृहात आल्यानंतर... तक्रारी होऊन आणि गावकऱ्यांचे आंदोलन होऊन या विधानसभेत तक्रार आली. त्यानंतरही आपण कार्यवाही करीत नसाल तर दुर्दैव आहे. म्हणून माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, ट्रायल केस म्हणून अशी घटना घडली असेल तर सर्वांसाठी कार्यवाही होण्याच्या दृष्टीकोनातून जे कोणी यामध्ये दोषी असतील त्यांना मंत्री महोदय निलंबित करतील काय, हा पहिला प्रश्न. मागच्या सरकारमध्ये सुध्दा मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेची कामे खूप चांगल्या पध्दतीने झाली आहेत. त्याही पेक्षा अधिक चांगल्या पध्दतीने महाविकास आघाडीचे सरकार काम करीत आहे. पण या सर्व कामांना दर्जा असेल तर आम्हा आमदार खासदारांचे लोक कौतुक करतात.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. प्रकाश आबिटकर...

परंतु दर्जा चुकला तर त्याचे शब्द आमच्यावर येतात. त्यामुळे अशा पद्धतीचे दर्जाहीन काम करणाऱ्या लोकांकडून केवळ काम काढून घेतले किंवा त्यांच्याकडून दुरुस्ती करुन घेतली असे न करता त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत माननीय मंत्री धोरणात्मक निर्णय घेतील काय ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, तत्कालीन कार्यकारी अभियंता, उप अभियंता आणि एसक्यूएमचे सर्व सदस्य यांना शो-कॉज नोटीस दिलेली आहे. त्यांना नोटीस दिल्यानंतर, त्यांचे उत्तर आल्यानंतर जर काही योग्य आढळले तर त्यांना निलंबित सुद्धा करण्यात येईल.

श्री. भिमराव तापकीर : अध्यक्ष महोदय, ग्रामसडक योजनेंतर्गत पुणे जिल्ह्यातील माझ्या मतदारसंघात जी कामे करण्यात आली त्यानंतर संबंधीत ठेकेदारांना त्याचे पैसे देण्यात आले. परंतु काम झाल्यानंतर एक ते दोन वर्षाच्या आत त्या रस्त्याला मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले होते. तेव्हा आम्ही संबंधीत अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार केला परंतु त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. मला वाटते की, ते अधिकारी त्या ठेकेदाराला पाठीशी घालत आहेत. माझ्या खडकवासला मतदारसंघातील एक रस्ता असा आहे की तो एका वर्षात संपूर्णपणे खराब झाला आहे. तो रस्ता दुरुस्त करण्यासाठी मी संबंधीत अधिकाऱ्यांना आणि ठेकेदारांनाही भेटलो. परंतु तो रस्ता आजपर्यंत पूर्ण झालेला नाही. आपल्या माध्यमातून मला सरकारला विनंती करायची आहे की, खराब झालेले रस्ते दोन महिन्याच्या पूर्ण करण्यासाठी आपण त्यांना आदेश देणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे तक्रार दिली तर आम्ही तात्काळ त्याची कार्यवाही करु.

ॲड. आशिष जैस्वाल : अध्यक्ष महोदय, या विषयावर माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्याकडे दिनांक १४ मार्च, २०२० रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर माननीय ग्रामविकास मंत्र्यांनी काही

असुधारित प्रत

ॲड. आशिष जैस्वाल....

सन्माननीय सदस्यांची एक समिती तयार केली. त्या समितीमध्ये मी मोठ्या प्रमाणात सूचना दिल्या होत्या. मूळात या योजनेमध्येच दोष आहे. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे निकष पूर्णपणे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये लावलेले आहेत. हा रस्ता एमपीएम कार्पेट सिलकोटचा करण्यात येतो. आमची बैठक झाल्यानंतर आम्ही सजेशन दिले होते तेव्हा ते आपण मान्य केले होते. परंतु विभागाने शासन निर्णय काढताना आणि आज जी योजना आंमलात आणली जात आहे त्यामध्ये कोणताही बदल केलेला नाही. मी अतिशय जबाबदारीने सांगतो की, आपण जर पूर्ण महाराष्ट्रामध्ये पाहिले तर या योजनेची ८० लाख किलोमीटर कॉस्ट असून ते रस्ते एका वर्षामध्ये खराब होत आहेत. विभाग जेव्हा कंत्राटदाराला नोटीस देतो तेव्हा कंत्राटदार सांगतो की, "या ठिकाणाहून हेवी लोडच्या गाड्या जात आहेत." आपल्याकडे अशी काही व्यवस्था आहे काय की, एकदा रस्ता झाल्यानंतर त्यामध्ये किती टनची गाडी जावी, यासाठी कोणी चौकीदार बसलेला आहे काय ?

अध्यक्ष महोदय, एकदा रस्ता झाल्यानंतर समजा ऊस गाडीची वाहतूक होत असेल तर तो रस्ता कसा चांगला राहणार आहे ? आम्ही सर्व सन्माननीय सदस्यांनी त्या बैठकीमध्ये ज्या सूचना दिल्या होत्या त्या मान्य करण्यात आल्या नाहीत असे मी दुर्दैवाने सांगू इच्छितो. रस्ते चांगले झाले पाहिजे यासाठी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांचा खूप आग्रह होता. परंतु विभागाने जास्त रहदारीच्या विषयावर जी ट्रीटमेंट करायला पाहिजे तिथे डीबीएमबीसी किंवा बीएमबीसी करायला पाहिजे होते ती ट्रीटमेंट विभागाने मान्य केलेली नाही. ८० लाख रुपये किलोमीटर मर्यादा असल्यामुळे कॉस्ट वाढते असे सांगण्यात येते. त्यामुळे हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

अध्यक्ष महोदय, ८० लाख रुपये किलोमीटरचा रस्ता यांचा कंत्राटदार ६० लाख रुपये किलोमीटर मध्ये करतो. त्याऐवजी जर यांनी बीएमबीसीची ट्रीटमेंट केली तर यांच्या बजेटमध्येच हे काम होईल. परंतु या सर्वांसाठी इच्छाशक्ती पाहिजे. या संदर्भात माननीय मंत्र्यांना माझी विनंती आहे की, राष्ट्रीय महामार्गामध्ये किंवा राज्य महामार्गामध्ये हेवी लोडेडसाठी जी ट्रीटमेंट आहे ती तुम्ही या रस्त्यासाठी करणार

असुधारित प्रत

ॲड. आशिष जैस्वाल....

काय आणि ५.५ मीटरचा रस्ता करणार काय ? हा निर्णय केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. नाही तर मग चौकशी आणि प्रश्न मांडण्यातच लोकांचा वेळ जाईल. त्यामुळे विनंती आहे की, या संदर्भात आम्ही सर्व आमदारांनी आपल्याला ज्या सूचना केल्या होत्या त्या सूचना इम्पिमेंट करण्यासाठी आपण विभागाला सक्तीने सांगणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, हे खरे आहे की, मागील सरकारच्या काळात ३० हजार किलोमीटरचे रस्ते मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत झाले. त्याच्या दर्जाबाबत बऱ्याच तक्रारी आल्या. त्यामुळे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी एक बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये पुढचा टप्पा मंजूर करीत असताना किंमत वाढली तरी चालेल परंतु रस्ते चांगले झाले पाहिजे यासाठी आपण सदस्यांची एक समिती नेमली. त्यानंतर त्यांच्या सूचना घेण्यात आल्या. याचा उल्लेख सन्माननीय ॲड. आशिष जैस्वाल यांनी केला आहे. आता त्या सूचनांचा संदर्भ नवीन शासन निर्णयामध्ये झाला नाही, अशी त्यांची तक्रार आहे. याबाबत मी त्यांना अश्वस्त करु इच्छितो की, दुसरा टप्पा सुरु करण्यापूर्वी थोडी किंमत वाढली तरी चालेल परंतु हे रस्ते दर्जेदार कसे होतील आणि एकदा रस्ता केल्यानंतर १० वर्ष त्याला काहीही होणार नाही अशी खबरदारी आम्ही घेऊ आणि त्यांच्या सूचनांची आम्ही अंमलबजावणी करु.

यानंतर श्रीमती करंदीकर...

असुधारित प्रत

श्री. नारायण कुचे : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना राज्यात सुरु करण्यात आली असून ही योजना अतिशय चांगली आहे. परंतु अनेक सन्माननीय सदस्य वारंवार या योजनेतील अभियंते यांची तक्रार करतात. कामे घेतली जातात मात्र ती वेळेवर पूर्ण करण्यासाठी आपण संबंधित एजन्सीला बंधनकारक करणार काय ? गेल्या दोन वर्षात एकही मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचे काम सुरु झाले नाही. आता मंत्री महोदयांनी सांगितले की, १० हजार कि.मी. रस्त्यांचे काम सुरु केले जाणार आहे. हे काम किती दिवसात करणार ? जसे गेल्या वेळेस कमिटी नेमून त्या त्या तालुक्यातील लोकसंख्येच्या प्रमाणे केले होते, तसे आता देखील करणार काय, तसेच किती दिवसात नवीन १० हजार कि.मी रस्त्याचे काम सुरु केले जाणार आहे?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, माननीय उप मुख्यमंत्री यांनी अर्थसंकल्पात दुसरा टप्प्या करिता ४० हजार कि.मी. रस्ते करण्याचे जाहीर केले आहे. त्यापैकी १० हजार कि.मी. या वर्षी घेणार असे जाहीर केले होते. मागील शासनाच्या काळात तत्कालीन माननीय पालक मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जशा समित्या केल्या होत्या, तशा समित्या आता केल्या आहेत. त्या नुसार आता काम सुरु केलेले आहे. या रस्त्याला मंजुरी अपेक्षित आहे. साधारणपणे दिवाळीच्या काळात या रस्त्यांचे काम सुरु होईल.

श्री. किशोर पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे. मागील काळात मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून रस्ते झाले. त्यांचे एस्टीमेट करीत असताना जिल्हा परिषद किंवा आमदार फंडातून झालेल्या रस्त्यांची लांबी सोडून उर्वरित रस्त्यांची लांबी मोजली गेली व तो रस्ता पूर्ण झालेला आहे असे दाखवण्यात आले. यामुळे असे झाले की, जिल्हा परिषदेतून ज्या रस्त्याचे काम झाले त्याची अवस्था वाईट झालेली आहे. त्या पुढे मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील रस्ता चांगला आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील रस्त्याची लांबी मोजताना आधी झालेल्या रस्त्याचा देखील यामध्ये समावेश केला जाणार काय ? तसेच आपण समावेश करावा, अशी माझी विनंती आहे.

असुधारित

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय,कोणते रस्ते घ्यावेत, या बाबत शासन निर्णयामध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे. या बाबतचा उल्लेखही शासन निर्णयात आहे, असे मला वाटते.

श्री. सागर मेघे : अध्यक्ष महोदय, सर्वात प्रथम माननीय मंत्री यांचे मी आभार मानतो की, ते आता १० हजार कि.मी रस्त्यांचे काम हाती घेणार आहेत. मागील सरकारने ३० हजार कि.मी चे काम मंजूर केले होते. माझ्या मतदारसंघातील विषय मी सांगतो. माझ्या मतदारसंघातील काही रस्ते येण्या-जाण्यासाठी वापरले जात होते. त्यांचे दोन वर्षापूर्वी टेंडर काढले. तेथील कंत्राटदाराने त्या रस्त्याचे अर्धे काम केले.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. दीपक चव्हाण )** : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा. आज आपल्याला ८ लक्षवेधी सूचना घ्यावयाच्या आहेत.

श्री. सागर मेघे : अध्यक्ष महोदय, जो येण्या जाण्याचा रस्ता होता तेथे नवीन काम करण्यासाठी तो उखडला गेला. यामुळे तेथे पायी चालण्यासाठी देखील तेथील गावकऱ्यांना त्रास होत आहे. माझा एवढाच प्रश्न आहे. येथील कामे मंजूर आहेत. काम सुरु करण्यासाठी कंत्राटदाराला दोन वर्षांपासून निधी न दिल्यामुळे तेथील काम बंद आहे. हे खरे आहे काय,असल्यास जी कामे मंजूर झाली आहेत त्यांना निधी केव्हा देणार ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, ३० हजार कि.मी. चा पहिला टप्पा सुरु होता.त्याची फार मोठी लाएबिलीटी शासनावर आहे. दर वर्षी ७० ते ७५ टक्के बिले आपण देत असतो. रस्त्यांची दर्जाबाबत व बिलाबाबत सन्माननीय सदस्यांची जी तक्रार असेल ती त्यांनी करावी. या बाबत निश्चितपणे कारवाई केली जाईल.

श्री. समीर कुणावार : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी अतिशय महत्त्वाचा विषय मी मांडू इच्छितो. तक्रारीचे मूळ कारण आहे. ६० ते ८० लाख रुपये प्रति कि.मी. या प्रमाणे रस्त्याच्या कामाकरिता खर्च केला जातो. अभियंते, उप अभियंते,कार्यकारी अभियंते हे सर्व कंत्राटी आहेत. गेल्या एक वर्षापासून त्यांना पगार दिला जात नाही.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.समीर कुणावार ...

त्यामुळे यामध्ये भ्रष्टाचाराला मोठा वाव मिळतो. येथे कायमस्वरूपी अभियंता यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. तसेच, उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांची देखील नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यांच्यावर आपण हजारो, करोडो रुपये खर्च करतो. मात्र कंत्राटी असल्यामुळे त्यांच्यावर काहीच जबाबदारी फिक्स होत नाही. तुम्ही त्यांचे वेतन देत नाही. त्यामुळे कंत्राटदार म्हणेल त्या प्रमाणे मेझरमेंट बुक भरले जाते. त्यामुळे आपण तेथे पर्मनंट स्टाफ देणार काय?

अध्यक्ष महोदय, कॉंट्रॅक्टरचे पेमेंट एक वर्षापासून झाले नसल्यामुळे कामे बंद आहेत. ती कधी सुरु होणार? आपण प्रत्येक कामाचे ॲग्रिमेंट करतो. त्या ॲग्रिमेंटमध्ये सर्व टर्म्स अँड कंडिशन्स नमूद केलेल्या असतात. या ज्या तक्रारी प्राप्त होत आहेत, त्या अनुषंगाने ॲग्रिमेंट प्रमाणे त्या त्या जिल्ह्यात कारवाई का होत नाही? याची जबाबदारी आपण तेथील अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता यांच्यावर दिली पाहिजे. त्या ॲग्रिमेंटचे उल्लंघन झाले व त्या अनुषंगाने जर तक्रार झाली, तर तेथल्या तेथे ही कारवाई करण्याचे निर्देश पुन्हा देणार काय?

श्री.हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, हे खरे आहे की, गेली दोन वर्षे कोरोनामुळे निधी कमी मिळाला होता. परंतु, जो निधी मिळाला त्याच्या प्रपोर्शनेट सर्वांची देयके दिली जातात. आता देखील या मार्च अखेरपर्यंत जास्तीत जास्त ७० टक्के देयके देण्याचा प्रयत्न करणार आहोत. सन्माननीय सदस्यांनी जी तक्रार केली आहे... त्यामध्ये स्कोप फार कमी होता. परंतु, त्याचे मी मुद्दामहून उत्तर देत आहे कारण हा महत्वाचा प्रश्न आहे व सर्वांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागातील रस्ते फार खराब झालेले आहेत. सर्व सन्माननीय सदस्यांची तक्रार या ग्रामीण रस्त्यांबद्दलच आहे. त्यांना रस्ते व्हावेत असे वाटते. मतदारसंघामध्ये त्यांना फार मोठ्या अडचणी येत आहेत. आज माझ्याकडे प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जर तक्रार दिली तर मी सन्माननीय सदस्यांचे समाधान निश्चितपणाने करेन.

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण)** : सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत नवघरे आपण शेवटचा प्रश्न विचारावा.

श्री.चंद्रकांत नवघरे : अध्यक्ष महोदय, रुखी येथील संबंधित ठेकेदाराला काळया यादीत टाकणार काय, तो रस्ता नव्याने खोदून पुन्हा नवीन रस्ता करणार काय?

श्री.हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, मी मघाशी सांगितले की, तपासणी कमिटी नेमली होती. तिने अहवाल दिलेला आहे. त्याच कंत्राटदाराला रस्ता पूर्णपणे करुन देण्याबाबत आदेशित केलेले आहे. त्याने केलेला रस्ता जर चांगला झाला नाही, त्याने सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले नाही तर त्या कंत्राटदाराला आम्ही निश्चितपणाने काळया यादीत समाविष्ट करु.

श्रीमती सरोज अहिरे : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्त्यांची परिस्थिती अशी आहे की, आमच्या एका सहकाऱ्यांनी सांगितले की, एक काँट्रॅक्टर ८-९ रस्त्यांचे काँट्रॅक्ट घेतो. परंतु, मुदतीमध्ये त्या रस्त्यांचे काम सुरु करीत नाही. माझ्याकडे अशी परिस्थिती आहे की, मागच्या टर्ममध्ये जे रस्ते मंजूर झाले होते, त्याबाबत मला काँट्रॅक्टरला, अधिकाऱ्यांना शंभरवेळा सांगावे लागले की, रस्त्यांची कामे सुरु करा. मुदत संपत येण्यास २-४ महिने शिल्लक राहिले की, ही कामे घाईघाईने केली जातात. क्वालिटी कंट्रोलला पत्र दिले तर, क्वालिटी कंट्रोलचा रिपोर्ट अगदी चकाचक येतो व तो काँट्रॅक्टरच्या बाजूनेच येतो.

अध्यक्ष महोदय, एल-१ पध्दतीमुळे रस्ते खराब होतात. ४० टक्के बिलो टेंडर होतात तर अधिकारी चुकीचे टेंडर करतात काय? अधिकारी स्थानिक पातळीवर प्रत्यक्ष भेट देऊन या रस्त्यांवर कुठे नाला पाहिजे, कुठे मोरी पाहिजे, कुठे काँक्रिट पाहिजे, नाले क्रॉस होतात अशा पध्दतीचा कोणताही अभ्यास न करता एस्टीमेट बनवतात. यावर अभ्यास करुन आपण काही निर्णय घेऊ शकता काय?

अध्यक्ष महोदय, त्या काँट्रॅक्टरकडे ४ वर्षे मेन्टेनन्स ठेवला पाहिजे. आपण फक्त ५ टक्के डिपॉझिट घेतो. काँट्रॅक्टर जर ४० टक्के बिलो जातो तर डिपॉझिटची रक्कम ५ टक्के वाढवून ती २० टक्के केली जाईल काय?

असुधारित प्रत

श्री.हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, आता मुख्यमंत्री मंत्री सडक योजनेची अशी पध्दत आहे की, एसक्यूओ ही आपली तज्ज्ञ समिती त्या रस्त्याला प्रत्येक टप्प्यावर तीन वेळा भेट देते. या रस्त्याची ती पाहणी करीत असते. मुदत संपायला ३-४ महिने असताना कॉंट्रॅक्टर रस्ता करतात असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्यांनी या संदर्भात स्पेसिफिक तक्रार दिली, तर आम्ही त्याची निश्चितपणाने चौकशी करु. आता टेंडर हे ओपन असते. त्यामुळे किती बिलो यावे याबाबत काही नियम नाही. त्यामुळे बरेच लोक बिलो टेंडर भरतात, काम करीत नाहीत, याबाबत काही तरी नियम करण्याची आवश्यकता आहे.

...........

यानंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

**पृ. शी.** : धारावीच्या पुनर्विकासासंबंधी करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

**मु. शी. :** धारावीच्या पुनर्विकासासंबंधी करावयाची कार्यवाही व उपाययोजना या संबंधी कॅप्टन आर. तमिल सेल्वन, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

कॅप्टन आर. तमिल सेल्वन (सायन कोळीवाडा) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"आशिया खंडामधील मुंबईतील सर्वात मोठी झोपडपट्टी असलेल्या धारावीचा पुनर्विकास गेल्या १६ वर्षांपासून रखडलेला असणे, धारावी येथील झोपडपट्टीच्या पुनर्विकासाकरिता राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर तब्बल २५ पेक्षा जास्त निविदा निघूनही धारावीचा पुनर्विकास रखडला असणे, यामुळेच कोरोनासारख्या जागतिक महामारीच्या काळात कोरोना विषाणूचा फैलाव मुंबईतील इतर भागांच्या तुलनेत धारावीमध्ये दाटीवाटीने असलेल्या झोपडपट्ट्यांमध्ये मोठया प्रमाणात होणे, मागील १६ वर्षांत सुमारे ३१ कोटी खर्च होऊनही धारावी विकासाचे कंत्राट रद्द झाल्यामुळे नव्याने निविदा मागविण्यासाठी पुन्हा खर्च करावा लागणार असणे, निवासी इमारती तसेच झोपडपट्ट्यांची दुरावस्था झाल्यामुळे स्थानिक रहिवासी जीव मुठीत घेऊन तेथे राहत असणे, त्याचबरोबर सदर ठिकाणी छोटे-मोठे व्यवसायिक आपला व्यवसाय मोडकळीस आलेल्या जुन्या गाळयामध्ये करीत असणे, स्थानिक रहिवाशी व व्यावसायिक यांना इच्छा असून देखील खाजगी

कॅप्टन आर. तमिल सेल्वन...

विकासकामार्फत आपल्या निवासी सोसायटीचा पुनर्विकास स्वतः करणे शक्य नसणे, सदर रखडलेला पुनर्विकास तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.जितेंद्र आव्हाड (गृहनिर्माण मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण) :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

कॅप्टन आर. तमिल सेल्वन : अध्यक्ष महोदय, धारावी के पुनर्विकास प्रकल्प के बारे में मेरा कहना यह है कि आशिया खंड में सबसे बड़ी झोपड़पट्टी धारावी है. इस धारावी में २ लाख परिवार बहुत तकलीफ में है. इतने बड़े स्लम में ५७५ एकड़ जमीन का मामला है. भूतपूर्व मुख्यमंत्री श्री विलासराव देशमुख जी ने सन २००४ में एसआरए स्कीम को रोका. उसके बाद सन २०१० में एक मसाल समिति नियुक्त हुई. इस समिति ने धारावी का सर्व्हे करके ६७ हजार झोपड़पट्टी है, दो लाख झोपड़पट्टी नहीं है, इस तरह की रिपोर्ट दी है. उसके लिए करोड़ों रुपये का वेतन दिया गया. उस समय कॉंग्रेस सरकार ने जनता का पैसा खर्च किया. इस मसाल समिति ने म्हाडा को आदेश दिया कि तीन इमारतें बनानी है. सन २०१० में आदेश हुआ और सन २०१२ में इसका काम शुरु हुआ. सन २०१२ में दो इमारतों का काम किया. ७०० टेनामेंट की चाबी मिली है. एक इमारत का काम अभी भी होना बाकी है. सन २०१४ में भूतपूर्व मुख्यमंत्री माननीय श्री देवेंद्र फडणवीस जी की ३-४ बैठके धारावी के पुनर्विकास के बारे में हुई. ३५० स्क्वेअर फूट के मकान दे सकते है. इस तरह का महत्वपूर्ण विषय माननीय भूतपूर्व मुख्यमंत्री जी ने पास किया. यहाँ पर लेदर कंपनी है, कई स्माल स्केल इंडस्ट्रीज है. उनको धारावी में मकान देने का विषय पास हुआ. लेकिन उससे पहले ही पांच सेक्टर्स का जो विषय है, माननीय भूतपूर्व मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस ने इसे टेकओव्हर किया, टेंडर निकाला, लेकिन टेंडर को रिस्पाँस नहीं मिला.

अध्यक्ष महोदय, मेरा स्पेसिफिक प्रश्न यह है कि दो लाख परिवार अपने मकान के पुनर्विकास के लिए तीन साल से कई जगहों पर प्रयास कर रहा है. अभी की सरकार ने इस विषय को अपने हाथ में नहीं लिया है. माननीय मंत्री श्रीमती वर्षा गायकवाड जी उसी धारावी विभाग से चुनकर आती है. माननीय श्री एकनाथ गायकवाड जी भी उसी विभाग के खासदार थे. ये सभी होने के बाद भी धारावी का पुनर्विकास कभी तक नहीं हुआ है. The redevelopment plans of Dharavi - it has been diverted into Sectors. It is very difficult. Developer would need consideration of the current market for retail commercial (Interruptions....) as per convenience of the public. ५ सेक्टर्स

कॅप्टन आर. तमिल सेल्वन...

निकालकर, सोसायटी या जितने लोगों का घर है उनको इन्डिविज्युअल कन्वीनंस देकर उनको स्वतंत्र घर मिलना चाहिए. अपने घर का पुनर्विकास होने संबंधी यह विषय है. माननीय मंत्री जी सदन में उपस्थित है. मेरी उनसे विनती है कि धारावी का पुनर्विकास होना चाहिए. दो लाख परिवार तकलीफ में है. उनको अपना घर बनाने के बारे में आप आदेश दीजिए, इतना ही मेरा कहना है.

श्री.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, ही गोष्ट खरी आहे की, धारावीची ओळख आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी अशी आहे. किंबहुना धारावी मुंबईची ओळख आहे. धारावी येथे केवळ झोपडपट्टीनसून विविध प्रकारचे मध्यम उद्योग आहेत. धारावीचा विचार करताना केवळ झोपडपट्टीचा विचार करता येणार नाही तर तेथील उद्योगांच्या माध्यमातून निर्माण झालेल्या रोजगाराचा व नोकऱ्यांचाही विचार करावा लागणार आहे. सन २००५ साली धारावी अधिसूचित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले होते. त्यानंतर मागील कालावधीतील मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या काळात निविदा मागविण्यात आली होती. त्यानंतर त्या निविदेत ४५ एकर रेल्वेचा भूखंड जोडण्यात आला. त्यामुळे फेर निविदा मागविण्यात यावी, असा सल्ला महाधिवक्ता यांनी दिला. त्यांनी सचिव समिती नेमली होती. सचिव समिती व महाधिवक्ता यांनी संयुक्तपणे अगोदरच्या सरकारने जी निविदा मागविली होती त्याची फेर निविदा करावी, असे सांगितले.

यानंतर श्री.तेलंग.....

असुधारित प्रत

डॉ.जितेंद्र आव्हाड.......

फेर निविदा काढण्याच्या निर्णयाला माननीय न्यायालयामध्ये आव्हान देण्यात आले आहे. आता ते प्रकरण माननीय न्यायालयामध्ये चालू आहे. परंतु आता यामधील पुढील कार्यवाही करावयाची असेल तर रेल्वे विभागाकडून येणे असलेली ४५ एकर जमीन राज्य शासनाकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. कारण उक्त जमिनीपोटी राज्य शासनाने केंद्र सरकारला ८०० कोटी रुपये दिलेले आहेत. तरी देखील अद्याप सदर जमीन राज्य शासनास प्राप्त झालेली नाही.

अध्यक्ष महोदय, आता समोरच्या बाकावर कोणीही दिसून येत नाही. केंद्र सरकारकडील जमीन राज्य शासनास मिळवून देण्यासाठी माननीय श्री.देवेंद्र फडणवीस, माननीय श्री.चंद्रकांत पाटील यांनी मदत केली आणि सदर ४५ एकर जमीन राज्य शासनास प्राप्त झाली तर सदर प्रकल्पातील आपणास पुढील कार्यवाही करता येईल.

अध्यक्ष महोदय, धारावी विकसित व्हावी, हे तुमचे आणि माझे स्वप्न आहे. कारण धारावीमध्ये वास्तव्य करीत असलेला माणूस अतिशय गरीब आहे. मुंबईतील सर्वात जास्त दलित संख्या ही धारावीमध्येच आहे. धारावीतील सर्वांचे जीवन सुखावह व्हावे, हे माझे पहिले स्वप्न आहे. धारावी हा महाविकास आघाडी सरकारचा प्रधान्याने देण्यात येणारा एकमेव असा प्रकल्प आहे. मध्यंतरीच्या काळामध्ये कोरोनाचे संकट आले. त्यामुळे पूर्ण जगाला हादरा बसलेला आहे. परंतु कोरोनाचे सर्वात जास्त रुग्ण हे धारावीमध्ये होते. या सर्व बाबींचा विचार करता धारावीचा विकास करणे अत्यंत आवश्यक आहे आणि ही बाब सरकारला देखील पटत आहे. त्यामुळे सदर ४५ एकर जमीन राज्य शासनाकडे हस्तांतरित करावी, यासाठी आम्ही केंद्र सरकारला किमान १० वेळा पत्रव्यवहार केलेला आहे. खरे पाहता महाराष्ट्राने केंद्र सरकारपुढे हात पसरण्याची गरज नाही. सदर जमिनीसाठी राज्य शासनाने ८०० कोटी रुपये दिलेले आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने सदर जमीन देणे आवश्यक आहे. यामध्ये राजकारण आहे, असे मला तरी वाटत नाही. केंद्र व राज्य सरकार राजकारण करीत आहे, असे मी कधीही म्हणत नाही. विरोधीबाकावर बसलेल्या काही नेत्यांचे

असुधारित प्रत

दिल्लीमध्ये चांगलं वजन आहे. त्यांनी माझ्यासारख्या कार्यकर्त्याला दिल्लीला सोबत

डॉ.जितेंद्र आव्हाड.......

घेऊन जावे व माननीय केंद्रीय रेल्वे मंत्री महोदयांशी चर्चा करावी. असे केले तर फक्त एका तासामध्ये राज्य शासनास जमीन प्राप्त होईल. धारावी विकास प्रकल्पामध्ये कोणीही आडवे येणार नाही. त्यामुळे विरोधी पक्षाने मदत केली तर धारावीचा विकास होण्यास वेळ लागणार नाही.

कॅप्टन आर.तमिल सेल्वन : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदय से मेरा सवाल यह है कि धारावी का ५ सेक्टर्स का टेंडर होने वाला नहीं है. गरीब को कभी न्याय मिलने वाला नहीं है. क्या उनको अभी की सरकार इन्डिविज्युअल परमिशन दे सकती है या नहीं दे सकती ? इसका जवाब मंत्री महोदय ने देना चाहिए.

डॉ. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, ये टेंडर हमने नहीं निकाला है. ये आपने निकाला हुआ टेंडर है. यदि आपको दोष ही देना है तो आप अपनी सरकार को दीजिए. हमने तो अभी तक टेंडर को हाथ भी नहीं लगाया है. आप जो ५ सेक्टर्स की बात कह रहे है वह ५ सेक्टर्स की बात आप उनसे कीजिए.

कॅप्टन आर. तमिल सेल्वन : अध्यक्ष महोदय, ५ सेक्टर्स और टेंडर का विषय है.

डॉ. जितेंद्र आव्हाड : टेंडर किसने निकाला है ? टेंडर जो निकाला वह टेंडर है. टेंडर को मैं अभी चेंज नहीं कर सकता.

श्री अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, धारावी पुनर्विकास के प्रश्न को लेकर मेरा स्पेसिफिक प्रश्न है.

ॲड. राहुल नार्वेकर : अध्यक्ष महोदय, कोणतेही सरकार स्थापन होत तेव्हा in continuity, in perpetuity असते. त्यामुळे सरकार बदलल्यानंतर देखील तो निर्णय शासनाचा असतो. आज महाराष्ट्र शासन आपण चालवित आहात. त्यामुळे

असुधारित प्रत

सभागृहामध्ये विरोधी पक्षाकडून उत्तरे मागवायची, ही नवीन प्रथा केव्हापासून सुरु झाली, याबाबत माहिती आम्हाला देखील देण्यात यावी.

ॲड. राहुल नार्वेकर.......

आपण शासनकर्ते असल्यामुळे आपण◌ास प्रश्न विचारण्यात आला आहे, त्यामुळे आपण विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर द्यावे, अशी मी विनंती करतो.

डॉ.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, मी कोणतेही चुकीचे उत्तर दिलेले नाही. सदर निविदेमधील माहिती सन्माननीय सदस्यांना माहिती नाही. त्यामुळे त्यांनी त्यांच्याच नेत्याकडून ती माहिती घ्यावी, अशी मी विनंती करीत आहे. बाकी मी काहीही बोललेलो नाही.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात.)

अध्यक्ष महोदय, टेंडर पब्लिश करण्यात आलेली आहे. उक्त टेंडरमध्ये सेक्टरचा उल्लेख करण्यात आलेला नाही. सदर टेंडर फडणवीस सरकारच्या काळामध्ये पब्लिश करण्यात आलेले आहे. हे सरकार उक्त टेंडरप्रमाणेच कार्यवाही करीत आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित

डॉ. जितेंद्र आव्हाड......

मागील सरकारने काढलेल्या टेंडरवरच कार्यवाही केली जात आहे. यात सन्माननीय सदस्य कॅप्टर आर. तमिल सेल्वन यांना जे पाच सेक्टर पाहिजेत, ते यात नाहीत.

श्री. नाना पटोले : अध्यक्ष महोदय, टेंडर निघाल्याचे मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. केंद्र सरकारला त्या जमिनीच्या मोबदल्यात ८०० कोटी रुपये देण्यात आले आहेत. राज्य सरकारकडून अनेकदा काही योजनांबद्दल सांगण्यात येते की, राज्य सरकारकडे निधी शिल्लक नाही. असे असताना राज्य सरकारने या जमिनीच्या मोबदल्यात केंद्र सरकारकडे ८०० कोटी रुपये जमा केले आहेत. तेथील जमीन राज्य सरकारच्या ताब्यात आली आहे काय ? जमीन ताब्यात आली नसेल तर टेंडर कशा प्रकारे काढले गेले ? तसेच टेंडर प्रसिद्ध केल्यानंतर पुढे कोणती कार्यवाही झाली आहे ? याबाबत मंत्री महोदयांनी सभागृहाला माहिती दिली पाहिजे. हा प्रकल्प धारावीचा आहे. आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी धारावी येथे आहे. मुंबईला आणखी सुंदर करावयाचे असेल तर धारावीला अधिक सुंदर करण्याचा प्रयत्न या प्रकल्पाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. असे असताना यासाठी टेंडर प्रक्रिया झाली आहे. तसेच जमीन न मिळविता ८०० कोटी रुपये देण्यात आले आहेत. यासाठी कोण दोषी आहे ? तसेच यावर पुढील कोणती कार्यवाही झाली आहे, याबाबत मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

डॉ. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, यात अदानी आणि सेकलिंक या दोन कंपन्यांनी यात भाग घेतला होता. यापैकी एका कंपनीला हे टेंडर मिळाले आहे. अदानी या कंपनीने हे टेंडर ४.२९ कोटी रुपयांना आणि सेकलिंक या कंपनीने हे टेंडर ७,२०० कोटी रुपयांना कोट केले होते. ४५ एकरचा प्रश्न हा टेंडर प्रसिद्ध झाल्यानंतर समोर आला आहे. ज्यावेळेस टेंडर प्रकाशित केले तेव्हा हा विषय नव्हता. तो नंतर समोर आला आहे. त्यानंतर ८०० कोटी रुपये केंद्र सरकारकडे देण्यात आले आहेत. एजी यांच्या सल्ल्यामुळे मागील सरकारने म्हणजेच आपण ते टेंडर रद्द केले. त्या वेळच्या सरकारच्या शेवटच्या टप्प्यात हे टेंडर होते. त्यानंतर कोरोना काळ सुरु झाला होता. श्री.संजीव कुमार हे माझ्या विभागाचे सचिव होते. नंतर ते मुख्य सचिव झाले

असुधारित प्रत

डॉ. जितेंद्र आव्हाड......

होते. त्यांनी केंद्र सरकारला जवळपास १० पत्रे लिहून सांगितले की, ही जमीन राज्य सरकारला देण्यात यावी. ज्यावेळेस माननीय केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री श्री. रावसाहेब दानवे हे ठाणे येथे आले होते तेव्हा मी त्यांची भेट घेऊन सांगितले की, राज्य सरकारचे ८०० कोटी रुपये केंद्र सरकारकडे आहेत. त्यामुळे कृपया आपण आम्हाला ती जमीन मिळवून द्यावी. अशी मी त्यांना विनंती केली होती. राज्य सरकरचा निधी तिकडे अडकला आहे. आपल्याला जमीन मिळाली पाहिजे. धारावीचा विकास हे या महाविकास आघाडीचे स्वप्न आहे. (...अडथळा...) नंतर यात बदल केला. त्यावेळेस काय केले हे मला माहित नाही. टेंडरच्या नियमांमध्ये बदल करुन ४५ एकर जमीन समाविष्ट केली गेली. ज्यावेळेस एखादा नवीन नियम टेंडरमध्ये समाविष्ट केला जातो तेव्हा त्या निविदेची प्रक्रिया बदलते. त्यामुळे एजी यांनी ते टेंडर रद्द केले. यास सर्व सचिवांनी मान्यता दिली. त्यानंतर हा प्रस्ताव तेव्हाच्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये सादर केला व त्यास मान्यता देण्यात आली. याबाबत मी अधिक काही बोलू शकत नाही. या सरकारचा उद्देश आणि विचार हे एकच आहेत. ४० वर्षापासून बंद असलेला बीडीडी चाळीचा प्रकल्प आज वेगाने सुरु आहे. त्यामध्ये कोणीही नाराजी व्यक्त केली नाही. तेथील लोकांनी स्वत:हून घरे खाली केली आहेत. मोतीलाल नगर येथील १४६ एकरचा प्रकल्प आता मार्गी लागला आहे. पत्राचाळ पुनर्विकासाचा प्रश्न मागील २५ वर्षापासून प्रलंबित होता. तोही प्रकल्प आता मार्गी लागला आहे.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

डॉ.जितेंद्र आव्हाड.....

अशा प्रकारे अनेक प्रकल्प आपण मार्गी लावत आहोत. यामध्ये एक गोष्ट स्पष्ट आहे की, रेल्वेने आम्हाला जमीन दिलेली नाही. हवे तर त्यांनी आम्हाला सांगावे की, आम्ही जमीन देणार नाहीत. तसे असेल तर आमचे ८०० कोटी रुपये परत करावेत. तसे केल्यास आम्ही नव्याने टेंडर काढून पुन्हा प्रक्रिया करु. परंतु रेल्वे विभागाने आम्हाला याबाबतीत अधांतरी ठेवल्यामुळे आम्ही काहीच कार्यवाही करु शकत नाहीत.

अध्यक्ष महोदय, या सदनाच्या माध्यमातून मी आज रेल्वे विभागाला हात जोडून जाहीरपणे विनंती करतो की, एक तर आमचे पैसे परत द्या किंवा जमीन तरी द्या. दोन्हीपैकी काहीतरी एक द्या. महाराष्ट्र सरकारच्या खिशातील पैसे आपल्याकडे ठेऊन आपल्याला काय मिळत आहे ? मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, रेल्वे हे एक मोठे संस्थान आहे. त्या विभागाचा स्वत:चा अर्थसंकल्प आहे, त्यांच्या अनेक जागा आहेत. एकटया मुंबई शहरामध्येच रेल्वेच्या करोडो रुपयांच्या जागा आहेत. त्यांची एवढी मक्तेदारी आहे की ते दुसऱ्या कोणाला जागा देखील घेऊ देत नाहीत. त्यांच्या संपूर्ण जमिनींवर झोपडपट्टी तयार झाली आहे.

अध्यक्ष महोदय, रेल्वेच्या जमिनीवर तयार झालेल्या झोपडपट्टया उठवा अशा नोटिसा देण्यात आल्या आहेत. मी माननीय रेल्वेमेंत्र्यांना भेटून सांगितले की, आमच्याकडे झोपडपट्टी पुनर्वसना संबंधीचा कायदा आहे. त्यानुसार सन २००० पूर्वीच्या झोपडपट्टया सुरक्षित आहेत. एवढेच नव्हे तर सन २०११ पर्यंतच्या झोपडपट्टीधारकांना देखील आपण सुरक्षा दिली असून त्यांनी पैसे दिल्यास त्यांनाही आपण घरे देणार आहोत. त्या जागेवर एस.आर.ए. योजना राबवून गरिबांच्या डोक्यावरील लटकती तलवार बाजूला करा अशी मी विनंती केली. तेव्हा मंत्री महोदयांनी मला आश्वासन दिले की, ठीक आहे, मी सोडवतो. परंतु आता पुन्हा नोटिसा देणे सुरुच आहे. यासंदर्भात पुन्हा माननीय केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब दानवे यांना भेटून प्रयत्न करु.

असुधारित प्रत

डॉ.जितेंद्र आव्हाड.....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अभिमन्यू पवार हे पूर्वी मंत्री महोदयांचे स्वीय सहाय्यक होते. त्यांचे आणि मंत्री महोदयांचे संबंध चांगले आहेत. त्यामुळे राज्याच्या ८०० कोटी रुपयांबाबत त्यांनी प्रयत्न केले तर बरे होईल, असे मला वाटते.

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरावरच माझी हरकत आहे. राज्य सरकारच्या ताब्यात सदर जमीन नसल्याचे मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. असे असतानाही टेंडर प्रक्रिया सुरु करुन केंद्र सरकारच्या रेल्वे विभागाला ८०० कोटी रुपये दिले आहेत. नंतर टेंडरचे क्लॉज बदलण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. प्रश्न असा आहे की, घाई-गडबडीत टेंडर काढण्याचा निर्णय का घेण्यात आला? जमीन ताब्यात नसतानाही रेल्वे विभागाला ८०० कोटी रुपये का देण्यात आले ? एका बाजूला सांगितले जाते की, राज्य सरकारच्या तिजोरीमध्ये पैसे नाहीत. असे असताना दुसऱ्या बाजूला केंद्र सरकारकडे ८०० कोटी रुपये पडून आहेत.

अध्यक्ष महोदय, जागा ताब्यात नसताना टेंडर काढण्यात आले. रेल्वे विभागाला पैसे देऊनही ते जागा देत नाहीत. असे असताना टेंडर काढण्याचा उद्देश काय होता ?

डॉ.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजी सदर टेंडर काढण्यात आले आहे. त्यामध्ये टाकण्यात आलेल्या अटी-शर्ती मी आता या ठिकाणी वाचून दाखवत नाही. नंतर दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजी टेंडर उघडण्यात आले. दिनांक ०३ मार्च, २०१९ रोजी रेल्वे विभागासोबत ४५ एकर जमिनीचा ९९ वर्षांसाठी करार करण्यात आला. आता सन्माननीय सदस्यांच्या लक्षात आले असेल की, टेंडर अगोदर निघाले आणि ४५ एकर जमिनीचा करार नंतर झाला. या ठिकाणी थेट क्लॉजमध्ये बदल करण्यात आला आहे. अगोदरच्या टेंडरमध्ये ४५ एकर जमीन नसल्यामुळे व त्या टेंडरचा आणि या जमिनीचा संबंध आल्यामुळे टेंडर infructuous झाले. याचा अर्थ नवीन टेंडर काढले पाहिजे. दरम्यान आपले सरकार सत्तेमध्ये आले. त्यानंतर हे प्रकरण न्यायालयात गेले.

असुधारित प्रत

डॉ.जितेंद्र आव्हाड.....

आमची टेंडर काढण्याची इच्छा आहे परंतु रेल्वे विभाग स्पष्ट भूमिका घेत नसल्यामुळे टेंडर काढण्यात उशीर होत आहे.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकार महाराष्ट्र राज्याला एवढी सावत्र वागणूक का देत आहे हा या निमित्ताने प्रश्न आहे. माननीय रेल्वे राज्यमंत्री श्री.रावसाहेब दानवे हे महाराष्ट्राच्याच मातीतील आहेत. त्यांनी २४ तासांमध्ये आपले पैसे द्यावेत, अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. सदा सर्वणकर : अध्यक्ष महोदय, धारावीचा पुनर्विकास झाला पाहिजे ही या सदनातील सर्वच सदस्यांची भावना आहे. त्याच भावनेपोटी राज्य सरकारने या निविदा काढल्या. त्या निविदा काढताना ही ४५ एकर जमीन वगळून निविदा काढण्यात आली आहे हे खरे असेल तर या ४५ एकर जमिनीचा पुन्हा त्या पुनर्विकासात समावेश केल्यामुळे मूळ निविदेचे उद्दिष्ट हे बदलण्यात आले हे खरे आहे काय आणि ते कोणाचे हितसंबंध जपण्यासाठी या अतिरिक्त ४५ एकर जमिनीचा समावेश करण्यात आला, हे मंत्री महोदय सांगतील काय ?

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, मी अत्यंत अराजकीय बोलत आहे की यामध्ये कोणाचेही हितसंबंध नव्हते. पण धारावीची व्याप्ती लक्षात घेता ही ४५ एकर जमीन मिळणे अतिशय महत्त्वाचे होते. त्यामुळे सरकारने निविदा निघाल्यानंतर या ४५ एकर जमिनीचा करार केला. त्या जमिनीचा करार झाल्यानंतर सदरची निविदा रद्द करण्यात यावी हे माझे किंवा त्यावेळच्या सरकारचे मत नव्हते तर त्यावेळी ए.जी.ने सांगितले होते की, आपल्याला ही निविदा पुढे नेता येणार नाही. कारण या निविदेमधील क्लॉजेस बदलले आहेत. त्यानंतर सचिव समिती गठीत झाली व त्या सचिव समितीनेही तेच मत दिले. त्यानंतर हे सर्व प्रकरण कॅबिनेटला गेले व कॅबिनेटने ते काढलेले टेंडर रद्द केले. त्यामुळे यामध्ये कोणाचाही काहीही हितसंबंध नव्हता.

श्री. अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदय अत्यंत सकारात्मक पध्दतीने या विषयावर उत्तर देत आहेत. त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

अध्यक्ष महोदय, माझे याबाबत २ प्रश्न आहेत. सदनातील अनेक सन्माननीय सदस्यांच्या हे लक्षात येत नाही की, ४५ एकर जागा ही रेल्वेच्या मालकीची होती. आपण ती निविदा रद्द केली कारण रेल्वेने आपल्याला ती जागा दिली. त्यामुळे ए.जीं.च्या सल्ल्यानुसार आपण निविदा रद्द केल्या आहेत. आता ते प्रकरण आपण म्हणता तसे राज्य सरकारने रेल्वेला पैसे दिले. परंतु अद्यापपर्यंत त्या जमिनीचा ताबा राज्य सरकारकडे आलेला नाही. त्यामुळे यापुढील काळात सरकार धारावीचा पुनर्विकास करताना कशा पध्दतीने करणार आहे, ही जमीन गृहित धरुन करणार आहे की या जमिनीशिवाय करणार आहे, हा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न स्कोपच्या

श्री. अतुल भातखळकर..

बाहेरचा आहे. पण मंत्री महोदय या विषयात सुध्दा फार चांगले काम करीत आहेत म्हणून एस.आर.ए.मध्ये ज्यांनी १० वर्षाच्या आत घरे विकली आहेत त्यांच्याकरिता आपण एक समिती नेमली होती. त्या समितीचा निर्णय आणि सन २०११ प्रमाणे अडीच लाखात सशुल्क घर देण्याचा निर्णय असे दोन्ही निर्णय सरकारने घेतले आहेत काय आणि त्यासंबंधी शासनाने जीआर काढला आहे काय, असे माझे दोन प्रश्न आहेत.

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, आपल्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर म्हणजे त्यासंबंधी जीआर निघालेला नाही. पण समितीचा निर्णय झालेला आहे. हे मी जाहीरपणे सांगतो. कारण त्याचा जीआर निघाल्यासारखाच आहे. आपला पहिला प्रश्न असा होता की, शासन कसे पुढे जाणार.... शेवटी सरकारे येतात, जातात. माणसे येतात जातात. पण आपल्याला एक गोष्ट मान्य करावी लागेल की, महाराष्ट्राच्या तिजोरीतील ८०० कोटी रुपये तेथे अडकून आहेत. त्या ८०० कोटींवर आपल्याला वाद घालायचा नाही. कसंही करुन आपल्याला ती जमीन मिळाली पाहिजे, असे माझे मत आहे. कारण धारावीच्या स्कोपमध्ये ही अधिकची जमीन मिळाली तर आपल्याला तेथे पुनर्वसित भाग ठेवता येईल आणि ४५ एकर जागेवर एकत्रितपणे खुली जागा मिळते. म्हणजे पुनर्वसित भाग बाजूला सरकवत सरकवत सुरुवातीला पूर्ण करु. त्यानंतर आज महाराष्ट्र सरकारच्या मनात त्या जागेवर एक नवीन ग्रोथ सेंटर उभारु शकतो. समोर बी.के.सी. आहे. म्हणजे एकंदर या धारावीचे Socio-Economic Structure बदलण्याचा सरकारचा विचार आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

डॉ. जितेंद्र आव्हाड.....

खरे म्हणजे ही जमीन आपल्याला मिळाली पाहिजे, यासाठी एकंदरीत सभागृहाची भावना पाहिजे. कारण हे आपल्या हक्काचे पैसे आहेत. हे कोणी दिले त्यामध्ये कोणाचा इंटरेस्ट होता यामध्ये मला काहीही करायचे नाही. I am pro-development. बीडीडी चाळीच्या विषयात काय झाले मला काही करायचे नाही. पण मी खात्रीपूर्वक हे सांगतो आणि आपल्याही मनात आले असेल की, ३० ते ३५ वर्ष थांबलेला बीडीडी चाळीचा प्रकल्प आज पायलिंग स्टेजला आला आहे. इमारती खाली आणल्या जात आहेत. लोक आपली घरे सोडत आहेत. We are pro-active. आम्ही स्वत: तिथे जाऊन स्वत: सर्व करीत आहोत. आपण सर्वजणच त्यामध्ये सामिल आहात. सन्माननीय सदस्य श्री. कालीदास कोळंबकर हे सुद्धा आम्हाला मदत करीत असतात. या सर्वांचे श्रेय फक्त आम्हीच घेण्याचा काही विषय नाही. प्रश्न असा आहे की, ८०० कोटी रुपयांची जमीन दिली पाहिजे.....(अडथळा)... माझ्या नेतृत्वाखाली ही जमीन मिळणार नाही. मी खूप प्रामाणिक बोलत आहे. आपण सर्वजण माननीय विरोधी पक्ष नेते श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली जाऊया. तरच पैसे मिळतील नाही तर पैसे मिळणार नाहीत.

श्री अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, धारावी को लेकर बहुत चर्चा हुई और माननीय मंत्री महोदय ने बहुत ही सकारात्मक जवाब दिया है. मुझे यकीन है कि धारावी के पुनर्विकास का काम बहुत ही जल्दी शुरु हो जाएगा.

अध्यक्ष महोदय, धारावी जैसी हालात मुंबई की और भी जगह पर है. माननीय मंत्री महोदय ने बहुत ही अच्छी तरह से कहा है कि बीआईटी में काम हो रहा है. अच्छी तरह से काम हो रहा है. मोतिलाल नगर और पत्रा चॉल का काम शुरु हो चुका है. मेरा प्रश्न स्कोप के बाहर का है. मैं धारावी के बारे में इसलिए प्रश्न उपस्थित नहीं कर रहा हूं, क्योंकि आपने उसका सही जवाब दे दिया है कि दिल्ली जाकर इस विषय को हल करना है.

अध्यक्ष महोदय, कमाठीपुरा के पुनर्विकास का प्रस्ताव सरकार के पास प्रलंबित है. मेरा प्रश्न यह है कि कमाठीपुरा के पुनर्विकास को लेकर आप क्या निर्णय

असुधारित प्रत

श्री अमिन पटेल....

ले रहे है? मेरा दूसरा प्रश्न यह है कि पिछली बार जब माननीय श्री सचिन अहिर जी गृहनिर्माण विभाग के मंत्री थे, तो उस समय कमाठीपुरा में एक साल के लिए नया एनओसी देना बंद किया था. क्योंकि सरकार ये प्रोजेक्ट करना चाहती थी. मेरी आपसे विनती है कि यदि आप म्हाडा को नोडल एजेन्सी बनाकर कमाठीपुरा का पुनर्विकास करना चाहते है, तो आने वाले दिनों में वहां एक साल के लिए नया कोई एनओसी न देते हुए सरकार ने तत्काल इस प्रोजेक्ट को अपने हाथ में लेना चाहिए.

डॉ. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, मैं सम्माननीय सदस्य श्री अमिन पटेल जी का शुक्रिया अदा करना चाहता हूं. उन्होंने प्रयास करके कमाठीपुरा के जितने भी जमीन मालिक और जितने भी मकान मालिक है, उनको शत प्रतिशत इकट्ठा करके उनका एक प्रपोजल म्हाडा को दिया है. यदि खुदा ने चाहा तो आने वाले १५ दिनों में आपके दिल में जो इच्छा है वह पूरी हो जाएगी.

कॅप्टन आर. तमिल सेल्वन : अध्यक्ष महोदय, धारावी की कुल जमीन ६७५ एकड़ है. सम्माननीय मंत्री महोदय का जवाब यह है कि रेल्वे की जमीन के लिए, ४५ एकड़ जमीन के लिए राज्य सरकार ने पैसा दिया. मैं ६७५ एकड़ के पुनर्विकास की बात कर रहा हूं. राज्य सरकार केंद्र सरकार से कहेगी, केंद्र सरकार राज्य सरकार से कहेगी. लेकिन गरीब जनता ने कौनसी गलती की है? धारावी का पुनर्विकास नहीं हो रहा है. अपनी सरकार ने टेंडर निकाला. लेकिन टेंडर को रिस्पाँस नहीं मिला है. आप धारावी का पुनर्विकास करेंगे या नहीं ? इसका जवाब आपने देना चाहिए.

डॉ. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, सम्माननीय सदस्य कॅप्टन आर.तमिल सेल्वन जी, क्या आपको आपकी सरकार को बदनाम करना है? नहीं ना? बात ऐसी है कि उस वक्त की सरकार ने सन २०१८ में टेंडर मंगवाया, उसमें दो लोग आए, टेंडर खुल गया, उसके बाद रेलवे का प्रश्न निर्माण हुआ, तो टेंडर रद्द किया गया. अब फिर से टेंडर निकालना है, वह हम जरुर निकालेंगे. अब आगे सवाल मत पूछिए.

यानंतर श्रीमती करंदीकर.....

असुधारित प्रत

ॲड. अशोक पवार : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड चांगले काम करीत आहेत. माझा प्रश्न स्कोपच्या बाहेरचा आहे. पुणे-मुंबई शहरात एसआरएचे काम राबवले जात आहे, हे चांगले आहे. तेथे बहुसंख्य नॉन महाराष्ट्रीयन लोक असून शासनाचा निधी त्यासाठी दिला जातो. आपल्याला धन्यवाद आहेत. शिरुर, फलटण या प्राईम लोकेशन येथे काम करण्याकरिता शासनाकडून एक रुपयाचीही आम्हाला अपेक्षा नाही. विकासक स्वखर्चाने ही योजना राबवू शकतो. येथे तालुका पातळीवर एसआरए योजना राबविण्याकरिता मी गेले दोन वर्षांपासून प्रयत्न करीत आहे. जेथे कमर्शियल दर १० ते १५ हजार रु.चौ.फू. आहे तेथे झोपडपट्टी पुनर्विकास करण्यासाठी जागा बदलू नका. त्यासाठी कायद्यात बदल करण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. माननीय मंत्री चांगले काम करणारे आहेत. यामुळे मी त्यांना नम्रपणे विनंती करतो. महाराष्ट्रातील अनेक तालुक्यात मोक्याच्या ठिकाणी एसआरए योजना राबवली जाणार आहे काय ? असल्यास, कार्यकाळ जाहीर करावा.

डॉ. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, ही गोष्ट खरी आहे की, मी मंत्री झाल्यापासून सन्माननीय सदस्य ॲड .अशोक पवार माझ्याकडे कमीत कमी १० वेळा आले. आम्हाला एसआरएची संधी द्या, अशी त्यांनी मागणी केली. महत्त्वाचा प्रश्न असा आहे की,एसआरए राबवताना तेथे विकासक गेला पाहिजे, त्याला परवडले पाहिजे. याचे गणित येथे सांगता येणार नाही. मी सन्माननीय सदस्य ॲड. अशोक पवार यांच्यासोबत बैठक घेऊन त्यांना समजवीन. शिरुर संबंधी आपल्याकडे जर एखादा प्रस्ताव असेल व आपल्याला करायचे असेल तर आपण, मी व विकासक आपण एकत्र बसू. मी आपल्या झोपडपट्टीत येतो. मला ती दाखवा. आपल्या विकासकाला परवानगी देण्याची जबाबदारी माझी. राज्यात ज्यांना झोपडपट्टीचा विकास करायचा आहे, त्यांना संधी देण्याचा आदेश काढलेला आहे. तसा महाराष्ट्र विकास आघाडीचा निर्णय आहे.

--------

साक्री तालुक्यात झालेला अवकाळी पाऊस व गारपीट या बाबत

श्रीमती मंजुळा गावित : अध्यक्ष महोदय, औचित्याच्या मुद्दयावर बोलण्याकरिता मी उभी आहे. माझ्या साक्री विधानसभा मतदारसंघात साक्री तालुक्यात अवकाळी पाऊस, वादळ वाऱ्यासह गारपीट मोठया प्रमाणात झाली आहे. साक्री तालुक्यातील पश्चिम पट्टयात दि. ९ मार्च, २०२२ रोजी दुपारी ४ वाजताच्या सुमारास मांजरी, बारीपाडा, मोगरापाडा, मापलगाव, शेंदवड, वार्सा, उमरपाडा, रामपुरा, उमऱ्यामाळ, डांगरशिरवाडे, बोपरखोल, भोरटेपाडा, शिवखट्याळ, विजयपूर, वर्दडी या परिसरात मोठया प्रमाणात साधारणत: आवळयाच्या आकाराएवढी गारपीट झाली आहे. यामुळे साक्री तालुक्यातील रब्बी हंगामातील हाता-तोंडाशी आलेला गहू, हरभरा मसूर, वाटाणा, कांदा , मका, आंब्याच्या बागा इ. पिंकांचे १०० टक्के नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांची झोप उडालेली आहे. शेतकरी हवालदिल झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात दि. ८ मार्च, २०२२ रोजी साक्री तालुक्यात ककाणी, भडगाव, चिंचखेडा, म्हसदी, शेवाळी, धमणार, वसमार या परिसरात मोठया प्रमाणात पाऊस पडला व गारपीट झाली. यामुळे या परिसरतील अनेक पिकांचे मोठे नुकसान झाले असून बळीराजाच्या डोळयात पाणी आले आहे. या अचानक झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे शेतकऱ्यांचे खूप नुकसान झाले असून कांदा पिकावर रोगाचा प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता आहे. या संबंधी महसूल विभागाने वस्तुस्थितीनिष्ठ पंचनामे करुन शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मी विनंती करते.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. दीपक चव्हाण ) :** या बाबत शासनाने नोंद घ्यावी.

------

असुधारित प्रत

**पृ. शी. :** बुलढाणा जिल्ह्यातील दसरखेड (ता.मलकापुर, जि.बुलढाणा) येथील बॅन्जो केमिकल कंपनी मधील दूषित रसायनयुक्त पाणी टँकरव्दारे शेतजमीन परिसरात व तलावात सोडण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांच्या कसदार शेतजमिनी खराब होणे

**मु. शी. :** बुलढाणा जिल्ह्यातील दसरखेड (ता.मलकापुर, जि.बुलढाणा) येथील बॅन्जो केमिकल कंपनी मधील दूषित रसायनयुक्त पाणी टँकरव्दारे शेतजमीन परिसरात व तलावात सोडण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांच्या कसदार शेतजमिनी खराब होणे, या संबंधी सर्वश्री राजेश एकडे, अमित झनक, बळवंत वानखेडे, विकास ठाकरे, ॲड. आकाश फुंडकर, डॉ. संजय रायमुलकर, श्री.संजय गायकवाड, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. राजेश एकडे (मलकापूर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बुलढाणा जिल्ह्यातील दसरखेड (ता.मलकापुर, जि.बुलढाणा) येथील बॅन्जो केमिकल कंपनी अनेक वर्षापासून सुरु असणे, सदर केमिकल कंपनी मधील दूषित

श्री.राजेश एकडे ....

रसायनयुक्त पाणी टँकरव्दारे शेतजमीन परिसरात व तलावात सोडण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांच्या कसदार शेतजमिनी खराब होऊन नापीक होत असल्याबाबत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी व लोकप्रतिनिधींनी उपविभागीय महसूल अधिकारी यांचेकडे तक्रार करणे, तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता माती परीक्षण अहवालामध्ये संबंधित शेतकऱ्यांच्या जमिनी शेतीयोग्य नसल्याचे निष्पन्न होणे, शेतजमिनी रसायनयुक्त पाण्यामुळे नापीक करणाऱ्या कंपनीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी कारवाई करण्याची मागणी करणे, वारंवार तक्रारी करूनही याप्रकरणी कोणतीही कारवाई न होणे, यामध्ये कंपनी व संबंधित अधिकारी यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. आदित्य ठाकरे (पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..............

असुधारित प्रत

श्री.राजेश एकडे : अध्यक्ष महोदय, बॅन्जो केमिकल कंपनी ही दसरखेड, ता. मलकापूर एमआयडीसीमध्ये आहे. बॅन्जो केमिकल कंपनीच्या विरोधात मागील २० वर्षांपासून शेतकऱ्यांच्या अनेक तक्रारी आहेत, तरी कंपनीच्या कारभारात कोणताही बदल झालेला नाही. बॅन्जो केमिकल ही रसायन तयार करणारी कंपनी असून त्या कंपनीमधून निघणारे सांडपाणी हे रसायनयुक्तच असणार आहे. कंपनीकडे WTP आहे. परंतु, तो पूर्ण क्षमतेने कार्यान्वित नसतो.

अध्यक्ष महोदय, बॅन्जो केमिकल कंपनी त्यांच्या जागेत खड्डे करुन केमिकलचे सांडपाणी त्या खड्डयांमध्ये सोडून देते. पावसाच्या पाण्यामुळे जमिनीतून निचरा होऊन दसरखेड, चिखली, रणथंब, वाघोळा, चिंचोळ येथे तसेच पाझर तलावापर्यंत नाल्यावाटे हे रसायनयुक्त पाणी पोहोचते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या विहिरीतील पाणी प्रदूषित होत आहे. ते पाणी पिण्याच्या व शेतीच्या उपयोगाचे नाही. त्यामुळे त्या भागातील सर्व नागरिकांचे व जनावरांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे.

अध्यक्ष महोदय, पाणी असूनही तेथील शेतकरी बागायती पीक घेऊ शकत नाही, हे अत्यंत दुर्दैवी आहे. या संदर्भात एमआयडीसीचे डेप्युटी इंजिनिअर यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना वेळोवेळी कळविले. त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्या भागातील जवळपास ५० वर्षे जुनी झाडे देखील जळालेली आहेत असे दिसले.

अध्यक्ष महोदय, आमच्या जिल्ह्याचे पालक मंत्री माननीय डॉ.राजेंद्र शिंगणे यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी व मी स्वत: तेथे स्पॉट इन्सपेक्शनकरिता गेलो असता शेतकऱ्यांनी या संदर्भात तक्रारी दिलेल्या आहेत. त्या १०० टक्के खऱ्या आहेत. त्या कंपनीचे सांडपाणी नाल्यामार्फत शेतामध्ये जात आहे. त्यामुळे नागरिकांच्या तक्रारीवरुन वेळोवेळी पंचनामे करुन पाणी तपासून त्याचे रिपोर्ट्स शासनाला दिलेले आहेत. त्या सर्व रिपोर्टमध्येसुध्दा कंपनीच्या विरुध्द कठोर कारवाईची शिफारस केलेली आहे. परंतु, अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही. या लक्षवेधी सूचनेवरील मंत्री महोदयांच्या लेखी निवेदनामध्ये देखील याचा उल्लेख केलेला आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य आपण प्रश्न विचारावेत.

श्री.राजेश एकडे : अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांच्या जमिनी नापिक होण्याचे मुख्य कारण म्हणजे कंपनीतील सांडपाण्यावर प्रक्रिया करणारा WTP बंद आहे. मला आपल्या मार्फत मंत्री महोदयांना विनंतीपूर्वक सांगावयाचे आहे की, गेल्या अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. तेथे दरवर्षी जवळपास २०० हेक्टर क्षेत्राचे नुकसान होत असते. त्याचे पंचनामे करुन त्यांना गेल्या ५ वर्षांचे प्रती हेक्टरी २ लक्ष रुपये द्यावेत, असा आदेश त्या कंपनीला देण्यात यावा.

अध्यक्ष महोदय, ज्या शेतकऱ्यांनी कंपनी विरुध्द दूषित पाण्यासंदर्भात तक्रारी केल्या आहेत. त्या शेतकऱ्यांच्या मुलांना या कंपनीने नोकरीतून काढून टाकले आहे. त्या मुलांना परत नोकरीवर घेण्याबाबत आदेश देण्यात यावा, अशी माझी विनंती आहे. मला आपल्या मार्फत मंत्री महोदयांना विनंतीपूर्वक विचारावयाचे आहे की, महाराष्ट्रातील इतर एमआयडीसीमध्ये कॉमन WTP कार्यान्वित केलेला आहे. तसा कॉमन WTP मलकापूरच्या दसरखेड एमआयडीसीमध्ये लावणार काय?

यानंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.आदित्य ठाकरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी ३ प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यापैकी पहिला प्रश्न पर्यावरणाच्या संदर्भात आहेत. त्याबाबत दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी १५ दिवसांची मुदत दिलेली आहे. त्यांनी विहीत मुदतीत सांडपाणी प्रक्रिया, त्याचा निचरा इत्यादी बाबींच्या संदर्भात उचित कार्यवाही केली नाही तर त्यांच्यावर सर्वाधिक कडक कारवाई करण्यात येईल, असे मी अश्वासित करतो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांचा दुसरा प्रश्न कामगारांच्या संदर्भात होता. तो कामगार विभागास हस्तांतरित करण्यात येईल व त्याचा आमच्या विभागाच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांचा तिसरा प्रश्न सीईटीपी प्रकल्पाच्या संदर्भात आहे. सदरहू औद्योगिक वसाहत लहान असली तरी देखील तेथे अधिकाधिक यंत्रणा उभारावयाची असेल त्यासंदर्भात त्वरित बैठक घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

श्री.चेतन तुपे : अध्यक्ष महोदय, बॅन्जो रासायनिक कंपनीच्या प्रदुषणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे, यासंदर्भातील लक्षवेधी सूचना मांडण्यात आली आहे. राज्यातील कानाकोपऱ्यामध्ये लहान मोठ्या रासायनिक कंपन्या आहेत. त्या प्रदूषण निर्माण करतात.

अध्यक्ष महोदय, मी प्रथम माननीय मंत्री श्री.आदित्य ठाकरे यांचे मनापासून अभिनंदन करतो. त्यांनी राज्यात इलेक्ट्रीक वाहनांच्या वापराचा अतिशय चांगला निर्णय घेतला आहे, त्यामुळे देशभरातील राज्यांपैकी आपल्या राज्यामध्ये निश्चितपणे पर्यावरण क्षेत्रात चांगले काम सुरु असल्याचे पाहण्यास मिळत आहे. अशाच पद्धतीने सुधारणा करीत राहिल्यास पुढील कालावधीत हवामान बदल, जागतिक तापमान बदल यासंदर्भात जगाला हे राज्य माननीय मंत्री यांच्या नेतृत्वाखाली एक मार्गदर्शक सूचना घालून देईल, असे मला वाटते.

असुधारित प्रत

श्री.चेतन तुपे...

अध्यक्ष महोदय, वसुंधरेचे रक्षण करणे हे आपणा सर्वांचे काम आहे. विधिमंडळाच्या वेगवेगळया समित्या आहेत, त्याधर्तीवर आमदार महोदयांची पर्यावर्णाची एक समिती गठीत केल्यास या विषयाच्या संदर्भातील सर्व प्रश्न एकत्रित करुन त्यांची पर्यावरण मंत्री महोदयांच्या नेतृत्वाखाली अधिक चांगली उकल करण्याच्या दृष्टीकोनातून चर्चा होतील. यासंदर्भात मंत्री महोदय निर्णय करतील काय व समिती गठीत करतील काय ?

अध्यक्ष महोदय, आता सीईआर लागू आहे परंतु तो अनेक ठिकाणी पडून असतो. संबंधित जिल्ह्यांचा सीईआर वापरला जात नाही, असा आमचा अनुभव आहे. त्यासंदर्भात धोरण आखणे आवश्यक असून कोणत्या प्रकल्पांना प्राधान्य द्यावयाचे याचा अग्रक्रम निश्चित करणे गरजेचे आहे. यासंदर्भात पर्यावरण विभाग प्राधान्यक्रम ठरवून देईल काय, त्यानुसार सीईआर यांचा आढावा घेऊन त्याचे लेखापरिक्षण करुन ते त्याच वर्षी वापर करण्यासाठी प्रकल्पांना देण्यात यावेत. दोन ते तीन वर्षांचे सीईआर कंपन्यांकडे पडून आहेत. आम्ही जिल्हाधिकारी यांना भेटून प्रकल्प दिल्यानंतर सीईआर उपलब्ध करुन देण्याची पुढील कार्यवाही होते. सर्व सीईआर दरवर्षी दिनांक ३१ मार्च पूर्वी वापरले जावेत याकरिता शासन निर्णय घेईल काय ?

श्री.आदित्य ठाकरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांच्या दोन्ही सूचना चांगल्या आहेत. पहिल्या सूचनेसाठी सजेशन फॉर ॲक्शन. सदरहू समिती गठीत करण्यात येईल. वरिष्ठ सभागृहाच्या माननीय उप सभापती यांनी पर्यावरण समिती गठीत केली आहे, त्याप्रमाणे आमदार महोदयांची समिती गठीत करण्यात येईल. सन्माननीय सदस्य यांनी मांडलेली दुसरी सूचना गंभीर आहे. त्यासंदर्भात प्राधान्यक्रम लावण्यात येईल. काही ठिकाणी Mining fund व CER fund असतो. त्यामधून पर्यावरणासाठी काय करता येईल, याबाबत नक्की विचार करुन सभागृहासमोर येऊ.

अप्रकाशित प्रत

श्री.राजेश एडके : अध्यक्ष महोदय, माझ्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही. मागील २० वर्षापासून २०० हेक्टर जमीनधारक शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. त्यासंदर्भात मागील ५ वर्षापासून २ लाख रुपये प्रति हेक्टर नुकसान भरपाई देण्याचे आदेश संबंधीत कंपनीला देण्यात येतील काय ?

श्री.आदित्य ठाकरे : अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईचे आदेश देण्यासंर्भात बैठक घेऊन विचार करण्यात येईल. पॅराक्लोरीन बेन्जीन वगैरे रासायनिक औषधे अग्रोबेस रासायनिक असतात. रासायनिक कंपनीचे सांडपाणी मातीत गेल्याने थोडे नुकसान होते. त्याकरिता स्ट्रॉम वॉटर ड्रेन निचऱ्यासाठी आदेश देण्यात आले आहेत. पुढील १५ दिवसांमध्ये रिप्लाय आल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

----------

असुधारित प्रत

**पू. शी.** : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील परशुराम घाटामध्ये रस्ता चौपदरीकरणचे काम सुरु असताना झालेल्या दुर्घटना यासंबंधी करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि त्यावर शासनाची प्रतिक्रिया

**मु. शी. :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील परशुराम घाटामध्ये रस्ता चौपदरीकरणचे काम सुरु असताना झालेल्या दुर्घटना यासंबंधी करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि त्यावर शासनाची प्रतिक्रिया या संबंधी सर्वश्री. भास्कर जाधव, शेखर निकम,वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. भास्कर जाधव (गुहागर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"रत्नागिरी जिल्हयातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील परशुराम घाटामध्ये रस्ता चौपदरीकरणासाठी डोंगरकटाईचे काम सुरू असताना दरड कोसळून त्याखाली दोन पोकलेन, एक डंपर गाडले जाऊन एका पोकलेन चालकाचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक ८ फेब्रुवारी, २०२२ रोजी घडणे, त्याआधी दिनांक ५ फेब्रुवारी, २०२२ रोजी याच ठिकाणी महामार्गाचे काम सुरू असताना अजस्त्र दगड कोसळून पायथ्याशी असलेल्या मौजे पेढे-बौध्दवाडीतील एका घराला भगदाड पडून मोठी हानी होणे, तसेच दिनांक २२ जुलै, २०२१ च्या अतिवृष्टीमध्ये परशुराम घाटातील काम सुरू असलेल्या ठिकाणाची दरड पेढे-कुंभारवाडी येथील घरावर पडून तीन जणांचा झालेला दुर्दैवी मृत्यू, रस्ता चौपदरीकरणाचे काम करणाऱ्या कंत्राटदार कंपनीकडून सुरक्षिततेच्या कोणत्याही उपाययोजना करण्यात न आल्यामुळे तेथे सतत

श्री. भास्कर जाधव...

दुर्घटना घडत असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांकडून होणे, घाटातील सुरक्षेबाबतच्या प्रश्नावर शासकीय यंत्रणा अद्यापही गंभीर नसणे, सतत दुर्घटना घडून जिवित व वित्त हानी होऊनही संबंधित कंत्राटदार कंपनीवर अद्याप कोणतीही कारवाई न होणे, सततच्या दुर्घटनांमुळे पेढे गावातील ग्रामस्थ तसेच घाटातील सुरक्षेचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री.अशोकराव चव्हाण (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. *

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण) :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, ही लक्षवेधी सूचना मांडत असताना माझ्या मनाला अत्यंत वेदना होत आहे. मुंबई-गोवा महामार्ग क्रमांक ६६ हा दोन राज्यांना जोडणारा आहे.

यानंतर श्री.तेंलग....

असुधारित प्रत

श्री.भास्कर जाधव.......

आज महाराष्ट्रामध्ये पाहिले तर दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या रस्त्यांचे देखील चौपदरीकरण व ६ पदरीकरण करण्यात आलेले आहे. परंतु हा दोन राज्य जोडणाऱ्या रस्त्याचे मात्र अद्याप चौपदरीकरण देखील होऊ शकले नाही. उक्त विषयासंदर्भात याच विधानसभेमध्ये माझ्यासह अनेक अनेक सन्माननीय सदस्यांनी अनेक वेळा चर्चा देखील केलेली आहे. त्यावर मंत्री महोदयांनी उत्तर देखील दिलेले आहे. आजच्या लक्षवेधी सुचनेवर देखील मंत्री महोदय उत्तर देतील. या लक्षवेधी सचुनेला उत्तर देणारे मंत्री महोदय अनुभवी आहेत. ते या राज्याचे माजी मुख्यमंत्री आहेत. नेहमी विकासाच्या बाबतील त्यांची भूमिका सकारात्मक असते, हे मला माहिती आहे.

अध्यक्ष महोदय, सन २०११ मध्ये उक्त रस्त्याच्या कामाची सुरुवात करण्यात आली होती. सन २०११ ते सन २०२२ म्हणजे ११ वर्षे पूर्ण होऊन देखील सदर रस्त्याचे काम पूर्ण होऊ शकले नाही. देशातील सर्व राष्ट्रीय महामार्गाचा विचार केला तर मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गावर अपघात होऊन सर्वात जास्त मृत्यू झाल्याची अधिकृत आकडेवारी समोर आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, कोकणातील बहुसंख्य माणसे मुंबई-पुणे शहरामध्ये राहतात. एका-एका गावातील एका-एका वाड्यातील माणसे मुंबईमध्ये राहण्यासाठी खोली घेतात व त्या खोलीमध्ये १०-१०, २०-२० माणसे राहतात. सणानिमित्त किंवा अन्य कोणत्या कार्यक्रमासाठी गावाकडे जाण्यासाठी १०-२० माणसे बसतील अशी एक बस भाड्याने करुन ते जातात. अशा वेळी अपघात झाला तर एकाच कुटुंबातील, एकाच गावातील किंवा एका वाडीतील ५-५ ,१०-१० माणसे मृत्यूमुखी पडतात. अशा प्रकारच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. एवढे अपघाचे प्रमाण असून देखील मुंबई-गोवा हा दोन राज्यांना जोडणाऱ्या रस्त्याचे काम पूर्ण होऊ शकले नाही. हा राष्ट्रीय महामार्ग आहे, असे मंत्री महोदय उत्तरामध्ये सांगतील, हे मला माहिती आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी यांचा बोलबाला राज्यामध्येच नव्हेतर पूर्ण देशामध्ये सुरु आहे. त्यांनी केलेली अनेक भाषणे मी ऐकलेली आहेत. ते वेगवेगळया नवीन कल्पना जनतेपुढे मांडत असतात.

असुधारित प्रत

श्री.भास्कर जाधव.......

खालून जड वाहने, त्यावरुन सर्वसाधारण वाहने व त्यावरुन मेट्रो धावणारे रस्ते व्हावेत व सदर रस्त्यांच्या आजूबाजूचा भाग हा आर्थिकदृट्या विकसित व्हावा, अशा प्रकारच्या अनेक कल्पना त्यांनी मांडलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, मुंबई-गोवा महामार्गाच्या कामासंदर्भात मी त्यांना स्वत: दोन ते तीन वेळा भेटलो आहे. त्यावेळी मी भारतीय जनता पार्टीमध्ये जात असल्याच्या बातम्या देखील प्रसारित करण्यात आल्या होत्या. मी कोणत्या पक्षात जाते हा प्रश्न नसून त्या रस्त्याचे काम झाले पाहिजे, अशी माझी धारणा होती. यासंदर्भात माननीय श्री.नितीन गडकरी यांना कळकळीने पत्र लिहिलेली आहेत. सन २०११ मध्ये सदर रस्त्याचे काम सुरु झाले तेव्हा आपण स्वत: आला होतात. त्यानंतर सन २०१४ मध्ये अनेक ठिकाणी भुमिपूजन देखील करण्यात आली. आता आपण कधीतरी मुंबई-गोवा रस्त्याने प्रवास करुन त्या रस्त्याची काय दूरवस्था झाली आहे ते पहा, अशा आशयाचे पत्र पाठविलेले आहेत. माननीय न्यायालयामध्ये सादर करण्यात येणाऱ्या शपथपत्रामध्ये साफपणे असत्य स्वरुपाची माहिती दिलेली असते. आम्ही त्या रस्त्याने प्रवास करीत असताना कोणत्या वेळी केव्हा दुर्घना होईल हे सांगता येत नाही. अधिकारी लेखी उत्तर देतात आणि आपण त्यानुसार माननीय न्यायालयामध्ये शासनाचे म्हणणे मांडतो. शासनाकडून माननीय न्यायालयामध्ये प्रगती अहवाल सादर केला जातो. मुंबई-गोवा हा रस्ता आता दुपदरी आहे. आता त्या रस्त्याचे चौपदरीकरण करावयाचे आहे. कोकणामध्ये जाणारा हा एकमेव महामार्ग आहे. सागरी मार्गाचे काम सुरु करुन २५ वर्षे पूर्ण होत आहेत. तरी त्या मार्गाचे काम पूर्ण होत नाही. कोकणामध्ये समृद्धी महामार्गासारखा नवीन महामार्ग करण्याचा संकल्प केलेला आहे. तो महामार्ग होईल तेव्हा होईल. परंतु या महामार्गाचे काम करण्यासाठी मी केवळ परशुराम घाटाचा विषय आपल्यासमोर मांडलेला आहे. सन २०१६ पासून १.२ किलोमीटर असलेला परशुराम घाटाच्या रस्त्याचे काम देखील पूर्ण होऊ शकले नाही.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

श्री. भास्कर जाधव.....

अध्यक्ष महोदय, सव्वा कि.मी.च्या अंतरामध्ये यावर्षी ७ माणसे मृत्युमूखी पडली आहेत. पावसाळयामध्ये रस्त्याच्या वरच्या भागातील दरड कोसळून तीन माणसे गाडली गेली आहेत. त्यानंतर एक मोठा दगड रस्त्यालगतच्या घरामध्ये गेला होता. तेथे एकाचा मृत्यू झाला आहे. मध्यंतरी तो रस्ता कट करीत असताना दोन पोर्कलँड, एक डम्पर आणि पोर्कलँड वाहन चालक गाडले गेले आहेत. वाहनचालकाचा मृतदेह अतिशय परिश्रम करुन काढावा लागला. तेथील दोन्ही पोर्कलँड गाडले गेलेले आहेत. अशी परिस्थिती कायम राहिली तर अनेक मृत्यू होतील. मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले की, ४०० मीटरवरील दरड काढली आहे. उर्वरित दरड या पावसाळयापूर्वी काढावी. अन्यथा त्या दरडीच्या खाली असलेल्या पेडगावची अवस्था माळीण या गावासारखी होईल. ते गाव गाडले जाईल आणि तेथे किती लोक गाडली जातील, हे सांगता येणार नाही. मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, पावसाळा सुरु होण्यापूर्वी व तेथील वाहतूक सुरुळीत होण्याच्या दृष्टीने परशुराम घाट कट करण्यात येणार आहे काय ? तसेच ४० कि.मी. लांबीचा रस्ता दिला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात हा रस्ता झाला आहे. परंतु रत्नागिरी आणि रायगडमध्ये हा रस्ता झाला नाही. हा रस्ता पूर्ण होण्याच्या दृष्टीने माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांना हा रस्ता पूर्ण होण्यासाठी इकडे बोलविण्यात येणार काय ? माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी, एमएसआरडीसीचे मंत्री श्री. एकनाथ शिंदे आणि आपण तिघेजण या रस्त्याने प्रवास करुन पाहणी करणार काय ? तसेच किती दिवसात हा रस्ता पूर्ण करण्यात येणार आहे ? मंत्री महोदयांनी वरच्या सभागृहामध्ये सांगितले की, मे, २०२३ पर्यंत हा रस्ता पूर्ण करण्यात येईल. डिसेंबर, २०१६ मध्ये याबाबत प्रश्न विचारला तेव्हा सांगितले की, डिसेंबर, २०१८ मध्ये रस्ता पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर पुन्हा डिसेंबर, २०१९ मध्ये पूर्ण होईल, असे सांगितले होते. आता मे, २०२३ पर्यंत पूर्ण होईल असे सांगण्यात येत आहे. परंतु मला वाटते की, मे, २०२३ पर्यंत रस्ता पूर्ण होणार नाही. म्हणून मी विनंती करतो की, माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री, माननीय मंत्री श्री. एकनाथ शिंदे आणि माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांनी एकत्र येऊन या रस्त्याची पाहणी करावी व तो रस्ता कधीपर्यंत पूर्ण

असुधारित प्रत

श्री. भास्कर जाधव.....

करण्यात येणार ? तसेच मृत्युमूखी पडलेल्या लोकांना स्थायी आदेशानुसार पैसे मिळतील. परंतु कंत्राटदाराकडून अधिकचे पैसे मिळवून देण्यात येणार आहेत काय ? मंत्री महोदयांनी सांगितले की, हे पैसे मिळवून देण्याचा प्रयत्न सुरु आहे. परंतु अद्यापपर्यंत ते मिळालेले नाहीत. तसेच मुख्यमंत्री सहायता निधीतून अधिकचे पैसे या लोकांना मिळवून देण्यात येणार आहे काय ?

श्री. अशोकराव चव्हाण : अध्यक्ष महोदय, हा विषय मुंबई-गोवा महामार्गाचा आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जावध यांनी या अनुषंगाने जवळपास १५ ते २० प्रश्न एकदम उपस्थित केले आहेत. त्यामुळे सर्वच प्रश्न मला आठवत नाहीत. तरीही जेवढे उत्तर देता येईल, तेवढे देण्याचा मी प्रयत्न करेल. मुंबई-गोवा महामार्गावर वरच्याही सभागृहात चर्चा झाली होती. त्याचे इतिवृत्त सर्वच सन्माननीय सदस्यांकरिता महत्त्वाचे आहे. हा विषय मागील अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. मी सांगू इच्छितो की, हा राष्ट्रीय महामार्ग आहे. मी असे म्हटले असते की, हा रस्ता राज्य सरकारकडे येत नाही, तो राष्ट्रीय महामार्गाचा विषय आहे. माननीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्याकडील विभागाचा हा प्रश्न आहे. परंतु मी असे म्हणणार नाही. मी सांगू इच्छितो की, या रस्त्याचा प्रश्न सुटण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल व तो लवकर मार्गी लागावा, अशी शासनाची भूमिका आहे. यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. मी वरच्या सभागृहात सांगितले आहे की, मुंबई-गोवा महामार्गाचे काम वेगाने होत आहे. मध्यंतरी चुकीच्या कंत्राटदारांची निवड करण्यात आली होती. त्यांना टर्मिनेट करण्यात आले आहे. त्यांच्यावर वेगाने कारवाई सुरु आहे. नवीन कंत्राटदारांची नियुक्ती झाली आहे. माझ्याकडे सध्या सविस्तर माहिती उपलब्ध नाही. परंतु मी सांगू इच्छितो की, यातील बहुतांश भाग डिसेंबर, २०२२ मध्ये पूर्ण होईल आणि उर्वरित काम मे, २०२३ पर्यंत करण्याचा विभागाचा प्रयत्न आहे. यादृष्टीने केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरु आहे. त्याकडे राज्य सरकारचे लक्ष आहे.

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

श्री.अशोकराव चव्हाण.....

कारण होळी व गणपती सणाला लोक मोठया प्रमाणात कोकणात जातात. कोकण व गोव्याला जोडणारा हा रस्ता निश्चितपणे महत्त्वपूर्ण आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी उपस्थित केलेला मुद्दा कशेडी ते परशुराम घाट या सेक्शनचा आहे. या सेक्शनची एकूण लांबी ४२ किलोमीटर असून त्यापैकी सुमारे ३९ किलोमीटर काम पूर्ण झाले आहे. केवळ घाटातील ३.२३ किलोमीटर रस्त्याचे काम अडचणीचे आहे. परंतु ते काम देखील सध्या सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, या निमित्ताने मी सांगू इच्छितो की परशुराम घाट हा कोकणातील पुरातन घाट आहे. त्यातील काही भाग सुमारे ३० ते ३५ मीटर उंचीच्या डोंगरांनी आणि सुमारे ६० ते ७० मीटर उंचीच्या खोल दऱ्यांनी व्यापलेला आहे. म्हणजे एकीकडे डोंगर आणि दुसरीकडे दऱ्या अशी स्थिती आहे. तसेच तेथे सुमारे ४ हजार ते ४ हजार ५०० मिलीमीटर पाऊस पडतो. म्हणजे तो अतिवृष्टीचा प्रदेश आहे. या बाबींचा देखील कामावर परिणाम होतो. रस्त्याचे काम करण्यासाठी तेथील भौगोलिक परिस्थिती अतिशय प्रतिकूल असल्यामुळे अतिशय काळजीपूर्वक काम करावे लागते. तेथे प्रचंड पाऊस असल्यामुळे दरडी कोसळण्याचे प्रमाण देखील जास्त आहे.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी दिनांक २२ जुलै, २०२१ रोजीच्या घटनेचा उल्लेख करण्यात आला आहे. त्याच काळात महाड तालुक्यातील तळिये गावात ८७ लोकांचा अतिवृष्टीमुळे मृत्यू झाला. तसेच रत्नागिरी जिल्हयातील पोसले फुर्द या गावामध्ये १७ लोकांचा व चिपळूण तालुक्यातील पेढे-कुंभारवाडी येथे ३ लोकांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. दिनांक २१, २२ व २३ जुलै या कालावधीमध्ये चिपळूण परिसरामध्ये १०४ मिली, ४५० मिली व ११० मिलीमीटर एवढा पाऊस पडला.

असुधारित प्रत

पावसाचे जास्त प्रमाण व डोंगर-दऱ्यांचा प्रदेश असल्यामुळे काम करणे कठीण जात आहे.

अध्यक्ष महोदय, या भागातील केवळ ३.२३ किलोमीटरचे काम शिल्लक आहे. या सेक्शनच्या वरील भागामध्ये पेढे-परशुराम हे गाव असून खालच्या भागात पेढे-कुंभारवाडी हे गाव आहे. येत्या दोन महिन्यांमध्ये म्हणजे मे, २०२२ पर्यंत हे काम पूर्ण होईल.

अध्यक्ष महोदय, दिनांक २२ व २३ जुलै रोजी जे ३ मृत्यू झाले त्यावेळी काम बंद होते. अतिवृष्टीमुळे ते मृत्यू झालेले आहेत. या कामामुळे दरड कोसळलेली नाही. त्यावेळी काम बंद होते. दिनांक ८ फेब्रुवारी, २०२२ रोजी दरड कोसळून एक अपघाती मृत्यू झाल्याची बाब खरी आहे. त्यामध्ये कशेडी परशुराम हायवे प्रा.लि. या कंपनीच्या मालकीचा एक डंपर देखील यामध्ये गाडला गेला. मृत व्यक्ती हा पोकलेन चालक होता. कंपनीच्या ग्रुप पर्सनल ॲक्सिडेंट क्लेम आणि एम्प्लॉईज कॉम्पेन्सेशन क्लेमच्या माध्यमातून मृत व्यक्तीच्या कुटुंबास ५ लक्ष रुपये मिळतील अशी अपेक्षा आहे. याबाबतची कार्यवाही सुरु झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, जुलै, २०२१ मध्ये दरड कोसळून ज्या लोकांचा मृत्यू झालेला आहे त्यांच्या कुटुंबियांना शासन नियमाप्रमाणे नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्यू झाल्यानंतर देण्यात येणारे ४ लक्ष रुपये व पंतप्रधान सहाय्यता निधीतून १ लक्ष रुपये असे एकूण ५ लक्ष रुपये देण्यात आले आहेत. तसेच जखमींना तहसिल कार्यालयातून १२ हजार ७०० रुपये देण्यात आले आहेत.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. अशोक चव्हाण....

या विषयाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे. परंतु ज्या ठिकाणी रॉक आहे त्या ठिकाणी आपल्या स्टेप कटींग करावी लागते. आजुबाजूला डोंगरमाथा आहे आणि खाली दरी आहे. कठीण परिस्थितीत रिटेनिंग वॉलचे बांधकाम करुन हे काम करायचे आहे. हे काम थोडे अवघड आहे आणि अशा परिस्थतीत कामाला गती देऊन ते काम आपण मार्गी लावू. मला जे सांगण्यात आले आहे त्यानुसार आपण मे अखेरपर्यंत ते काम पूर्ण होईल अशा प्रकारे मला सांगण्यात आले आहे.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, सन्माननीय मंत्री महोदय अतिशय प्रामाणिकपणे उत्तर देत होते. काल त्यांनी मला बोलावून घेऊन माझ्यासमवेत चर्चा केली आहे. मी नम्रपणे त्यांच्या लक्षात आणून देतो. आपण आता सांगितले की, ४० कि.मी.पैकी १ कि.मी. रस्त्याचे काम शिल्लक आहे म्हणजे ३९ कि.मी. रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण हे कशेडी ते परशुराम घाट या भागापुरते म्हणाला आहात. पण मी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो परशुराम घाट ते आरवली आणि आरवली ते वाकेड येथपर्यंतच्या रस्त्याचा आहे. परशुराम घाट ते आरवली हा रस्ता आतापर्यंत जेमतेम २८ टक्के झाला आहे. माझ्याकडे आपल्या कार्यकारी अभियंत्यांनी दिलेले औपचारिक पत्र आहे. मी आपला मुद्दा खोडून काढत नाही. परंतु हा २८ टक्के रस्ता झाला असला तरी त्या रस्त्यावर सलग ३ कि.मी.चे सुध्दा कॉंक्रीटीकरण झालेले नाही. या बाजूला १००-२०० मिटर आणि पुन्हा डायव्हर्शन तर त्या बाजूला १००-२०० मिटर आणि पुन्हा डायव्हर्शन असे रस्त्याचे काम झाले आहे. सलग तेथे रस्त्याचे काम झालेले नाही. आरवली ते वाकेड हा मूळात १२ ते १४ टक्केच रस्ता झाला आहे. इतर रस्त्याचे काम झालेले नाही. त्यामुळे आपल्याला जी माहिती अधिकाऱ्यांकडून दिली जाते ती धादांत असत्य आहे. सभागृहात खोटे असा शब्द बोलला जात नाही म्हणून मी असत्य म्हणालो. यामध्ये आपला दोष काहीही नाही. म्हणून मी आपल्याला आग्रह धरतो की, केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांना आमच्या वतीने आपण पुढाकार घेऊन बोलवा आणि एकदा बाय-रोड प्रवास करा. म्हणजे आपल्याला वस्तुस्थिती समजेल की आम्ही

असुधारित प्रत

श्री. भास्कर जाधव...

सांगतो ते खरे आहे की अधिकारी सांगतात ते खरे आहे. त्यामुळे आपण एकदा कधी तरी त्रास घ्या. आता आंब्यांचा सिझन आहे. मासे पण चांगले मिळतात. आपण दोघेही चांगले खवय्ये आहात आणि म्हणून आम्ही आपले दोघांचेही जोरदारपणे स्वागत करतो. पण आमच्या रस्त्याचे काम करावे, एवढीच आमची कळकळीची विनंती आहे. अधिकारी सांगतात त्यापेक्षा आम्ही रोज त्या रस्त्यावरुन प्रवास करतो. त्यामुळे आपण त्या अर्थाने या रस्त्याची पाहणी करावी आणि संबंधितांना सूचना द्याव्यात, अशी माझी कळकळीची विनंती आहे.

श्री. अशोक चव्हाण : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी परशुराम घाट ते आरवली या भागाचा उल्लेख केला आहे. या कामाचा कालावधी साधारणपणे मे २०२३ पर्यंत पूर्ण व्हावे असा आमचा प्रयत्न आहे. आपला प्रश्न होता तो त्या घटनेसंबंधी होता आणि त्यासंबंधी मी मघाशी खुलासा केला आहे. आता आपण वेगळा संदर्भ देत आहात. परशुराम घाटातील आरवलीपर्यंतच्या सेक्शनचा आपण उल्लेख केला आहे. त्या भागाची लांबी ३४ कि.मी. आहे. त्या कामाचा कार्यारंभ आदेश सन २०१७ मध्ये दिलेला आहे. ते काम २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. त्या कामाचा कंत्राटदार टर्मिनेट झाला. आता ते काम करण्याचा अंदाजित दिनांक ३१ मे २०२३ पर्यंत हे काम पूर्ण व्हावे अशा प्रकारचा सरकारचा आहे. सुमारे ५२ टक्के काम आता पूर्ण झाले आहे. मध्यंतरी भूसंपादन मोबदला वाटपाच्या बाबतीत काही वाद होते ते प्रश्न आता मार्गी लागले आहेत. ते देखील विलंबाचे एक कारण आहे. परंतु आता हे सर्व काम ३१ मे २०२३ अखेरपर्यंत पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा आहे.

श्री. नितेश राणे : अध्यक्ष महोदय, कोकणातील सर्वच घाटांचा हा प्रश्न आहे. गगनबावडा आणि भूईबावडा येथील जो घाट आहे त्याची देखील परिस्थिती अतिशय वाईट आहे. माननीय राज्यमंत्री श्री. बंटी पाटील आपल्या मागेच बसले आहेत. या दोन्ही घाटांची परिस्थिती अशी भयानक आहे की, तेथील वाहतूक महिनोंमहिने बंद असते. तसेच माझ्या वैभववाडी तालुक्यातून वरच्या भागात जाणारा

श्री. नितेश राणे...

ऊस जो माननीय बंटी पाटील यांच्या कारखान्याकडे जातो तो देखील नेता येत नाही. कारण गाड्या नेऊ शकत नाही. त्या घाटाची परिस्थिती अतिशय वाईट आहे. म्हणून आपण ज्याप्रमाणे त्या घाटाबद्दल विचार केला तसाच विचार गगनबावडा व भूईबावडा या घाटाच्या कामाकडे लक्ष देऊन करावा, अशी विनंती मी या निमित्ताने करतो.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री.अशोक चव्हाण : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितेश राणे यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबाबत मी त्यांच्या उपस्थितीत माझ्या दालनात एक बैठक घेऊन ज्या प्रश्नाबाबत त्यांची अडचण असेल ते मार्गी लावण्याचा प्रयत्न करेल.

श्री. शेखर निकम : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी जो मुद्दा मांडला आहे तो कोकणवासीयांसाठी खूप महत्त्वाचा आहे. कारण श्रीराम देखील १२ वर्षानंतर वनवासातून बाहेर आलेले आहेत. परंतु आम्ही कोकणवासीय १३ वर्षापासून या रस्त्यांच्याच प्रश्नामध्ये आहोत. याच्या मागून आलेले अनेक रस्ते पूर्ण देखील झालेले आहेत. ज्या पेडेगाव चा उल्लेख करण्यात आला ते गाव माझ्या मतदारसंघातील आहे. त्याबाबत तातडीची उपाययोजना केली नाही तर पूर्ण गाव उद्धवस्त होईल ही भिती आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, तेथील काही जण मृत्युमुखी पडले आहेत. पावसामुळे तिथे जी दरड कोसळली त्यामध्ये तीन जणांचा मृत्यू झाला आणि त्यांचे घरे पूर्णपणे उद्धवस्त झाली. सदरच्या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून माझी आपल्याकडे अशी मागणी आहे की, शासन त्या घरांना काही नुकसान भरपाई देणार आहे काय ? कारण आज ते सर्वजण रस्त्यावर आले आहेत त्यांचाही प्रश्न तेवढाच महत्त्वाचा आहे. हे सर्व करीत असताना आपण जर परशुराम घाट दुरुस्त करणार असू तर त्याला पर्यायी चिरणी मार्गे आमंडस मार्गे चिपळूण येथे जाता येते. या रस्त्याचे रुंदीकरण करुन तो रस्ता जर उत्तम दर्जाचा झाला तर आपल्यासमोर एक पर्याय उभा राहू शकतो. दुसरी बाब अशी की, या घाटाच्या माध्यमातून संगमेश्वर येथे खूप मोठया प्रमाणात बोअर ब्लास्टिंग होते. तेथील श्रीमती खान नावाच्या महिलेचे घर पूर्णपणे ब्लास्टिंगमुळे नष्ट झालेले आहे. तेथील श्री. म्हात्रे नावाच्या कंत्राटदाराकडे वेळोवेळी आमचा पाठपुरावा सुरु आहे. परंतु अक्षरश: या विषयाला उडवून लावले जाते. त्यामुळे या माध्यमातून त्या घराचीही नुकसान भरपाई देण्याचे आदेश व्हावेत. दरडी कोसळतात, घरे वाहतात, माणसे मृत्युमुखी पडतात असे अनेक अपघात होत असतात. पण त्याहीपेक्षा रस्त्याचे काम अपूर्ण असल्यामुळे परवा देखील कळंबस सारख्या गावात कॉलेजला जाणाऱ्या मुलीचा अपघात झाला. त्या रस्त्यामुळे तिचा मृत्यू झाला. त्यांनाही शासनाची मदत होणे खूप गरजेचे आहे.

असुधारित प्रत

श्री. शेखर निकम....

माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. अशोक चव्हाण यांना माझी विनंती आहे की, १३ वर्षाच्या कालावधीनंतर तरी निदान आम्हाला या घाटातून मोकळीक मिळावी आणि खूप चांगल्या पद्धतीचा रस्ता व्हावा. कारण आता जो रस्ता झाला आहे तो अत्यंत निकृष्ट दर्जाचा आहे. बरेचजण कोणाकोणाच्या गालाची उदाहरणे देत असतात आमच्या भागातील रस्त्याला कोणाचे उदाहरण द्यायचे हा आमच्यासमोरील मोठा प्रश्न आहे. कारण तिथे २ किलोमीटर गेल्यानंतर खाली जाते आणि मग परत गाडीतून वर उडी मारल्यासारखे होते. तो रस्ता लवकरात लवकर पूर्ण करुन आम्हा कोकणवासीयांना न्याय द्यावा, एवढीच मागणी आहे.

श्री. अशोक चव्हाण : अध्यक्ष महोदय, हे दोन वेगवेगळे प्रश्न आहेत. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी जो प्रश्नांकित विषय उपस्थित केला त्याबाबतीत मला एवढेच सांगायचे आहे की, कोकणामधील भौगोलिक परिस्थिती आणि तेथील डोंगरातील मातीच्या अवस्था यासाठी अतिवृष्टीमुळे दरड कोसळण्याचे प्रमाण मोठया प्रमाणावर आहे. त्यामुळे तेथील सॉईल कंडीशनची माहिती घेण्यासाठी पर्यावरण आणि अन्य विभागांना आम्ही सूचना देत आहोत. कोकणामध्ये दरड कोसळल्यामुळे रेल्वे बंद होते, रस्ता बंद होतो. याबाबत आता आपण जे प्रश्न ऐकत आहोत त्यासाठी या भागाचा इकॉलॉजिकल स्टडी होऊन मधल्या काळात अतिवृष्टीमुळे या परिसरात खूप मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे एकंदरीत पर्यावरणाच्या संदर्भातील जे विषय निर्माण होत आहेत त्याचा सखोल अभ्यास करावा, अशा माननीय मुख्यमंत्र्यांच्या सुद्धा सूचना आहेत. त्यामुळे आपण ती माहिती घेऊन तया अनुषंगाने व्यापक असे काय करण्याची गरज आहे यावर धोरणात्मक निर्णय घेण्याची शासनाची तयारी आहे.

अध्यक्ष महोदय, यापूर्वी जो विषय उपस्थित करण्यात आला होता आणि सन्माननीय सदस्यांना आता जो विषय सांगितला आहे की, या रस्त्याला काही पर्याय काही करता येईल काय ? तर त्यासाठी आमचा असा प्रयत्न आहे की, पिरलोटे, चिरडी, आमंडस आणि कळंबस फाटा या मार्गाला राज्य महामार्गाचा दर्जा देऊन

असुधारित प्रत

श्री. अशोक चव्हाण....

आपण पर्यायी मार्ग काढूया. घाटातील हा रस्ता बंद पडला, तिथे दरड कोसळली किंवा तिथे काही अपघात झाला किंवा अन्य प्रश्न निर्माण झाले तर याला पर्यायी रस्ता म्हणून पिरलोटे पासून कळंबस फाट्यापर्यंत जो पर्यायी रस्ता आहे त्याला आपण राज्य महामहार्गाचा दर्जा देऊ. तसेच हा रस्ता आपण चौपदरी करीत आहोत. तो सिमेंट काँक्रीट करुन पर्यायी रस्ता म्हणून उपलब्ध करुन देऊ हा त्यातील पर्याय देण्यासाठी आम्ही विचार करीत आहोत. सीआयएफमधून याला रस्त्याचे काम देण्याच्या बाबतीत प्रस्ताव आम्ही पाठवणार आहोत.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री. अशोक चव्हाण...

सीआरएफ मधून रस्त्याचे काम घेण्याबाबत प्रस्ताव पाठवणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. राणे यांनी तळेरे ते गगनबावडा एनएच १६५ बाबत उल्लेख केला. मिनीस्ट्री ऑफ रोड ट्रान्सपोर्ट यांच्या कडून वार्षिक नियोजनमध्ये हे काम मंजूर करण्यात आले आहे, अशी माहिती मला मिळाली आहे.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांचे मी धन्यवाद व्यक्त करतो. त्यांनी या विषयाला वाचा फोडली आहे. मंत्री देखील सकारात्मक उत्तर देत आहेत आपणही राजकारण बाजूला ठेवून चर्चा करीत आहोत. कोकणाला काय शाप आहे मला माहीत नाही. मुंबई ते गोवा या महामार्गाची कधी परिपूर्तता होईल, हे सांगता येत नाही. या करिता आता नवसच सांगावा लागेल किंवा होय रे महाराजा करावे लागेल. या ठिकाणी उत्तरे दिली आहेत. मला आश्चर्य वाटते की, कोकणात भरपूर पाऊस गेल्या ८ ते१०वर्षातच येतो असे नाही.

अध्यक्ष महोदय, परशुराम घाटाचा विषय सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी मांडला आहे. श्री. राणे यांनी गगनबावडा संबंधी सांगितले. कोकणात ४ ते ५ हजार मि.मी पाऊस पडतोच. येथे दरडी व खोली पूर्वीपासूनच आहे. डी.पी बनवताना आपण योग्य विचार केला काय, असा माझ्या मनात प्रश्न आहे. कामाची व्याप्ती करताना आपण या गोष्टींचा विचारच केला नाही काय, असा प्रश्न आहे. मात्र आता मागे जाऊन काही फायदा नाही. आपल्याला पुढेच जावे लागेल. ३ फेब्रुवारी नंतर ८ फेब्रुवारी रोजी घटना घडली असे सांगितले. फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात माझे अतिशय जिवलग व घरचे संबंध असणारा मित्र श्री. जितेंद्र राऊत याच्या सख्या भावाची बायको सौ. निलेश राऊत यांचा अपघात झाल. तिचे वय ४० वर्षेही नसेल. ते तिघे जण गावावरुन निघाले, सिंधुदुर्गातून याच रोडने रायगडपर्यंत आले. अपघाती वळण अशी नोंद आहे. गावकरी सांगतात की, येथे दर महिन्याला काही ना काही होत आहे. ४०च्या आतील सौ. निलेश राऊत हिचे सख्ख्ये एक भाऊ, एक चुलत भाऊ तिघे गाडीखाली गेले व त्याच वेळी मृत पावले. कोकणात अशा

ॲड. आशिष शेलार ....

घटना थांबतच नाहीत. आपण परशुराम घाटाबाबत सांगितले. मघाशी सन्माननीय सदस्य म्हणाले की, आमच्याकडे दोन कि.मी खाली व दोन कि.मी वर जंपींग राईड आहे. या महामार्गावर अशी स्थिती आहे. या संपूर्ण महामार्गावरील जंपींग राईड, अपघाती ठिकाणे, दरडीची ठिकाणे यांची यादी करणार काय ? सौ.निलेश राऊत केसमध्ये जितेंद्र  रुगणालयात गेला. रुग्णालयात अवस्था गंभीर होती. मला या दुर्घटनेमुळे तेथील परिस्थिती कळली. येथील आजुबाजूच्या गावातील लोकांना काय सुविधा मिळत असतील हे माहीत नाही. पोस्टमार्टेम करिता डॉक्टर नाही, स्ट्रेचर नाही,ट्रॉमा केअर सेंटर नाही, आयसीयु नाही. बॉडी अशीच ठेवली जाते. आपल्या जवळची व्यक्ती गेलेली असते,यामुळे ते बघवत नाही. गावकरी मदत करतात. हा विषय आपल्या अखत्यारित येईल की नाही मला माहीत नाही. केंद्रात माननीय मंत्री श्री. नितीन गडकरी सकारात्मक आहेत. राज्य शासनाने मदत करावी तसेच केंद्र शासनानेही मदत करावी.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

ॲड.आशिष शेलार ...

दोघांनी करावी. परंतु, या मार्गावर १-२ ठिकाणी ट्रॉमा सेंटर्स, हॉस्पिटल्स अद्ययावत करणे आवश्यक आहे. ती तुम्ही तातडीने करावीत, अशी माझी दुसरी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, माझी तिसरी विनंती सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांना आहे. त्यांच्या मागणीला माझे पूर्ण समर्थन आहे. माननीय श्री.नितीन गडकरी साहेबांना तेथे घेऊन आलेच पाहिजे. आम्ही सर्वपक्षीय लोक येण्यास तयार आहोत. माननीय श्री.नितीन गडकरी देखील सकारात्मक आहेत. मंत्री महोदय आपण त्यामध्ये लिड घ्यावा. त्यामध्ये फक्त एकच अमेंडमेंट आहे. तुम्ही म्हणालात की, दोघेही खवय्ये आहेत, मासे खूप आहेत, या. परंतु, मासे म्हटल्यावर माननीय श्री.नितीन गडकरी येणार नाहीत. कारण ते पूर्ण शाकाहारी आहेत. त्यामुळे अशी अमेंडमेंट करा की, शाकाहारी जेवण चांगले देऊ व मासेही चांगले देऊ. तुम्हालाही देऊ, त्यांनाही देऊ. त्यांना काजूची भाजी देऊ. तुम्हाला मासे देऊ. ही व्हिजीट ३१ मेच्या आधी करणार काय?

अध्यक्ष महोदय, माझे ३ स्पेसिफिक प्रश्न आहेत. ॲक्सीडेंटल स्पॉट्स, दरडीचे स्पॉट्स, जंपींग राईडचे स्पॉटस् आयडेंटिफाय करुन त्याच्या जवळ रिलिफ करणारी मेडिकल व्यवस्था उभी करणार काय? या पूर्ण महामार्गावर ट्रॉमा सेंटर, आयसीयु व्यवस्था नाही, तर एक किंवा दोन्ही सरकार मिळून हॉस्पिटल उभारणी करण्यासाठीचा प्रयत्न करणार काय? आम्ही सर्व पक्षीय नेते तेथे येण्यास तयार आहोत. माननीय श्री.नितीन गडकरी व तुम्ही ३१ मे पूर्वी तशी व्हिजीट करणार काय?

श्री.अशोक चव्हाण : अध्यक्ष महोदय, तिन्ही विषय महत्वाचे आहेत. त्या ठिकाणी जाण्याचा जो प्रश्न आहे त्याबाबत माझी अडचण नाही. माननीय श्री.नितीन गडकरी यांच्याकडे वेळ असेल तर माझी जाण्याची तयारी आहे. तुम्ही मदत करा. ते जर आले तर संयुक्तरित्या आपण पाहणी करुया. माझी काही अडचण नाही. माझ्याकडे वेळ आहे. त्यांना तो वेळ सुटेबल आहे की नाही हे आपण तपासून घ्यावे. माझी काही अडचण नाही. हा एक मुद्दा झाला.

श्री.अशोक चव्हाण ...

अध्यक्ष महोदय, माझ्या माहिती प्रमाणे चिपळूण तेथून ९ कि.मी. अंतरावर आहे. त्यामुळे तेथे हॉस्पिटल आहे. त्या हॉस्पिटलची अवस्था मी काही पाहिलेली नाही परंतु, तेथे जी काही व्यवस्था असेल ती. ते चिपळूणचे हॉस्पिटल सोईचे असेल व ते अद्ययावत करावयाचे असेल, चिपळूण मोठे शहर आहे. चिपळूणमध्ये हॉस्पिटल आहे. ते बरोबर नसेल. ते अद्ययावत करायची गरज असेल, ते ट्रॉमा सेंटर करायची गरज असेल... नसेल त्या ठिकाणी व्यवस्था तर त्याची माहिती मी जरुर घेईन.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाला सांगून त्या ठिकाणी ते हॉस्पिटल व अनुषंगिक बाबी लक्षात घेता त्या ठिकाणी असलेले हॉस्पिटल अद्ययावत करण्याच्या दृष्टीने ज्या काही कमतरता असतील त्या पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून माझ्या विभागाकडून सार्वजनिक आरोग्य विभागाला आम्ही जरुर कळवू. त्यातून ज्या काही त्रुटी असतील त्या पूर्ण करुन चिपळूणचे ते हॉस्पिटल अद्ययावत रहावे किंबहुना त्या घाटाच्या परिसरात अजून काही करण्याची गरज असेल तर त्याचाही विचार नक्की केला पाहिजे, हा दुसरा विषय झाला.

अध्यक्ष महोदय, तिसरा विषय घाटामध्ये ब्लॅक स्पॉट्स, दरड कोसळण्याची जी काही ठिकाणे असतील त्याची सर्व माहिती घेऊ. आपले धोरणच आहे. ब्लॅक स्पॉट्स आपण काढतो. जेथे ॲक्सीडंट स्पॉट्स आहेत. जेथे अशा घटना वारंवार घडत असतात त्या संदर्भात राज्य व केंद्र सरकार दोघांच्याही सूचना आहेत की, हे सर्व स्पॉट्स आयडेंटिफाय करुन ते काढले पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, मी आजच या सभागृहाच्या माध्यमातून विभागाला सांगेन की, परशुराम घाट व त्या परिसरातील सर्व ॲक्सीडेंट स्पॉट्सची अद्ययावत माहिती घेऊन सर्व ब्लॅक स्पॉट्स आपण आयडेंटिफाय करु. ज्या ठिकाणी दरड सातत्याने पडण्याचे प्रमाण आहे ती देखील माहिती घेऊ. त्या ठिकाणी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहेत त्या निश्चितपणे केल्या जातील.

अध्यक्ष महोदय, मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवर आपल्याकडे हायवे पेट्रोलची युनिट्स आहेत. पेट्रोल युनिट्समध्ये फायर एक्सटींग्वीशर आहेत, गॅस कटर आहेत,

श्री.अशोक चव्हाण ...

प्रोटेक्टिव्ह ग्लासेस तेथे दिल्या जातात. तेथे वॉटर कंटेनर, पिण्याचे पाणी, रबर ग्लोव्ह्ज ज्या काही गोष्टी एखाद्या वाहनामध्ये पूर्तता करुन ... ते निश्चित करण्याची भूमिका आहे. त्याच बरोबर पेट्रोलींग करण्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ सुध्दा निश्चित दिले जाईल.

अध्यक्ष महोदय, इमर्जन्सी मेडिकल सर्व्हीसेससुध्दा मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवर ज्या पध्दतीने या सर्व गोष्टी केल्या जातात त्या सुध्दा निश्चित केल्या जातील. लाईफ सपोर्ट सिस्टिम्स ज्या लागतात म्हणजे स्ट्रेचर, फोल्डिंग स्ट्रेचर, ऑक्सीजन सिलिंडर, स्टेथोस्कोप, डॉक्टर ट्रेन्ड स्टाफ लागतो या सर्व गोष्टी नॅशनल हायवेवर जे स्टँडर्ड्स आहेत त्या प्रमाणे पुरविण्याच्या बाबतीत धोरणच आहे आणि त्या सुध्दा या भागात नक्की पुरवल्या जातील हे मला मुद्दाम सांगावयाचे आहे.

श्री.राजन साळवी : अध्यक्ष महोदय, मुंबई गोवा महामार्गाबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री भास्कर जाधव, शेखर निकम, ॲड. आशिष शेलार व श्री.नितेश राणे यांनी आपली बाजू मांडलेली आहे. कोकणवासीयांचे हे स्वप्न होते की, मुंबई गोवा महामार्ग झालाच पाहिजे.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.राजन साळवी...

त्याकरिता ५ वर्षापूर्वी काम सुरु झाले असून ते अद्याप पूर्ण झाले नाही. लांजा ते गोवा हद्दीपर्यंतचा रस्ता पूर्ण झाला आहे. परंतु पनवेल ते लांजापर्यंतच्या रस्त्याची काय अवस्था आहे, याची आपणाला माहिती आहे. अतिवृष्टी झाली होती. मध्यंतरीच्या काळात आंदोलने करण्यात आली होती. सदरहू रस्त्याचे काम पूर्णत: बंद आहे ते सुरु करण्यात यावे, अशी आमची मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, मी माननीय मंत्री श्री.अशोकराव चव्हाण यांचे अभिनंदन करतो. मुंबई-गोवा महामार्गावरील कोल्हापूर भागात अंबाळा घाटाला पर्यायी रस्ता देवडेहून जात आहे. लांजा घाटाला पर्यायी रस्ता भांबेडाहून आहे. अनुस्कुराला घटाला पर्यायी रस्ता काजेडा आहे. हे तीन घाट फोडण्यासाठी यावर्षीच्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्यात येईल, असा मंत्री महोदयांनी सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक घेऊन निर्णय घेतला आहे. उक्त कामासाठी त्यांनी निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई-गोवा महामार्गावर ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी ओनी या ठिकाणची त्यांच्या विभागाची जागा आरोग्य विभागास वर्ग केली आहे. तेथे ट्रॉमा केअर सेंटर उभारण्यात यावे, अशी माझी मागणी आहे.

श्री.अशोकराव चव्हाण : अध्यक्ष महोदय, मी यापूर्वीच सांगितले आहे की, केंद्र सरकारच्या अख्त्यारितील राष्ट्रीय महामार्गांच्या कामाला आता बऱ्यापैकी गती आली आहे. मी विभागनिहाय माहिती सांगू शकणार नाही. काल मी विस्तृत माहिती दिली आहे. आजची लक्षवेधी सूचना एका मर्यादित विभागाच्या संदर्भात आहे. सन्माननीय सदस्य यांनी उल्लेख केलेल्या बाबींच्या संदर्भातील मुद्यांची माहिती घेऊन लेखी उत्तराद्वारे त्यांना कळविण्यात येईल.

असुधारित प्रत

श्री.सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिले आहे. मुंबई-गोवा महामार्गावर होणाऱ्या अपघाताबाबत सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी सांगितले आहे. दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य यांनी कोकणातील मार्ग कशा पद्धतीने तयार करावा, याबाबत सूचना केल्या. त्यासंदर्भात मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी यांचा दौराही आयोजित केला. गोव्यापासून मुंबईपर्यंत महामार्गाचे काम करण्यात येणार आहे. हा मार्ग गोवा राज्यातून सिंधुदुर्ग-रत्नागिरी-रायगड-पनवेल असा आहे. या रस्त्यावर १५० ते २०० कि.मी.अंतरावर एक ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याची सुविधा देण्यात येणार आहे, असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. त्यादृष्टीने नियोजन करणे गरजेचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.राजन साळवी यांनी ओनी या ठिकाणी ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याबाबत सांगितले आहे. सिंधुदुर्ग व गोवा मार्गाच्या मध्यवर्ती ठिकाणी एक ट्रॉमा केअर सेंटर उभारणे आवश्यक आहे. रायगड जिल्ह्याच्या हद्दीतही ट्रॉमा केअर सेंटर उभारणे गरजेचे आहे. कारण अपघात झाल्यानंतर तत्काळ मदत मिळण्याची आवश्यकता असते. त्या भागात ट्रॉमा केअर सेंटर असेल तर जखमी लोकांचे जीव वाचविणे शक्य होते, हा अनुभव आहे. त्यामुळे उक्त महामार्गावर ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे काय, नसेल तर करण्यात येईल काय ?

श्री.अशोकराव देशमुख : अध्यक्ष महोदय, राज्य महामार्ग किंवा राष्ट्रीय महामार्गावर ट्रॉमा केअर सेंटर उभारणे हे शासनाचे धोरण आहे. संपूर्ण राज्यांनी हे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे सदरहू रस्त्यावर ज्या ठिकाणी ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याची आवश्यकता आहे त्याबाबतचा अहवाल विभागाकडून घेण्यात येईल. तसेच लोकांच्या सूचना असतील त्यांचाही विचार करण्यात येईल. आपल्या राज्याच्या हद्दीतील सदरहू महामार्गावरील अपघात स्थळे विचारात घेऊन आरोग्य विषय सुविधा, वैद्यकीय व औषधी सुविधा देण्याकरिता सकारात्मक दृष्टीकोन ठेवून त्याबाबतचा प्लॅन आरोग्य विभागाला पाठविण्यात येईल. त्यासाठी मंजुरी घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय ट्रॉमा केअर सेंटर हे शासनाचे धोरण असल्याचे सांगत आहेत. माझ्याकडे आरोग्य विभागाचे लेखी उत्तर आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, राज्यतील ६० टक्के ट्रॉमा केअर सेंटरमधील पदे भरणे शक्य झाले नाही. त्यांनी असेही सांगितले की, ट्रॉमा केअर सेंटर हा काही मार्ग नाही. मंत्री महोदय सभागृहाला वारंवार चुकीची माहिती देत आहेत.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार......

ट्रॉमा केअर सेंटरमध्ये पद भरती करता येत नाही म्हणून आरोग्य विभागाने अनेक ट्रॉमा केअर सेंटर त्या त्या रुग्णालयाला जोडले आहेत. मराठवाड्यामधील देखील अनेक ट्रॉमा केअर सेंटर रुग्णालयाशी जोडलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू यांना सांगू इच्छितो की, ही सभागृहाची दिशाभूल आहे. आपणास खरच प्रश्न सोडवावयाचा असेल तर आपणाकडे एकच मार्ग आहे. आपल्याकडील २५ आमदारांची यादी माझ्याकडे द्यावी, त्यानंतर मी सदरहू काम करुन देईन.

श्री.अशोक चव्हाण : सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी आता केलेले वक्तव्य पूर्णपणे राजकीय आहे. त्याबद्दल मला अधिक काही बोलायचे नाही. ट्रॉमा केअर सेंटर हे ग्रामीण रुग्णालयास जोडण्याचे धोरण आहे. ट्रॉमा केअर सेंटर हे स्वतंत्र काम करीत नाही.

(सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार खाली बसून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

स्टाफ नाही हा येथे विषय नाही. ट्रॉमा केअर सेंटर बांधायचेच नाही, असे शासनाचे धोरण नाही. ज्या ज्या ठिकाणी ट्रॉमा केअर सेंटर उभारणे आवश्यक आहे, त्या त्या ठिकाणी निश्चितपणे ट्रॉमा केअर सेंटर उभारता येईल. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे सदर पूर्ण लांबीमध्ये आवश्यक ठिकाणी या सुविधा शासनाकडून पुरविण्यात येतील.

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, अशाच पद्धतीने कशेडी घाटामध्ये मध्ये अपघात होत होते व दरडी कोसळ होत्या. त्यावेळी माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी यांच्याकडे हा प्रश्न मांडण्यात आला. कशेडी घाटामध्ये १७ किलोमीटर वर चढण्यासाठी आणि १७ किलोमीटर खाली उतरण्यासाठी जवळ-जवळ ३५-४० मिनिटे लागत होती. त्यामुळे कशेडी घाटामध्ये बोगदा केला. तशाच पद्धतीचा बोगदा परशुराम घाटामध्ये करता येतो काय, याबाबतचा विचार करणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत

श्री.रविंद्र वायकर.......

ज्या ज्या ठिकाणी घाट आहेत, त्या त्या ठिकाणी भुयारी मार्ग किंवा बोगदा करता येतो काय, याबाबत शासनाने विचार करणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

श्री.अशोक चव्हाण : अध्यक्ष महोदय, हा तांत्रिक मुद्दा आहे. तेथील भौगोलिक परिस्थिती व तेथे असलेली सॉईल कंडिशनचा विचार करुनच बोगदा काढणे शक्य आहे की नाही, या बाबी तपासून घेण्यात येतील. जर शक्य असेल तर निश्चितपणे त्याचा विचार केला जाईल.

श्री.ज्ञानराज चौगुले : अध्यक्ष महोदय, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-६६ वर चर्चा सुरु आहे. त्या अनुषंगाने मला काही प्रश्न उपस्थित करावयाचे आहेत. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-६५ ची देखील अतिशय दूरवस्था झालेली आहे. सोलापूर ते कर्नाटक हद्दीपर्यंत एकही फ्लाय ओव्हर झालेला नाही. तरी देखील पथकर वसूल करण्याची कार्यवाही सुरुच आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांच्या समवेत आपण आपल्या दालनामध्ये बैठक घेणार आहात काय?

श्री.अशोक चव्हाण : ठीक आहे. माझ्या दालनामध्ये बैठक घेण्यात येईल.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** ऑबेरॉय मॉल समोर, शामबापू मंदिरा लगत, सी.एस.क्र.१०८ या शासनाच्या रिक्त भूखंडावर पोलीस उपायुक्त, परिमंडळ ११ व १२ चे कार्यालय सुरु करण्याबाबत

**मु.शी.:** ऑबेरॉय मॉल समोर, शामबापू मंदिरा लगत, सी.एस.क्र.१०८ या शासनाच्या रिक्त भूखंडावर पोलीस उपायुक्त, परिमंडळ ११ व १२ चे कार्यालय सुरु करण्याबाबत या संबंधी श्री.सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गोरेगांव (पूर्व), कुरार पोलीस ठाणे हद्दीत, ऑबेरॉय मॉल समोर, शामबापू मंदिरा लगत, सी.एस.क्र.१०८ या शासनाच्या रिक्त भूखंडावर पोलीस उपायुक्त, परिमंडळ ११ व १२ चे कार्यालय सुरु करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दोन वर्षापूर्वी शासनास लेखी निवेदन देऊनही अद्यापपर्यंत सदरहू भूखंड शासनाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता दिली नसल्याची बाब दिनांक ७ मार्च २०२२ रोजी निदर्शनास येणे, सद्यस्थितीत पोलीस उपायुक्त परिमंडळ ११ व १२ चे कार्यालय दहिसर येथे असल्यामुळे सामान्य व ज्येष्ठ नागरीकांना कार्यालयीन कामकाजाकरिता जोगेश्वरी (पूर्व) पासून दहिसर (पूर्व) पर्यंत प्रवास करतांना गैरसोईचा होत असणे, तसेच दिंडोशी पोलीस ठाणे सध्या खाजगी सोसायटीत असून कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने सदरची जागा अत्यंत अपुरी पडत असणे, त्याचप्रमाणे तेथील नागरीकांना पोलीस ठाण्यात येणारे तक्रारदार, सततची वर्दळ, गोंगाट इत्यांदी बाबीमुळे त्रास होत असल्याची नागरीकांची तक्रार असणे, तसेच परिमंडळ-१२ कार्यालय हे इतर पोलीस ठाण्यापासून लांब अंतरावर एका बाजुला असल्याने नागरीकांना कार्यालयीन

असुधारित प्रत

श्री.सुनिल प्रभू.......

कामकाजकरिता गैरसोय होत असणे, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी लेखी पत्र देऊनही व त्यास दोन वर्ष इतका कालावधी होऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच दखल घेऊन कार्यवाही करण्यात न येणे, यामुळे पोलीस उपायुक्त परिमंडळ ११ व १२ तसेच दिंडोशी पोलीस ठाणे येथील कार्यालयीन कामकाजासाठी भेटी देणाऱ्या नागरीकांची झालेली व होत असलेली प्रचंड गैरसोय, शासनाने सदर प्रकरणी सी.एस.क्र.१०८ हा सरकारी भूखंड मुंबई पोलीस प्रशासनाच्या पोलीस उपायुक्त परिमंडळ ११ व १२ तसेच दिंडोशी पोलीस ठाणे उभारण्याकरिता उपलब्ध करुन देण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील नागरीकांमध्ये निर्माण झालेला तीव्र अंसतोष व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया".

श्री. अशोक चव्हाण (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अधीच वितर ीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री.सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, पोलीस उपायुक्त परिमंडळ ११ व १२ चे कार्यक्षेत्र गोरेगाव (पूर्व) आणि मालाड (पूर्व) ते कांदिवलीपर्यंत आहे. या परिमंडळाचे कार्यालय दहिसर येथे आहे. सदर कार्यालय हे बैठी चाळीमध्ये आहे. आता तेथे डी.सी.पी. चे कार्यालय आहे. उक्त कार्यालाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी अर्थसंकल्पामध्ये निधीची तरतूद करुन तेथील दुरुस्तीची काही कामे करण्यात आलेली आहेत. परंतु उक्त कार्यालयातील टॉयलेट, बाथरुम आणि तेथील कर्मचाऱ्यांची दूरवस्था पाहिल्यानंतर आपल्या लक्षात येईल की, उपायुक्त परिमंडळ ११ व १२ ला एक स्वतंत्र कार्यालय उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघाचे नाव दिंडोशी आहे. माझ्या बाजूचा मतदारसंघ हा सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र वायकर यांचा आहे. दुसऱ्या बाजुचा मतदारसंघ हा सन्माननीय सदस्य श्री.अतुल भातखळकर यांचा आहे. आम्हा तिघांचा मतदारसंघ हा उक्त परिमंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये येतो. त्यामुळे मी ऑबेरॉय मॉल समोर, शामबापू मंदिरा लगत, सी.एस.क्र.१०८ या शासनाच्या रिक्त भूखंडावर पोलीस उपायुक्त, परिमंडळ ११ व १२ चे कार्यालय सुरु करण्याची मागणी केलेली आहे. सदर भूखंड हा शासनाचा आहे. दिंडोशी पोलीस स्टेशन हे खाजगी इमारतीमध्ये कार्यरत आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

श्री. सुनिल प्रभू .....

शासनाच्या या भुखंडावर डीसीपी कार्यालय आणि दिंडोशी पोलीस स्टेशन झाले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. अतुल भातखळकर आणि माझ्या मतदारसंघातील काही भागही त्या पोलीस स्टेशनच्या हद्दीला जोडण्यात आलेला आहे. हे पोलीस स्टेशन एका खाजगी इमारतीमध्ये आहे. तेथे अपुरी जागा आहे. शासनाच्या या भुखंडावर हे कार्यलय बांधले तर पोलीस स्टेशन आणि डीसीपी परिमंडळ कार्यालयास ते वापरता येईल. त्या भुखंडावर सध्या मेट्रोचे कार्यालय सुरु आहे. मेट्रो प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर तो भूखंड मोकळा होईल. मेट्रोचे कार्यालय नंतर दुसरीकडे हलविले जाईल. त्यानंतर तेथील भुखंडावर अतिक्रमण होईल. याचे कारण असे की, त्या भुखंडाशेजारी अशाच प्रकारे अतिक्रमण झालेले आहे. त्याबाबत माननीय न्यायालयात प्रकरण सुरु आहे. तसेच बाजुलाच असलेला फायर ब्रिगेडचा भुखंडही अडचणीत आहे. मुंबई महानगरपालिकेचे तत्कालीन नगरसेवक आणि तत्कालीन आमदार यांनी मोठा लढा यासाठी दिला होता व आता तो भूखंड फायरब्रिगेडच्या कर्मचाऱ्यांकरिता उपलब्ध करुन दिला आहे. त्यामुळे जो भूखंड रिक्त होईल त्यावर अतिक्रमण होईल आणि तो कोणा जमीन माफियाच्या ताब्यात जाईल. म्हणून मी विंनती करतो की, त्या भुखंडावर पोलीस स्टेशन आणि डीसीपी परिमंडळाचे कार्यालय उभे करावे. दिंडोशी पोलीस स्टेशनला यामुळे अधिक जागा उपलब्ध करुन देता येईल. त्यामुळे ही जागा शासनाने ताब्यात घ्यावी. या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात म्हटले आहे की, १६.५० चौ.मी. जागा न्यायालयीन वादग्रस्त आहे. १६.५० चौ.मी. पर्यंतचा भुखंडाचा भाग मोकळा होता. त्याकडे शासनाचे लक्ष नव्हते. त्याठिकाणी काहींनी वास्तव्याकरिता झोपड्या बांधल्या आहेत. तेथील लोक आता पक्की घरे बांधून तेथील त्या जागेवर स्वत:चा हक्क दाखवित आहेत. त्यांनी न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे. त्यामुळे हा भूखंड मोकळा झाल्यानंतर त्यावरही अतिक्रमण होऊ शकते. मी विनंती करतो की, याबाबत राज्य सरकारने निर्णय घेतला पाहिजे.

असुधारित प्रत

श्री. सुनिल प्रभू .....

अध्यक्ष महोदय, ३४ चा नवीन डीपी प्रकाशित झाला आहे. त्यामध्ये या भुखंडावर न्यायालय आणि शासकीय हाऊसिंग असे आरक्षण दाखविण्यात आले आहे. मी सांगू इच्छितो की, त्या भुखंडापासून १ कि.मी. अंतरावर सत्र न्यायालयाची इमारत आहे. असे असतानाही तेथे न्यायालयाचे आरक्षण दर्शविण्यात आले आहे. मला शंका आहे की, झारीतला शुक्राचार्य हा भूखंड मिळवून शासकीय कर्मचाऱ्यांकरिता इमारत किंवा त्यांची सोसायटी करुन तो भूखंड गिळंकृत करेल. यात कोणी विकासक आहे काय, असा मला संशय येत आहे. याबाबत मी अधिक चर्चा करणार नाही. मी विनंती करतो की, सरकारने हा भूखंड तात्काळ ताब्यात घ्यावा. महसूल विभागामार्फत तो गृह विभागाकडे वर्ग करावा. जनहिताच्या दृष्टीने आणि वाढीव लोकसंख्येचा विचार करता हे महत्त्वाचे आहे. परिमंडळ कार्यालयांतर्गत कांदिवली (पूर्व), दिंडोशी, जोगेश्वरी, दहिसर मतदारसंघाचा भाग येतो. त्यामुळे या सर्वांसाठी डीसीपी परिमंडळाचे कार्यालय उभे राहू शकेल. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, त्यांनी दिलेले निवेदनातील उत्तर हे दिशाभूल करणार आहे. ते अयोग्य आहे. मंत्री महोदयांनी या विषयाबाबत अधिवेशन कालावधीत बैठक आयोजित करावी. त्याबैठकीला आम्हाला बोलावावे. तसेच याबाबतचा निर्णय महसूल विभाग, गृह विभागाने घेऊन या भुखंडावर डीसीपी परिमंडळाचे कार्यालय आणि दिंडोशी पोलीस स्टेशनच्या इमारतीसाठी जागा उपलब्ध करुन द्यावी. याबाबत मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर द्यावे, अशी मी विनंती करतो.

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : अध्यक्ष महोदय, डीसीपी झोन क्र. ११ व १२ ला स्वतंत्र कार्यालय नाही. मुंबईतील सर्वच झोनसाठी स्वतंत्र कार्यालये आहेत. म्हणून ही जागा सरकारची आहे. गृह विभागाची इच्छा आहे की, या जागेवर हे कार्यालय झाले तर त्या अंतर्गत येणाऱ्या पोलीस स्टेशनसाठी ते सोयीचे होईल. सन २००५ मध्ये त्या भुखंडावर मनोरंजनाकरिता आरक्षण होते. नंतरच्या डीपीमध्ये न्यायालय आणि शासकीय वसाहत असे आरक्षण करण्यात आले होते.

यानंतर श्री. चौधरी.....

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील.....

या जागेवरील आताच्या सुधारित आरक्षणाची माहिती देखील आपण घेतली आहे. त्या ठिकाणी दोन्ही झोनची कार्यालये व्हावीत ही गृह विभाग म्हणून आमची देखील अपेक्षा आहे. परंतु हा विषय केवळ एका खात्याशी संबंधित नाही. ही जागा महसूल विभागाची आहे व त्यावर महानगरपालिका म्हणजे नगरविकास विभागाने आरक्षण जाहीर केलेले आहे. त्यामुळे या दोन्ही विभागांसोबत संयुक्त बैठक घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आमच्या गृहनिर्माण विभागाकडे ही जागा वर्ग करण्यात आली तर गृह खात्याकडून निधी देऊन दोन्ही झोनची कार्यालये तेथे उभे करणे शक्य होईल. मी सांगू इच्छितो की, अधिवेशन संपण्यापूर्वी म्हणजे पुढील आठवडयामध्येच यासंदर्भातील बैठक आयोजित करु. सदर बैठकीस सन्माननीय सदस्यांना व महसूल आणि नगरविकास विभागाच्या संबंधितांना बोलावण्यात येईल.

श्री.अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, दिंडोशी पोलीस स्टेशनची इमारत माझ्या मतदारसंघामध्ये आहे. एका निवासी इमारतीमध्ये हे पोलीस स्टेशन आहे व त्यामुळे तेथील रहिवाशांच्या यासंदर्भात कायम तक्रारी असतात. कारण तेथे रात्रभर वर्दळ असते. सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू यांच्यासह मी गेल्या दोन-तीन वर्षांपासून हा विषय मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करीत आहे. माननीय मंत्री श्री.सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील यांनी यासंदर्भात सकारात्मक उत्तर दिले आहे. परंतु माझा त्यांना एवढाच प्रश्न आहे की, अधिवेशन काळामध्ये माननीय गृह मंत्री, नगरविकास मंत्री व महसूल मंत्री यांची संयुक्त बैठक घेण्यात येईल का ? तसेच या जागेवर सध्या असलेले शासकीय निवासस्थाने आणि न्यायालय यासाठीचे आरक्षण हटवून परिमंडळ कार्यालय आणि दिंडोशी पोलीस स्टेशनच्या इमारतींसाठी आरक्षित करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात करणार का ? तसेच किती दिवसांमध्ये सदर बैठक घेण्यात येईल?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : अध्यक्ष महोदय, मी मघाशीच सांगितले की हे अधिवेशन संपण्यापूर्वीच आपण या संदर्भातील बैठक घेऊ. कारण आम्हाला देखील या जागेची गरज आहे. यामध्ये गृह विभाग पुढाकार घेईल. पुढील आठवडयामध्ये बैठक आयोजित करण्याबाबत मी आजच सूचना देतो.

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.कालिदास कोळंबकर)**

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले आहे की, झोन-११ आणि १२ ची पोलीस उपायुक्त कार्यालये दहिसर येथे आहेत. त्यातील झोन-११ चे कार्यालय बोरिवली हद्दीमध्ये तर झोन-१२ चे कार्यालय माझ्या मतदारसंघामध्ये म्हणजे दहिसर येथे आहे. दहिसर येथील पोलीस उपायुक्त कार्यालयास चांगला निधी देऊन ते अत्याधुनिक केलेले आहे. आणखी मोठी इमारत बांधायची असेल तर या कार्यालयाच्या बाजूलाच म्हाडाची मोकळी जागा आहे. तेथेच पोलीस उपायुक्तांचे मोठे कार्यालय बांधावे. तसेच बोरिवली येथील झोन-११ च्या पोलीस उपायुक्त कार्यालयाची इमारत धोकादायक स्थितीत आहे. सदर इमारत पूर्णपणे तोडून बोरिवली स्टेशनसमोर अत्याधुनिक कार्यालय करता येऊ शकते. तेथे पोलीस वसाहत व पोलीस स्टेशनची देखील बरीच जागा उपलब्ध आहे.

अध्यक्ष महोदय, झोन-११ चे पोलीस उपायुक्त कार्यालय बोरिवली येथेच असले पाहिजे. हवे तर पोलीस उपायुक्त आणि सहाय्यक पोलीस आयुक्त हे एकेका ठिकाणी बसतील अशी व्यवस्था करावी परंतु दहिसर येथील पोलीस उपायुक्त कार्यालय दिंडोशी येथे स्थलांतरित करणार असाल तर ते चालणार नाही.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : अध्यक्ष महोदय, मी सांगू इच्छितो की, हा विषय चर्चेतून पुढे आलेला आहे. ज्यावेळी आपण यासंदर्भात बैठक घेऊ त्यावेळी झोन-११ अंतर्गत येणाऱ्या पोलीस स्टेशन्सला कोणती जागा संयुक्तिक आहे ते पाहू. आता सुचविलेली जागा संयुक्तिक वाटत नसेल तर स्थलांतरित करण्याचा प्रश्नच येत नाही. परंतु सुचविलेली जागा संयुक्तिक असेल तर तसा निर्णय अपेक्षित आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, भौगोलिक आणि कामकाजाच्या बाबींच्या दृष्टीकोनातून पोलीस आयुक्त व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करुन योग्य वाटल्यास निर्णय घेऊ. किमान झोन-१२ बाबत तरी आपण निर्णय घेऊ शकतो, असे मला वाटते. यासंदर्भातील बैठकीस पोलीस आयुक्तांना देखील बोलावण्यात येईल व ग्राउंड रिपोर्ट घेऊन जी जागा सोयीची असेल तेथे स्थलांतरित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. दिलीप लांडे : अध्यक्ष महोदय, या समस्येच्या अनुषंगाने मी माझ्या मतदार संघातील एक समस्या मंत्री महोदयांच्या नजरेसमोर ठेवतो.

अध्यक्ष महोदय, माझे २ प्रश्न आहेत. त्यातील पहिला म्हणजे साकीनाका पोलीस ठाण्याची इमारत अतिशय धोकादायक आहे, हे खरे आहे काय आणि त्या इमारतीला टेकू लावला आहे हे देखील खरे आहे काय ? दिनांक ५ ऑक्टोबर २०२१ रोजी गृहमंत्र्यांनी या ठिकाणी पाहणी केली होती आणि शब्द दिला होता की, मुंबईचे पोलीस आयुक्त, सार्वजनिक बांधकाम विभाग, संबंधित अधिकारी व स्थानिक आमदार यांची तातडीची बैठक घेण्यात येईल. परंतु आजपर्यंत ती बैठक झाली नाही. म्हणून माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, या महिन्यात सदर प्रश्नासंबंधी तातडीची बैठक घेतली जाईल काय ? त्या बैठकीची वेळ मिळावी. दुसरे म्हणजे या इमारती अत्यंत धोकादायक असल्यामुळे ज्या ठिकाणी कर्तव्यदक्ष असणारे अधिकारी बसतात त्या इमारतीला टेकू लावलेला आहे. १५ दिवसांपूर्वी पहिल्या मजल्यावरील स्लॅब कोसळला होता. जर जिवित हानी झाली तर सरकार याची जबाबदारी घेईल काय ? या इमारतीशेजारी नगरविकास विभाग आणि मुंबई महानगरपालिकेने पोलीस विभागासाठी भूखंड आरक्षित ठेवला आहे. त्या जागेची माननीय गृहमंत्र्यांनी पाहणी केली आहे. त्यामुळे मंत्री महोदय ही जागा शासनाच्या ताब्यात घेणार आहेत काय किंवा त्या दृष्टीने मुंबई महानगरपालिकेला मागणी करणार आहेत काय ?

अध्यक्ष महोदय, या पोलीस ठाण्याची नवीन इमारत उभारण्यासाठी मी अनेकवेळा पत्र व्यवहार केला, अनेकवेळा मागणी केली. त्यामुळे या अर्थसंकल्पात सदरची नवीन इमारत बांधण्यासाठी सरकार तरतूद करील काय, हा माझा प्रश्न आहे.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत विस्ताराने प्रश्न विचारला आहे. परंतु आम्ही झोन १२ संबंधी जेव्हा बैठक घेऊ त्याच दिवशी या विषयासंबंधी देखील बैठक घेऊ.

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष (श्री. कालिदास कोळंबकर) :** माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, मुंबई शहरातील जी जी पोलीस ठाणी आहेत त्यांचा आपण सर्व्हे करावा. आपल्या लक्षात येईल की मुंबईतील सर्व पोलीस ठाण्यांची परिस्थिती अत्यंत भयानक आहे. काही पोलीस ठाण्यांमध्ये खुर्च्या सुध्दा बसायला नाहीत. त्यामुळे आपण याचा सर्व्हे करावा.

श्री. सतेज उर्फ बंटी पाटील : अध्यक्ष महोदय, निश्चितपणे ते करता येईल. पण आपण यासाठी आम्हाला थोडा वेळ द्यावा. एक बैठक आपण अधिवेशन संपण्यापूर्वी घेऊ आणि अधिवेशन संपल्यानंतर एक बैठक संपूर्ण मुंबईतील पोलीस ठाण्यासंबंधी घेऊ. कारण या वर्षीच्या बजेटमध्ये आपण काही पोलीस ठाणे प्रस्तावित करुन निधीची मागणी केली आहे. मागच्या वर्षी आपल्याला जवळपास ७०० कोटी रुपयांचा निधी यासाठी मिळाला होता. आपण तो निवासी किंवा पोलीस ठाणे यांच्याकरिता खर्च करतो. "आझादी का अमृत महोत्सव" या निमित्ताने या राज्यातील जवळ जवळ ७५ नवीन पोलीस ठाण्यांच्या इमारती कार्यान्वीत करीत आहोत. त्यामुळे याबाबत विस्ताराने बैठक हे अधिवेशन झाल्यानंतर आम्ही निश्चितपणे घेऊ आणि एकूणच मुंबईमधील कोणत्या पोलीस ठाण्यात कोणत्या अडचणी आहेत ते समजून घेऊ. आपल्याकडे त्याचा आराखडा सुध्दा तयार आहे की दरवर्षी कोणत्या पोलीस ठाण्याच्या इमारती बांधाव्यात. परंतु त्याला अग्रक्रमाने पुढे नेणे आणि सन्माननीय सदस्य म्हणाले तशी ज्या पोलीस ठाण्यांच्या इमारती अतिशय जीर्ण झाल्या आहेत आणि खऱ्या अर्थाने त्यांची दुरुस्ती करणे गरजेचे आहेत त्यांची प्राधान्यक्रमाची यादी आम्ही तयार करु आणि त्यानुसार कार्यवाही करु.

श्री. दिलीप लांडे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांना एवढीच विनंती आहे की, मुंबई विकास आराखड्यात पोलीस विकासासाठी राखीव असलेली जागा एका विकासकाकडून आपल्याला मिळालेली आहे. ती आता पोलीस ठाण्यासाठी आरक्षित आहे. परंतु स्थानिक विकासक ते आरक्षण बदली करण्याच्या मार्गावर

श्री. दिलीप लांडे...

आहे. म्हणून मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, सदर जागा पोलीस ठाण्यासाठी मिळण्याकरिता शासनाकडून महापालिकेला पत्र देणार आहोत काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की त्यांनी त्या संदर्भातील पत्र आजच्या आज द्यावे. आम्ही त्यावर त्वरीत कार्यवाही करु.

डॉ. भारती लव्हेकर : अध्यक्ष महोदय, याच विषयाच्या अनुषंगाने माझा प्रश्न आहे. माझा वर्सोवा मतदार संघामध्ये असलेले पोलीस ठाणे हे वर्सोवामध्ये येत नाही. ते दुसऱ्या विधानसभा क्षेत्रात आहे. त्यामुळे तेथील लोकांनी अनेकदा माझ्याकडून डी.सी.पी. आणि सी.पी. यांना देण्यासाठी पत्र घेऊन गेले आहेत की, हे पोलीस ठाणे आम्हाला वर्सोवामध्ये देण्यात यावे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

डॉ. भारती लव्हेकर...

वर्सोवा पोलीस स्टेशन हे सात बंगला येथे होमगार्डची जागा आहे. त्या अर्ध्या जागेवर पोलीस स्टेशन शिफ्ट करण्यात आले तर मला वाटते की, वर्सोव्यातील लोकांना तेथील पोलीस स्टेशनमध्ये जाता येईल. त्यामुळे ते पोलीस स्टेशन दुसऱ्या विधानसभा मतदारसंघामध्ये गेले आहे तर पण आपण ते वर्सोवा विधानसभा मतदारसंघातील होमगार्डच्या जागेवर देणार काय ? तसेच माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आमच्या भागात सात बंगला येथे पोलिसांचे क्वॉर्टर असून ते जीर्ण झालेले आहेत आणि पडायला आलेले आहेत. मध्यंतरी त्याची दुरुस्ती केली पण तिथे अतिशय वाईट परिस्थिती आहे त्यासाठी आपण ती इमारत दुरुस्त करणार काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : अध्यक्ष महोदय, या प्रश्नाची व्याप्ती वाढत आहे. सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी एक प्रत्र द्यावे. कारण निवासाची बरीच कामे सुरु आहेत. मुंबईमध्ये अनेक नवीन निवास केली जात आहेत. यामध्ये मुंबई शहराचा प्राधान्याने समावेश करण्यात आला आहे. मधल्या काळात काही निवासस्थानाचे उद्घाटन झाले. सन्माननीय सदस्यांनी मांडलेला प्रश्न हा त्यांच्या मतदारसंघाच्या हद्दीचा आहे. त्यांनी एखादे पत्र दिले तर त्यातून काय मार्ग काढता येईल हे बघितले जाईल. सन्माननीय सदस्यांना पोलीस स्टेशनसाठी पैसे द्यायचे असतील तर त्यांनी माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या नावाने माझ्याकडे एक पत्र द्यावे. मग मी त्यांना विशेष परवानगी देऊन तिथे हे पैसे खर्च करण्यासाठी सांगतो.

डॉ. भारती लव्हेकर : अध्यक्ष महोदय, हे पोलीस स्टेशन होमगार्डच्या जागेवर करुन द्यायचे आहे आणि यासाठी पोलिसांकडूनच मागणी आलेली आहे. यापूर्वीच मी यासाठी आपल्याकडे पत्र दिलेले आहे.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : अध्यक्ष महोदय, मुंबईतील ज्या ज्या सन्माननीय सदस्यांची पत्रे आले असतील तर ते एकत्र करुन अधिवेशन झाल्यानंतर आम्ही एक बैठक आयोजित करुन हे सर्व प्रश्न मार्गी लावतो.

--------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** गुंठेवारी नियमीतीकरणाचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना घेता न येणे

**मु.शी. :** गुंठेवारी नियमीतीकरणाचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना घेता न येणे या संबंधी श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सन २००१ सालच्या गुंठेवारी कायद्यानुसार राज्य शासनाने दिनांक ३१ डिसेंबर, २०२० पर्यंतची बांधकामे गुंठेवारी नियमित करण्याचा अधिनियम एकमताने मंजूर करणे, मात्र या संदर्भात माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये राज्य शासनाने काढलेल्या परिपत्रकात एकात्मिक विकास नियंत्रण नियमावलीनुसार गुंठेवारीतील बांधकामे नियमितीकरणाचा आदेश काढणे, बहुतांश गावांमध्ये गुंठेवारी मध्ये झालेली बांधकामे ही ९ मीटरच्या आतील रस्त्यांवर असल्यामुळे नियमितीकरणासाठी अत्यल्प प्रस्ताव दाखल झाले असणे, तसेच यासाठीचा प्रशमन शुल्क अवाजवी असून, त्यामुळे गुंठेवारी नियमितीकरणाचा लाभ सर्वसामान्य नागरीकांना घेता येत नसणे, त्यामुळे नागरिकांच्या मनात पसरलेला तीव्र असंतोष, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने सदरहू गुंठेवारी बांधकामे नियमितीकरणाचा लाभ सर्वसामान्य नागरीकांना मिळण्याकरीता शुल्क आकारणी कमी करण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे ( नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. कालिदास कोळंबकर)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------

असुधारित प्रत

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील : अध्यक्ष महोदय, जवळपास महाराष्ट्रातील सर्वच शहरांशी संबंधीत अतिशय महत्त्वाची सदरची लक्षवेधी सूचना आहे. कारण आपली घरे पाडली जाणार किंवा नाही यामुळे रोज लोकांच्या डोक्यावर टांगती तलवार आहे. लक्षवेधी सूचना मांडत असताना मी माननीय मंत्र्यांना विनंती करणार आहे की, यामध्ये प्रोपिपल म्हणजे याच्या माध्यमातून लोकांना रिलिफ मिळेल अशा पद्धतीचे उत्तर द्यावे.

अध्यक्ष महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, गुंठेवारीच्या विषयामध्ये सन २००१ साली तेव्हाच्या शासनाने कायदा केला. त्या कायद्यामुळे बरीच गुंठेवारी नियमित झाली. पण सन २०२० रोजी सरकारच्या असे लक्षात आले की, यातील बऱ्याच जणांच्या गुंठेवाऱ्या नियमित झाल्या नाहीत. त्यामुळे आपण पुन्हा एकदा सन २००१ ची गुंठेवारी सर्वांना मिळेल अशा प्रकारचा निर्णय केला. आपली गुंठेवारी नियमित होणार किंवा आपल्याला नियमित घरे मिळणार, यामुळे लोकांमध्ये आनंद निर्माण झाला. पण यासाठी खूप कडक नियम लावलेले आहेत म्हणून पुण्यासारख्या शहरात १०० लोकांनी सुद्धा त्यासाठी अर्ज केला नाही. यासाठी मी असा प्रश्न विचारत आहे की, सन २००१ साली जो कायदा करण्यात आला तो कायदा जसाच्या तसा इम्प्लिमेंट करणार की नाही ? नवीन डीपी रुलमध्ये ६ मीटरचा रस्ता असेल तर आपण त्याला वाढीव एफएसआय देत नाही. त्या काळात गुंठेवारीमध्ये बांधलेल्या इमारती आहेत तिथे ६ मीटरच्या आतीलच रस्ते आहेत. मग आपण ९ मीटरच्या आतील रस्ते असावेत असा आग्रह धरत आहात. आपण आता असा नियम करु शकता की, यापुढे या इमारतींचा पुनर्विकास होईल. त्यावेळेला त्यांनी ९ मीटरचा रस्ता सोडायला पाहिजे, असे म्हणायला काही हरकत नाही. परंतु आता आपण असा आग्रह धरु शकत नाही. कारण तसे होणारच नाही. दुसरे असे की, याचे प्रशमन शुल्क किती असावे तर एका एका घराला ते शुल्क १७ लाख रुपये येते. मुळात ज्याने

असुधारित प्रत

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील....

गुंठेवारीमध्ये घर घेतलेले असते किंवा ज्यांनी इमारत बांधलेली असते त्याच्याकडे एवढे पैसे असते तर तो एवढ्या छोटया घरात राहिलाच नसता. त्यामुळे ते सन २००१ च्या कायद्याप्रमाणेच असायला पाहिजे, असा माझा मुद्दा आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर.....

असुधारित प्रत

श्री. चंद्रकांत पाटील....

रेराने मध्येच एक पत्र काढले की, ५ हजार चौ.फू.च्या आतील ज्या योजना आहेत त्या बंद केल्या आहेत. आपण या बाबत चौकशी करा, सर्व रजिस्ट्रेशन बंद आहे. माननीय महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी देखील हा मुद्दा लावून धरला आहे. रेराशी आपल्याला बोलावे लागेल की, या बाबत काय संबंध आहे. एक नियम करुन लोकांना रिलीफ द्यायचा व मध्येच अशी पाचर मारून ठेवायची की, त्यांना रिलीफ मिळणार नाही. ६ मीटरचे रस्ते असूनही गुंठेवारी नियमित करावी लागेल. या बाबत आपले काय धोरण आहे ? प्रशमन शुल्क अधिक आहे. ते आपल्याला कमी करता येईल काय ? रेराने अनावश्यक पाचर मारली आहे, त्या बाबत सरकार काय करणार आहे ?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन २००१ मध्ये सुरुवातीला गुंठेवारी अधिनियम होता. त्या नंतर गेल्या २० वर्षात आणखी काही प्रकरणे झाली असतील. त्या दृष्टीने महाविकास आघाडीच्या सरकारने हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला. सन २०२० पर्यंत जरी गुंठेवारीमध्ये काही ॲक्टीव्हिटी झाली असेल तर ती देखील... या ॲक्टमध्ये आपण आता बदल केला आहे. मागे होता तसाच कायदा ठेवला आहे. केवळ यामध्ये तारीख बदललेली आहे. बाकी पूर्वी जसा कायदा होता तसाच आहे. ६ मी व ९ मी. बाबत येथे सांगितले. खरे तर महापालिका क्षेत्र वगळून नगर पालिका क्षेत्रामध्ये डीपी रोड किंवा साडे चार मी. पर्यंत आपण मान्य करीत आहोत. महापालिका क्षेत्रामध्ये ९ मी. आहे. त्या व्यतिरिक्त नगरपालिका क्षेत्र, लहान गावांमध्ये आपण ९ मी च्या खाली जाऊन ॲक्टीव्हिटी करु शकतो.

अध्यक्ष महोदय, दोन्ही बाजू पाहिल्या पाहिजेत. लोकांच्या सुविधेकरिता आपण हे आणले आहे. एकदा ही घरे नियमित झाली की, लोकांचा प्रॉपर्टी कर निम्मा होणार आहे. लोकांच्या सोयीसाठी हा विषय आणला आहे. कायदा आणताना दोन्ही बाजुंचा सर्वंकष विचार करणे गरजेचे आहे. या करिता एखादे अनियमित बांधकाम नियमित करतो, डीसीपीआरमध्ये विचार करुन नियम आणले आहेत. ते देखील नियम

असुधारित प्रत

श्री. चंद्रकांत पाटील....

विचार करुन आणलेले असतात. ९ मी. रस्ता या करिता आहे की, कमी रुंदीच्या रस्त्यावर लोकसंख्येची घनता अधिक नसावी. अग्नीशमन सेवा, पार्कींग या गोष्टी येथे राहणाऱ्या लोकांच्या सोयीसाठी त्याचा विचार करणे अपेक्षित आहे. हा सर्वंकष विचार करुन हा कायदा आणलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी अशी भावना व्यक्त केली की, प्रशमन शुल्क जास्त आहे. प्रशमन शुल्क तेथील रेडी रेकनरच्या दरावर आधारित आहे. या ठिकाणी १७ लाख रुपयांचे उदाहरण दिले. कदाचित महागडी जमीन खरेदी केलेली असल्यामुळे ते असू शकेल. महागडी जमीन खरेदी करणारा तेवढा आर्थिक सक्षम असू शकेल. माझ्याकडे गणना केलेली आहे. भूखंडांची जी किंमत आहे त्याच्या ४ टक्क्यांच्या पुढे प्रशमन शुल्क जात नाही. बांधकामाचे ॲडीशन केले तर बांधकाम व जमिनीची किंमत बघता प्रशमन शुल्काची टक्केवारी कमी आहे. प्रशमन शुल्क आकारताना जागेवर आकारले जाते. बांधकाम एफएसआयनुसार असते. प्रशमन शुल्क बांधकामावर आकारले जात नाही. सर्वंकष विचार करुन लोकांची सोय झाली पाहिजे अशी आपली भूमिका आहे. प्रशमन शुल्काचा उपयोग त्याच रेखांकनाच्या विकासासाठी केला जातो. बेकायदेशीर लेआऊटचा विकास आहे. आपण नियमितपणे एखाद्या लेआऊटचा विकास करतो तेव्हा रस्ते, गटारी, ड्रेनेज, स्ट्रीट लाईट इ. सुविधा विकासकाने कराव्यात, अशी भूखंड मालकाला अपेक्षा असते. त्यांनी जर हे केले नसेल तर तेवढे बेटरमेंट चार्जेस प्लानिंग ॲथॉरिटीला भरणे अपेक्षित असते. प्रशमन शुल्क प्लानिंग ॲथॉरिटीकडे वर्ग होणार आहे. त्याची ८५ टक्के रक्कम ले आऊटच्या विकासासाठी खर्च केली जाणार आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे ....

कारण ती बाब देखील तितकीच महत्वाची आहे. उद्या सर्व नियमित झाले आणि पिण्याच्या पाण्याची लाईनच नसेल किंवा तेथील सांडपाण्याकरिता गटारेच नसतील किंवा चांगले रस्ते नसतील तर या बाबींकडे देखील आपल्याला दुर्लक्ष करुन चालणार नाही.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.कुणाल पाटील)** : मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी थोडक्यामध्ये उत्तर द्यावे.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, या सर्व बाबी विचारात घेऊन ही प्रशमन शुल्काची रचना आहे. ही काही जास्त आहे असे म्हणणे मला सयुक्तिक वाटत नाही. रेराचा विषय खरे तर या लक्षवेधी सूचनेमध्ये नसला तरी, संबंधित मंत्री महोदयांसमवेत बोलून आपल्याला त्याचा खुलासा करु.

श्री.चंद्रकात पाटील : अध्यक्ष महोदय, आता हे नवीन डीसी रुल लावणार, त्याबाबतचा निर्णय घेतल्यापासून किती अर्ज आले ते सांगावे. काही लाख लोक यामध्ये बाधित आहेत. शेवटी आपण निर्णय घेतला त्याबद्दल मी तुमचे अभिनंदन करेन. गुंठेवारीने पिंपरी, चिंचवड, पुणे इव्हन मुंबई सर्व ठिकाणी लोक संत्रस्त आहेत. तुम्ही म्हणता त्या प्रमाणे खूप चांगला निर्णय असेल तर काही लाख लोकांमधील काही हजार लोकांनी तरी फायदा घेतला पाहिजे. याचा अर्थ अडचण आहे.

अध्यक्ष महोदय, नवीन डी.सी. रुलप्रमाणे तुम्ही नवीन परवाने द्या. आता एखादी इमारत बांधली तर त्याला तुम्ही कसे म्हणणार? येथे इमारत बांधली तेथे इमारत बांधली मधला रस्ता ६ फुटांचा असेल तर तो तुम्ही भविष्यात ९ फुटांचा करा. आता पुण्यामध्ये महानगरपालिकेने एक निर्णय घेतला की, यापुढे तुम्हाला जर एफएसआय वाढवून हवा असेल तर रस्ता ९ फुटी व्हावा म्हणजे काय, तर त्या रोडवर नवीन इमारत बांधताना एफएसआय मिळत असल्याने उंच इमारती बांधावी व थोडे आत सरकावे. त्यामुळे तो रस्ता थोडा झिगझॅग होणार आहे. परंतु, कधी तरी तो रस्ता ९ फुटी होईल. आता तो ६ फुटी आहे ... (अडथळा).. सॉरी ९ मिटर... ते प्रॅक्टिकली

असुधारित प्रत

श्री.चंद्रकांत पाटील ....

समजावून सांगा. काही लाख लोक राहत आहेत जर तुम्ही आता ही अट लावा असे म्हणत असाल तर, ठीक आहे. ती अट लावून आता किती अर्ज आले ते सांगा.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, किती अर्ज आले ही माहिती आम्ही निश्चितपणे घेऊच. ते देखील निश्चितपणे जास्त असतील. माझ्याकडे जी माहिती असेल ती मी आपल्याला देईन. परंतु, शासनाकडे काही पालिकांनी असेही अर्ज केले आहेत की, जे प्रशमन शुल्क आकारलेले आहे ते उलट वाढवले पाहिजे. अशा आशयाचे १-२ महानगरपालिकांचे ... (अडथळा)... ते म्हणाले की, किती लोकांनी अर्ज केले. तर काही महापालिका बोलत आहेत की, उलट प्रशमन शुल्क वाढवा. असे आकडे देखील आपल्याकडे आलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, मी मागच्या उत्तरात सांगितले की, आपल्याला दोन्ही गोष्टींचे भान ठेवावे लागणार आहे. पूर्वी तर काहीच कायदा नव्हता. आता उलट महाविकास आघाडी सरकारने लोकांना काही ना काही रिलिफ देण्याकरिता कायदा आणलेला आहे. परंतु, हे पाहताना दोन्ही बाजूमध्ये आपल्याला समतोल साधणे गरजेचे आहे. त्यांना आपल्याला सुविधा देखील देता आल्या पाहिजेत. उद्या तेथे आग लागली तर आपल्या अग्निशमनच्या गाडीला देखील तेथे जाता आले पाहिजे.

श्री.चेतन तुपे : अध्यक्ष महोदय, गुंठेवारी या शब्दामध्येच सर्व काही येत आहे. जो छोटा गुंठा घेतो व बांधतो त्यामध्येच सर्व येत आहे. यामध्ये प्रथम एक समजून घेतले पाहिजे की, आपण दि. ३१ डिसेंबर, २०२० पर्यंतची बांधकामे नियमित करण्याचा अध्यादेश निर्गमित केलेला आहे. एकात्मिक विकास नियमावली ही सन २०२० च्या मध्यानंतर आलेली आहे. मग २-३ महिन्यांत कोणाची घरे बांधून होणार आहेत का, तर अजिबात होणार नाहीत. त्यामुळे घरे बांधून झाल्यानंतर जी नियमावली येते ती नियमावली आपण लावणार का, हा खरा प्रश्न आहे. जी नवीन नियमावली आलेली आहे, ती खूप क्लिष्ट आहे. त्यातील क्लिष्टता कमी होणार काय?

असुधारित प्रत

श्री.चेतन तुपे ...

अध्यक्ष महोदय, मी महाविकास आघाडी सरकारचे अभिनंदन करतो. सन २००१ नंतर परत एकदा सन २०२० मध्ये कायदा आणला गेला. त्यामध्ये लाखो लोकांचा फायदा होईल हे पाहिले गेले. यापूर्वी मधल्या काळात जर हा कायदा आणला असता तर, आज हा प्रश्न उपस्थित झाला नसता. आता नवीन एकात्मिक विकास नियंत्रण नियमावली आली आहे. त्यावेळेच्या सरकारने कायदा आणला असता तर हे सर्व विषयच उपस्थित झाले नसते. हा एक विषय झाला.

अध्यक्ष महोदय, दुसरा विषय असा आहे की, ज्यावेळेस प्लॉट पाडले जातात ते बेकायदा पाडले जातात की, प्लॉटिंग कायदेशीर आहे हा वेगळा विषय आहे.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.चेतन तुपे...

गुंठेवारी क्षेत्रात प्लॉटींग पाडतानाचा एक अनुभव आहे की, त्यामध्ये १० किंवा १५ फुटांच्या रस्त्यांचे नियोजन करण्यात येते. हा रस्ता ६ मीटरही नाही. ही वस्तुस्थिती आहे. गुंठेवारीमधील बांधकामासाठी नवीन नियमावली लागू करण्यात आली आहे, त्यामध्ये काही सुधारणा करण्यात येईल काय ? संपुर्ण राज्यात उक्त नियमावलीनुसार काम करण्यात यावे, असे आमचे मत आहे. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत (दादा) पाटील यांनी पुणे शहरासाठी हा प्रश्न उपस्थित केला आहे. तेथील लोकांनी नवीन अर्ज सादर केले नाहीत. औरंगाबाद महानगरपालिकेत अत्यंत सुंदर काम सुरु आहे. ज्या नियमावलीने औरंगाबाद महानगरपालिका काम करते त्यानुसार पुणे महानगरपालिका काम का करु शकत नाही, जाणीवपूर्वक क्लिष्टता वाढवून लोकांना वेठीस धरण्याचे काम करण्यात येत आहे काय, यासंदर्भात शासन कोणती कार्यवाही करणार आहे ? औरंगाबाद येथे उभारण्यात येणाऱ्या इमारतींसाठी भविष्यात होणारी रस्ता रुंदी विचारात घेऊन आखणी करण्यात येते व त्यांचे अर्ज स्वीकारले जातात. परंतु याप्रमाणे पुणे महानगरपालिकेत कार्यवाही करण्यात येत नाही. पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात हद्दवाढीमुळे अनेक ग्राम पंचायती असलेल्या गावांचा समावेश करण्यात आला आहे. त्यांचे डीपी तयार करण्यात आले नव्हते व आरपीचा प्रश्नच उद्भवत नाही. महानगरपालिकेमध्ये गावांचा समावेश झाल्यानंतर डी.पी.तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. अशा परिस्थितीत गाव नकाशातील रस्त्यांना एकात्मिक विकास नियमावली लावली तर त्यांची गुंठेवारी कशी होईल ? यामध्ये दोन प्रकार आहेत. काही लोकांनी गुंठाभर जमीन खरेदी करुन स्वत:साठी घर बांधले आहे, हा एक विषय आहे. काही लोकांनी सर्रास मोठ्या इमारती उभारुन त्यामधील सदनिका विक्री केली आहे, हा दुसरा विषय आहे. ज्या लोकांनी स्वत:साठी घर बांधले त्यांना काही सवलती व सूट देण्यात येईल काय ? ज्यांनी मोठ्या इमारती बांधून त्यामधील सदनिका विक्री केल्या आहेत त्यांना वेगळे शुल्क आकारण्यास हरकत नाही. आणखी एक अडचण आहे की, मोठ्या इमारती बांधून त्यातील सदनिका विकासक विक्री करुन निघून गेला आहे व त्यामध्ये राहणारे सदनिकाधारक आता पैसे भरु शकत नाहीत. यासंदर्भात कोणती उपाययोजना करणार आहे ?

असुधारित प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. शासनाने युडीसीपीआरमधील तरतुदी विचारपूर्वक केल्या आहेत. जो व्यक्ती अर्ज सादर करील त्याला उक्त तरतुदी लक्षात घेऊन न्याय द्यावा लागणार आहे. सन्माननीय सदस्य यांनी सांगितले आहे की, डीसीपीआरमध्ये खूप क्लिष्टता आहे. यासंदर्भातील मुद्दे त्यांनी दिले तर त्याबाबत एक बैठक घेण्यात येईल. पुणे महानगरपालिकेत काही ग्रामपंचातय असलेल्या गावांचा समावेश झाल्याचे सन्माननीय सदस्य यांनी सांगून प्रश्न उपस्थित केले आहेत, त्यासंदर्भात एक बैठक घेण्यात येईल.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय फार टेक्निकल उत्तर देत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी विचारलेला प्रश्न अतिशय स्पष्ट आहे. शहराच्या विकासबरोबर शहरालगत असलेल्या विभागांचा विकास होतो. परंतु ते विभाग महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये नसतात. त्यामुळे अशा प्रकारचे प्रश्न निर्माण होतात.

अध्यक्ष महोदय, जेव्हा सदर विभागाचा समावेश महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये केला जातो, तेव्हा त्या विभागामध्ये अनधिकृत केलेले बांधकाम नियमित करण्याबाबतचे हे धोरण आहे.

अध्यक्ष महोदय, यामध्ये दोन विषय आहेत. आपण ९ मीटर रस्त्याची सक्ती केली आहे. त्यामुळे आपण अनुज्ञेय वाढीव चटईक्षेत्रासह टीडीआर देणार आहात. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये येण्यापूर्वी एखाद्याने बांधकाम केले असेल आणि आज शासन त्यांना ९ मीटरची अट घालीत असाल तर ते बांधकाम नियमित करता येत नाही. त्याबाबत आपण १.१ एफएसआय देणार असे सांगितले आहे. परंतु अनेक बांधकामे १.१ एफएसआयच्या पुढे गेलेले आहेत. अग्निशमन दलाच्या किंवा महानगरपालिकेच्या नियमानुसार अशी बांधकामे नियमित करता येणार नाहीत. त्यामुळे सद्य:स्थितीमध्ये जेसे आहे तसे किंवा कोणतीही अट न घालता सदर बांधकामे नियमित करण्यात यावी. असे करावयाचे असेल तर आपण सदर ९ मीटरची अट मागे घ्यावी लागेल. सदर ठिकाणी जेव्हा पुनर्विकास होईल, तेव्हा शासनास काय अटी लावावयाच्या आहेत त्या आपण लावू शकता. परंतु आता ९ मीटरची अट मागे घेण्यात यावी, अशी मी विनंती करतो. जेथे जसा रस्ता आहे आणि तो गुंठेवारी कायद्यामध्ये बसल असेल तर ते बांधकामे आपण नियमित करणार आहात काय?

अध्यक्ष महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, प्रशमन शुल्काबाबत शासनाने उदारता दाखविण्याची गरज आहे. जेव्हा आपण सदर बांधकामे नियमित करणार आहात तेव्हाचा बाजारमूल्य न मोजता ज्यावेळी त्यांनी बांधकाम केले आहे, तेव्हाच्या बाजारमूल्याच्या १० टक्के शुल्क आकारले तर सरकारला उत्पन्न मिळेल

श्री.योगेश सागर.......

आणि लोकांची बांधकामे देखील नियमित होतील तसेच लोकांना त्यांच्या घरांची शाश्वती देखील मिळेल. त्यामुळे शासन याप्रमाणे कार्यवाही करणार आहे काय?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न विचारलेले आहेत. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये ज्या नवीन गावांचा समावेश करण्यात आलेला आहे, त्याबद्दल मी बैठक घेण्यात येईल, असे सन्माननीय सदस्य श्री.चेतन तुपे यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले आहे. उक्त बैठकीमध्ये याबाबत विचारविनिमय करण्यात येणार आहे.

अध्यक्ष महोदय, ९ मीटरच्या अटीबाबत मी वारंवार सांगितले आहे की, युनिफाईड डीसीपीआर हा खूप विचारपूर्वक तयार करण्यात आलेला आहे. या दोन्ही बाबींचा ताळमेळ घालून पुढे गेले पाहिजे, असे माझे मत आहे. मागील सरकारच्या काळामध्ये कम्पाउंडींग ऑफ स्ट्रक्चरची एक योजना आणली होती. परंतु दुर्दैवाने माननीय उच्च न्यायालयाने ती योजना मान्य केली नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या सर्व बाबींचा विचार करुन आपणास हा निर्णय घेणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, शासन कशा प्रकारे प्रशमन शुल्क आकारीत आहे, याबाबत मी मघाशीच खुलासा केलेला आहे. ज्या ठिकाणी रेडीरेकनरचा दर जास्त आहे, त्या ठिकाणी प्लॉट घेणाऱ्या व्यक्तीची आर्थिक क्षमता चांगली असते. त्यामुळे रेडीरेकनरच्या दरानुसार प्रशमन शुल्क आकारण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे. सदर शुल्क जास्त आकारण्याचे कारण देखील सांगितलेले आहे. जेव्हा अनधिकृत ले-आऊट पडतो तेव्हा रस्ते, गटार, पाणी किंवा अशा प्रकारच्या कोणत्याही सुविधांचा विचार केला जात नाही. जेव्हा नियमानुसार ले-आऊट पाडतो तेव्हा या सर्व बाबी विकासक किंवा संबधित मालकाकडून करुन घेतल्या जातात किंवा बेटरमेंट चार्जेस आकारले जातात. रस्ते, पाणी, गटार या तेथे राहणाऱ्या लोकांच्या मूलभूत सुविधा आहेत. त्यामुळे या सर्व बाबींची काळजी घेणे आवश्यक आहे. शासन या सर्व सुविधा प्रशमन शुल्कामधून करणार आहे. त्यामुळे शासनाने रेडीरेकनर दरानुसार प्रशमन शुल्क आकारण्याचा निर्णय घेतलेला आहे.

असुधारित प्रत

श्री.सुनिल टिंगरे : अध्यक्ष महोदय, अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबतची नियमावली प्रथम सन २००१ मध्ये अस्तित्त्वात आली आहे. त्याचे कारण असे आहे की, सन १९९७ मध्ये पुणे महानगरपालिकेमध्ये २३ गावांचा समावेश करण्यात आला होता. तेव्हा त्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनिधकृत बांधकामे करण्यात आली होती. परंतु तेव्हाची नियमावली सुटसुटीत होती. त्यामुळे सदर गावातील अनधिकृत बांधकामे नियमित करणे सोयीचे झाले होते. सन २०१७ मध्ये पुणे महानगरपालिकेमध्ये काही गावांचा समावेश करण्यात आला होता. त्या गावांतील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत पुन्हा सन २०२० मध्ये नवीन नियमावली तयार करण्यात आली. परंतु या नियमावलीमध्ये ९ मीटरची अट ठेवण्यात आलेली आहे. जेव्हा अनधिकृत ले-आऊट पाडण्यात आला त्यावरील प्लॉटची नोंदणी देखील करण्यात आली. परंतु तेव्हा त्या ठिकाणच्या रस्त्यांची रुंदी १५ फुटांपेक्षा जास्त ठेवण्यात आली नाही.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

अस्थायी प्रत

श्री. सुनिल टिंगरे....

परंतु अनधिकृत प्लॉटिंग करण्यात आले आणि त्यांची नोंदणी झाली होती. तेथील रस्ते १५ फुटापेक्षा कमी होते. दुसरे असे की, तेथील लोक स्वत: ते नियमित करु शकत नव्हते. याचे कारण असे की, आता समावेश झालेल्या ११ गावांचा डीपी तयार झाला नाही. त्यामुळे तेथील अधिकाधिक घरे ही ॲग्रीकल्चर झोनमध्ये आहेत. ती घरे जर रेसिडेन्शिअल झोनमध्ये असतील तरच ती नियमित होतील, अशी अट आहे. तेथे घरे बांधण्यात आलेली आहेत. त्यामुळे मला असे वाटते की, ही अट शिथिल केली पाहिजे. दुसरे असे की, १५ फुटापेक्षा अधिक रस्ता वाढविला तर तेथील घरे रस्त्यांवरच आहेत. त्यामुळे तेथील लोक ते नियमित करीत नाहीत. तेथे अनुज्ञेय एफएसआय ठेवण्यात आला आहे. ९ मीटरकरिता कमीतकमी १.१ आणि अधिकाधिक २.५ एफएसआय आहे. मी सांगू इच्छितो की, तेथील घरे यापूर्वीच २.५ एफएसआयला एक्सीड झाली आहेत. त्यामुळे २.५ पेक्षा अधिक झाले असेल तर उर्वरित घर पाडावयाचे काय ? अशी त्या लोकांच्या मनात भिती आहे. यामुळे तेथील लोक घरे नियमित करीत नाहीत. तिसरे असे की, पुणे महारनगरपालिकेतील जागेला जवळपास १७०० रुपये स्क्वेअर फूट असा दंड आहे. त्यामुळे यात प्रिमिअम आकारण्यात आला आहे. परंतु असे न करता लमसम (एकत्रित) स्क्वेअर फुटास दंड अधिक फी अशी आकारणी केली पाहिजे. त्यामुळे अधिकाधिक लोक नियमात बसतील. अधिक एफएसआयची अट शासनाला शिथिल करावी लागेल. कदाचित ही चारपर्यंत करावी लागेल. पुणे महानगरपालिकेतील झोपडपट्टी भागातील लोक आर्थिकदृष्टया सक्षम झाल्यानंतर दुसरीकडे जागा घेऊन घर बांधत असतात. ही घरे तीन मजली व छोटी असतात. ही घरे नियमित व्हावीत, अशी त्यांची इच्छा असते.

अध्यक्ष महोदय, ही घरे नियमित न झाल्यामुळे त्यांना ३ पट दंड आकारण्यात आला आहे. त्यामुळे ते लोक नाराज आहेत. यासाठी शासनाला निमयामध्ये बदल करावे लागतील. जेणेकरुन ती घरे नियमानुकूल होतील. हे केले नाही तर अनधिकृत घरे बांधण्याचे प्रमाण कमी होणार नाही. मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, त्यांनी या नियमांमध्ये शिथिलता आणावी. एफएसआय, रस्ते, प्रिमियम, झोन याबाबतच्या

श्री. सुनिल टिंगरे....

अटी बदलाव्यात. जेणेकरुन ही घरे नियमित होतील. अन्यथा एकही घर नियमानुकूल होणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे १० पेक्षा अधिक अर्ज प्राप्त झालेले नाहीत.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी पुणे येथील परिस्थितीचा उल्लेख केला आहे. तत्कालीन काही गावे महानगरपालिका हद्दीत घेतली आहेत आणि आता नवीन गावांचा समावेश केला असल्याचे त्यांनी सांगितले. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे या विषयाच्या अनुषंगाने बैठक घेण्यात येईल. ही बैठक माननीय उप मुख्यमंत्री यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली घ्यावी, अशी मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती करणार आहे. त्या बैठकीमध्ये पुण्यातील इतरही विषय चर्चेला घेतले जातील.

श्रीमती माधुरी मिसाळ : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, ९ मीटरची अट महानगरपालिकेपुरती मर्यादित आहे. गावामध्ये गुंठेवारीकरिता ही अट नाही. पुणे जिल्ह्यातील ३४ गावांचा महानगरपालिकेमध्ये समावेश केला होता. सरकारने गुंठेवारी पद्धत बंद केली आहे. असे असले तरी ३४ गावांमध्ये प्लॉटिंग करुन बेकायदेशीर बांधकाम करणे सुरु होते. त्यावेळेस जे जे प्लॉट विकण्यात आले आहेत त्यामध्ये गावठाणाचा समावेश करण्यात आलेला आहे. गावठाणामध्ये अनेकांनी गुंठेवारी पद्धतीने घरे बांधली आहेत. मागील २० वर्षापासून शासन निर्णय न काढल्यामुळे अनधिकृत घरे बांधण्याचे थांबलेले नाही. आता या गावांचा समावेश शहरामध्ये करण्यात आला आहे. तेथे ९ मीटरची अट लागू होत नाही. याचे कारण तेथे प्लॉटिंग करुन घरे बांधली आहेत. पुणे शहरातील सदाशिव पेठ किंवा जुन्या भागामध्ये ९ मीटरची अट पूर्ण होत नाही. तेथे क्लस्टर डेव्हलपमेंट होत नाही. शासनाकडून सांगण्यात येते की, शासनाची नियमावली योग्य आहे. मी विचारु इच्छिते की, ही नियमावली योग्य असती शासनाकडे गुंठेवारीचे प्रस्ताव नियमित करण्यासाठी दाखल झाले असते. परंतु ते दाखल झालेले नाहीत. त्यामुळे या अटी रद्द करणे आवश्यक आहे. पुणे शहरात जी गावे समाविष्ट झाली आहेत, त्यामध्ये मोठ्या

असुधारित प्रत

श्रीमती माधुरी मिसाळ .....

प्रमाणात गावठाण आहेत. गावठाणामध्ये घरे बांधलेली आहेत. आता डीसी रुलप्रमाणे दंड आणि त्यावरील व्याज असे शुल्क आकारले जात आहे.

यानंतर श्री. चौधरी.....

असुधारित प्रत

श्रीमती माधुरी मिसाळ.....

तसेच यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामध्ये कुठलीही स्पष्टता नाही. अर्ज दाखल केल्यानंतरच्या प्रक्रियेबाबत अधिकाऱ्यांनाच व्यवस्थित माहिती नसल्यामुळे बरेचसे अर्ज छाननी करण्यासाठीच प्रलंबित आहेत. सर्वच सदस्यांचा हा प्रश्न आहे असल्याने आपण यासंदर्भात एक बैठक आयोजित करणार का ? तसेच ९ मिटरचा प्रश्न सोडवून गुंठेवारीला न्याय देणार का ?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रशमन शुल्कावरील व्याजाचा उल्लेख केला. परंतु तशी काही तरतूद आहे, असे मला वाटत नाही. सध्याच्या रेडी रेकनर दरावर विकास शुल्क काढले जाते. भूखंडाच्या क्षेत्राच्या ०.५ टक्के विकास शुल्क व त्याच्या ३ पट प्रशमन शुल्क असते. त्यावर व्याज किंवा दंडाची कोणतीही तरतूद नाही.

अध्यक्ष महोदय, दुसरा विषय नव्याने समावेश झालेल्या गावांचा आहे. दोन-तीन वेळा हाच विषय समोर आलेला आहे व मी मघाशीच सांगितले आहे की, पुण्यातील प्रश्नांच्या संदर्भात बैठक आयोजित करण्यात येईल. सदर बैठकीमध्ये यातून निश्चितपणे मार्ग निघेल. तसेच महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांना काही क्लिष्ट बाबींच्या संदर्भात मार्गदर्शन हवे असेल तर नगरविकास खात्यामार्फत आवश्यक ते मार्गदर्शन केले जाईल.

श्री.संजय शिरसाट : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये महानगरपालिकेची हद्दवाढ होऊन देवळाई-सातारा हा परिसर महापालिका हद्दीमध्ये आला. देवळाई-सातारा परिसरातील लोकांनी ग्रामपंचायत अस्तित्त्वात असताना ग्रामपंचायतीच्या परवानगीने बांधकामे केलेली आहेत. उदाहरण द्यायचे झाले तर गुंठेवारी म्हणजे काय तर २०x३० आकाराचे एखादे छोटे घर असेल तर त्याला नियमित करणे. परंतु माझ्या मतदारसंघातील ज्या भागाचा मी उल्लेख केला तेथील एकेक भूखंड पाच-पाच हजार चौरस मीटरचा आहे. त्यावर दोन-दोन चार-चार मजली इमारती आहेत. त्या भाड्याने देण्यासाठी बांधलेल्या नसून मालकांनी स्वत:साठी बांधलेल्या आहेत.

असुधारित प्रत

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.भास्कर जाधव)**

श्री.संजय शिरसाट.....

परंतु महापालिका सांगत आहे की, देवळाई-सातारा हा भाग महापालिका हद्दीमध्ये आल्यामुळे आम्ही या बांधकामांना अनधिकृत ठरवित आहोत. असे सांगून या रहिवाशांकडून गुंठेवारी करुन घेतली जात आहे. आजच्या रेडी रेकनर दराप्रमाणे अव्वाच्या सव्वा शुल्काची आकारणी केली जात आहे. माझ्याकडे काही नोटिसा तर अशा आहेत की त्यामध्ये २५ लाख रुपये, २० लाख रुपये भरण्याबाबत सांगितले आहे. २५ वर्षांपूर्वी या जागा ५० रुपये चौरस फूट दराने खरेदी केलेल्या आहेत. परंतु आता त्यांना आजच्या रेडी रेकनर दराप्रमाणे वीस-वीस पंचवीस-पंचवीस लाख रुपये शुल्क आकारले जात असेल तर मला वाटते हे कोणीही भरु शकत नाही. त्यातून काही दुकानांना सिल करण्याचे देखील प्रकार घडले आहेत.

अध्यक्ष महोदय, आमची महानगरपालिका चांगली काम करीत असल्याची स्तुती या ठिकाणी एका सन्माननीय सदस्यांनी केली. परंतु दुसऱ्या बाजूला हा भाग महापालिका हद्दीमध्ये समाविष्ट करुन सात वर्षे उलटून देखील तेथे महापालिकेने एक रुपयाही खर्च केलेला नाही. त्याउलट सुमारे ३४ कोटी रुपयांची वसुली या कालावधीत केली आहे. त्यामुळे मंत्री महोदयांना विनंती आहे की, जी घरे पूर्वी ग्रामपंचायत हद्दीमध्ये होती, जे ग्रामपंचायतीचा कर भरत होते, ज्यांची ७/१२ वर नावे आहेत... त्यामध्ये मंत्री महोदयांच्या घराचा देखील समावेश आहे. त्यांच्या घराला देखील अनधिकृत ठरविले गेले आहे. त्यांना देखील गुंठेवारीसाठीचे शुल्क भरावे लागणार आहे. त्यामुळे माझा प्रश्न आहे की, या भागातील घरांना अत्यंत कमी शुल्क आकारुन नियमित केले जाईल का ?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, मी मघाशी देखील सांगितले की ग्रामपंचायतीमधून महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या क्षेत्राबाबत सन्माननीय सदस्य श्री.सुनिल टिंगरे आणि सन्माननीय सदस्य श्री.चेतन तुपे यांनी देखील त्यांची भूमिका मांडली. मी त्याच वेळी सांगितले आहे की, यासंदर्भात बैठक आयोजित करण्यात येईल. बैठकीत या विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात येईल.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. विजय देशमुख : अध्यक्ष महोदय, ज्याप्रमाणे मंत्री महोदयांनी पुणे जिल्ह्यातील गुंठेवारीच्या बाबतीत बैठक आयोजित करण्याचे कबूल केले आहे त्याप्रमाणे माझ्या सोलापूर जिल्ह्यातही गुंठेवारीच्या अनुषंगाने अनेक प्रश्न आहेत. तेथे जमिनीची मोजणी झाल्याशिवाय गुंठेवारीला परवानगी मिळत नाही. बांधकामाची परवानगी मिळत नाही. अशा अनेक गोष्टी आहेत की, मोजणी फी जास्त असल्यामुळे किंवा जाचक अटी असल्यामुळे लोकांचे अर्ज देखील कमी येतात. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील गुंठेवारीच्या प्रश्नासंबंधी मंत्री महोदयांनी तातडीने बैठक लावावी अशी मी विनंती करतो. मंत्री महोदय अशी बैठक लावणार आहेत काय, अशी मी त्यांना विचारणा करतो.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, आपण यासंबंधी ज्या ज्या अटी लावल्या आहेत, त्यामध्ये नकाशे, मालकी हक्कांची कागदपत्रे असावीत ही त्याबाबतची प्रक्रिया व्यवस्थितपणे पाळली जावी यासाठी आहेत. त्यामुळे या अटी काही जाचक नाहीत. प्रश्न फक्त पुणे जिल्ह्यातील ग्रामपंचायतीसंबंधी आहे तो मला जेन्यूअन विषय वाटतो. त्या अटी जाचक नाही तर आवश्यकच आहेत असे मला वाटते. कारण मूळ मालक कोण आहे, त्याचे रेखांकन कसे आहे हे सुनियोजित विकास करण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे.

श्री. सुनील शेळके : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत दादा पाटील यांनी अत्यंत महत्त्वाच्या विषयाला हात घातला आहे. खरं म्हणजे शहरालगत गुंठेवारी होत असताना त्यांना मूलभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत. ९ मिटर किंवा ६ मिटर याबाबत आपण साधक बाधक चर्चा केली. त्यावर एकात्मिक विकास नियंत्रण नियमावलीच्या अधीन राहून जे नियम तयार होणे आवश्यक आहे ते होतील. परंतु पुणे शहराच्या लगत जो ग्रामीण भाग आहे त्या ग्रामीण भागामध्ये अनेक ठिकाणी गुंठेवारी होत आहे. ही गुंठेवारी निवासी झोनमध्ये नाही तर शेती असलेल्या ग्रीनझोनमध्ये होत आहे. अशी गुंठेवारी होत असताना त्या ठिकाणी कोणत्याही

असुधारित प्रत

श्री. सुनील शेळके...

प्रकारे रस्ते, पाणी आणि वीजेची सुविधा केली जात नाही. लोक आपापल्या ऐपतीप्रमाणे १ ते २ गुंठा जमीन आपापल्या कुटुंबासाठी घेत असतात. अशी खरेदी करीत असताना ११ गुंठे जमिनीची खरेदी करायची आणि कुटुंबात १-१, २-२ गुंठे जमीन वाटून घ्यायची अशी पध्दत आहे. त्यावर राज्य शासनाने काही निर्बंध घातले. त्यानंतर डीडीआर यांनी देखील काही अटी व शर्ती टाकल्या. त्या अटी व शर्तींच्या अधीन राहून डी.ए.पी.ए.च्या माध्यमातून खरेदीखते सुरू आहेत. मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, ज्या ठिकाणी ग्रीनझोन आहे तेथील गुंठेवारी आपण थांबविणार आहात काय, किंवा त्यांचे अतिक्रमण नियमानुकूल करुन त्यांना मूलभूत सुविधा देणार आहात काय ?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, मूळातच ज्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे आहेत ती अधिकृत करण्यासंबंधीचा हा विषय आहे. मघाशी अनेक सन्माननीय सदस्यांनी वारंवार प्रशमन शुल्कासंबंधी मुद्दा उपस्थित केला होता. त्यांना मी सांगू इच्छितो की, हे प्रशमन शुल्क त्या लोकांना सुविधा देण्याकरिता वापरले जाणार आहे. त्यामुळे असा प्रश्न येत नाही.

श्री. भिमराव तापकीर : अध्यक्ष महोदय, अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी गुंठेवारी कायदा अंमलात आला आहे. खरं तर १९९७ साली पुणे महानगरपालिकेत २३ गावे समाविष्ट करण्यात आली. ती गावे पुणे महापालिकेत समाविष्ट केल्यानंतर २००१ साली तेथे गुंठेवारी कायदा नियमित करण्यात आला. हा कायदा नियमित केल्यानंतर त्या महापालिकेतील सहआयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांनी प्रत्यक्ष ज्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे झाली त्या जागेवर जायचे आणि तेथे ज्यांची अनधिकृत बांधकामे झाली त्यांच्या बैठका घेत होते. त्या बैठकांनंतर ते गुंठेवारीच्या कायद्यानुसार ही बांधकामे नियमित होती, असे ते सांगायचे. त्यामुळे त्यावेळी पुणे

श्री. भिमराव तापकीर...

महापालिकेच्या हद्दीमध्ये अशी हजारो बांधकामे नियमित करण्यात आली आहेत.

अध्यक्ष महोदय, आज अशी परिस्थिती आहे की, पुणे महानगरपालिकेमध्ये आणखी ३४ गावे आली आहेत. आता ही ३४ गावे आल्यानंतर खरे म्हणजे ज्यांचे घर नियमित करायचे आहे ते घर गुंठेवारीमधील नसल्यामुळे त्यांच्या घराची नोंदणी होत नाही. ती जमीन किंवा घर विकता येत नाही. जी व्यक्ती तेथे रहावयास आली आहे तो सुध्दा तेथे भितीच्या वातावरणात राहतो. ही सर्व बांधकामे अनधिकृत आहेत आणि ही अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी आपण हा गुंठेवारी कायदा निर्माण केला आहे. त्यामुळे आपण जो सन २००१ मध्ये कायदा निर्माण केला आहे त्या कायद्यामध्येच या प्रकरणांचे नियमितीकरण करण्याचा प्रयत्न केला तर बरे होईल.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. भिमराव तापकीर....

सन २०२० मध्ये गुंठेवारी कायदा विकसित केलेला आहे. परंतु हा कायदा विकसित करीत असताना आपण ज्या अटी व शर्ती घातलेल्या आहेत त्या बघितल्या तर ८ मीटर किंवा ९ मीटर अशा रस्त्याची जागेवर पाहणी केली तर खरे म्हणजे तिथे राहणाऱ्या गोरगरिबांना जाण्यासाठी ५ फुटाचे रस्ते नाहीत. अशा वेळेस ती गुंठेवारीची घरे नियमित झाली पाहिजे. त्यामुळे आपण कायद्यामध्ये शिथिलता आणून सन २००१ च्या नियमानुसार करण्याचा प्रयत्न केला तर बहुतांश गुंठेवारी नियमित होईल. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, हा गुंठेवारी कायदा आल्यानंतर आजपर्यंत पुणे महानगरपालिकेकडून आपल्याला किती प्रस्ताव प्राप्त झाले आहेत ?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी पुण्याविषयी आणि नवीन समाविष्ट गावांविषयी माहिती सांगितली आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, सन २००१ आणि सन २०२० च्या कायद्यामध्ये काहीच बदल नाही. आपण फक्त तारीख बदलेली आहे. त्या त्या वेळेचे डीसीपीआर रुल असतील तर आता युनिफाईड डीसीपीआर रुल आलेले आहेत. त्यामुळे आताचे रुल लागू होतात. मी यापूर्वी देखील सांगितले आहे की, आपल्याला दोन्ही कायद्याचे बॅलेन्स ठेवून हे करावे लागणार आहे. खूप नियोजन करुन व शहराचा विचार करुन डीसीपीआर रुल आपण आणलेले आहेत. नवीन ग्रामपंचायती समाविष्ट झालेल्या गावांचा एक प्रश्न उपस्थित करण्यात आला तर याबाबत मी आधीच सांगितलेले आहे की, या संदर्भात बैठक आयोजित करण्यात येईल.

--------

अप्रकाशित प्रत

**पृ.शी.**: पुणे जिल्ह्यातील तळेगाव दाभाडे नगर परिषद हद्दीत गौण खनिजाचे होत असलेले बेकायदा उत्खनन व विक्री.

**मु.शी.** : पुणे जिल्ह्यातील तळेगाव दाभाडे नगर परिषद हद्दीत गौण खनिजाचे होत असलेले बेकायदा उत्खनन व विक्री या संबंधी श्री. सुनिल शेळके, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. सुनिल शेळके(मावळ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे जिल्हयातील तळेगाव दाभाडे नगरपरिषद हद्दीमधील तळयातील माती, मुरुम गौण खनिजाचे बेकायदा खोदकाम करण्यात आले असल्याचे निदर्शनास येणे, तसेच नगरपरिषद प्रशासनाने सदर तळयातील गौण खनिजांची परस्पर विक्री करुन शासनास स्वामित्व धन (रॉयल्टी) जमा न केल्यामुळे शासन महसुलाचे नुकसान केल्याप्रकरणी मा.तहसिलदार यांनी, तळेगांव दाभाडे नगरपरिषदेस रुपये ७९ कोटी ६४ लाख ९४ हजार ६०० इतक्या रकमेचा दंड ठोठावला असल्याचे दिनांक ८ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, सदर गैरव्यवहार व आर्थिक घोटाळयाप्रकरणी सीआयडीमार्फत चौकशी करुन संबंधित पदाधिकारी, अधिकारी व संबंधित ठेकेदाराविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदविण्यात यावा अशी आग्रही मागणी मा.लोकप्रतिनिधींनी मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे करण्यात येणे, त्यानुसार मा.जिल्हाधिकारी यांनी, याप्रकरणी केलेल्या चौकशीत दोषारोप निश्चित करुन प्रथमदर्शनी दोषी ठरत असलेल्या नगरपरिषद पदाधिकाऱ्यांबाबत अपात्रता व मुख्याधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतचा अहवाल मा.विभागीय आयुक्त,पुणे यांना सादर करुन सदर प्रकरणी शासनाकडे पाठविण्यात येणे, तथापि, मागील ६ महिन्यापासून ही बाब शासनाकडे कोणतीही

असुधारित प्रत

श्री. सुनिल शेळके....

कार्यवाही न होता प्रलंबित असल्याचे आढळून येणे, परिणामी या प्रकरणी सर्व संबंधितांविरुध्द अपात्रता व शिस्तभंगाची कारवाई करण्याची होत असलेली मागणी, तथापि, कारवाई होत नसल्यामुळे तेथील जनतेमध्ये निर्माण झालेले नैराश्याचे वातावरण, प्रकरणी शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना."

श्री.प्राजक्त तनपुरे ( नगर विकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. भास्कर जाधव)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------

असुधारित प्रत

श्री. सुनिल शेळके : अध्यक्ष महोदय, माझ्या मावळ विधानसभा मतदारसंघामध्ये तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये जवळपास ६५ एकर जागेवर ऐतिहासिक तलाव आहे. या तलावामध्ये काही दिवसांपूर्वी बेकायदेशीरपणे उत्खनन सुरु होते. तसेच मोठ्या प्रमाणात मुरुम मातीची बेकायदेशीर विक्री सुरु होती. त्या संदर्भात माननीय जिल्हाधिकाऱ्यांकडे दिनांक १३ मार्च, २०२० रोजी मी तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांनी उप विभागीय अधिकारी, कार्यकारी अभियंता, जलसंधारण आणि मावळ तहसिलदार अशी त्रिसदस्यीय समिती गठीत केली आणि या समितीने संपूर्ण तलावाची पाहणी करुन अहवाल तयार करण्याचे काम केले. या समितीने जवळपास ७०० पानाचा अहवाल तयार केला. यामध्ये उप विभागीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या अहवालामध्ये असे म्हटले की, सदर तलावाचे उत्खनन करीत असताना नगरपरिषदेमधील सन्माननीय सदस्यांनी व अधिकाऱ्यांनी नगर परिषदेमध्ये स्थायी समितीचा ठराव घेतला. परंतु सदर कामाची तांत्रिक मान्यता न घेता नगरपरिषदेच्या करातील रकमेची जवळपास ७ कोटी ४० लक्ष रुपयांची बिले ठेकेदाराला अदा करण्यात आली. कार्यकारी अभियंता, जलसंधारण, पुणे यांनी त्या अहवालामध्ये असे म्हटले आहे की, सदर तलावाचे उत्खनन करीत असताना तलावाच्या बंधाऱ्याचे खोलीपेक्षा जास्त खोलीचे उत्खनन केल्यामुळे या तलावामध्ये पाणी साठा करण्यापूर्वी बंधाऱ्याचे मजबुतीकरण करणे आवश्यक आहे. जोपर्यंत मजबुतीकरण केले जात नाही तोपर्यंत बंधाऱ्यामध्ये कोणत्याही पाण्याचा साठा करु नये. मावळ तहसिल महसूल विभागाचा अहवाल असा आहे की, ...(अडथळा)....अध्यक्ष महोदय, मी दीड वर्षापासून या विषयाचा पाठपुरावा करीत आहे त्यामुळे मी प्रश्न समजून सांगत आहे कारण मला याचे उत्तर अपेक्षित आहे.

अध्यक्ष महोदय, सदर तलावाचे उत्खनन करताना कोणत्याही प्रकारची उत्खनन परवानगी न घेता जवळपास २ लाख ३७६ ब्रासची रॉयल्टी व दंड असा एकूण ८० कोटी रूपये हा दंड नगरपरिषदेला ठोठावलेला आहे. यामध्ये नगराध्यक्ष, सन्माननीय सदस्य, अधिकारी, ठेकेदार आणि देवराई संस्था यांच्या संगणमताने हे सर्व उत्खनन झालेले आहे. या सर्व प्रकरणाचा मी गेल्या दीड वर्षापासून सातत्याने

श्री. सुनिल शेळके....

पाठपुरावा करीत आहे. तरी देखील विभागीय आयुक्तांनी डीएमए कार्यालयाकडेसर्व माहिती पाठवली. ही सर्व माहिती घेत असताना जबाबदारी निश्चित करुन द्या असे सांगितल्यास जबाबदारी निश्चित करुन दिली. माझा स्पेसिफिक प्रश्न एवढाच आहे की, या सर्व प्रकरणाची चौकशी करीत असताना संबंधीत अधिकारी व संबंधीत सदस्य ठेकेदार, देवराई संस्था यांच्यावर दोषपत्र सादर केल्यानंतर सुद्धा अद्याप या विषयावर कोणताही निर्णय घेतला जात नाही.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री. सुनील शेळके ....

मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, ही प्रकरणे किती दिवसात निकाली काढणार तसेच नगरपालिकेमध्ये जनतेने कर रुपी पैसा भरलेला आहे. तो शासनाचा निधी आहे. हा गेलेला निधी संबंधित व्यक्तींकडून वसूल करणार काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या मतदारसंघातील तळेगाव दाभाडे नगरपरिषदेत एका तलावामध्ये गाळ माती काढण्याचा विषय येथे मांडलेला आहे. सन २०१७ च्या दरम्यान झालेला हा विषय असेल. त्या वेळी गाळ काढण्याचा उद्देश चांगला असला, लोकांच्या हितासाठी असला तरी देखील एकंदरित ज्या प्रकारे ही प्रक्रिया राबवण्यात आलेली आहे ते बघता निश्चितपणे यामध्ये प्रोसीजर फॉलो केलेली दिसत नाही. नगरपरिषदेचा ठराव न घेता ८९ लाख रुपये इ. खर्च होणार असतील म्हणजे ....

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. भास्कर जाधव )** : ८९ लाख रुपये की कोटी ?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, ही रक्कम ८९ लाख रुपये आहे. ठराव केल्याशिवाय एक रुपयाही खर्च करता येत नाही.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी ८९ कोटी रुपयांचा उल्लेख केला होता.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, तो विषय वेगळा आहे. ते देखील मी पुढे सांगणार आहे. ही रक्कम ८० लाख रुपये आहे. लोक सहभागातून गाळ काढायचा होता. त्यासाठी डिझेल नगरपालिकेकडून पुरवले जाणार होते. मात्र नगरपालिकेने डिझेलला पैसे देण्याबाबत कोणताही ठराव केला नाही. कोणाला पैसे दिले, किती दिले याची नोंद ठेवल्याचे दिसत नाही. यामध्ये प्रोसीजरल लॅप्स आहे. या संबंधी नंतर देखील कार्योत्तर मंजुरी घेण्यात आली नाही, असे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. नगरपालिकेमध्ये ठराव न करता बरेचसे विषय केलेले आहेत. यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्तांच्या मार्फत डीएमए यांना अहवाल सादर

असुधारित प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे.....

केलेला आहे. या अहवालानुसार, नगराध्यक्ष व काही नगरसेवक यांना कलम ५५ व कलम ४२ नुसार पुढील सुनावणीची तारीख दिलेली आहे. तसेच शो कॉज नोटीसही दिली आहे. ३०तारखेला पदाधिकाऱ्यांची सुनावणी घेतली जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावना मी समजू शकतो. त्यांचे म्हणणे आहे की, यास बरेच दिवस झाले आहेत. कालमर्यादेमध्ये हे संपवणे आवश्यक होते. या सुनावण्या घेण्याकरिता आता आणखी वेळ जाणार नाही. तातडीने या बाबत एखादी पुढील तारीख द्यावी लागली, तर ती देऊन सर्वांना न्याय देऊ. सर्वांची बाजू सुनावणीमध्ये ऐकली जाते. या करिता निश्चित अशी कालमर्यादा आता सांगता येणार नाही. आम्ही प्राधान्याने तारीख घेऊन महिन्यात सुनावणी संपवण्याचा प्रयत्न करु. अधिकाऱ्यांच्या बाबतीतही सांगू इच्छितो. जे दोषी अधिकारी आहेत, ज्यांच्यावर ठपका ठेवलेला दिसत आहे, त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९७९च्या नियम ८ अंतर्गत विभागीय चौकशी करण्याचे ठरवले आहे. त्यांच्यावर लवकरच दोषारोप पत्र बजावण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, देवराई संस्थेचा या ठिकाणी उल्लेख केला गेला. त्याबाबत काही नसेल तर जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत चौकशी करु किंवा आधीच चौकशीमध्ये ते दोषी ठरले असतील तर त्यांच्याविरुध्द देखील योग्य ती कडक कारवाई करण्यात येईल.

श्री.सुनील शेळके : अध्यक्ष महोदय, नगरपालिकेच्या नफा फंडातील जवळपास ७ कोटी ४० लाख रुपयांचे बिल अदा संबधित ठेकेदाराला केले आहे.तांत्रिक मान्यता नाही, ठराव नाही. अशा परिस्थिती जवळपास ७ कोटी ४० लाख रुपयांचे बिल ठेकेदाराला दिले. राज्य शासनाच्या महसूल विभागाने ७९ कोटी रुपये दंड ठोठावला.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

असुधारित प्रत

श्री.सुनील शेळके ....

७ कोटी ४० लक्ष रुपयांची नगरपालिकेची ... ही सर्व वसुली तुम्ही संबंधित ठेकेदार किंवा अधिकाऱ्यांकडून करणार काय? सदस्य म्हणून मला येथे जवळपास ४ लाख जनतेने पाठविले आहे. मी दीड वर्षे या प्रकरणाचा पाठपुरावा करीत आहे. अजून किती दिवस किंवा किती महिने किंवा किती वर्षे याचा पाठपुरावा करायचा, हे तुम्ही मला सांगावे. आपण मला दिवस ठरवून द्यावा.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे सन्माननीय सदस्यांच्या भावना खूप तीव्र दिसत आहेत. नगरपरिषदेच्या मोठ्या निधीची अफरातफर झाल्याची त्यांची भावना आहे. पदाधिकाऱ्यांविरुध्द कलम ५५ व ४२ अन्वये सुनावणी सुरु आहे. मी त्यांना मघाशी देखील सांगितले की, एका महिन्यामध्ये ही सुनावणी संपविण्याचा आमचा प्रयत्न राहील. शेवटी ही अर्धन्यायिक प्रक्रिया आहे. त्याला एखाद्याने पुढची तारीख... वकिलाचे काय आर्ग्युमेंट होतात ते कधी कधी सांगता येत नाही. परंतु, एका महिन्यामध्ये सुनावणी संपवून निकाल देण्याचा आमचा प्रयत्न राहील. महसूल विभागाने जो काही ७९ कोटीचा दंड ठोठावलेला आहे, माझ्या माहितीप्रमाणे त्यामध्ये नगरपालिकेने उप विभागीय अधिकाऱ्यांकडे अपील केलेले आहे. जे काही योग्य आहे ते तपासून निश्चितपणे .... कारण मुरुमांचे देखील उत्खनन झालेले आहे असा तलाठ्यांचा अहवाल आहे.

अध्यक्ष महोदय, गाळ व वनस्पती वगैरे काढणे अपेक्षित होते. परंतु, मुरुम देखील काढला गेलेला आहे, असे तलाठ्यांचे निरीक्षण दिसत आहे. महसूल विभागाच्या अंतर्गत ही कारवाई आहे. ती उप विभागीय अधिकाऱ्यांच्या स्तरावर सुरु आहे. यामध्ये सर्व दोष सिध्द झाले तर निश्चितपणे नगरपालिकेचे झालेले जे नुकसान आहे ते देखील... कारण शेवटी लोकांचा पैसा आहे. नगरपालिका फंडातून ही कामे झाली असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे आणि जर का सर्व दोषारोप सिध्द झाले तर, त्या प्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, ही लक्षवेधी सूचना जरी एका विशिष्ट विषयाच्या, एका प्रसंगाच्या संदर्भात असली तरी, सर्वदूर हाच अनुभव आहे. त्यामुळे

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार ....

माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. जेव्हा अशा पध्दतीने एखादा गुन्हा उघडकीस येतो तेव्हा काही लोक मॅच फिक्सिंग करतात. निर्णय द्यायला ६ महिने, वर्ष, दोन वर्ष आणि कधी कधी अतिशय जास्त कालावधी लावतात. सरकार कायद्यामध्ये काही बदल करुन स्पेसिफिक ६० दिवसांत, ९० दिवसांत हा निर्णय लावणे बंधनकारक करणार आहे काय? कारण ज्या ठिकाणी चोऱ्या होतात अशा ठिकाणी माझा-तुझा, आपला-तुपला, आवडता-नावडता अशा भावनेतून एक-दीड वर्ष निर्णय लागत नाही. त्यामुळे कायद्यामध्ये सुधारणा करुन एका विशिष्ट कालमर्यादेमध्ये आपल्याला हा निर्णय केला पाहिजे. त्यावरच्या ५० टक्के दंडाची रक्कम अंडर प्रोटेस्ट भरली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, हा गुन्हा का घडतो आहे, खरे तर सरकारचे एक धोरण आपण मागे विधानसभेत अनुभवले आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये दारुबंदी होती. आपण सांगितले की, मोठ्या प्रमाणावर अवैध दारु विकली जाते. त्यामुळे आपण तेथील दारुबंदी हटवली. कारण आपण त्यांना पकडूच शकत नव्हता. आताही तोच प्रश्न आहे. दारु अवैध का विकली जाते, परवा .... (अडथळा)... सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश सोळंके थांबा. आपण ऐका. तुम्ही राग आणू नका. मी काय बोलतो ते ऐका. मी तुम्हाला डिस्टर्ब करीत नाही. कमीत कमी तुम्ही मला डिस्टर्ब करु नका. आपण थांबा. आपण डिस्टर्ब करु नका, पुन्हा निवडून या. मला डिस्टर्ब करणारा पुन्हा निवडून येत नाही. ती दैवी शक्ती आहे. भानगडीत पडू नका.... (अडथळा)... आहे म्हणून सांगत आहे. कारण प्रश्न जनतेच्या .... (अडथळा)... ठीक आहे. सन २०२४ मध्ये भेटू.

अध्यक्ष महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, अवैध उत्खनन होत आहे कारण शासन रेतीचे घाट काढत नाही. आता परवा पुन्हा शासनाने नवीन बॉम्ब टाकला. मुरुम उत्खनन जे तुम्ही अगोदर अधिकृतपणे द्यायचे ते परवा बंद केले. आता परिणाम काय होईल? आतापासून ते जून महिन्यापर्यंत रस्ते किंवा सर्व काम पूर्ण करण्याचे दिवस आहेत. आता मुरुमासाठी कोणी टी.पी. मागायला गेला तर परवा तुमच्या विभागाने निर्णय केला की, आम्ही मुरुम उत्खनन करु देणार नाही. परिणाम काय होईल एक तर रस्त्याचे काम थांबवावे लागेल. त्यावर आपण काही उपाय

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार ...

शोधणार आहात की नाही? राज्य सरकारने मुरुमाच्या संदर्भात २ दिवसांपूर्वी बंदी घातली आहे, राज्यातील सर्व ठिकाणच्या टी.पी. थांबवल्या, ती बंदी एनजीटीचे नाव सांगून तुम्ही किती दिवस अशीच ठेवणार आहात?

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार...

यासंदर्भात ताबडतोब पर्यावरण विषय अधिकारी व कर्मचारी यांची संख्या वाढविण्यात यावी. टेक्नॉलॉजी वाढविण्यात यावी. राज्यातील रस्त्यांची कामे थांबविली तर त्याचा दुष्परिणाम होईल. यासंदर्भात सरकारचे धोरण काय आहे ?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी या विषयाला कालमर्यादा आहे काय, त्यासंदर्भात कोणती उपाययोजना करणार का, अशी विचारणा केली आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुनिल शेळके यांनी संबंधित नगराध्यक्ष व सदस्य यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येणार का, असा प्रश्न उपस्थित केला आहे. ही अर्धन्यायायिक प्रक्रिया आहे, कायद्यात ती कालमर्यादा निश्चित करता येणार नाही.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, राज्यातील अनेक कायद्यांमध्ये कालमर्यादा समाविष्ट केली आहे, हा आपला अधिकार आहे. या प्रकरणी कालमर्यादा समाविष्ट करावयाची नसेल तर करु नये. परंतु चुकीची माहिती देऊ नये. राज्यातील विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान बिघडवू नका. त्यांना ज्ञान देता येत नसेल तर देऊ नका परंतु त्यांचे सामान्य ज्ञान बिघडवू नका. या विषयावर आपणा सोबत चर्चा करण्यास मी केव्हाही तयार आहे.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, माझे ज्ञान सन्माननीय सदस्य यांच्या एवढे नाही. परंतु अर्धन्यायिक प्रक्रिया पार पाडत असताना अनेक वेळा सर्व बाजूंचे म्हणणे ऐकून घ्यावे लागते. वेगवेगळ्या वेळी वेगवेगळे पुरावे सादर करण्यात येतात, ते तपासून घ्यावे लागतात. त्यामुळे न्यायालयीन बाबींसाठी कालमर्यादा निश्चित करता येणार नाही. मी सन्माननीय सदस्यां एवढा अनुभवाने मोठा नाही.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.भास्कर जाधव) :** सन्माननीय सदस्य यांनी दीड वर्षे पाठपुरावा करुन हा विषय सभागृहाच्या माध्यमातून आपणापर्यंत पोहोचविला आहे. हे प्रकरण आपल्या विभागास केव्हा प्राप्त झाले आहे ?

असुधारित प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांचे विशिष्ट विषय आहेत, त्याबाबत उत्तर दिले आहे. महिनाभराच्या कालावधीत प्रयत्न करण्यात येतील, असे मी सांगितले आहे. त्यांना मी विशिष्ट कालमर्यादा देऊ शकलो नाही. अर्धन्यायिक बाबींमध्ये आठवड्यात निकाली काढतो...(अडथळा)...

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य यांनी प्रकरण निकाली काढण्यासाठी एक आठवडा कालावधीची मागणी केली नाही. सदरहू प्रकरणी आपल्या विभागाला केव्हा प्राप्त झाले ?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, आता माझ्याकडे निश्चित तारखेची माहिती नाही, मी ती आपणास नंतर देईल. सन्माननीय सदस्य श्री.सुनिल शेळके यांना मी उत्तरामध्ये सांगितले आहे की, सदरहू बाब अर्धन्यायिक प्रक्रियेची आहे. एक महिन्यात ती संपविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. समोरील बाजूच्या वकील तारखा नसल्याचे सांगू शकतात, ही बाब विचारात घेऊन लवकर लवकर तारखा घेऊन सदरहू बाब निकाली काढण्यात येईल. महसूल विभागाच्या संदर्भातील विषय माननीय महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल व योग्य उत्तर मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री.दिलीप लांडे : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न पुणे जिल्ह्याच्या संदर्भातील आहे. पुणे जिल्ह्यातील कात्रज घाटातील वरील भागातील डोंगर मोठ्या प्रमाणात खोदल्याने जीवित हानी झाली होती. ही बाब सर्व राज्याला माहिती आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** हा तळेगाव-दाभाडे नगरपालिका हद्दीतील प्रश्न आहे. आपण या प्रश्नाच्या स्कोपच्या बाहेर जाऊन प्रश्न विचारु नयेत, मंत्री महोदय त्याचे उत्तर देऊ शकणार नाहीत, असे मला वाटते.

श्री.दिलीप लांडे : अध्यक्ष महोदय, पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील तांबाड या गावी मोठ्या प्रमाणात डोंगर खोदण्यात येत आहेत, अतिथी गृहे बांधण्यात येत आहेत. त्यामुळे खालील भागातील वस्तीमधील लोकांची पुर्वी घडलेल्या घटनेप्रमाणे

अग्रिम प्रत

श्री.दिलीप लांडे...

जीवित हानी होण्याची शक्यता आहे. ही बाब मंत्री महोदयांना माहिती आहे काय, बेकायदेशीर खोदकाम थांबवून संबंधितांवर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी मांडलेला प्रश्न या विषयाच्या स्कोपच्या बाहेरील आहे. मी त्यांच्या भावना जाणून घेतल्या आहेत. वस्तुस्थितीची माहिती घेऊन त्यांना उत्तर देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री.प्रकाश सोळंके : अध्यक्ष महोदय, तळेगाव दाभाडे नगरपरिषदेने कोणत्याही प्रकारचा ठराव न घेता नगरपालिका फंडातून सुमारे ७४० कोटी रुपये कामावर खर्च केले आहेत.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.प्रकाश सोळंके.....

आपण सांगितले की, नियमाप्रमाणे नगराध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. तसेच अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी करण्यात येईल, असे सांगितले आहे. संबंधित अधिकारी/कर्मचारी प्रथमदर्शनी दोषी असतील तर त्यांना निलंबित करुन त्यांची चौकशी करणे आवश्यक आहे. मागील दीड वर्षांपासून सन्माननीय सदस्य प्रयत्न करीत आहेत. अजून देखील त्यांना न्याय मिळत नाही. अधिकारी/कर्मचारी यांच्या विभागीय चौकशीसाठी अजून किती दिवसांचा कालावधी लागणार आहे? संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना निलंबित करुन विभागीय चौकशी करणार आहात काय?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, नियमाप्रमाणे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या चौकशीचे आदेश देण्यात आलेले आहेत. उक्त चौकशीमध्ये दोषी आढळून आल्यानंतर संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल.

**तालिका सभाध्यक्ष :** आपल्या विभागाने नियम ५५ (अ) अंतर्गत लोकप्रतिनिधींची चौकशी सुरु केलेली आहे. म्हणजे आपल्या विभागाकडून लोकप्रतिनिधींवर कारवाई केली जाणार आहे. परंतु अधिकारी/कर्मचारी यांच्याबाबतच आपण सहानुभूतीचे धोरण का ठेवत आहात, असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, अधिकारी/कर्मचारी यांच्याबाबत शासन कोणतेही सहानुभूतीचे धोरण ठेवत नाही. पुढील ६ महिन्याच्या आत सदर चौकशी पूर्ण होईल. उक्त चौकशीमध्ये दोषी आढळून आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कठोरातील कठोर कारवाई करण्यात येईल.

श्री.अशोक पवार : अध्यक्ष महोदय, आपण नगर विकास खाते चांगले सांभाळलेले आहे. आपण खाली बसल्यानंतर एखादे मंत्री महोदय ठोस उत्तर देत नसतील तर आपण अध्यक्ष महोदयांकडून ते उत्तर घेता.

असुधारित प्रत

श्री.अशोक पवार.......

परंतु आता मंत्री महोदय, निबंधासारखे उत्तर देत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश सोळंके यांनी विचारलेला मुद्दा अतिशय गंभीर असल्याचे आपल्याही लक्षात आलेले आहे. त्यामुळे आपण मंत्री महोदयांना आदेश देऊन शासन संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणत्या दिवशी कारवाई करणार आहे, याची मंत्री महोदयांकडून तारीख तरी निश्चितकरुन घ्यावी. आपण खाली बसले असताना आपली जी भूमिका असते तीच भूमिका आपण तालिका सभाध्यक्ष असताना असतील पाहिजे, अशी माझी विनंती आहे. त्यामुळे आपण मंत्री महोदयांकडून कारवाईचा दिनांक निश्चित करुन घ्यावा, अशी मी विनंती करतो.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मघाशी मंत्री महोदयांना तीन प्रश्न विचारुन उत्तर घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांनी सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न वेगळा आहे, असे म्हणत माझ्या प्रश्नाला उत्तर देण्याचे टाळत होते. कदाचित ते नवीन मंत्री असल्यामुळे माझ्या प्रश्नाला उत्तर देणे टाळत असतील किंवा मंत्री आहेत म्हणून उत्तर टाळत असतील. ठीक आहे. ते नवीन मंत्री आहेत म्हणून मी समजून घेतलो. त्यातल्या त्यात ते माननीय श्री.जयंतराव यांचे भाच्चे आहेत, हेही आपण लक्षात घेतले पाहिजे. सभागृहाच्या भावना लक्षात घेता अधिकारी सांगतात, म्हणून केवळ त्यावर विसंबून राहून चालणार नाही. अशा प्रकारचे एखादे प्रकरण धसास लावून मंत्री महोदयांना थातूर-मातूर उत्तर देऊन चालणार नाही, हे प्रशासनाच्या लक्षात आणून द्यावे लागते. त्यामुळे उक्त प्रकणी आपण विशेष लक्ष घालून आवश्यक कारवाई करण्यात यावी.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** नाशिक जिल्ह्यातील चांदवड व देवळा तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीपोटी मदत देणेबाबत.

**मु.शी.:** नाशिक जिल्ह्यातील चांदवड व देवळा तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीपोटी मदत देणेबाबत.या संबंधी डॉ. राहूल आहेर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ.राहुल आहेर (चांदवड) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२१ या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीमुळे बाधीत शेतकऱ्यांना मदत देण्याकरीता राज्य आपत्ती प्रतिसाद निधी व राज्य शासन निधीमधून दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ च्या परिपत्रकानुसार नाशिक जिल्ह्यातील ९ तालुक्यांना १२०२४०७००० इतकी मदत देण्यात येणे, परंतु यामध्ये शासकीय यंत्रणेमार्फत देण्यात आलेल्या चुकीच्या आकडेवारीनुसार अथवा चुकीच्या माहितीमुळे चांदवड व देवळा तालुक्यात मोठ्या प्रमाणात नुकसान होऊनदेखील देण्यात आलेल्या मदतीत दोन्ही तालुक्यांचा समावेश न झाल्यामुळे तेथील शेतकऱ्यांवर अन्याय झालेला असणे, दिनांक २८ व २९ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या पावसाच्या आकडेवारीत जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय यांच्या व तालुकास्तरीय यंत्रणेमार्फत सादर करण्यात आलेल्या आकडेवारीत प्रचंड मोठी तफावत असल्याने शासनास चांदवड व देवळा तालुक्याची दिलेली आकडेवारी ही चुकीची असल्याचे स्पष्ट होणे, दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ अखेरीस चांदवड तालुक्यात सरासरी ७०२ एम.एम. पाऊस झालेला असला तरी तालुका स्तरीय यंत्रणेकडील माहितीवरून फक्त ३५८ एम.एम. पाऊस झाल्याचे कळविण्यात आल्याने यात हेतुपुरस्सर तालुका वगळण्याचे काम

असुधारित प्रत

डॉ.राहुल आहेर.......

केले जात असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे तालुक्यातील नागरिकांमध्ये शासनाविषयी पसरलेला तीव्र असंतोष व चीडीची भावना, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी (चांदवड) यांनी कृषी मंत्री यांना निवेदन देऊन मदत मिळण्याकरीता विनंती करणे, शासनाने तातडीने खऱ्या आकडेवारीनुसार चांदवड व देवळा तालुक्याला मदत देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.विजय वडेट्टीवार (मदत व पुनर्वसन मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

डॉ.राहुल आहेर : अध्यक्ष महोदय, आपण सर्व बाबींचा सखोल अभ्यास करता ही लक्षवेधी सूचना माझ्या मतदारसंघाची असली तरी यातील विषय पूर्ण राज्याच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा आहे.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराचा विचार केला तर संबंधित अधिकाऱ्यांने मंत्री महोदयांना चुकीची माहिती दिली आहे. त्यामुळे उत्तरामध्ये खोट आहे, असे मला वाटते. कारण आपण आपल्या उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, जेव्हा गुलाब चक्रीवादळ आले होते तेव्हा माझ्या मतदारसंघामध्ये शासनाच्या नियमानुसार ६५ एमएमपेक्षा जास्त पाऊस झाला नाही. जेव्हा अतिवृष्टी होते तेव्हा सदर गावामध्ये किती नुकसान झाले आहे ते तलाठी रेकॉर्डवर आणतात आणि त्याच माहितीच्या आधारे पुढील कार्यवाही केली जाते. सदर नुकसानीचे सर्व्हेक्षण हे तीन विभागाचे कर्मचारी करतात. तलाठी हा महसूल विभागाचा कर्मचारी असतो. कृषी सहाय्यक हा कृषी विभागाचा कर्मचारी असतो आणि ग्रामसेवक हा ग्राम विकास विभागाचा कर्मचारी असतो. या कर्मचाऱ्यांनी सर्व्हेक्षण केल्यानंतर तो अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला जातो व तो अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडून मदत व पुनर्वसन विभागाकडे सादर केला जातो. जेव्हा गुलाब चक्रीवादळ आले होते तेव्हा १०० एमएमपेक्षा जास्त पाऊस पडला होता.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

डॉ. राहुल आहेर....

सन २०१६ पासून आपण ऑटोमेटेड रेन गेजेस वापरत आहोत. आता मॅन्युअल रेन गेज स्टेशन वापरण्यात येत नाही. तरीही माझ्या मतदारसंघात मॅन्युअल रेन गेजचे आकडे कळविले आहेत. याबाबत मी जिल्हाधिकारी यांच्यासोबत चर्चा केली. याबाबत त्यांना तहसिलदारांना निदेश देण्याबाबत सांगितले. परंतु मघाशी चर्चा करताना सांगण्यात आले की, तेथे ६५ मि.मी.पेक्षा अधिक पाऊस झाला नाही. जिल्हा कृषि अधिकारी आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडे ऑटोमेटेड रेन गेज स्टेशनची आकडेवारी येत असते. ही आकडेवारी तहसिल कार्यालयाकडे येत नाही. याची की त्यांच्याकडे नसते. त्यामुळे ही तफावत दिसते. माझ्याकडील ८ मंडळांपैकी चांदवड मंडळामध्ये ४३ मि.मी. पावसाची आकडेवारी दर्शविण्यात आली आहे. परंतु जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ऑटोमेटेड रेन गेज कार्यालयात हीच आकडेवारी ८७ मि.मी. इतकी दिसून येत आहे. रायपूर मंडळातील सब स्टेशनमधील आकडेवारी ३९ मि.मी. इतकी दिसत आहे. परंतु ती ६९ मि.मी. आहे. तिसऱ्या मंडळात मॅन्युअल रेन गेज स्टेशनची आकडेवारी वेगळी असून जिल्हाधिकारी कार्यालयातील ऑटोमेटेड रेन गेज स्टेशन आणि जिल्हा कृषि अधिकारी कार्यालयातील आकडेवारी ९९ मि.मी. दिसून येत आहे. ज्याठिकाणी ३० मि.मी. पाऊस दाखविण्यात आला आहे तेथे ऑटोमेटेड रेन गेज स्टेशनमधील नोंदीनुसार ११० मि.मी. पाऊस दिसत आहे. देवळा मंडळामध्ये ४७/७८, ९२/७७ आणि ५२/५७ अशी आकडेवारी आहे. याचा अर्थ क्षेत्रीय कार्यालयातून चुकीची आकडेवारी मिळाली आहे. वारंवार सांगूनही याबाबतचे पंचनामे होऊ शकले नाहीत.

अध्यक्ष महोदय, माझ्या तालुक्याच्या शेजारी माननीय कृषि मंत्र्यांचा तालुका आहे. दुसरीकडे माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ यांचा तालुका आहे. माननीय कृषि मंत्र्यांच्या तालुक्यामध्ये १०० टक्के नुकसान दिसून येते. तेथे ४० कोटी रुपयांची नुकसानभरपाई मिळाली आहे. नाशिक जिल्ह्यामध्ये १२० कोटी रुपयांच्या नुकसानीत माझ्या भागातील शेतकऱ्यांचे मालेगाव तालुक्यात क्षेत्र असतानाही काही भागामध्ये १०० टक्के नुकसान दिसून येते. माझ्या भागातील लागूनच असलेल्या

असुधारित प्रत

डॉ. राहुल आहेर....

क्षेत्रामध्ये शून्य टक्के नुकसान दिसते. ही तफावत केवळ तहसिल कार्यालयातून पाठविण्यात आलेल्या चुकीच्या आकडेवारीमुळे झाली आहे. माझ्या भागात संपूर्ण पावसाळ्यातील पावसाची आकडेवारी ३५८ मि.मी. दाखविण्यात आली आहे. परंतु जिल्हाधिकारी कार्यालयातील हीच आकडेवारी ७०२ मि.मी. इतकी आहे. तहसिल कार्यालयाने ४८ टक्के पाऊस झाल्याचे सांगितले. परंतु वस्तुस्थितीमध्ये १२२ टक्के पाऊस झाला आहे.

अध्यक्ष महोदय, तहसिल कार्यालयाने चुकीची आकडेवारी कळविली आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांना वारंवार सांगून आणि तहसिल कार्यालयाशी बोलूनही पंचनामे होऊ शकले नाहीत. याचे कारण असे की, तहसिल कार्यालयाकडून सांगण्यात येते की, २० ते ३० मि.मी. पाऊस झाला आहे. त्यामुळे पंचनामे करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई कशी मिळेल, याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. शासकीय आकडेवारीनुसार ६२ मि.मी. पेक्षा अधिक आकडे माझ्या मतदारसंघातील सर्व मंडळामध्ये आहेत. याबाबत कृषि मंत्री महोदयांनीही एक बैठक घेतली होती. यावेळेस सर्व अधिकाऱ्यांना बोलविले होते. त्यावेळेस त्यांच्या लक्षात आले की, क्षेत्रीय कार्यालयातील वापरण्यात आलेली प्रणाली चुकीची आहे. त्यामुळे शेतकरी नुकसानभरपाईपासून वंचित आहेत. या शेतकऱ्यांना मंत्री महोदय कसा न्याय देणार आहेत ?

श्री. विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी मालेगाव येथे केलेल्या मदतीबाबतचा उल्लेख केला आहे. मी सांगू इच्छितो की, याच विषयाच्या अनुषंगाने वरच्या सभागृहात प्रश्न मांडला होता. तेव्हाही हा विषय उपस्थित केला गेला. तेव्हा सांगण्यात आले की, चुकीच्या अहवालावरुन ४० कोटी रुपयांची मदत केली आहे. त्यामुळे मी याबाबत कारवाई करण्याची सूचना दिली आहे.

यानंतर श्री. चौधरी....

श्री.विजय वडेट्टीवार.....

एस.डी.आर.एफ. च्या निकषांमध्ये बसत नसतानाही प्रस्ताव आले होते. ग्राम पातळीवर तलाठी, ग्रामसेवक यांच्यामार्फत पंचनामे केले जातात. गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी आणि तहसिलदार यांच्यामार्फत ते प्रमाणित केले जातात. नंतर ही माहिती जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शासनाकडे मदतीसाठी येते. त्याआधारे मदत दिली जाते. परंतु एका बाजूला चुकीची मदत करण्यात आल्यामुळे दुसरे लोक देखील म्हणायला लागले की, आम्हाला का मदत करण्यात आली नाही? त्यामुळे आम्हाला कारवाई करण्याची वेळ आली. ही बाब सन्माननीय सदस्यांच्याच तालुक्यामध्ये घडली आहे.

अध्यक्ष महोदय, यामध्ये असे झाले की, जे लोक मदत मिळण्यास पात्र होते ते बाजूला राहिले आणि अपात्र लोकांचीच यादी सरकारकडे सादर करण्यात आली. आलेल्या माहितीच्या आधारे सरकारने ४० कोटी रुपये मदत केली. त्यामध्ये सरकारचा काहीही दोष नाही. नंतर एका सन्माननीय सदस्यांच्या तक्रारीवरुन चौकशीचे आदेश देण्यात आले. त्यामुळे मी सांगू इच्छितो की, निकषात बसत असेल तर मदत न देण्याचा प्रश्नच येत नाही. निकषात बसत असल्यास मदत दिलीच पाहिजे यामध्ये दुमत नाही.

अध्यक्ष महोदय, हा सर्व घोळ पर्जन्यमापन यंत्रांमुळे होत आहे. मी या निमत्ताने सभागृहाला सांगू इच्छितो की, आपण आता ग्रामपंचायत निहाय ॲटोमॅटिक पर्जन्यमापन यंत्रे बसविण्याचा निर्णय घेतला आहे. ही कार्यवाही या वर्षीच पूर्ण केली जाणार आहे. हा गोंधळ प्रामुख्याने पर्जन्यमापन यंत्रामुळेच होतो. नंतर कोणी म्हणते अमूक ठिकाणी कमी पाऊस पडला तर दुसरे कोणी सांगते त्या ठिकाणी जास्त पाऊस पडला. अशा स्थितीत आम्ही तरी काय करायचे ? कारण यासंदर्भातील प्रस्ताव खालच्या स्तरावरुन येत असतो. तसेच असेही ठरले आहे की, Wind Vane देखील या ठिकाणी बसविण्यात येतील. त्यामुळे वाऱ्याचा ताशी वेग कळून वादळाची पूर्वकल्पना मिळू शकेल. ही दोन्ही यंत्रे ग्रामपंचायत पातळीवर बसविण्यात येणार आहेत.

श्री.विजय वडेट्टीवार.....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की क्षेत्रीय पातळीवरील अहवाल आणि जिल्हाधिकारी यांच्या अहवालामध्ये तफावत आहे. मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, ही मदत शेतकऱ्यांना मिळणार आहे व शेतकरी आपणा सर्वांचेच आहेत. ते केवळ तुमचे आहेत किंवा आमचे आहेत, असे नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे ही आपल्या दोघांचीही प्रामाणिक भावना आहे. मी मघाशी देखील सांगितले की, कोणताही पात्र शेतकरी मदतीतून सुटता कामा नये. तसेच जी मदत चुकीची झाली ती देखील कोणा व्यापाऱ्याला गेलेली नसून शेतकऱ्यांनाच गेली आहे. परंतु काही पात्र शेतकरी वंचित राहिले आहेत ही बाब देखील खरी आहे. त्यामुळे मी संबंधितांना निर्देश दिले आहेत की, आठ-पंधरा दिवसांमध्ये या सर्व शेतकऱ्यांना मदत देण्यात यावी. सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीनुसार मी तहसिल कार्यालयाचा व जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल पुन्हा मागवितो. ६५ मिलीमिटरपेक्षा जास्त पाऊस व ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान दोन्ही निकषांमध्ये सदर प्रस्ताव बसत असल्यास या सर्व शेतकऱ्यांना १०० टक्के मदत देण्यात येईल.

श्री.रमेश बोरनारे : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न नाशिक जिल्हयाचा असला तरीही संपूर्ण महाराष्ट्रामध्ये हीच परिस्थिती आहे. माझ्या वैजापूर-गंगापूर विधानसभा मतदारसंघामध्ये सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२१ मध्ये अतिवृष्टी झाली. त्यावेळी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई आम्हाला मिळाली व त्याबद्दल मी मंत्री महोदयांचे आभार मानतो. परंतु या अतिवृष्टीमुळे माझ्या मतदारसंघातील १७० विहिरींचे पूर्णपणे म्हणजे १०० टक्के नुकसान झाले आहे. विहिरींची पूर्ण पडझड झाली आहे. तहसिल कार्यालय, कृषी विभाग यांच्याकडून याचे पंचनामे झाले. परंतु अद्यापपर्यंत या १७० विहिरींना कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळालेली नाही.

असुधारित प्रत

श्री.रमेश बोरनारे.....

अध्यक्ष महोदय, याच काळात नारळी, सिवना, खारी-खामगाव, नारंगी-सारंगी, बोळ, ढेकू या नद्यांवर जेवढे के.टी. वेअर होते ते सर्व वाहून गेले. सोबतच त्याच्या बाजूची जमीन पूर्णपणे खरडून गेली. याचे देखील पंचनामे झाले.

अध्यक्ष महोदय, या अनुषंगाने मंत्री महोदयांना माझे प्रश्न आहेत की, अतिवृष्टीमध्ये नुकसान झालेल्या १७० विहिरींना नुकसानभरपाई देण्यात येईल का ? तसेच ज्या जमिनी खरडून गेल्या त्यांची देखील नुकसानभरपाई देण्यात येईल का ?

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, या सर्व प्रकरणासंबंधी जिल्हाधिकारी यांच्याकडून माहिती घेऊ. शासनाकडे प्रस्ताव असेल तर लगेच देऊ आणि नसेल तर प्रस्ताव मागवून घेऊ. निकषात बसत असेल तर १०० टक्के देऊ.

श्री. दिलीप बोरसे : अध्यक्ष महोदय, २ फेब्रुवारी २०२१ रोजी आमच्या नाशिक जिल्ह्यात जे अवकाळी पावसाने नुकसान झाले....

**तालिका सभाध्यक्ष (श्री. भास्कर जाधव) :** मी सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्यापासून थांबवित नाही किंवा फार तत्त्वज्ञानही सांगत नाही. पण येथे ज्येष्ठ सदस्य बसलेले आहेत. आम्ही जेव्हा या सभागृहात सदस्य म्हणून आलो तेव्हा आमच्या लक्षात आले की, अशा विषयावर फक्त ३-४ किंवा जास्तीत जास्त ५ प्रश्न विचारले जात होते आणि तेही पॉईन्टेड असायचे. परंतु मी गेल्या ५-७ वर्षापासून पाहतो आहे की, प्रत्येक वक्ता, प्रत्येक सदस्य प्रत्येक प्रश्न मांडताना तो डेव्हलप करुन मांडतो. त्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, पहिल्या सन्माननीय सदस्यांनी तो प्रश्न डेव्हलप केल्यानंतर इतर सन्माननीय सदस्यांनी त्या अनुषंगाने आता उपप्रश्न आणि तेही पॉईन्टेड विचारावेत. मी आपल्याकरिताच हे सांगत आहे असे नाही तर सर्वांसाठी सांगत आहे. आपण पहिल्यांदाच बोलत आहात. म्हणून आपण आपले प्रश्न विचारावेत. नवीन सदस्यांनी हे शिकले पाहिजे की, कमी वेळात जास्तीत जास्त प्रश्न विचारुन ते कसे सोडवून घ्यावेत, याला सभागृहामध्ये कौशल्य म्हटले जाते. किती वेळ बोलले... काही विषयावर जास्त बोलावे लागते. परंतु वेळ अगदी कमी असतो अर्धा मिनिट किंवा एक मिनिटच मिळतो.

श्री. दिलीप बोरसे : अध्यक्ष महोदय, नाशिक जिल्ह्यातील माझ्या बागलाण तालुक्यामध्ये प्रामुख्याने आर्ली द्राक्ष पीक घेतले जाते. २०२०-२१ मध्ये या द्राक्ष पिकाची झालेली नुकसान भरपाई पाहिली तर ५०० ते ६०० कोटींचे नुकसान झाले आहे. त्या नुकसान भरपाईपोटी फक्त दीड कोटी रुपये मिळाले आहे. आपल्या माध्यमातून माझी सरकारला एकच विनंती आहे की, जेथे आमच्या द्राक्ष बागायतदारांचे ५ हजार टनांचे नुकसान झाले म्हणजे ५०० ते ६०० कोटी रुपयांचे नुकसान झाले त्या बदल्यात फक्त दीड कोटी रुपये मिळाले.

अस्धारित प्रत

श्री. दिलीप बोरसे...

अध्यक्ष महोदय, त्यानंतर फेब्रुवारी २०२२ मध्ये आमच्या भागात द्राक्ष आणि डाळींबाच्या पिकाचे नुकसान झाले. त्याबद्दल आमच्या शेतकऱ्यांना एकही रुपया सरकारकडून मिळाला नाही. पुन्हा काल परवा आमच्या तालुक्यात अवकाळी पावसाने थैमान घातले. त्यात प्रामुख्याने कांदा, द्राक्ष या पिकांचे मोठे नुकसान झाले. मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती करतो की या द्राक्ष बागायतदारांचे नुकसान भरपाईचे शिल्लक राहिलेले पैसे देणार आहात काय आणि काल परवा जो पाऊस होऊन नुकसान झाले त्याचे पंचनामे करण्याचे आपण आदेश देणार आहात काय ?

श्री. विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, होय.

श्री. बाळासाहेब आजबे : अध्यक्ष महोदय, माझ्या बीड जिल्ह्यामध्ये एकूण ६३ मंडळे आहेत आणि त्यापैकी ७ मंडळांना अतिवृष्टीचे अनुदान मिळालेले आहे. माझ्या मतदार संघातील आष्टा आणि टाकळसिंग या २ मंडळांना अनुदान मिळाले नाही. वास्तविक पाहता त्यातील आष्टा हे नवीन मंडळ झाले आहे. त्या मंडळामध्ये पर्जन्यमापक बसलेले नाही. मग तेथे पर्जन्यमापक बसलेले नसताना तेथील अहवाल कशा पध्दतीने पाठविला. वास्तविक पाहता संपूर्ण ६३ मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली आहे. जिल्ह्यातील फक्त ३ मंडळे राहिली आहेत. तेथेही चांगला पाऊस झाला. परंतु पर्जन्यमापकाच्या चुकीच्या अहवालामुळे तेथील लोकांना अनुदान मिळालेले नाही. आपण आता निर्णय घेतला.

**तालिका सभाध्यक्ष :** मला असे वाटते की, जवळपास सर्व सन्माननीय सदस्यांचे प्रश्न सारखेच आहेत.

श्री. बाळासाहेब आजबे : अध्यक्ष महोदय, आपण गावनिहाय पर्जन्यमापन करण्याचा जो निर्णय घेतला तो अभिनंदनीय आहे. कारण एका मंडळामध्ये वेगवेगळ्या गावात कमी जास्त पाऊस होतो. त्यामुळे गाव हे निकष धरले तर येथून पुढील काळात शेतकऱ्यांना फायदा होईल.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये मान्य केले आहे की, ६५ मी.मी.पाऊस पडला की नाही याबद्दल सन्माननीय सदस्य डॉ. राहूल आहेर यांनी प्रश्न विचारला. त्यांनी प्रश्न विचारल्यानंतर जिल्हाधिकारी आणि पर्जन्यमापक यांच्या अहवालामध्ये तफावत येत आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार...

आता माननीय मंत्री असे म्हणत आहेत की, मी जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देईल की, या संदर्भात त्यांनी अहवाल पाठवावा. परंतु ते पंचनामे कसे करतील ? कारण आता शेतीमध्ये पीक उभे नाही. आता तुम्ही काहीही नजर अंदाज करु शकत नाही किंवा तिथे जाऊन पीक पाणी बघू शकत नाही. त्यामुळे माननीय मंत्र्यांना उत्तर दुरुस्त करावे लागेल की, तिथे तेवढा पाऊस आला होता दर हेक्टरी त्यांना निकषानुसार मदत करावी लागेल असे जिल्हाधिकाऱ्यांनी मान्य करावे. कारण जिल्हाधिकारी आता पंचनामे करु शकत नाहीत. त्यामुळे मी हरकतीचा मुद्दा मांडलेला आहे. माझी एवढीच विनंती आहे की, त्या भागात जो अन्याय झाला त्यासाठी आपण सरसकट मदत जाहीर करावी.

श्री. विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांना मी सांगू इच्छितो की, त्यांच्या तालुक्यामध्ये पडलेले पर्जन्यमान आणि त्यांनी दिलेला अहवाल आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे नोंद झालेले पर्जन्यमान हा सर्व फरक आहे असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. याबाबत मी असे म्हटले की, पर्जन्यमानामध्ये असलेला फरक आम्ही जिल्हाधिकाऱ्यांकडून व्हेरिफाय करुन घेऊ. पर्जन्यमानाचा विषय मी म्हणालो नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, तहसिलदारांकडे किंवा खालच्या पातळीवर जे पंचनामे झाले त्यांच्या अहवाल मधील तफावत दुरुस्त करायची असेल तर मला परत त्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रस्ताव मागवावा लागेल. पंचनाम्याचा काहीही विषय नाही.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, ६५ मिलिमीटरपेक्षा पाऊस पडला होता असे जर जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले तर आपण शेतकऱ्यांना कशी मदत करणार आहात, एवढाच माझा प्रश्न आहे. कारण आता पंचनामे करता येणार नाहीत.

श्री. विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, ६५ मिलिमीटरपेक्षा जास्त पाऊस पडला असे जर जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले तर त्यांचा जो प्रस्ताव असेल तो मान्य करण्यात येईल. खालच्या पातळीवरुन आलेला प्रस्ताव....(अडथळा)... यावर

असुधारित प्रत

श्री. विजय वडेट्टीवार....

काहीतरी मार्ग काढावा लागेल. आपण सांगितलेला आपला आकडा योग्य असेल तर कुठेतरी....

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. भास्कर जाधव)** : मंत्री महोदय, थोडक्यात असा विषय आहे की, पर्जन्यमानातील दोघांच्या अहवालातील फरकामुळे जर नुकसान भरपाई मिळाली नसेल तर जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालानुसार नुकसान भरपाई देण्यात येईल, एवढेच साधे या प्रश्नाचे उत्तर आहे. आता या प्रश्नाला न्याय मिळाला आहे असे मला वाटते.

ॲड. आशिष जैस्वाल : अध्यक्ष महोदय, कितीही निकष असले तरी शेतकऱ्यांना नुकसान होऊ नये. कारण हे सर्व निकष शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आहेत. त्यांचे जर नुकसान झाले असेल तर माननीय पालकमंत्री किंवा आमदार एकदा त्या ठिकाणी भेट देतात. शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आपल्या डोळयांना दिसते. परंतु आपण त्याला राज्य शासनाचे निकष सांगून त्याला मदतीपासून वंचित ठेवता ही बाब योग्य नाही. त्यामुळे अनेक अपवादात्मक परिस्थितीमध्ये म्हणजे आमच्या जिल्ह्यात पावसामुळे मध्यप्रदेशाचे पाणी वाहून आल्यामुळे आमची घरे वाहून गेली. आमच्या जिल्ह्यात पाऊस पडला नाही. परंतु तरी देखील शासनाला मदत करावी लागली. प्रश्न असा आहे की, मदत किंवा निकष शेतकऱ्यांसाठी आहेत. त्यामुळे आवश्यकतेप्रमाणे ते निकष माईल्ड करायला पाहिजे किंवा सरकारने या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेऊन याचा पुनर्विचार करायला पाहिजे. ३३ टक्के लोकांचे नुकसान झाले तरी देखील मदत न करणे ही बाब योग्य नाही.

अध्यक्ष महोदय, माझा दुसरा मुद्दा असा आहे की, अतिवृष्टी झाल्यानंतर माननीय मंत्र्यांनी आमच्या जिल्ह्यात बैठक घेतली. तेव्हा जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल आला. तो अहवाल निकषात बसणारा आहे. परंतु ११ जानेवारी रोजी अतिवृष्टी झाल्यानंतर ६ महिने पैसे मिळत नाहीत. आज जखम झाली तर किती दिवसांनी उपचार करणार आहात ? आपल्या एसडीआरएफमध्ये पैसे आहेत तर आपण असा काही मेकॅनिझम करणार काय ? नुकसान झाले हे आपल्याला मान्य

ॲड. आशिष जैस्वाल...

आहे आणि त्यासाठी मदत करण्याचा शासनाचा निर्णय झाला आहे. परंतु ती मदत करण्यासाठी ६ महिन्याचा विलंब लागतो. त्यामुळे दु:ख आज झाले, घाव आज लागला आहे तर मरण किती दिवसात लावणार आहात ? तसेच ही मदत तात्काळ होण्यासाठी आपण निर्णय करणार काय ?

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष (श्री. भास्कर जाधव )** : मला असे वाटते की, आता आपण येथे थांबलेले बरे.

श्री. विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष जैस्वाल यांनी या ठिकाणी विषय उपस्थित केलेला आहे. आपले निकष ठरलेले आहेत. निकषाच्या बाहेर जाता येते काय ? असे झाले तर संपूर्ण राज्यातील लोकप्रतिनिधींची मागणी होईल. आपण आता हे निकष वाढवले आहेत. ६५ मि.मी पेक्षा जास्त पाऊस असेल, ३३ टक्क्यांपेक्षा जास्त पिकाचे नुकसान असे दोन निकष निश्चित केलेले आहेत. आता निकष बदलायचे असतील तर मी आपल्याला सांगू इच्छितो की, एसडीआरएफमध्ये राज्य शासनाला अधिकार नाहीत. एसडीआरएफमध्ये केंद्र शासनाच्या माध्यमातून निकष ठरवले जातात. आपले निकष निश्चित करताना आपण निधी वाढवून दिला. जिरायती शेतीकरता एसडीआरएफचे निकष ६ हजार ८०० रुपये होते. आपण ते १० हजार रुपये केले आहेत. आपण अशा प्रकारे सरसकट निधी वाढवून दिला. आता बागायतचे १३ हजार ५०० रुपये निकष होते. आता आपण जवळपास १५ हजार रुपये केले आहेत. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष जयस्वाल यांनी प्रश्न विचारला आहे की, आपल्या या दोन्ही निकषामध्ये नुकसान भरपाई असेल तर नागपूर जिल्ह्यातील एकही प्रस्ताव प्रलंबित राहणार नाही. अधिवेशन संपल्यानंतर १५ दिवसात आलेले सर्व प्रस्ताव मंजूर करु.

श्री. योगेश कदम : अध्यक्ष महोदय, सन २०२० मधील जून महिन्यात निसर्ग चक्रीवादळ आले. या वादळाचा तडाखा आपल्याही मतदारसंघाला मोठया प्रमाणात बसला होता. हा प्रश्न स्कोपच्या बाहेर असला तरी देखील हा महत्त्वाचा प्रश्न असल्यामुळे, माझी आपल्याला विनंती आहे. या पूर्वी अतिवृष्टीबाबत गेल्या हिवाळी अधिवेशनातही मी प्रश्न विचारला होता. शेतीच्या तसेच घरे व दुकानाच्या नुकसानाची भरपाई शासनाने दिलेली आहे. मात्र सार्वजनिक मालमत्ता, स्मशान शेड, जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायत कार्यालय यांची बरीच पडझड झालेली आहे.

असुधारित प्रत

श्री. योगेश कदम ....

माझ्या मतदारसंघात सव्वा दोनशे गावात स्मशान शेड अजूनही पडलेले आहे. टायर जाळून प्रेतांचे दहन करावे लागते, एवढी गंभीर परिस्थिती माझ्या मतदारसंघात आहे. माझा मंत्री महोदयांना स्पेसिफिक प्रश्न आहे. या सर्व सार्वजनिक मालमत्तांच्या मागणीचे प्रस्ताव मदत व पुनर्वसन विभागाकडे आले आहेत. किती दिवसात या सर्व सार्वजनिक मालमत्तांचा निधी उपलब्ध करुन देणार ?

श्री. विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, आपला प्रश्न नाशिक पासून पुढे सरकत कोकणात गेला. आहे. तसेच पुन्हा विदर्भात जाऊन आला. आता मराठवाडा शिल्लक आहे. त्याचाही येथे उल्लेख झालेला आहे. हे खरे आहे की, कोकणात निसर्ग चक्रीवादळ आल्यानंतरआपण मदत केली. हे सर्वांना माहीत आहे. शाळेकरिता मदत शिल्लक राहिली होती. जिल्हा परिषदेच्या शाळांकरिता १२ कोटी रुपयांची मदत काल -परवा मंजूर करुन दिलेली आहे तसेच निधी देखील दिलेला आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : ती मदत असते. पूर्ण भरपाई नसते.

श्री. विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, स्मशान भूमीच्या संदर्भात जर प्रस्ताव आला असेल व तो निकषात बसत असेल.... मध्ये बीडच्या विहिरींचा प्रश्न होता. तेथील विहिरी बुजल्या होत्या. हा विषय निकषात बसत नाही तर कशी मदत देणार.

**तालिका सभाध्यक्ष :** सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा.

डॉ.राहुल आहेर : अध्यक्ष महोदय, मी आपल्याला आकडेवारी सांगू इच्छितो. जिल्हा परिषद कार्यालयात १०० एमएम पाऊस झाला अशी आकडेवारी आहे. असे असताना आपण ३३ टक्के नुकसान झाले हे कसे निश्चित करणार ? यामुळे आपण एकच आश्वासन द्या. आता हे पंचनामे झालेले नाहीत. ती वेळ आता निघून गेलेली आहे. पंचनामे झालेले नसताना पावसाच्या आकडेवारीवर .....

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष :** मंत्री महोदयांनी या बाबत मघाशीच स्पष्टपणे उत्तर दिलेले आहे.

डॉ.राहुल आहेर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही. त्यांना उत्तर देऊ द्या. मंत्री महोदय पुन्हा तेवढे बोलू शकतात. ३३ टक्क्यांची नुकसान भरपाई कशी दिसणार आहे ?

श्री. विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, या संबंधी सन्माननीय सदस्यांना बोलावून बैठक घेऊन योग्य तो निर्णय घेऊ.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

## म.वि.स. नियम २९३ अन्वयेच्या विरोधी पक्षाच्या प्रस्तावावरील माननीय मंत्री यांच्या उत्तराबाबत

श्री.दिलीप वळसे-पाटील (गृह मंत्री) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम २९३ अन्वयेच्या विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर आज उत्तर द्यायचे ठरले होते. परंतु, समोरच्या बाजूला सन्माननीय सदस्य नाहीत. तसेच माननीय विरोधी पक्ष नेते देखील नाहीत. त्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. तसेच, उद्या देखील या बाबतचे उत्तर देता येणार नाही. कारण उद्या राज्याचा अर्थसंकल्प सादर होणार आहे. त्यामुळे मी म.वि.स. नियम २९३ अन्वयेच्या विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर सोमवारी उत्तर देईन.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.भास्कर जाधव)** : ठीक आहे. दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी विरोधी पक्षाने म.वि.स. नियम २९३ अन्वये मांडलेल्या प्रस्तावाला गृह मंत्री महोदय सोमवार, दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी उत्तर देणार आहेत. आपण त्या प्रस्तावावर काही सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देणार आहात का की, केवळ उत्तर दिले जाणार आहे ... फक्त उत्तर दिले जाणार आहे. ठीक आहे. मंत्री महोदय आपण एवढा वेळ उगाच बसलात. आपण हे अगोदर सांगून निघून देखील जाऊ शकला असता.

श्री.अमित झनक : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य मी आपल्याला माहितीचा मुद्दा मांडण्याची अनुमती देणार नाही. माहितीच्या मुद्दयाद्वारे आपण कोणत्या घटनेकडे लक्ष वेधू इच्छिता?... ठीक आहे आपण बोलावे.

## माहितीचा मुद्दा

श्री.अमित झनक : अध्यक्ष महोदय, विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती मागच्या ४ तारखेपासून जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अमरावती येथे उपोषणाकरिता बसलेली आहे. त्यांच्या शासनाकडून माफक अपेक्षा आहेत. सन २००६ ते डिसेंबर, २०१३ या कालावधीत .....

**तालिका सभाध्यक्ष** : ठीक आहे. त्यांच्या ज्या काही मागण्या आहेत तेथे शासनाने लक्ष द्यावे, एवढेच म्हणा आपल्याला डिटेल सांगता येणार नाही.

श्री.विक्रमसिंह सावंत : अध्यक्ष महोदय, ....

**तालिका सभाध्यक्ष** : आपले काय म्हणणे आहे?

श्री.विक्रमसिंह सावंत : अध्यक्ष महोदय, माझा कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत माहितीचा मुद्दा आहे. माझ्या मतदारसंघातील उमदी परिसर येथे अनेक दिवसांपासून ...(अडथळा)...

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, असे ठरले होते की, लक्षवेधी सूचनेवरील चर्चा संपल्यानंतर अर्धा तास चर्चा घ्यायच्या.

**तालिका सभाध्यक्ष** : होय. मी आता तिच सुरु करणार आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, माझी अर्धा तास चर्चेची सूचना आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : मी त्यांना अर्धा तास चर्चेची सूचना मांडण्याची अनुमती दिलेली नाही. त्यांनी पत्र दिले होते. त्यांना माहितीचा मुद्दा मांडायचा आहे. सन्माननीय सदस्य श्री. अमित झनक जुने आहेत. मला माहीत होते की, ते माहितीचा मुद्दा उपस्थित करणार. सन्माननीय सदस्य आपला माहितीचा मुद्दा काय आहे?

श्री.विक्रमसिंह सावंत : अध्यक्ष महोदय, कायदा व सुव्यवस्थेच्या विषयाबाबत माहितीचा मुद्दा उपस्थित करीत असताना मी सभागृहाच्या समोर काही बाबी ...

**तालिका सभाध्यक्ष** : आता म.वि.स. नियम २९३ अन्वयेची चर्चा होणार नाही. तो विषय संपलेला आहे.

श्री.विक्रमसिंह सावंत : अध्यक्ष महोदय, आपण माझा मुद्दा ऐकून घ्यावा.

**तालिका सभाध्यक्ष** : आता म.वि.स. नियम २९३ अन्वयेची चर्चा होणार नाही. मग मी आपले म्हणणे कसे ऐकून घेणार?

श्री.विक्रमसिंह सावंत : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : आपण कायदा व सुव्यवस्थेचा उल्लेख केला. आपल्याला माहितीच्या मुद्दयाद्वारे काय मांडावयाचे आहे?

**माहितीचा मुद्दा**

श्री.विक्रमसिंह सावंत : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील उमदी गावात किरकोळ कारणावरुन तलवारी नाचवून त्याच बरोबर ...

**तालिका सभाध्यक्ष** : ही कधीची घटना आहे?

श्री.विक्रमसिंह सावंत : अध्यक्ष महोदय, परवा रात्री साडेअकरा वाजताची ही गोष्ट आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : हा तेथील लोकल लॉ अँड ऑर्डरचा किरकोळ विषय आहे. हा विषय माहितीचा मुद्दयाद्वारे मांडायचा होऊ शकत नाही. राज्याशी संबंधित काही धोरणात्मक विषय असेल तर तो माहितीच्या मुद्दयांतर्गत मांडावा. आपल्या मतदारसंघात अशी घटना घडली तर लगेच माहितीचा मुद्दा मांडायचा नसतो.

**लक्षवेधी सूचनेवरील प्रश्न विचारण्यासाठी मर्यादा निश्चित करणे**

श्री.प्रकाश सोळंके : अध्यक्ष महोदय, दोन दिवसांपासून आपण पाहत आहोत की, प्रश्नोत्तराच्या तासामध्ये २ नाही तर ३ प्रश्नांवर चर्चा होते. लक्षवेधी सूचनेवर ५-५ तास चर्चा होते. या संदर्भात माझी आपल्याला विनंती आहे की, विरोधी पक्षासह सर्व नेत्यांना एकत्र बसवून या बाबतीत काही ना काही धोरण ठरले पाहिजे. किमान १० ते १५ प्रश्न झाले पाहिजेत. लक्षवेधी सूचनेवरील चर्चा एक तासाच्या आत संपली पाहिजे. ही चर्चा पाहिली तर, प्रत्येक लक्षवेधी सूचनेवर बोलण्याकरिता प्रत्येक आमदार महोदय उभे राहतात व माझ्या मतदारसंघात असे झाले असे सांगतो. हे जे काही चाललेले आहे तो वेळेचा अपव्यय आहे. या बाबतीत माझी आपल्याला विनंती आहे की, सर्व नेत्यांना एकत्रित घेऊन आपण या बाबतीत निश्चित कालमर्यादा ठरवावी.

**तालिका सभाध्यक्ष** : आपण मघाशी सभागृहात उपस्थित नव्हता. मी त्यावेळेस सन्माननीय सदस्यांच्या एक गोष्ट लक्षात आणून दिली की, लक्षवेधी सूचनेवरील चर्चेकरिता इतका वेळ नसतो. तुम्ही लक्षवेधी सूचनेवरील चर्चेमध्ये

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष** ...

भाषण करता व प्रश्न विचारता. ठीक आहे. आज आपल्या समोर दुसरे काही काम नव्हते. बऱ्याच दिवसांनी कामकाजपत्रिकेवर दर्शविल्याप्रमाणे अर्धा तास चर्चा होणार आहेत.

तुम्ही म्हणता त्या गोष्टीवर सर्व सभागृहाने नक्की लक्ष केंद्रित केले पाहिजे. सभागृहात जास्तीत जास्त चर्चा विधेयकावर झाली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार माझ्या मताशी १०० टक्के सहमत असतील. मघाशी सभागृहात... आता तो विषय नाही परंतु, ज्यावेळेस काही एका विशिष्ट विषयावर ॲकेडेमिक डिस्कशन सुरु होते त्यावेळेस सुध्दा सभागृहाने अशा विषयावर अतिशय गांभीर्याने लक्ष घातले पाहिजे.

नंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष (श्री.भास्कर जाधव)...**

हे विषय गांभीर्याने ऐकले पाहिजे, असे विषय वारंवार चर्चेला येत नाहीत. पूर्वी खेळीमेळीने सभागृहात चर्चा होत असत, वक्तव्ये करण्यात येत असत. ती आता करण्यात येत नाही, असा शब्द प्रयोग मी करणार नाही. परंतु तशा प्रकारची वक्तव्ये व चर्चा झाल्या शिवाय नवीन सन्माननीय सदस्यांना अनुभव मिळणार नाही. तो कोणत्याही पुस्तकातून मिळवता येणार नाही. सभागृहाच्या माध्यमातूनच ते अनुभव नवीन सन्माननीय सदस्यांना प्राप्त होतील. त्याचा फायदा राज्याच्या जडणघडणीला होईल. सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, अशा पद्धतीने कायद्याच्या संदर्भात दोन्ही बाजूंची चर्चा होते व एकमेकांना चर्चेने उत्तर दिले जाते. पर्यायाने चर्चेने एकमेकांवर मात करण्याच्या प्रयत्न कायद्याने केला जातो. अशा चर्चेला अधिक प्राधान्य दिले पाहिजे. अशा चर्चा ऐकल्या पाहिजे. त्यातून फार मोठे ज्ञान प्राप्त होते.

सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश सोळंके म्हटल्याप्रमाणे काही विषयांवर एकत्रित बसून निर्णय करण्याची आवश्यकता आहे. मागील वेळी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सभागृहामध्ये श्रद्धांजलीचा ठराव मांडल्यानंतर गट नेत्यांच्या भाषणानंतर अनेक सन्माननीय सदस्य भाषण करीत असत. आता माननीय महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष श्रद्धांजलीचा ठराव मांडतील व सभागृहाचे सन्माननीय सदस्य त्यास पाठिंबा देतील, असा निर्णय घेण्यात आला. अशा पद्धतीचे काही निर्णय घ्यावे लागतात. मी सन्माननीय सदस्य यांनी मांडलेला विषय माननीय अध्यक्ष यांच्यापर्यंत पोहोचवतो.

श्री.प्रकाश सोळंके : अध्यक्ष महोदय, आपण आताच सांगितले की, विधेयकावर चर्चा झाली पाहिजे. मागील २-३ अधिवेशनामध्ये विधेयकावर चर्चा झाली नाही. विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य गोंधळ करतात व त्या गोंधळामध्ये सरकार विधेयके मंजूर करुन घेते. नवीन सन्माननीय सदस्य यांना विधेयकावर बोलण्याचे केव्हा शिकावे ? विधेयक काय असते, कशासाठी असते, हे त्यांना चर्चा झाली नाही तर कसे समजेल ? या विषयाच्या संदर्भात पुढील आठवड्यात बैठक घेऊन सर्वांना आमंत्रित करण्यात यावे. नवीन सन्माननीय सदस्यांना सर्व विषयांवर बोलता आले पाहिजे. याकरिता आपण पुढाकार घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

अमुद्रित प्रत

**तालिका सभाध्यक्ष :** ठीक आहे. मी व सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार या विषयात पुढाकार घेऊ. मागील वेळी अशाच पद्धतीने विरोधी पक्षाने सभात्याग केला होता. त्यावेळी सभागृहामध्ये केवळ सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य उपस्थित होते. त्यावेळी विधेयके मंजुरीसाठी मांडण्यात असताना मी सांगितले होते की, सभागृहात सन्माननीय सदस्य नसले तरी मंत्री महोदय यांनी विधेयकाचा अर्थ, त्याचा उद्देश व कारणे विषद करावीत. त्यानंतरच मंजुरी मिळेल असे मी तालिका सभाध्यक्षाच्या खुर्चीवर बसून मी बोललो होतो. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश सोळंके सभागृहामध्ये उपस्थित होते. मी आजचा विषय माननीय विधानसभा अध्यक्ष यांचेकडे मांडतो.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मी या विषयाच्या संदर्भात बैठक घेण्यासाठी विनंती पत्र देणार आहे. मी दिनांक व वेळ नमूद करुन घेतली आहे. तालिका सभाध्यक्ष यांनी दिलेले आश्वासन हे आश्वासन समितीकडे नियमानुसार जाते. त्यामुळे यासंदर्भात बैठक घ्यावीच लागणार आहे.

----------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांच्या पद भरती बाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे

**मु. शी.** : अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांच्या पद भरती बाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे यासंबंधी श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम ९४ अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

“अनुसूचित जमातीची वर्ग १ ते ४ पर्यंतची प्रलंबित विशेष पदभरती प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह इतर प्राधिकरणांनी जाहीराती देवून पूर्ण करण्याची आवश्यकता असणे, न्यायालयीन आदेशाप्रमाणे व दिनांक २१ डिसेंबर, २०१९ च्या शासन निर्णयानुसार शासकीय तसेच खाजगी अनुदानित संस्थातील पदभरती प्रक्रिया पूर्ण करण्याची गरज असणे, मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्रमांक ८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला असणे, अद्याप या शासन निर्णयाची अंमलबजावणी झालेली नसणे, परिणामी अनुसूचित जमातीतील बेरोजगार उमेदवारांमध्ये तीव्र असंतोष पसरलेला असल्याने सदर रखडलेली पदभरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची शासनाने करावयाची कार्यवाही.”

श्री. सुधीर मुनगंटीवार...

अध्यक्ष महोदय, हा अतिशय महत्त्वचा विषय आहे. माझी विनंती आहे की, आदिवासी समाजाचे नेतृत्व करणारे सन्माननीय सदस्य श्री.संदीप धुर्वे या चर्चेत भाग घेणार आहेत, त्यांना अनुमती देण्यात यावी.

**तालिका सभाध्यक्ष :** ठीक आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, हे अमृत महोत्सवी वर्ष आहे, याची आपणास जाणीव आहे. हजारो लाखो शहिदांनी प्राणांची आहुती देऊन स्वातंत्र्याचा मंगल कलश भारतातील जनतेला प्राप्त करुन दिला. एकच संकल्प होता की, प्रत्येक जात, समुह, धर्मातील लोकांना जगण्याचा अधिकार आहे. एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की, माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर देखील मंत्रालयातील काही झारीतील शुक्राचार्य हे आदिवासी बांधवांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवत आहेत. आदिवासी बांधव मुख्य प्रवाहात यावे याकरिता विश्वरत्न, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात त्यांना संरक्षण दिले आहे.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार…..

माननीय सर्वोच्च न्यायालयाने अतिशय स्पष्ट शब्दात सांगितले आहे की, आदिवासी विभागातील १२ हजार ५०० पदे भरण्यासाठी विशेष भरती मोहिम घेण्यात यावी. त्या अनुषंगाने राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी शासन निर्णय देखील निर्गमित केला. मी आज तारीख, नंबर याच्या खोलात जाणार नाही. आशय, भाव आणि भावनावर सरकारकडून उत्तराची अपेक्षा करीत आहे.

अध्यक्ष महोदय, आज आपण मुंबईमध्ये प्रगतीच्या गोष्टी करीत आहोत. परंतु आदिवासी बांधवाच्या नावे बिल्डर कंपनी असल्याचे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपासून बोरिवलीपर्यंत आणि चर्चगेट स्टेशनपासून मुंबईतील शेवटच्या टोकापर्यंत एक तरी बोर्ड आहे काय? आदिवासी बांधवानी फक्त भामरागड, चंद्रपूर, राजूरा, गडचिरोली व मेळघाटमध्ये राहायचे, असे या सरकारचे धोरण आहे काय? माननीय सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश दिले. परंतु त्या अनुषंगाने आपल्या सरकारने काय कार्यवाही केली?

अध्यक्ष महोदय, अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनावर राज्य शासन १ लाख ४४ कोटी रुपये खर्च करीत आहे. त्यामुळे आपल्याकडून एवढीच अपेक्षा आहे की, "राष्ट्र हित में करेंगे काम, काम के लेंगे पूरे दाम." आता काय होत आहे? "हम राष्ट्र हित में कुछ नहीं करेंगे काम, मगर वसूल करेंगे जनता के पैसों से पूरा का पूरा दाम." आपण राज्यमंत्री असल्यामुळे आम्हाला आपल्याकडून अपेक्षा आहेत. पद भरतीसंदर्भात एक वेळा नाही तर अनेक वेळा पत्रव्यवहार केलेला आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आपण १२ हजार ५०० पदे भरण्यासंदर्भात राज्य शासनाने शासन निर्णय देखील निर्गमित केला. तरी देखील पद भरती करण्यात आलेली नाही. आदिवासी समाज विकासापासून वंचित आहे. त्यांना देखील जगण्याचा अधिकार आहे. मी माझ्याजवळचे सर्व कागदपत्रे आपल्याकडे सादर करतो. परंतु सदर पदे लवकरात लवकर भरावीत, अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार…..

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.संदीप धुर्वे आदिवासी समाजाबाबतची त्यांची भूमिका ते मांडणार आहेत. आदिवासी समाजाच्या आयुष्यामध्ये असलेला अंधार हे शासन दूर करणार आहे की नाही? आदिवासी समाजातील बांधवामध्ये किती शक्ती असते याचा मी अनुभव घेतलेला आहे. मी मिशन शौर्य कार्यक्रम राबविलेला आहे. आदिवासी समाजातील १८ ते २० वर्षांचे मूल कधीही विमानामध्ये बसले नव्हते. परंतु त्यांनी फक्त ८ महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर २९ हजार फुटांच्या एव्हरेस्टवर चढले आहेत. जो आदिवासी समुह प्रामाणिक आहे, सात्त्विक आहे, त्यांना मुख्यप्रवाहामध्ये आणण्यासाठी सर्व पदांची भरती करण्यात यावी, एवढीच माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या पक्षाचा जाहीरनामा सोबत आणलेला आहे. यामध्ये स्पष्ट नमूद केले आहे की, आमचे सरकार आल्यानंतर मोठ्या प्रमाणावर पदांची भरती करण्यात येईल. रिक्त पदांच्या बाबतीत माननीय न्यायालयाने देखील ताशेरे ओढलेले आहेत. रिक्त पदांमुळे राज्यातील सर्व कारभार विस्कळीत झालेला आहे. कापूस कोड्यांच्या गोष्टीसारखे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या १५ हजार ५११ पदे भरण्यासाठी शासनाने फक्त मान्यता दिलेली आहे. “चिऊताई चिऊताई दार उघड” परंतु दार काही उघडल्याच जात नाही. पद भरती संदर्भात राज्य शासन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे प्रस्ताव पाठवित आहे परंतु महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा घेण्यास तयार नाही. मानवाधिकार आयोगावरुन माननीय न्यायालयाने राज्य शासनाचे कान उपटून रिक्त असलेली पदे भरण्यास सांगितले. राज्यातील १६ हजार उमेदवार अनुकंपातून नियुक्तीच्या प्रतिक्षेत आहेत. त्यामुळे अनुकंपातील व आदिवासी समाजातील १२ हजार ५०० पदे भरण्यासाठी राज्य शासनाने वेगाने कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर पदे भरुन त्यांना न्याय देणे आवश्यक आहे. आदिवासी समाजाची शुरता, प्रामाणिकता, सात्त्विकता या सर्व बाबींचा आपण सन्मान करु शकलो नाही तर आपल्याला लोकप्रतिनिधी म्हणून घेण्याचा अधिकार नाही.

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार…..

अध्यक्ष महोदय, राज्यातील जंगल कोठे आहे? जेथे जास्त आदिवासी बांधव आहेत, त्याच ठिकाणी मोठ्या प्रमाणावर जंगले आहेत. पर्यावरणामध्ये ईश्वाराचा अंश पाहण्याच्या आदिवासी समाजाच्या स्वभावामुळे ही जंगले जिवंत राहिलेली आहेत. अन्यथा हा मानवी समाज तेंव्हाच नष्ट झाला असता. त्या आदिवासी बांधवांना न्याय देण्यासाठी मी विनंती करीत आहे. सदर पदे भरण्यास कोणते अधिकारी/कर्मचारी आडवे येत आहेत? अधिकाऱ्यांच्या फायद्याची फाईल २४ तासाच्या आत निकाली निघते. कारण हे मी अनुभवले आहे. आदिवासी बांधवाची फाईल असेल तर त्या फाईलमधील काना, मात्रा पाहिला जातो आणि जास्तीत जास्त त्रुटी काढून ती फाईल पुन्हा परत पाठविली जाते. मंत्री महोदयांनी सांगितले की, मला तांदूळ मोजून पाहिजे. त्यावर अधिकारी लिहून पाठवितात, ग्रॅमने मोजून पाठवून की दाणे मोजून पाठवू?

यानंतर श्री.कुलकर्णी……..

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार....

आपण आता २१ व्या शतकात आहोत. हे जग पुढे जात आहे. या अमृतमहोत्सवी वर्षात जर आपण आदिवासी बांधवांना मुख्य प्रवाहात आणू शकलो नाही तर काळ आपल्याला कधीच माफ करणार नाही. माननीय मंत्री हे अतिशय चांगले काम करीत आहेत. त्यांच्याबद्दल माझ्या मनात आदर आहे. माननीय मंत्री श्री. गुलाबराव पाटील हे देखील चांगले काम करीत आहेत. जनसेवेची संधी आपणास दिली आहे. या संधीचा आपण उपयोग करावा. यासाठी दोन, तीन बैठका घ्याव्यात. एखाद्या बैठकीमध्ये आम्हालाही निमंत्रण द्यावे. मंत्री म्हणून काही शब्द आपणास वापरता येणार नाही. परंतु आमदार म्हणून आम्हाला काही अतिरिक्त शब्द वापरता येतात. आमच्याकडील शब्दकोशामध्ये अधिक पाने आहेत. त्या शब्दांचा उपयोग करुन काही लोक सुधारणार असतील तर आम्ही त्या शब्दांचा उपयोग करु. तसेच शासनाचा नस्ती निपटारा कायदा आहे. त्यानुसारही मंत्री महोदय कारवाई करतील. हा कायदा मी माननीय मंत्री श्री. दादाजी भुसे यांच्याकरिता वापरणार आहे. त्या कायद्याचा उपयोग करावा.

डॉ. संदीप धुर्वे : अध्यक्ष महोदय, अर्धा-तास चर्चेवर बोलण्याची आपण मला संधी दिल्याबद्दल मी आभार व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, सन २००४ ते सन २००९ या कालावधीत मी आमदार म्हणून निवडून आलो होतो. त्यावेळेस मी या सभागृहामध्ये आदिवासी समाजाचे प्रश्न मांडले होते. त्यावेळेस हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे कारण सांगून कार्यवाही झाली नाही. मध्यंतरी मी १० वर्षे सदस्य नव्हतो. तरीही सभागृहाच्या बाहेर मी या मुद्याचा पाठपुरावा करीत होतो. दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी माननीय सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊन सांगितले आहे की, राज्य शासनाने १२ हजार ५०० बोगस आदिवासी कर्मचारी ठरविले आहेत. त्यांना तात्काळ नोकरीवरून काढून त्याठिकाणी खऱ्या आदिवासी समाजातील उमेदवारांची नोकरभरती करावी. तरीही मंत्रालयातील काही भ्रष्ट अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या संगनमताने ही पदभरती होत नाही. ही अतिशय खेदाची आणि गंभीर बाब आहे. मी आमदार झाल्यापासून प्रत्येक अधिवेशनामध्ये

अप्रकाशित प्रत

डॉ. संदीप धुर्वे ......

हा मुद्दा मांडत आहे. कोरोना काळ सुरु होण्यापूर्वीही मी या विषयावर चर्चा केली होती. त्यावेळेस यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. मागील हिवाळी अधिवेशनातही या विषयावर बोललो होतो. तरी कोणतीही कार्यवाही केली गेली नाही. दिनांक २ मार्च, २०२१ रोजी मी तारांकित प्रश्न मांडला होता. त्यावर राज्याच्या माननीय मुख्यमंत्री यांनी लेखी उत्तर दिले की, २०२१ अखेरपर्यंत बोगस भरती झालेले १२ हजार ५०० पदे भरली जातील. परंतु त्यावरही कोणतीही कार्यवाही झाली नाही. या संघटीत भ्रष्टाचाराचा फटका गरीब, होतकरु आदिवासी लोकांना होत आहे. याचा त्यांना त्रास होत आहे. आदिवासी समाजामध्ये बेरोजगारी वाढली आहे. आदिवासी समाजाकडे लक्ष देण्यासाठी कोणीही नाही. त्यांची मानसिकता बिघडत आहे. उद्या जर त्या युवकांनी हातामध्ये बंदुका घेतल्या आणि ते नक्षली झाले तर यास हे राज्य सरकार जबाबदार राहील.

अध्यक्ष महोदय, आदिवासी समाजातील अनेक युवक डॉक्टर आहेत. मी सन १९९१ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातून पहिला आदिवासी डॉक्टर झालो होतो. त्यानंतरच्या काळात अनेक तरुण पदवीधर, डॉक्टर, प्राध्यापक, अभियंता झालेले आहेत. हे सर्व लोक नोकरीसाठी आता भटकत आहेत. तुटपुंज्या पगारावर ते बाहेर जात आहेत. काहीजण कंत्राटी पद्धतीवर काम करीत आहेत. बोगस आदिवासी कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला आहे. परंतु ते भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या सहकार्याने आदिवासी समाजावर अन्याय करीत आहेत.

असुधारित प्रत

यानंतर श्री. चौधरी....

डॉ.संदीप धुर्वे.....

अध्यक्ष महोदय, मी स्वत: आदिवासी डॉक्टर आणि आमदार आहे. आदिवासी होतकरु उमेदवारांसाठी मी स्वत: एम्प्लॉयमेंट एक्सचेंज डेटा एकत्रित केला आहे. त्याची आकडेवारी मी या निमित्ताने आपणास सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, एम.बी.बी.एस., एम.एस., एम.डी. झालेले ५५ आदिवासी डॉक्टर्स राज्यामध्ये असून सरकारी नोकरी मिळत नसल्यामुळे ते खासगी ठिकाणी किंवा कंत्राटी तत्त्वावर नोकरी करीत आहेत. तसेच एम.बी.बी.एस. आणि बी.ए.एम.एस. झालेले २७४ आदिवासी डॉक्टर्स कंत्राटी तत्त्वावर काम करीत आहेत. बी.ई., बी.टेक., डिप्लोमा पास असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या २ हजार ५३४ असून ते नोकरीसाठी वणवण भटकत आहेत. तसेच नेट-सेट परीक्षा उत्तीर्ण असलेले १७९ आदिवासी उमेदवारही नोकरीविना आहेत. याशिवाय कला, वाणिज्य, कृषी पदवीधर व पदव्युत्तर पदवीधरांची संख्या सुमारे १५ हजारांच्या वर आहे. परंतु या सर्वांचे दुर्भाग्य असे आहे की, सध्या सेवेमध्ये असलेल्या १२ हजार ५०० आदिवासींना सर्वोच्च न्यायालयाने बोगस ठरवून देखील त्यांच्या जागी या उमेदवारांना नोकरी मिळत नाही. खऱ्या आदिवासी उमेदवारांवरील हा खूप मोठा अन्याय आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यामध्ये असे कधीपर्यंत चालणार आहे ? झारखंड, छत्तीसगड, गुजरात आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये विशेष मोहिम राबवून बोगस आदिवासींना सेवेमधून काढून अस्सल आदिवासींना सेवेमध्ये सामावून घेतले आहे. अशी विशेष कार्यवाही आपल्याकडे का केली जात नाही ? या निमित्ताने माझी मागणी आहे की, अशा प्रकारे विशेष मोहिम राबवून बोगस आदिवासींवर कारवाई केली पाहिजे. याबाबत केंद्र सरकारने देखील महाराष्ट्र शासनाला वारंवार सूचना केलेल्या आहेत. मात्र, त्याबाबत कार्यवाही होत नाही ही बाब अत्यंत अन्यायकारक आहे. आम्ही या ठिकाणी किती वेळा भाषणे द्यायची, किती वेळा तारांकित प्रश्न उपस्थित करायचे हा खरा प्रश्न आहे. कारण एवढे करुनही सरकारला पाझर फुटत नाही. यावरुन असे दिसते की, आदिवासींचा कोणी वालीच राहिलेला नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले की,

असुधारित प्रत

डॉ.संदीप धुर्वे.....

प्रत्येक पक्षाच्या जाहीरनाम्यामध्ये सांगितलेले आहे की, "आम्ही आदिवासी विद्यार्थ्यांची भरती करु."  त्यातील तीन पक्ष सध्या सत्तेवर आहेत.  त्यामुळे किमान जाहीरनाम्यामध्ये दिलेले आश्वासन तरी पूर्ण केले पाहिजे.  परंतु तेही होताना दिसत नाही.

अध्यक्ष महोदय, सर्वोच्च न्यायालयाने बोगस ठरविलेल्या १२ हजार ५०० आदिवासींपैकी ५३२ बोगस आदिवासी अधिकारी / कर्मचारी आजही मंत्रालयात काम करीत आहेत.  यातील खरे कलाकार तेच आहेत.  ते यासंदर्भातील कुठलीही फाईल पुढे जाऊ देत नाहीत.

अध्यक्ष महोदय, अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा उप सचिव पदी कार्यरत असलेले खरे ६ आदिवासी अधिकारी आहेत.  परंतु त्यांना आय.ए.ए. केडर दिले जात नाही.  त्यांना आय.ए.एस. केडर दिले पाहिजे अशीही या निमित्ताने माझी विनंती आहे.  तसेच बोगस आदिवासींना सेवेतून कमी करण्यासाठी या सरकारने विशेष मोहिम राबविली पाहिजे व बोगस १२ हजार ५०० आदिवासींच्या जागी अस्सल आदिवासी उमेदवारांची भरती करुन त्यांना न्याय दिला पाहिजे.

असुधारित प्रत

श्री.दत्तात्रय भरणे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार व सन्माननीय सदस्य डॉ.संदीप धुर्वे यांनी अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून या ठिकाणी अनेक सूचना केल्या व अडचणीही मांडल्या आहेत.

सन्माननीय सदस्य डॉ.संदीप धुर्वे यांनी सांगितल्याप्रमाणे जगदीश बहिरा आणि इतर यांनी दाखल केलेल्या सिव्हिल अपील क्रमांक १६२८/२०१५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी निर्णय दिला होता की, "ज्या व्यक्तींचे अनुसूचित जातीचे दावे अवैध ठरले आहेत त्या व्यक्तींना शासकीय सेवेमध्ये संरक्षण देता येणार नाही. घटनेतील तरतूद लक्षात घेता त्यांना संरक्षण देणे ही बाब घटनाविरोधी आहे." माननीय उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या याचिका क्रमांक ३१४०/२०१८ मध्ये निर्णय देण्यात आला की, "ज्या कर्मचाऱ्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे अशा ठिकाणच्या रिक्त पदी ज्यांचे जात प्रमाणपत्र वैध आहे त्यांची दिनांक १ फेब्रुवारी, २०२० पर्यंत ताबडतोब नेमणूक करावी." माननीय सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला व अनुसूचित जमातीची रिक्त पदे कालबध्द कार्यक्रम आखून ताबडतोब भरावित, असे आदेश सर्व विभागांना देण्यात आले.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. दत्तात्रय भरणे...

सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी रिक्त पदांच्या सांगितलेल्या आकड्यांमध्ये कदाचित थोडी तफावत असेल. पण आज राज्यामध्ये शासनाचे २८ ते ३२ विभाग कार्यरत आहेत. त्यामध्ये अनुसूचित जमातींसाठी साधारणत: ५५,३१९ पदे राखीव होतील. ते कमी जास्त असू शकतात. त्यापैकी ४४००१ पदे भरलेली असून त्यापैकी ११४३५ पदे रिक्त आहेत. आज मी या सभागृहाला आणि सर्व सन्माननीय सदस्यांना आश्वासित करतो की, ही रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी शासन विशेष भरती मोहीम राबविल. तसेच या विभागात जे सन्माननीय सदस्य येतात त्या सर्वांची एक संयुक्त बैठक शासन तातडीने घेईल. त्यातूनही आपल्याला काही अडचणी किंवा प्रश्न लक्षात येतील व त्यामधून आपल्याला योग्य तो निर्णय घेता येईल. दुसरा मुद्दा सन्माननीय सदस्य डॉ. संदिप धुर्वे यांनी अनुसूचित जमातीच्या कार्यरत पदांबाबत उपस्थित केला होता. साधारणत: ४४००१ इतक्या कर्मचाऱ्यांपैकी ३५५९३ इतक्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या जातीचे वैधता प्रमाणपत्रे सादर केली आहेत. उर्वरित ८४०८ कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्रांबाबत कार्यवाही सुरू आहे. त्यांनी अद्याप ही प्रमाणपत्रे सादर केलेली नाहीत. त्यांना यासाठी आपण सुमारे ३ महिन्यांचा कालावधी दिलेला आहे. अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या कर्मचाऱ्यांची आणि ते अधिसंख्य ठरलेल्यांची संख्या ३२१४ इतकी आहे. त्यातील सरळसेवेची १९२१ इतकी अनुसूचित जमातीची पदे आहेत. उर्वरित १२९३ पदे ही पदोन्नतीने भरावयाची आहेत. आजपर्यंतचा आढावा घेतला तर आपल्या सर्वांना माहिती आहे की, सन २०१९ कोविडचे संकट आणि कोर्टाच्या काही निर्णयांमुळे आपल्याला ही नोकर भरती करता आली नाही. परंतु आता सरळसेवेपैकी ३९४ पदांचे मागणीपत्र एमपीएससीकडे सादर केलेले आहे. त्यानुसार त्यातील सुमारे ८२ पदे भरण्यात आली आहेत. दिनांक २१.१२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील अनुसूचित जमातीची कार्यवाही सुरू केली होती. पण मघाशी मी आपल्याला कोविडच्या संकटाचे उदाहरण दिले आहे. तसेच ज्यांचे जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरले ते उमेदवार कोर्टामध्ये गेल्यामुळे तशा प्रकरणांमध्ये थोडा विलंब झाला आहे. परंतु आता आपण यासाठी विशेष भरती मोहीम राबविणार

असुधारित प्रत

श्री. दत्तात्रय भरणे...

आहोत आणि याबाबत मी माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा केलेली आहे आणि त्यांनी देखील आपण सभागृहाला तसे आश्वासित करावे, अशा सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार आपण ही विशेष भरती मोहीम राबविणार आहोत.

अध्यक्ष महोदय, जे कर्मचारी अधिसंख्य पदावर वर्ग झाले आहेत त्या कर्मचाऱ्यांचा निर्णय घेण्यासाठी दिनांक १५.६.२०२० रोजी माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री. छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली आहे. त्या समितीचा जेव्हा अहवाल येईल त्या अहवालानुसार आपण त्यासंबंधी पुढील कार्यवाही करु.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी एमपीएससीच्या बाबतीत एक प्रश्न उपस्थित केला होता. त्याबाबत मी सभागृहाला अवगत व्हावे म्हणून सांगणार आहे. एमपीएससीच्या बाबतीत गेल्या २-३ वर्षात विद्यार्थ्यांचा फार मोठ्या प्रमाणावर रोष होता. परंतु कोरोनाच्या संकटामुळे आपल्याला जाहिराती देता येत नव्हत्या किंवा भरती करता येत नव्हती. परंतु आता शासनाने दिनांक ३०.७.२०२१ रोजी निर्णय घेतला की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील रिक्त पदे ही ताबडतोब व १०० टक्के भरावीत. मागच्या काळातील विषय लक्षात घेतला तर आपण साधारणपणे एका वर्षात ३ हजार पदांची जाहिरात देत होतो आणि त्यापैकी ६० ते ७० जाहिराती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिल्या जात होत्या.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. दत्तात्रय भरणे...

सर्व सन्माननीय सदस्यांना मी माहितीसाठी सांगतो की, ऑक्टोबर, २०२१ मध्ये म्हणजे सहा महिन्यामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून ६२०० अधिक १७०० अशा साधारणत: एकूण ७९०० पदांसाठी ३०० जाहिरात दिलेल्या आहेत. सन २०१९ पूर्वी मराठा आरक्षण किंवा न्यायालयाच्या अडचणीमुळे काही पदांसाठीच्या मुलाखती राहिल्या त्या मुलाखती घेण्यात येतील व निश्चितपणे याबाबतीत शासन सकारात्मक आहे. शासनाला माहीत आहे की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षेसाठी ग्रामीण भागातील हजारो लाखो मुले शहरात येऊन अभ्यास करतात. त्यांची आर्थिक परिस्थिती खूप अडचणीची असते. त्यांचे आई-वडिल कुठे तरी कामावर जाऊन किंवा त्यांच्या घरातील सोने मोडून माझा मुलगा किंवा माझी मुलगी अधिकारी व्हावेत अशी मागच्या दोन ते तीन वर्षात अपेक्षा होती. राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी सांगितले की, रिक्त असणाऱ्या १५००० जागा ताबडतोब भरण्यात येतील. त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. येणाऱ्या एका वर्षात आम्ही शासनाच्या वतीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विद्यार्थ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करु.

श्री. सुनिल भुसारा : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार आणि सन्माननीय सदस्य डॉ. संदिप धुर्वे यांनी आजच्या चर्चेला अनुसरुन बोगस आदिवासींचा प्रश्न उपस्थित केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊन सुद्धा १२,५०० लोक अजूनही काम करीत आहेत असे चित्र दिसून येते. महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून आदिवासी समाजावर जो अन्याय झाला आहे तो अन्याय दूर करण्यासाठी आपण काही उपाययोजना करणार आहात काय ? त्याचबरोबर पद भरती करण्यासाठी आपण शासन निर्णय काढलेला आहे. त्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करीत असताना आपण सर्वजण मागच्या काळात कोरोनाच्या परिस्थितीला सामोरे गेले आहोत. मला वाटते की, आता आपण बऱ्याच बाबी नव्याने सुरु केल्या आहेत तर पद भरती सुद्धा आपण लवकरात लवकर करणार काय ?

असुधारित प्रत

श्री. दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, होय.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मला प्रश्न विचारायचा नाही तर माननीय मंत्री श्री. दत्तात्रय भरणे यांचे अभिनंदन करायचे आहे. त्यांनी साजेसे उत्तर दिले आहे. फार कमी लोक नावानुसार वागतात परंतु आपला आडनावच भरणे आहे त्यामुळे पद भरण्याची प्रक्रिया वेगाने होईल अशी अपेक्षा आहे. ११,४३५ पदे रिक्त आहेत त्यासाठी आपण सांगितले की, विशेष मोहीम करुन ही पदे भरण्यात येतील. तसेच बैठक घेण्याचे आपण आश्वासन दिले आहे. मी ते सर्व पुन्हा निश्चित करुन घेत आहे. याबाबत आमची एवढीच विनंती आहे की, आपण बैठक घेताना आम्हाला थोडी सोयीची होईल अशी तारीख द्या. ११,४३५ पदे भरण्याच्या दृष्टीने आम्हाला जे सहकार्य करता येईल ते करु. पुन्हा एकदा आम्ही तुमचे मनापासून अभिनंदन करतो.

श्री. दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, होय.

श्री. विकास कुंभारे : अध्यक्ष महोदय, माझा प्रश्न एवढाच आहे की, फक्त २२ जणांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आला होता. परंतु तरी तो निकाल संपूर्ण समाजाला लागू केला. हे चुकीचे आहे. वैयक्तिकपणे हा निकाल बऱ्याच लोकांना मिळाला आहे. परंतु २२ लोकांच्या बाबतीत लागलेला निकाल सर्व समाजाला आहे हे योग्य नाही. त्यामुळे आपल्याला आग्रहाची विनंती आहे की, आपण जे बोगस आदिवासी म्हणता त्यांची आपण अधिसंख्य पदावर नेमणूक केली आहे. याचा अर्थ त्यांना आदिवासी पदावरुन काढून टाकले आहे. त्या कर्मचाऱ्यांनी २० ते २५ वर्ष सेवा केली आहे. आता त्यांची जी ५ किंवा १० वर्षाची सेवा राहिली असेल तर त्यांना ती करु द्यावी, अशी मी आपल्याला आग्रहाची विनंती करतो.

श्री. दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, या संदर्भात माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली आहे. ती समिती जो निर्णय घेईल तो आपण मान्य करु. बैठकीसाठी सन्माननीय सदस्यांना देखील बोलावण्यात येईल.

यानंतर श्रीमती करंदीकर......

असुधारित प्रत

अर्धा तास चर्चा क्रमांक ३ बाबत

श्री. अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, हा पोयसर नदीच्या पुनर्विकासाचा मुद्दा आहे. या विषयाबाबत कोणते मंत्री महोदय उत्तर देणार आहेत ?

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. भास्कर जाधव )** : प्रतोद कोठे आहेत ? ठीक आहे. आपण बसावे. आपण संबंधित मंत्री महोदयांना सदनात बोलावू. एक तर अर्धा तास चर्चा लागत नाहीत. आता लागली आहे तर आपण ती लॅप्स होऊ देणार नाही. आपल्याला ऊर्जा मंत्री व नगर विकास मंत्री हवे आहेत ना. माननीय राज्य मंत्री यांच्याकडे ऊर्जा व नगर विकास ही दोन्ही खाती आहेत. मघाशी या ठिकाणी राज्य मंत्री उपस्थित होते. नगर विकास मंत्री यांना बोलवावे.

------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर- बल्लारपूर मार्गावर विसापूर गावानजिक बॉटनिकल गार्ड उभारण्याकरिता निधी उपलब्ध करुन देणे

**मु. शी.** : चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर- बल्लारपूर मार्गावर विसापूर गावानजिक बॉटनिकल गार्ड उभारण्याकरिता निधी उपलब्ध करुन देणे या संबंधी श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री. सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम ९४ अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"चंद्रपूर जिल्हयातील चंद्रपूर-बल्लारपूर मार्गावर विसापूर गावानजिक बंगलुरच्या धर्तीवर बॉटनिकल गार्डन उभारण्याचे काम सुरू असणे, राज्य शासनाच्या दिनांक १६ जून २०१५ च्या शासन निर्णयानुसार बॉटनिकल गार्डन उभारण्यात येणे, सदर प्रकल्पाची योजना राबविण्याकरिता राष्ट्रीय वनस्पती संशोधन संस्था लखनऊ या संस्थेची तांत्रिक कामात मदत झालेली असणे, फुलांचे निर्जलीकरण तंत्र व त्याबाबतचे प्रशिक्षण हे या संस्थेच्या सहभागाचा मुख्य भाग असणे, सायकॅड हाऊस, हर्बेरिअम, बीज संग्रहालय, बोन्साय गार्डन, कॅना गार्डन, बोगनवेलीया गार्डन इत्यादी घटकांचा समावेश करण्यात आला असणे, त्यामुळे चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी गरीब लोकांना जगण्याचे साधन निर्माण होणार असणे, तसेच वनविभागामार्फत रोपवन कामे, निरीक्षण पथ, जल व मृद संधारणाची कामे, वॉच टावर पूल, रस्ते, जलाशय, सुशोभीकरण, सिमेंट नाला बांध, ट्री हाऊस, इतर कामे प्रगतीपथावर असणे, निधी अभावी सदर बॉटनिकल गार्डनमधील अनेक कामे रखडली असणे, निसर्गवन आणि जैवविविधतेने संपन्न आणि समृध्द या क्षेत्राला व त्याच्या निसर्ग वैभवाला संजीवनी ठरणाऱ्या या प्रकल्पाच्या पूर्ण होण्यात अडसर निर्माण झालेली

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार .....

असणे, शासनाचे याकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर प्रकल्पासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन प्रकल्पाचे काम जलदगतीने पूर्ण करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अध्यक्ष महोदय, चंद्रपूर जिल्ह्याच्या महत्त्वाच्या विषयावर अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून मी आपले लक्ष वेधू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, एकविसाव्या शतकात विज्ञानाने बरीच प्रगती केलेली आहे. मात्र वनांची अधोगती मोठया प्रमाणात होत आहे. ' जंगलसे जीवन के मंगल तक, धन से तनको समाधान मिलता है, वन से मन को समाधान मिलता है.' राज्यात सुंदर बॉटनिकल गार्डनची स्थापना करण्याबाबत वन विभागाने दोन अडीच वर्षापूर्वी निर्णय घेतला. या निर्णयानुसार, १०८ हेक्टरमध्ये या संबंधी काम सुरु झाले. १४ हेक्टरमध्ये रिक्रीएशन झोन व ९४ हेक्टरमध्ये कन्झर्व्हेशन झोन तयार करण्यात आला. जैविक साठा जतन करणे, येणाऱ्या पिढीला वनाचे महत्त्व अवगत करणे, या ठिकाणी जैव विविधतेचे महत्त्व पटवून वनांचे संरक्षण व संवर्धन करणारी पिढी निर्माण करणे, त्यांची मानसिकता तयार करणे या दृष्टीने येथे अनेक निर्णय करण्यात आले. या निर्णयाला अनुरूप वन विभागाने अतिशय उत्तम काम केले आहे.

अध्यक्ष महोदय, या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना माझी विनंती आहे. येणाऱ्या महिन्याच्या कालावधीत अधिवेशन संपल्यानंतर स्वत: मंत्री महोदयांनी प्रत्यक्षपणे आमच्या सोबत भेट द्यावी. जैव विविधता हे या बॉटनिकल गार्डनचे मुख्य उद्दिष्ट आहे. येथे काही चार लोकांनी यायचे, आपले मनोरंजन करुन मनाचे समाधान करावे, एवढेच या गार्डचे उद्दिष्ट नाही. हे गार्डन म्हणजे एक चालते बोलते विद्यापीठ आहे. या उद्यानामुळे येणाऱ्या पिढीला जैव विविधतेचे महत्त्व समजणार आहे.

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार .....

अध्यक्ष महोदय, माझ्याकडे ही विस्तृत टिप्पणी असून त्या बाबत मी अधिक बोलत नाही. आपल्याकडे देखील ही टिप्पणी आहे. माझी स्पेसिफिक विनंती आहे की, या संबंधी बैठक घेतली पाहिजे. मी विशेष करुन आपले पुन्हा एकदा या निमित्ताने अभिनंदन करतो. संवेदनशिलता आपण दाखवत अनेकदा मदत दिलेली आहे. काही काही टाईम पास मंत्री असतात. त्यांचे आयुष्य देखील टाईम पास असते. मात्र आपण स्वत: या विषयाची माहिती घेतली. माहिती घेऊन या संबंधी योग्य तो निर्णय घेण्याबाबत भाव व्यक्त केला. मला मंत्री महोदयांकडून दोन उत्तरे हवी आहेत. आपण स्वत: येथे यावे, अशी माझी विनंती आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, या उद्यानाचे थोडे काम अर्धवट राहिले आहे. या करिता लवकरात लवकर मान्यता प्रदान करण्याकरिता आपण स्वत: जातीने लक्ष द्यावे, एवढीच माझी विनंती आहे.

असुधारित प्रत

श्री. दत्तात्रय भरणे (वने राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, चंद्रपूर जिल्ह्यापेक्षा आपल्या संपूर्ण राज्याला अभिमान वाटावा तसेच महाराष्ट्राच्या लौकिकामध्ये भर पाडणारे जागतिक दर्जाचे बॉटनिकल गार्डन होणार आहे. मला एवढेच सांगायचे आहे की, आपल्या संपूर्ण देशात अत्याधुनिक सुविधेने परिपूर्ण असणारे हे पहिलेच बॉटनिकल गार्डन असावे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.दत्तात्रय भरणे ...

त्यासाठी त्यांनी सांगितले की, साधारणत: सन २०१७-२०१८ किंवा सन २०२१-२०२२ मध्ये त्याला एकूण १२२ कोटी ५२ लाख रुपये इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता. या प्रकल्पास आणखी ८ कोटी ५८ लाख म्हणजे जुन्या आराखड्यानुसार ८ कोटी ५८ लाख इतक्या निधीची आवश्यकता आहे. या व्यतिरिक्त आपण काही गोष्टी ॲडिशनल वाढविल्या. आपल्या आराखड्याच्या बाहेरच्या काही गोष्टी लक्षात आल्या. अग्निशामकविषयक बाबीसाठी पुरवठा करणे, खडीकरणाद्वारे वाहनतळाचे बांधकाम करणे, भूमीगत संग्रहालय, विज्ञान केंद्र, उपहारगृह, प्रशासकीय भवन, एनडीआरआय इमारतीकरिता एचव्हीएसी यंत्रणा बसवणे अशा ३ बाबींकरिता आपण वाढीव ७ कोटी ७ लाख इतक्या निधीची आवश्यकता आहे असे म्हटलेले आहे. साधारण ८ व ७ मिळून एकूण १५ कोटी ६५ लाख रुपयांचा निधी यासाठी आवश्यक आहे. बैठक आपण निश्चित प्रकारे घेऊ. खरे तर हा काही तुमच्या तालुक्या, जिल्ह्याचा विषय नाही. शेवटी हा महाराष्ट्राचा विषय आहे. आमच्या वन विभागाच्या दृष्टिकोनातून हे एक खूप महत्वाचे काम आहे. यासाठी एकूण साधारणत: १५ कोटी ६५ लाख रुपये एवढा निधी लागणार आहे.

अध्यक्ष महोदय, मी सांगू इच्छितो की, वन विभागाच्या माध्यमातून इको टूरिझम या योजनेंतर्गत २०२१-२०२२ या आर्थिक वर्षामध्ये सुधारित अंदाज अंतर्गत मंजूर होणाऱ्या रक्कमेतून याला निश्चित प्रकारे निधी दिला जाईल. हा केवळ चंद्रपूरचा विषय नाही. यातून आमच्या वन विभागाला सुध्दा खूप महत्वाचे ... होणार आहे. त्यामुळे याबाबतीत जी बैठक आहे किंवा इपीसीचा जो विषय आहे, इपीसीची बैठक असेल त्या बाबतीत आपण सर्वजण अर्थमंत्री महोदयांच्या, मुख्यमंत्री महोदयांच्याही कानावर या गोष्टी घालू व त्याला जो निधी लागेल तो निधी कमी पडू दिला जाणार नाही. त्याबाबतीतील बैठक देखील आपण लवकरच लावू.... मी त्या भागात आलो नाही. मला देखील चंद्रपूरला यायचे आहे. आपण दौरा लवकर लावू. अधिवेशन संपल्यानंतर दौरा लावण्यात येईल.

........

असुधारित प्रत

## माहितीचा मुद्दा

श्री.रवि राणा : अध्यक्ष महोदय, माझा माहितीचा मुद्दा आहे. अमरावती जिल्ह्यामध्ये गेल्या ४-५ दिवसापासून अमरावती जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पाचे काही लाभार्थी त्या ठिकाणी उपोषणास बसले आहेत. त्यातील दोन लाभार्थ्यांची प्रकृती गंभीर आहे. निम्न पिढी प्रकल्प, चंद्रभागा, बोळणी नाला, शहापूर टाकडी, टाकडी कलाम, वाघाडी या सर्व प्रकल्पाचे ते लाभार्थी आहेत.

अध्यक्ष महोदय, दि. ६ जून, २००६ च्या जी.आर. प्रमाणे त्यांना न्याय मिळाला पाहिजे यासाठी ते मागणी करीत आहेत. १८९४ चे परिपत्रक आहे त्या परिपत्रकाच्या नियमानुसार त्यांना लाभ मिळाला तर ते उपोषण मागे घेण्यास तयार आहेत. संबंधित मंत्री महोदयांनी याची नोंद घेऊन अधिकाऱ्यांना उपोषणकर्त्यांना भेट द्यायला लावावी व त्यांचे उपोषण मागे कसे घेता येईल, याबाबत प्रयत्न करावेत, अशी मी विनंती करतो.

........

असुधारित प्रत

**पृ. शी.** : तीव्र पाणीटंचाई असलेल्या चिपळूण तालुक्यातील पिंपळी बुद्रुक, तिवरे, रिक्टोली, आकले, कादवड, दादर, कळकवणे या गावांनाही ग्रॅव्हीटीने पाणी देणेबाबत सर्व्हे होवून त्यांचा यादीत समावेश करण्यात येण्याबाबत

**मु. शी.** : तीव्र पाणीटंचाई असलेल्या चिपळूण तालुक्यातील पिंपळी बुद्रुक, तिवरे, रिक्टोली, आकले, कादवड, दादर, कळकवणे या गावांनाही ग्रॅव्हीटीने पाणी देणेबाबत सर्व्हे होवून त्यांचा यादीत समावेश करण्यात येण्याबाबत यासंबंधी श्री. भास्कर जाधव, वि.स.स., यांनी उपस्थित केलेली

श्री. भास्कर जाधव (गुहागर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम ९४ अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"रत्नागिरी जिल्हयातील कोळकेवाडी (ता. चिपळूण) धरणाच्या आऊटलेटमधून २४ ग्रामपंचायतीमधील २७ गावांना ग्रॅव्हीटीने पाणी देणे शक्य असल्याचा निष्कर्ष शासनाकडून नेमण्यात आलेल्या मे. मॉडर्न सर्व्हे कन्सल्टन्सी, पुणे या एजन्सीने सर्व्हेक्षण करून काढणे याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडून या सर्व २७ गावांना भेटी देवून सद्य:स्थितीची पाहणी करण्यात आली असून त्याबाबतचा अहवाल या विभागाचे अधिक्षक अभियंता यांचेकडून माहे मे २०२१ मध्ये पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करण्यात येणे, मात्र, सात महिने उलटले तरी यावर कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी पाणीटंचाईची समस्या अत्यंत गंभीर होत असणे, त्याचबरोबर धरणापासून जवळ असलेल्या आणि तीव्र पाणीटंचाई असलेल्या चिपळूण

असुधारित प्रत

श्री.भास्कर जाधव ...

तालुक्यातील पिंपळी बुद्रुक, तिवरे, रिक्टोली, आकले, कादवड, दादर, कळकवणे या गावांनाही ग्रॅव्हीटीने पाणी देणेबाबत सर्व्हे होवून त्यांचा यादीत समावेश करण्यात यावा, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अध्यक्ष महोदय, मी या ठिकाणी माननीय पाणी पुरवठा मंत्री महोदयांकडून काही निर्णय व्हावेत या करिता ही अर्ध्या तासाची चर्चा मांडलेली आहे. माझ्या चिपळूण तालुक्यामध्ये त्याच बरोबर चिपळूण व गुहागर विधानसभा मतदारसंघामध्ये आपण मे. मॉडर्न सर्व्हे कन्सल्टन्सी, पुणे या एजन्सीने सर्व्हेक्षण करुन चिपळूण तालुक्यामध्ये जे कोळकेवाडी धरण आहे, त्याचे ग्रॅव्हीटीद्वारे जे पाणी वाया जाते ते पाणी या २७ गावांना मिळावे याकरिता म्हणून गेले ४-५ वर्षे सातत्याने प्रयत्न करुन आता जलसंपदा विभागाने या गावात पाणी योजना राबविण्यास हरकत नाही, अशा प्रकारचा दाखला दिलेला आहे. त्याची सर्व प्रश्नोत्तरे माझ्याकडे आहेत. ती सांगून मी वेळ घेत नाही.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांकडे माझी पहिली मागणी अशी आहे की, त्यामध्ये ७ गावे ॲड करण्याचे राहून गेले आहे. त्या गावांची नावे मौजे पिंपळी बुद्रुक, तिवरे, रिक्टोली, आकले, कादवड, दादर, कळकवणे अशी आहेत. या गावांचा सुध्दा या २७ गावांच्या यादीमध्ये समावेश करावा. याचे कारण असे आहे की, बाजूचे गाव घेतले गेले. त्याच्या बाजूचे गाव... कारण काही काही ठिकाणी पूर्वी एकच ग्रुप ग्राम पंचायत होती. आता ती स्वतंत्र ग्राम पंचायत झाली. पूर्वी ते गाव ग्रुप पंचायतीमध्ये होते. परंतु, आता ....

नंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

श्री.भास्कर जाधव...

ते गाव ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये नाही, स्वतंत्र झाले आहे. त्यामुळे त्यास योजनेतून वगळले आहे, त्याचा समावेश योजनत करण्यात यावा, अशी माझी आग्रही मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, माझी दुसरी मागणी अशी आहे की, ग्रॅव्हिटीद्वारे पाणी देण्यात यावे. मला खात्रीपूर्वक माहिती आहे की, आपल्या खात्याच्या अधिकाऱ्यांनी अशा प्रकारे पाणी देता येणार नाही याची वेगवेगळी कारणे सांगितलेली आहेत. त्यातील पहिले कारण असे आहे की, काही गावांना वेगवेगळ्या योजनेतून पाणी पुरवठा सुरू आहे, काही गावांना सध्याच्या जल जीवन मिशन योजनेमधून पाणी पुरवठा करता येतो म्हणून या योजनेंतर्गत पाणी देऊ नये, काही गावे दरडोई खर्चाच्या निकषापेक्षा अधिक खर्चामध्ये जातात. अशा प्रकारची प्रमुख तीन कारणे सांगितले आहेत, अशी माझी माहिती आहे. ही माहिती खोटी असेल तर काही अडचण नाही. सदरहू कारणांमुळे या योजनेची अंदाजपत्रकीय किंमत वाढते.

अध्यक्ष महोदय, माझ्या चार मागण्या आहेत. सात गावांचा योजनेत समावेश करण्याची आपण घोषणा करावी. आम्हाला अन्य कुठल्याही योजनेतून पाणी नको, कोळकेवाडी धरणातून ग्रॅव्हिटीने पाणी द्यावे. कारण हे पाणी ग्रॅव्हिटीने मिळाले तर खालील भागातून डोंगराच्या वरील भागात पाणी घेऊन जाण्यासाठी लागणारा पंपिंगच्या इलेक्ट्रिसीटीचा खर्च ग्रामपंचायतीस करावा लागणार नाही. यासाठी आम्ही मागील ४-५ वर्षापासून मेहनत करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मला वादात अडकवू नये. त्यांच्या विभागाचे अधिकारी ही बाब दरडोई खर्चात बसणार नाही असे सांगत असतील तर मी राज्यातील काही जिल्ह्यांचे रेकॉर्ड सोबत आणले आहे. साडे तीन हजार रुपये दरडोई खर्चाचा नियम योजनेत असताना २० हजार रुपये दरडोई खर्च असलेल्या काही ठिकाणी योजना मंजूर करण्यात आल्या आहेत. त्यावेळी योजनेतील

असुधारित प्रत

श्री.भास्कर जाधव...

निकष विचारात घेण्यात येत नाही. आमची योजना एकंदरीत ८० ते ८१ कोटी रुपयांची होते. त्यामध्ये ७ गावांचा समावेश केल्यास त्यामध्ये ७ ते ८ कोटी रुपये आणखी वाढ होईल.

अध्यक्ष महोदय, आम्ही कोकणातील लोक केवळ रस्ता व पाण्याची मागणी शासनाकडे करीत असतो. याशिवाय राज्याच्या विधानसभेमध्ये कोकणासाठी विशेष काही मागणी करण्यात येत नाही. आमच्या भागामध्ये अतिवृष्टी होत असल्याने रस्ते खराब होतात. त्यामुळे आम्ही रस्त्यांची मागणी करतो. आमच्या भागामध्ये साडे चार ते पाच हजार मि.मी.पाऊस पडतो व ते पाणी डोंगरावरुन समुद्रात विलीन होते. आमच्या भागामध्ये सपाट जमिनी नाहीत. त्यामुळे पाणी जमिनीमध्ये जिरण्याचे प्रमाण नगण्य आहे. कोकणामध्ये कागदोपत्री पाऊस अधिक पडत असला तरी पिण्याच्या पाण्यासाठी आम्हाला वणवण करावी लागते. शेती करिता पाण्याची मागणी करणे ही वेगळी बाब आहे. मंत्री महोदय सकारात्मक उत्तर देखील अशी मला अपेक्षा आहे. सात गावांचा योजनेत समावेश करण्यात यावा, त्यासाठी नवीन सर्व्हे करण्यात यावा. आपल्या अधिकाऱ्यांनी दुसऱ्या योजनेतून पाणी देण्याचा किंवा दरडोई खर्च याबाबत सांगितले तर याचा विचार करण्यात येऊ नये. कारण आम्ही मागील ४-५ वर्षापासून प्रत्येक अधिवेशनामध्ये विविध आयुधांच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित करीत आहोत. आम्हाला अशा प्रकारची उत्तरे आपल्या अधिकाऱ्यांकडून नकोत. माझ्या प्रश्नाचे उत्तर आपण दिले नाही तर मी आपले आभार ही मानेन. सदरहू योजना १२५ कोटी रुपयांची झाली तरी त्यास मंजूरी देण्यात येईल, असे आपण सांगावे. यासाठी ही अर्धा-तास चर्चा मी उपस्थित केली आहे.

अध्यक्ष महोदय, माझे सहकारी सन्माननीय सदस्य श्री. शेखर निकम यांना या विषयावर बोलण्याची संधी देण्यात यावी, अशी माझी विनंती आहे. माझ्या दोन्ही प्रश्नांची सकारात्मक उत्तरे मंत्री महोदयांनी द्यावी, एवढीच माझी अपेक्षा आहे.

असुधारित प्रत

श्री.शेखर निकम (चिपळूण) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून केलेल्य सूचना रास्त आहेत. मंत्री महोदय देखील सकारात्मक आहेत. त्यांनी कळकवणे, दादर, वालोटी येथील पाणी योजनांना मंजुरी देताना ती ग्रॅव्हिटी योजनेच्या माध्यमातून देण्याचे मान्य केले आहे.

अध्यक्ष महोदय, प्रत्येक योजनेच्या वेळी टॅपिंगची परवागनी घ्यावी लागते व त्यासाठी मंत्रिगणाच्या बैठकीत मंजुरी घ्यावी लागते.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.शेखर निकम : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत, त्या अतिशय रास्त अशा सूचना आहेत. तसेच माननीय मंत्री श्री.गुलाबराव पाटील देखील अतिशय सकारात्मक आहेत. कारण त्यांनी आता कळकवडा, दादर, वाळवोटी येथील ग्रॅव्हीटीने पाणी पुरवठा करण्याच्या योजनेला देखील मंजुरी देण्याचे मान्य केले आहे. प्रत्येक योजने वेळी टॅपिंगची परवानगी घ्यावी लागते. टॅपिंगची परवानगीसाठी मंत्रिमंडळाची बैठक घ्यावी लागते. सदर बैठक जवळ-जवळ एक-एक वर्षे होत नाही. त्यामुळे वर्षानुवर्षे टॅपिंगची परवानगी मिळत नाही. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी सूचना केल्याप्रमाणे सदर सर्व गावांचा समावेश करुन एकाच वेळी टॅपिंगची परवानगी देण्याचे धोरण निश्चित करावे आणि या गावांबरोबर चिपळूनला देखील ग्रॅव्हीटीने पाणी पुरवठा करण्याच्या योजनेस मंजुरी द्यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, ओळी, वालवटी, दादर येथील पाणी पुरवठा योजनेला मंत्री महोदय निश्चितपणे मंजुरी देतील. तसेच टॅपिंगला देखील परवानगी देतील, अशी मी आशा करतो.

श्री.गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी उपस्थित केलेल्या अर्धा-तास चर्चेला उत्तर देण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी सांगितल्याप्रमाणे कोळकेवाडी धरणामध्ये वशिष्ठ नदीवरुन पाणी मिळावे याकरिता सन २०१७ मध्ये मे.मॉडर्न सर्व्हे कन्सल्टन्सी, पुणे या एजन्सीकडून सर्व्हे करण्यात आला. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी सदर योजनेस लवकरात लवकर मंजुरी मिळविण्याकरिता कायम माझ्याकडे पाठपुरावा करीत होते. योगायोगाने राज्यात तीन पक्षाचे सरकार सत्तेमध्ये आले व केंद्रात माननीय श्री.नरेंद्र मोदीचे सरकार सत्तेमध्ये आहे. केंद्र व राज्य सरकारने मिळून लोकांना पाणी देण्याची एक प्रतिज्ञा केली. मला वाटते तो एक उत्सव आहे. एक प्रकारचे हे मिशन आहे, एक प्रकारची ही जल यात्रा आहे. या योजनेसाठी केंद्र सरकार ५० टक्के निधी देत आहे आणि राज्य सरकार ४० टक्के निधी देत आहे आणि उर्वरित १० टक्के निधी लोकवर्गणीतून उभारला जात

असुधारित प्रत

श्री.गुलाबराव पाटील.......

आहे. या योजनेच्या माध्यमातून २७ हजार गावांना पाणी पाजण्याची संधी मला प्राप्त आहे. त्याबद्दल मी केंद्र व राज्य शासनाचे आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी २७ गावांचा प्रश्न उपस्थित केला. तसेच उक्त २७ गावामध्ये इतर ७ गावांचा देखील समावेश करण्याबाबतची विनंती केली. आपण सांगितलेले काही मुद्दे सत्य आहेत. अहमदनगर, पुणे किंवा इतर काही जिल्ह्यांमध्ये पाणी पुरवठा करावयाचा असेल तर स्टोर टँक केल्याशिवाय पाणी पुरवठा करता येत नाही. ज्या गावामध्ये ५०० पेक्षा कमी लोकवस्ती आहे, अशा गावांमध्ये मातोश्री टँक उभारुन सौर ऊर्जेच्या माध्यमातून त्या गावाला किमान तीन महिने तरी पाण्याचा पुरवठा करता येतो. आपण सर्वसामान्य जनतेसाठी पाण्याची मागणी करीत आहात. त्यामुळे आपल्या सारख्या ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना कोणत्याही मंत्री महोदयांनी मान्यच केली पाहिजे, असे मला तरी वाटते.

अध्यक्ष महोदय, यासंदर्भात मी अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली होती. तेव्हा मी त्यांना सांगितले होते की, ८१ कोटी रुपयांऐवजी ८८ कोटी रुपये लागले तरी चालतील. परंतु सर्व गावांना चांगला पाणी पुरवठा झाला पाहिजे. ३५०० रुपयांचा दर २० हजार रुपयांपर्यंत गेला तरी काही हरकत नाही. कारण कोकणातील पाण्याचे चित्र भयावह आहे. कोकणामध्ये ५ ते ७ महिने चांगले पाणी मिळते. परंतु त्यानंतरचे चार पाच महिने कोकणामध्ये पाणी मिळत नाही. त्यामुळे मी आपणास अभिमानाने आणि स्वाभिमानाने सांगू इच्छितो की, कोणते आमदार कोणत्या पक्षाचे आहेत, हे मला माहिती नाही. पाण्यासंदर्भात सरपंचापासून मुख्यमंत्री महोदयापर्यंत मला कोणीही सूचना केली तरी मी लगेच कार्यवाही करतो. कारण पाण्यामध्ये राजकारण आणायचे नाही, हे मी निश्चितपणे मनामध्ये ठरविलेले आहे.

अध्यक्ष महोदय, पाणी पुरवठा योजनेच्या उद्घाटनासाठी मी एका गावामध्ये गेलो होते. तेव्हा तेथील एक म्हातारी आजी मला पाहून “पाणीवाला बाबा आला” असे म्हणाली. माझी दाडी पाहून व त्यांच्या गावाला पाणी मिळते हे पाहून त्यांच्या

श्री.गुलाबराव पाटील.......

तोंडून हे शब्द निघाले होते. जनतेला पाणी पाजण्याचे असे पुण्याचे काम महाविकास आघाडी सरकारने माझ्याकडे दिले आहे. सन्माननीय सदस्यांनी मागणी केलेल्या ७ गावांचा समावेश १०० टक्के समावेश करण्यात येईल, अशी मी ग्वाही देतो. सदर योजनेसाठी ८० कोटी रुपये खर्च येत असेल किंवा ८८ कोटी रुपये खर्च येत असता तरी

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

श्री. गुलाबराव पाटील.....

अध्यक्ष महोदय, मी सांगू इच्छितो की, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणामध्ये कधीच दरी पडणार नाही. याबाबत निश्चिंत रहावे. सात ते आठ कोटी रुपयांचा हा विषय आहे. या सात गावांचा समावेश केला जाईल. यामध्ये पिंपळी बुद्रुक, तिवरे, रिक्टोली, आकले, कादवड, दादर, कळकवणे या सर्व गावांचा समावेश केला जाईल. चिपळूण तालुक्यामध्ये एकूण १५५ गावे आहेत. यामध्ये जिल्हा परिषदेच्या ४९ योजना आहेत. गुहागर तालुक्यात १५५ गावे आहेत. त्यामध्ये जिल्हा परिषदेच्या ११८ योजना आहेत. खेड तालुक्यात एकूण १८६ गावे असून जिल्हा परिषदेच्या ९७ योजना आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या किरकोळ योजना आहेत. या योजना लवकर होण्यासाठी कार्यवाही केली जाईल. राज्यातील २७ हजार गावांतील योजनांपैकी केवळ ४५० योजना राज्य शासनाकडील आहेत. मी ५ कोटी रुपयांच्या योजनेपर्यंतचे सर्व अधिकार खालच्या स्तरावर दिले आहेत. यासाठी सरपंच, जिल्हा परिषद, आमदार यांना माझ्याकडे येण्याची आवश्यकता नाही. पालकमंत्र्यांनी कृती आराखडता तयार करुन आमदारांनी त्यामध्ये त्यांच्या योजनेचा समावेश करावा. हे केल्यानंतर आम्ही पीएमसी नियुक्त केली आहे. यासाठी बाह्य यंत्रणेद्वारे इंजिनिअर नियुक्त केले आहेत. आठ दिवसाच्या आत डीपीआर तयार झाला पाहिजे. सात दिवसांची निविदा नोटीस काढली पाहिजे आणि वर्क ऑर्डर दिल्यानंतर काम केले पाहिजे, अशी गतीमान यंत्रणा निर्माण करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. माननीय पंतप्रधान आणि माननीय मुख्यमंत्र्यांचे स्वप्न आहे. सन २०२४ पर्यंत देशात आणि राज्यात 'हर घर जल' ही योजना पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. मी सांगू इच्छितो की, या सात गावांना पाणी मिळण्यासाठी समावेश केला जाईल.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांचे आभार मानतो. परंतु एक गोष्ट स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे. मंत्री महोदय एस्टीमेट कॉस्ट देण्यासाठी आणि सात गावे समाविष्ट करण्यासाठी सहमत झाले आहेत. परंतु विभागाच्या अधिकाऱ्यांनी यातील काही गावे वगळण्याचे ठरविले आहे. ती गावे न वगळता कोळकेवाडी धरणातूनच पाणी देण्याचे मंत्री महोदयांनी मान्य करावे.

असुधारित प्रत

श्री. गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, माझ्या माहितीनुसार ३ गावांना बारमाही पाणी मिळते. इतर गावांना काही दिवस पाणी मिळत नाही, अशी माहिती मला देण्यात आली होती. इतर गावांना एमआयडीसीमधून पाणी मिळत असल्याची माहिती माझ्याकडे आहे. तरीही सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या संपूर्ण गावांचा यामाध्ये समावेश केला जाईल.

**तालिका सभाध्यक्ष :** अर्धा-तास चर्चा संपली आहे. मला वाटते की, पुढील १५ दिवसांमध्ये मंत्रीमंडळामध्ये याबाबतचा प्रस्ताव मंत्री महोदय सादर करतील. पुढील मंत्रीमंडळ बैठकीमध्ये प्रस्ताव आणला जाईल, असे उत्तर मंत्री महोदयांकडून अपेक्षित होते. आता सन्माननीय सदस्य श्री. कृष्णा गजबे यांची अर्धा-तास चर्चा घेतली जाईल.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कृषिपंपाकरिता २४ तास वीज पुरवठा करणे

**मु.शी.** : गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कृषिपंपाकरिता २४ तास वीज पुरवठा यासंबंधी श्री. कृष्णा गजबे यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री. कृष्णा गजबे (आरमोरी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम ९४ अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

अध्यक्ष महोदय, "गडचिरोली हा आदिवासी, दुर्गम व नक्षलग्रस्त जिल्हा असणे, जिल्ह्यात कोणतेही मोठे उद्योग, व्यवसाय नसणे, जिल्ह्यातील नागरीक पुर्णत: शेती व्यवसायावर अवलंबून असणे, गडचिरोली जिल्ह्यातील मुख्य पीक असलेल्या धान पिकाच्या सिंचनासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असणे, जिल्ह्यात वीज वितरण कंपनीकडून केवळ ८ तास वीज पुरवठा करण्यात येणे, सिंचनाची सोय उपलब्ध असूनही विजे अभावी पुरेसे सिंचन करता येत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणे, शेतकरी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदने व आंदोलनाव्दारे जिल्ह्यात कृषि पंपाना २४ तास वीज पुरवठा करण्याची वारंवार मागणी करणे, याकडे शासनाचे होत असलेले दूर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांच्या कृषि पंपांना २४ तास वीज मिळावी या महत्त्वाच्या बाबीवर ही अर्धा-तास चर्चा आहे. गडचिरोली हा आदिवासी आणि दूर्गम व नक्षलग्रस्त जिल्हा आहे. या जिल्ह्यात कोणतेही मोठे उद्योग नाही. मंत्री महोदय हे विदर्भातील आहेत. त्यामुळे त्यांना अधिक काही सांगावे लागणार नाही. दिनांक १३ मार्च, २०२१ पासून मी त्यांच्याकडे या विषयाचा पाठपुरावा करीत आहे. विद्युत विभागाने कृषि पंपांना २४ तास वीज देण्याऐवजी केवळ ८ तास वीज कृषि पंपांना मिळत आहे. या विषयाचा पाठपुरावा करीत असताना मंत्री महोदयांकडून आणि

असुधारित प्रत

श्री. कृष्णा गजबे .....

विभागाकडून अशी माहिती मिळाली की, एमईआरसीने ठरविलेला हा विषय आहे. कृषि वाहिन्या वेगवेगळ्या केल्या आहेत. याबाबत केंद्र सरकारचे अतिशय चांगले धोरण आहे.

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

श्री.कृष्णा गजबे.....

कृषी वाहिन्या वेगळया केल्या तर दिवसा सौर ऊर्जेवरील विद्युत पुरवठा व त्याच वाहिन्यांवरुन रात्री देखील ८ तास विद्युत पुरवठा करण्याबाबत आयोगाचे निर्देश आहेत.

अध्यक्ष महोदय, गडचिरोली हा अतिशय दुर्गम, आदिवासी व नक्षलग्रस्त जिल्हा आहे. या जिल्हयामध्ये मोठे उद्योग, व्यवसाय वा बाजारपेठा नाहीत. या जिल्हयामध्ये केवळ शेती उत्पादन होते. सिंचनासाठी मोठी धरणे देखील नाहीत. जिल्हयाच्या काही भागातून वैणगंगा, गाढवी, इत्यादी नद्या वाहतात. तसेच गोंदिया जिल्हयातील इटियाडोह धरणामुळे काही नद्यांना बारमाही पाणी असते. परंतु त्यातून सिंचन करण्यासाठी पुरेसा विद्युत पुरवठा असणे आवश्यक आहे. अशा ठिकाणच्या शेतकऱ्यांना केवळ ८ तास वीज पुरवठा केला तर त्यांना काहीही उत्पन्न निघू शकणार नाही.

अध्यक्ष महोदय, दिनांक १३ मार्च, २०१९ रोजी यासंदर्भात गडचिरोली जिल्हयातील सर्वपक्षीय शिष्टमंडळ मंत्री महोदयांच्या भेटीसाठी मी आणले होते. त्यावेळी मंत्री महोदयांनी आम्हाला आश्वासन दिले. तसेच दिनांक १३ मार्च, २०२१ रोजी एम.डी., प्रकाशगड यांना एका पत्राद्वारे निर्देश देण्यात आले. त्यानुसार कुरखेडा तालुक्यातील गेवरदा या पॉवर स्टेशनवरील तीन फिडरवरील कृषी वाहिन्यांना आठ तास विद्युत पुरवठा करण्यास स्थगिती देण्यात आली. मे, २०२१ पर्यंत २४ तास विद्युत पुरवठा करण्यात आला. नंतर पुन्हा कुरखेडा तालुक्यातील तीन फिडर, वळसा तालुक्यातील तीन फिडर आणि आरमोरी तालुक्यातील तीन फिडरवरील कृषी वाहिन्यांना ८ तास विद्युत पुरवठा सुरु करण्यात आला. माझा प्रश्न आहे की, असा पक्षपात कशामुळे केला जात आहे ?

अध्यक्ष महोदय, ज्या ठिकाणी कृषी वाहिन्या वेगळया झाल्या नाहीत त्या ठिकाणी शेतकऱ्यांना २४ तास विद्युत पुरवठा केला जातो. परंतु ज्या ठिकाणी कृषी वाहिन्या वेगळया करण्यात आल्या आहेत त्यांना ८ तासच विद्युत पुरवठा केला जातो. अर्थात, ही योजना चांगली आहे परंतु राज्य सरकारने अगोदर सौर ऊर्जेसाठी

श्री.कृष्णा गजबे.....

मोठा प्लांट उभारला पाहिजे. तसे केल्यास शेतकऱ्यांना २४ तास विद्युत पुरवठा होऊ शकेल. परंतु अशा प्रकारचे कोणतेही नियोजन नसताना ९ फिडरवरील कृषी वाहिन्यांना ८ तास विद्युत पुरवठा करण्याचे ठरविण्यात आले.

अध्यक्ष महोदय, दिनांक २ मार्च, २०२१ रोजी सन्माननीय सदस्य श्री.धर्मरावबाब आत्राम, सन्माननीय सदस्य डॉ.देवराव होळी व मी स्वत: अशा गडचिरोली जिल्हयातील तीनही आमदारांनी मिळून माननीय मुख्यमंत्री व माननीय ऊर्जा मंत्र्यांना पत्र दिले. त्यामध्ये नमूद केले होते की, "गडचिरोली जिल्हयाची एकंदर परिस्थिती पाहता ८ तास विद्युत पुरवठ्याच्या संदर्भातील धोरणास गडचिरोली जिल्हयापुरती स्थगिती देण्यात यावी." माननीय पालकमंत्र्यांना देखील आम्ही पत्र दिले. त्यावरुन त्यांनी माननीय ऊर्जा मंत्र्यांना पत्र देऊन सांगितले की, "सन्माननीय सदस्यांचे म्हणणे खरे आहे. मी त्या जिल्हयाचा पालकमंत्री आहे व तेथील शेतकऱ्यांची ही समस्या बऱ्याचदा माझ्या निदर्शनास आली आहे व त्यामुळे या जिल्हयाला सदर योजनेमूधन वगळण्यात यावे."

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. कृष्णा गजबे...

म्हणून मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, आपल्याला कृषी वाहिन्यांना ८ तास जो वीज पुरवठा दिला जातो तो त्याऐवजी २४ तास देण्याबाबत निर्णय घ्यावा. दुसरी मागणी मी अशी करतो की, आपण याबाबत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाला सुध्दा विनंती करू शकता. कारण मागच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार हे वित्तमंत्री असताना हा प्रश्न उद्भवला होता. तेव्हा सन २०१६-१७ मध्ये महावितरण कंपनीने शेतकऱ्यांच्या कृषी पंपाना ८ ते १० तासाऐवजी १२ तासांचा वीज पुरवठा केल्यामुळे वीज दर सवलतीपोटी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने त्यावेळी दिनांक २४ मे २०१८ रोजी एक परिपत्रक निर्गमित केले होते. याचा विचार करता त्या कृषी पंपांना किमान १६ तास वीज पुरवठा केला तरी शेतकऱ्यांना शेतातून उत्पादन घेता येईल. शेतकऱ्यांनी शेतामध्ये जे बी रोपण केलेले आहे त्यामध्ये अडचण येऊ नये म्हणून शासनाने ३१ मे २०२२ पर्यंत सध्याच्या धोरणाला स्थगिती द्यावी. त्यानंतर आपण विद्युत नियामक आयोगाच्या माध्यमातून निर्णय घेऊ शकाल. या निमित्ताने माझी विनंती आहे की, आपण गडचिरोली जिल्ह्यामधील कृषी पंपांना जी ८ तास वीज दिली जाते ती २४ तास देण्यात यावी. अन्यथा शासनाच्या जाचक अटीमधून गडचिरोली जिल्हा वगळण्यात यावा, एवढी मागणी मी ऊर्जा मंत्री महोदयांना करतो.

श्री. राजेश पवार : अध्यक्ष महोदय, आताच माझ्या सन्माननीय सहकाऱ्यांनी मागणी केल्याप्रमाणे शेतकऱ्यांसाठी किंवा शेती व्यवसायासाठी महावितरण किंवा वीज ही लाईफ लाईन म्हणजे जीवनरेखा आहे, हे आपल्या सर्वांना माहिती आहे. सन्माननीय सदस्यांनी २४ तास वीज पुरवठा करण्याची मागणी केली. परंतु मी आपल्या माध्यमातून ऊर्जा मंत्री महोदयांना विनंती करतो की, २४ तास शक्य नसेल तर किमान १२ तास आणि तेही शक्य नसेल तर किमान ८ तास तरी वीज द्यावी. मात्र ती दिवसा द्यावी आणि आपण तशी ती देणार आहात काय ?

अध्यक्ष महोदय, दुसरी माझी मागणी आहे की, ३१ मार्च २०१८ पासून ज्यांनी वीज कनेक्शनसाठी कोटेशन भरलेली आहेत त्या शेतकऱ्यांना आपण अद्यापही वीज

असुधारित प्रत

श्री. राजेश पवार...

जोडणी दिलेली नाही तर ती आपण देणार आहात काय, आणि देणार असाल तर कधीपर्यंत देणार आहात ?

अध्यक्ष महोदय, तिसरी मागणी अशी आहे की, आज राज्यात वीज बिल वसुलीची सुरू असलेली मोहीम स्थगित करण्याबाबत सर्वपक्षीय सन्माननीय सदस्यांनी मागणी केली आहे. त्यामुळे मला याबाबत विचारायचे आहे की, आपण संपूर्ण राज्यात जरी स्थगिती देऊ शकत नसलात तरी किमान मराठवाडा आणि विदर्भातील मागासलेले शेतकरी विचारात घेता या दोन विभागात वीज बिल वसुलीच्या मोहीमेला स्थगिती देणार आहात काय ? तसेच राज्यात पेड पेंडिंगचे कनेक्शन्स राज्यात मोठ्या प्रमाणावर आहेत त्यांना आपण वीज जोडणी देणार आहात काय ? शेवटची मागणी अशी आहे की, आपण विद्युत सहायकांची भरती सुरू केली आहे त्यामध्ये मराठा समाजातील उमेदवारांवर अन्याय झाल्याची भावना अनेकांमध्ये आहे. त्यामुळे याबाबतच्या अडचणी आपण दूर करणार आहात काय?

श्री. सिध्दार्थ शिरोळे : अध्यक्ष महोदय, या विषयाला अनुसरुन मी काही मागणी करु इच्छितो. बऱ्याच ठिकाणी सध्या काही भागातील शेतीला आठवड्यातून ३ दिवस पाणी दिले जाते आणि इतर ४ दिवस रात्री पाणी दिले जाते. रात्री वीज पुरवठा केल्यामुळे शेतकऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अंधारामध्ये पिकाचे क्षेत्र व्यवस्थित भिजले जात नाही. त्यामुळे पाणी सोडूनही पिकांचे नुकसान होते. शिवाय बिबट्या, तरस, मगरी आणि साप यासारख्या प्राण्यांचे हल्ले होत असतात. हा धोका फार मोठा आहे आणि कधी कधी तो जीवघातकही असतो. त्यामुळे नदीकाठचे किंवा विहिरीचे पंप रात्री अपरात्री जाऊन शेतकऱ्यांना सुरू करावे लागतात, हे धोकादायक आहे. अनेकवेळा अंधारात वायर न दिसल्यामुळे शॉक लागून अनेक शेतकऱ्यांचे मृत्यू सुध्दा झालेले आहेत. या सर्व बाबींचा विचार करुन शेतकऱ्यांना दिवसा कमीत कमी १० तास वीज उपलब्ध करुन देण्यासाठी एक चांगले वीज धोरण ठरविले पाहिजे आणि शासन ते करील काय ?

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कृष्णा गजबे यांनी एका महत्त्वाच्या विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित केली आहे. माननीय मंत्र्यांनी सकारात्मक उत्तर दिले पाहिजे, अशी त्यांच्याकडून अपेक्षा आहे. गडचिरोली जिल्ह्याचा भाग हा दुर्गम, गरिब आणि अतिशय अविकसीत, आदिवासी बहुल, नक्षलग्रस्त आहे. उत्तर देताना आपण या सर्व विषयांचा भाव लक्षपूर्वक बघण्याची आवश्यकता आहे. देशामधील ७४० जिल्ह्यांपैकी गडचिरोली, वाशिम, नंदूरबार आणि उस्मानाबाद हे ४ जिल्हे आकांक्षित म्हणून निवडले आहेत. माननीय मंत्र्यांनी नेहमीच वंचितांचे नेतृत्व केलेले आहे. एक वंचित मुंबईमध्ये येऊन बदलला असे उत्तरामध्ये होऊ नये. एक वंचित शोषितांचे नेतृत्व करणारा नेता तिथे असणाऱ्या शोषित समाजाला न्याय देणारा असला पाहिजे. गडचिरोली हा नो इंडस्ट्री जिल्हा आहे. मला ही आठवते की, आम्ही या जिल्ह्यासाठी ८ तासाच्या ऐवजी १२ तासाची वीज दिली होती. याचे कारण साधे होते की, साधारणत: ७० टक्के भाग जंगलाचा आहे. त्यामुळे रात्री जाऊन शेतीला पाणी देणे कठीणच आहे. त्यामुळे आम्ही तिथे ११,५०० धडक सिंचन विहिरी सुद्धा दिल्या आहेत. माझ्या हातात जे पुस्तक आहे त्या समितीचे आपण सदस्य होते. आपण एकदा हे पुस्तक वाचा. यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा तसेच तुमचाही फोटो आहे. या ठिकाणी आपण सांगितले की, तामिळनाडू व आंध्रप्रदेश राज्याच्या धरतीवर वीज बिल माफ करुन शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज मोफत देणार असे तुम्ही स्वत: आश्वासन दिले आहे. आपण जर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खरे मानणारे अनुयायी असाल तर आपण त्यांच्या फोटो छापून कमीत कमी असत्य कथन करु नका. एका सत्य कथनाची सुरुवात आपण गडचिरोली जिल्ह्यापासून करा. आपण दरडोई उत्पन्नामध्ये ३६ जिल्ह्यात हा ३५ व्या क्रमांकाचा जिल्हा आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, आम्ही कर्जबाजारी आहोत किंवा आमच्यावर खूप कर्ज आहे असे उत्तर आपण आम्हाला देऊच नका. अशा प्रकारचा प्रश्न मलाही पडायचा. माझ्या एका मित्राने विचारले की, "जास्त कर्ज असते तर तुम्ही काय मंत्री पदाची शपथ घेतली नसती काय ?" घेतलीच असती ना ! कर्ज असले तरी देखील एमएसईबी वर अजून कर्ज होईल. ६० हजार कोटी रुपये कर्ज झाले तर माननीय मंत्री डॉ. नितीन राऊत यांचे

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार...

घोषणापत्र येईल की, मी आता राजीनामा देतो कारण ६० हजार कोटी रुपयांचे कर्ज झाले आहे. मंत्री महोदय, आपण काही चिंता करु नका कारण आपल्या पुढची पिढी आपल्यापेक्षा बुद्धिमान आहे. ते एका मिनिटात ६० हजार कोटी रुपयांचे कर्ज फेडतील. आपण त्यांची चिंता न करता आधी शेतकऱ्यांची, आदिवासी बांधवांची आणि कष्टकऱ्यांची चिंता करा. आपण जर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे खरे अनुयायी असाल तर १२ तास वीज मोफत द्या.

ॲड. आशिष जैस्वाल : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कृष्णा गजबे यांनी जी अर्धा-तासाची चर्चा उपस्थित केली आहे त्याकडे मला शासनाचे आणि माननीय मंत्र्यांचे लक्ष वेधायचे आहे. परवाच्या दिवशी सभागृहात हा प्रश्न देखील झाला होता. त्यामुळे दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांच्या व्यथा आपण समजून घ्या. आम्ही ज्या भागात असतो त्या भागात धरण असतात आणि तेथील पाणी शेतात येते. परंतु जंगलामध्ये जेवढे आदिवासी राहतात त्यांच्याकडे कुठेही सिंचनाची सुविधा नाही. कारण धरण आणि कॅनॉल त्यांच्या भागात होते ही वन कायद्याची अडचण आहे. पहिली अडचण अशी आहे की, सिंचनाला पाणी नाही. दुसरी अडचण अशी आहे की, शेतात जे काही वाचले त्याचा जंगली जनावर सत्यानाश करतात आणि त्यानंतर निसर्गाचा कोप होतो, ही तिसरी अडचण आहे. अशा तिहेरी संकटात तो माणूस जगत आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितल्याप्रमाणे माझ्या मतदारसंघात देखील १०० ते १२५ गावे आदिवासी आहेत त्या गावाची परिस्थिती आपण स्वत: फिरुन पाहिलेली आहे. या परिस्थितीमध्ये जीवन जगणाऱ्या माणसांसाठी आपण डोंगरी विकास निधी सुरु केला आहे. मानव विकास मिशनमध्ये आपण १२५ तालुके निवडले त्यांच्यासाठी आपण काही योजना देत आहोत. या दुर्गम आदिवासी भागात राहणाऱ्या शेतकऱ्यांना सिंचन देऊ शकत नाही. त्यामुळे त्यांना विहिरीतूनच पाणी घ्यावे लागते आणि विहिरीतही पाणी लागत नाही. मला माहीत आहे की, आपण फक्त ८ तास वीज देत असताना ४० लाख कृषी पंपांना ४ हजार कोटी रुपयांची सबसीडी देतो. एमईआरसीचा रेट

असुधारित प्रत

ॲड. आशिष जैस्वाल....

किती आहे आणि किती रुपये सबसीडी देतो याची मला माहिती आहे. परंतु हे देखील आपल्याला माहीत आहे की, ११ जिल्ह्यात जेवढे विजेचे कनेक्शन आहे तेवढे फक्त पुणे आणि नगर जिल्ह्यामध्ये आहेत.

यानंतर श्रीमती करंदीकर.....

असुधारित प्रत

ॲड. आशिष जैस्वाल....

आपल्याला माहीत आहे की, या विषयासंबंधी आपण विधानसभेत आवाज बुलंद केला. आपण विदर्भाचे सुपुत्र आहात. विदर्भाच्या शेतकऱ्याला आपण न्याय देणार अशी आमची आपल्याकडून अपेक्षा आहे. या भागात शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची अवस्था अतिशय भयनाक आहे. त्यांच्यावर अनेक संकटे येत आहेत. ते अनेकदा विजेच्या कनेक्शनच्या मागणीकरिता आमच्याकडे येतात. मात्र एमएसईबीचे लाईनमन दुर्गम भागात जात नाहीत. ५० -१०० कि.मी आतल्या भागात गावे आहेत. त्यांची लाईन गेली तर कोणी दुरुस्तीसाठी तेथे जात नाहीत. तेथे अनेक अडचणी आहेत. येथे वीज देण्याकरिता एवढे पोल लागणार आहेत, आम्ही लाईन देणार नाही, आपण सन २०१८ पूर्वी अर्ज केला काय अशा प्रकारे विचारणा केली जाते. आदिवासी विकास विभागाकडून काही ठिकाणी कनेक्शन दिले जाते.

अध्यक्ष महोदय, या विषयासंबंधी मी परवा देखील मागणी केली. आदिवासी भागातील गावांमध्ये शेतकरी शेती करतात. या संबंधी नवीन धोरणाचा विचार शासनाने केला पाहिजे. ही देखील आपल्याच राज्याची जनता आहे. त्यांनाही चांगले जीवन जगण्याचा अधिकार आहे. राज्य शासनाचा मंत्री म्हणून व विदर्भाचा सुपुत्र म्हणून आपण मदत केली पाहिजे. या भागात आदिवासी लोकसंख्या अधिक आहे. शेतकऱ्यांची पाण्याची, सिंचनाची अडचण दूर करण्यासाठी आपण ठोस निर्णय घ्यावा, अशी मी विनंती करतो. आपल्याला जो काही वेळ लागणार असेल तो घ्यावा, त्यासाठी कमिटी तयार करा. या शेतकऱ्यांसाठी जर आपण निर्णय केला नाही, त्यांना सिंचनासाठी विजेची सुविधा दिली नाही तर ते कधीच उभे राहू शकणार नाहीत. या बाबत आपण निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत

डॉ. नितीन राऊत ( ऊर्जा मंत्री ) : अध्यक्ष महोदय, मविस नियम ९४ अन्वये या ठिकाणी अर्धा तास चर्चा मांडली असून त्यावर उत्तर देण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या चर्चेत सन्माननीय सदस्य सर्वश्री कृष्ण गजबे, राजेश पवार, सुधीर मुनगंटीवार, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष जैस्वाल यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. शेतीसाठी वीज उपलबध करुन देताना अनेक नियमावलींचा विचार करावा लागतो. त्यासाठी टेक्निकल फिजीबिलीटी बघावी लागते. गडचिरोली सारखा जिल्हा अत्यंत दुर्गम, नक्षलग्रस्त, वनाने वेढलेला असून येथे आदिवासी लोकसंख्या अधिक आहे. येथे राज्य शासनाने अनेकदा मदत करण्याचा प्रयत्न केला. पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी, कृषी पंपासाठी आवश्यक वीज पुरवठा लक्षात घेऊन शासनाच्या प्रचलित धोरणानुसार, वीज व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक वीज पुरवठा करण्याकरिता महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या नियमांचे पालन आम्हाला करावे लागते.

अध्यक्ष महोदय, कृषी वाहिनीवरील ग्राहकांना रात्री दहा तास,आठ तास किंवा दिवसा आठ तास थ्री फेज विजेची उपलब्धता चक्राकार पद्धतीने करुन दिली जाते. या ठिकाणी सध्याची स्थिती लक्षात घेतली तर असे दिसून येईल की, गडचिरोली जिल्ह्यांतर्गत १३१ वाहिन्या असून ९ वाहिन्यांना विलगिकृत कृषी वाहिन्या असून त्या माध्यमातून वीज पुरवठा देण्याचे मागील सरकारने ठरवले होते. एकूण ३२३० म्हणजे १५ टक्के कृषी ग्राहकांना विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार, रात्री किंवा दिवसा ८तास चक्राकार पद्धतीने वीज पुरवठा केला जात आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

डॉ.नितीन राऊत ...

उर्वरित १७८८० म्हणजे ८५ टक्के कृषी ग्राहकांना मिश्र विद्युत वाहिन्यांद्वारे २४ तास वीज पुरवठा करण्यात येतो. मी सांगेन की, हे सर्व करीत असताना कुरखेडा तालुक्यातील कृषी विलगीकरण झालेल्या वाहिन्यांवरील कृषी पंपांना २४ तास वीज पुरवठा करण्याबाबत शेतकरी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदने व आंदोलनामार्फत मागणी केल्यानुसार तसेच माननीय जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी २४ तास अखंडित ३ फेज विद्युत पुरवठा करण्यासाठी येणाऱ्या अतिरिक्त खर्चाच्या प्रतिपूर्तीचे लेखी आश्वासन दिल्यामुळे ११ के.व्ही. चिखली, ११ के.व्ही. कुरणोली व ११ के.व्ही. केवरदा या ३ कृषी वाहिन्यांवर माहे डिसेंबर, २०२० पासून मे, २०२१ पर्यंत प्रती दिवस २४ तास ३ फेज वीज पुरवठा देण्यात आला होता.

अध्यक्ष महोदय, मी आपणांस सांगू इच्छितो की, सन्माननीय जिल्हाधिकारी यांनी या ठिकाणी कमिटमेंट केले. आमच्या खात्याने वीज पुरवठा केला. त्याला २४२.१८ लाख इतक्या अतिरिक्त आर्थिक भाराची अनुदान स्वरुपात शासनाने महावितरण कंपनीस तत्काळ प्रतिपुर्ती करावी, असा प्रस्तावसुध्दा दि.२०.८.२०२१ अन्वये पाठविला. परंतु, अद्यापही या संबंधी कंपनीस कोणत्याही प्रकारे प्रतिपूर्ती झालेली नाही. मी संबंधित खात्याच्या मंत्री महोदयांच्या लक्षात ही बाब आणून दिलेली आहे. शेवटी दिवसा वीज द्यायची असेल तर दिवसा विजेचा दर जास्त असतो. कृषीचा दिवसाचा दर जास्त आहे.

अध्यक्ष महोदय, आम्ही कृषी वीज जोडणी ही एक चांगली योजना आणली. त्या योजने अंतर्गत जो कोणी ती कृषी वीज जोडणी घेईल, त्याला दिवसा वीज मिळेल. ती वीज देत असताना त्यांचे ५० टक्के तर आधीच निर्लेखन केले आहे. ते निर्लेखन केल्यानंतर आज गडचिरोली जिल्ह्याची अवस्था आपण पाहिली तर, ग्राहकांची संख्या ७३८७ इतकी आहे. सप्टेंबर, २०२० मध्ये थकबाकी १२७५ लक्ष होती. निर्लेखनाद्वारे आम्ही २८ लक्ष रुपयांची सूट दिली आणि विलंब आकार आणि व्याजातील सूट जवळपास ८३ लक्ष इतकी दिली. त्यानुसार ११३५ लक्ष थकबाकी आली. त्यातून पुन्हा आम्ही वीज देयक दुरुस्ती केली... (अडथळा)... नाही १० कोटी नाही १ हजार १६५ लक्ष आहे. त्यातून १३ लक्ष रुपये वजा केले तर १.१५२ लक्ष

डॉ.नितीन राऊत ...

इतकी आकडेवारी येते. आता चालू देयक ४११ लक्ष नव्हे तर ६८९ लक्ष आहे. त्यामध्ये आकस्मिक निधी... ७९३ लक्ष इतका एसीएफ तुमच्याकडे तयार झाला. एसीएफमध्ये २ लक्ष ६२ हजार तुमच्या तालुक्याला आणि २ लक्ष ६२ हजार तुमच्या जिल्ह्याला प्राप्त झाले. त्यातून तुम्हाला विजेच्या कृषी वाहिन्या दुरुस्त करावयाच्या असतील त्याचे प्रस्ताव आम्ही एसीएफ मधून मान्य करु.

अध्यक्ष महोदय, शेवटी २४ तास वीज द्यायची असेल तर त्या फिडरची सस्टेनेबिलिटी देखील आपल्याला लक्षात घ्यावी लागते. ती नाही. त्या ठिकाणी फक्त ९ फिडरची सस्टेनेबिलिटी आहे. त्यापैकी ३ फिडरवर मागच्या वेळेस आपण ते दिलेले होते. मागे आपण माझ्याकडे तक्रार केली होती. त्या अनुषंगाने मी एक बैठक लावून सांगितले की, आदिवासी असो, दुर्गम असो, डोंगरी असो, नक्षलग्रस्त असो, ज्यांचा एसडीआय कमी आहे असे प्रदेश असो, त्या विभागांना दिवसा वीज पुरवठा करावयाचा असेल तर त्या संबंधी जो अतिरिक्त निधी द्यावा लागतो ....

यानंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

डॉ.नितीन राऊत...

तो अतिरिक्त निधी आदिवासी विभागाच्या माध्यमातून, अनुसूचित जातीच्या विभागाच्या माध्यमातून, ओबीसींच्या विभागातून देण्यात यावा. अशा पद्धतीने निधी एकत्रित करण्यासाठी मी त्या भागाचा डीपीआर तयार करुन घेतला. त्यासाठी संबंधित खात्याला निधीची मागणी केलेली आहे. तो अतिरिक्त निधी प्राप्त झाला तर एमईआरसीची मान्यता घेऊन वीज उपलब्ध करून देण्याचा मी निश्चित प्रयत्न करेन. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, काही लोकांना वीज जोडणी देत असताना अडचणी निर्माण झालेल्या आहेत. त्या दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्यासाठी सारखा प्रयत्न सुरु आहे. ज्या लोकांना वीज देयक अधिक आले असेल ते तपासण्यासाठी शिबिर लावण्याचे आदेश काढले आहेत. काल-परवापर्यंत तीन प्रकारचे करोना येऊन गेले. आता थोडी मोकळीक मिळाली आहे. वीज देयके दुरुस्त करण्यासाठी शिबिरे लावण्यात येतील व ती दुरुस्त करुन देण्यात येतील. करंट बिल तीन महिन्याचं असते ते भरल्यानंतर थकबाकी उर्वरित राहत असेल तर त्यासाठी हप्ते पाडून पाहिजे असतील तर त्याकरिता लेखी घेऊन हप्ते पाडून देण्याची आमची तयारी आहे. वीज देयक तर भरावेच लागते.

अध्यक्ष महोदय, मला आनंद आहे की यावेळी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी वीज देयके भरलेली आहेत व ती भरण्यात येत आहेत. चंद्रपूर व गडचिरोलीसह इतर जिल्ह्यातील शेतकरीही वीज देयक अदा करतात. कृषि वीज जोडणी योजनेबाबत आपण मला पत्र दिले आहे. या योजनेचा पूर्ण फायदा पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रातील काही लोकांनी घेतला आहे. मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागातील लोक त्याच्यापासून दूर राहिले आहेत. जे बारमाही पीक घेतात त्यांच्यासाठी वेगळी योजना व जे आठमाही पीक घेतात त्यांच्यासाठी वेगळी योजना आणण्याचा विचार सुरु आहे. उर्वरित जे लोक योजनेत बसत नसतील त्यांच्यासाठी स्व.विलासराव देशमुख अभय योजना लागू केलेली आहे. अशा रितीने प्रयत्न करीत आहोत. विरोधी पक्ष असो की सत्ता पक्ष असो दोघांनाही शेतकऱ्यांच्या विषयी जास्त

डॉ.नितीन राऊत...

कळवळा आहे. आम्ही शेतकऱ्यांचा उपस्थितीमध्ये त्यांना साक्षी ठेवून सत्तेत आलो आहोत. त्यांच्या साक्षीने आमचा शपथ विधि झाला आहे. त्यामुळे त्यांना आम्हाला काही तरी द्यावे लागेल म्हणून ही योजना आणली आहे. ही एक चांगली योजना सुरू झालेली आहे. मला वाटते की या योजनेचा अवश्य लाभ घेतला पाहिजे. तद्वतच आपल्याकडे ईसीएफ क्रिएट होणार आहे. आपण संबंधीत अधिकाऱ्यांना भेटून ज्या वाहिन्या सक्षम करणे शक्य असेल त्या सक्षम कराव्यात, ट्रांसफार्मर बदली करावयाचे असतील तर ते बदली करावेत. त्यातूनही शक्य झाले नाही तर गडचिरोली हा जिल्हा नक्षतग्रस्त असल्याने त्यांना केंद्र सरकारचा सुद्धा निधी उपलब्ध होतो. त्या निधीचा वापर जिल्हाधिकाऱ्यांनी करावा यासाठी सुद्धा मी सूचना देईल. या व्यतिरिक्त जर आणखी मदत लागत असेल तर डिस्कॉमसाठी नवीन आरडीएसए रिस्ट्रक्चरींगची रि-व्हॅम्प योजना केंद्र सरकारने सुरु केली आहे. त्या योजनेमध्ये त्याचा समावेश केला जाईल व त्यांची मागणी मान्य करण्याच्या दिशेने पावले उचलली जातील.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, गडचिरोलीसाठी १२ तास दुपारी वीज उपलब्ध करुन देण्यात येईल काय ? मंत्री महोदय यांनी सांगितले की, जिल्हाधिकारी २ कोटी रुपये निधी देत नाही. त्यांना येथे बोलवावे, आपण २८८ सन्माननीय सदस्य त्याच्या छाताडावर बसू. जिल्हाधिकारी निधी देत नाही, असे मंत्री महोदय उत्तरात सांगत आहेत. ही लोकशाही आहे. संविधानाने आम्हाला शक्ती दिली आहे, आपणासमोर राजदंड दिला आहे.

यानंतर श्री.तेलंग....

श्री.सुधीर मुनगंटीवार……

जिल्हाधिकारी निधी देत नाहीत, असे मंत्री महोदय उत्तर देत आहेत. हे राज्य कोणाचे आहे, हे राज्य आमचे आहे. हे राज्य सर्वसामान्य जनतेचे आहे. जिल्हाधिकारी का निधी देत नाहीत? आपण त्यांच्या छातीवर जाऊन बसत नाही काय? मंत्री महोदयांकडून असे उत्तर अपेक्षित नाही. आपल्याकडून साधे आणि सोपे उत्तर अपेक्षित आहे. गडचिरोली जिल्हा अतिशय दुर्गम भागामध्ये आहे आणि तो या राज्यातील शेवटचा जिल्हा आहे. माझा एवढाच प्रश्न आहे की, राज्य शासन गडचिरोली जिल्ह्याला दिवसा १२ तास वीज पुरवठा करणार आहे काय? कारण या जिल्ह्यामध्ये ७० टक्के जंगल असल्यामुळे वन्य प्राण्यांचा मोठ्या प्रमाणावर त्रास होतो. अनेक लोकांना मृत्यूमुखी पडावे लागते. गडचिरोली जिल्ह्यामध्ये वन्यप्र ाण्या ंमुळे किती लोकांचा मृत्यू झाला, याची माहिती नाही. परंतु चंद्रपूर जिल्ह्यामध्ये मागील ११ महिन्यांमध्ये ४२ लोकांचा मृत्यू झालेला आहे. हा मागील ५० वर्षातील सर्वात मोठा आकडा आहे.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी एक गोष्ट मान्य की, दोन्ही पक्ष शेतकऱ्यांसाठी आहेत. आपण सचिवांच्या दबावाखाली येऊन का काम करीत आहात? आपणास राज्य चालवायचे आहे. गडचिरोली जिल्ह्याला दिवसा १२ तास वीज दिल्यामुळे राज्याच्या तिजोरीतून चार पैसे जातील. राज्य शासनाने ३७६ प्रशासकीय अधिकारी कशासाठी नियुक्त केले आहेत? ते बुद्धीचा वापर करुन शासनाची तिजोरी भरतील, यासाठीच आपण एवढे आयएएस अधिकारी नियुक्त केले आहेत. आपण का टेंशन घेत आहात? जसे आपण चिर ंजीवच आहोत, असे विचार करीत आहात. शोषित, वंचितांचे खरे नेते म्हणून गडचिरोली जिल्ह्याला दिवसा १२ तास वीज देणार आहात काय?

अध्यक्ष महोदय, गडचिरोली जिल्ह्यातील जनता मोफत विजेची मागणी करीत नाही. ते त्यासाठी पैसे देण्यास तयार आहे. आपण यापूर्वी त्या जिल्ह्याला दिवसा १२ तास वीज दिलेली आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, आपण खरच

अधिकाऱ्यांच्या नादी लागू नका. मंत्री झाल्यावर मी देखील एक वर्षे आपल्यासारखे च

श्री.सुधीर मुनगंटीवार......

वागत होतो. हे जनतेचे राज्य आहे. "ये पब्लिक है. चिंता नहीं करना चाहिए." मी आपणास खरे सांगू इच्छितो आपण कशाचीही चिंता करु नका. भगवत गीतेचा सारच असा आहे की, "क्या लेकर आए थे, क्या लेकर जाओगे, आज जो तुम्हारा है, कल किसी और का था, परसों किसी और का होने वाला है." आपण कोण आहोत? त्यामुळे आपण गडचिरोली जिल्ह्याला दिवसा १२ तास वीज देण्यात यावी, अशी मी पुनश्च: एकदा विनंती करतो.

डॉ.नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी हा मुद्दा अतिशय स्पष्टपणे मांडण्याची विनंती केली आहे. त्यांनी शेवटी भगवत गितेचे सार देखील सांगितले आहे. तसेच त्यांनी सुरुवातीलाच भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांचे देखील नाव घेतले आहे.

अध्यक्ष महोदय, फडणवीस सरकार सत्तेमध्ये होते तेव्हाचे एक पत्र माझ्या हातामध्ये आहे. या पत्रामध्ये तत्कालीन ऊर्जा मंत्री श्री.चेंद्रशेखर बावनकुळे यांनी दिनांक १६ जून २०१७ रोजी तत्कालीन या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.डी. मल्लिकार्जून रेड्डी यांना पत्र लिहून असे कळविले होते की, ‘‘पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी कृषी पंपासाठी आवश्यक असलेला वीज पुरवठा लक्षात घेऊन शासनाच्या प्रचलित धोरणानुसार व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मान्यतेने राज्यातील कृषी ग्राहकांना रात्रीच्या काळात १० तास व दिवसा ८ तास थ्रीफेज विजेची उपलब्धता चक्रकार पद्धतीने देण्यात येत आहे. एकूण १२ पैकी ५० टक्के भार असलेल्या कृषी वाहिन्यांना दिवसा ८ तास व उर्वरित ५० टक्के भार असलेल्या वाहिन्यांना रात्री १० तास आठवड्यातून दोन वेळा किंवा प्रत्येक आठवड्यात चक्राकार पद्धतीने विजेची उपलब्धता देण्यात येत आहे.’’

अध्यक्ष महोदय, मी तत्कालीन मंत्री महोदयांसारखे बोललो नाही.

(सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार खाली बसून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

डॉ.नितीन राऊत.......

अध्यक्ष महोदय, मी त्यांचे सर्व भाषण शांततेत ऐकले आहे. आता आपण माझे उत्तर ऐकावे, अशी मी विनंती करतो. मी आपल्याच माननीय मंत्र्यांनी लिहिलेले पत्र वाचून दाखवित आहे, हे माझे पत्र नाही. शिवसेना पक्षाचे जिल्हा प्रमुख श्री. सुरेंद्रसिंग चेंदल यांनी तेथे आंदोलन केले होते. तसेच सन्माननीय सदस्य श्री.कृष्णा गजबे यांनी देखील आंदोलन केले होते. या सर्वांनी आंदोलन केल्यानंतर जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी लेखी लिहून दिले आहे की, दिवसा वीज पुरवठा करीत असाल तर त्या विजेचा खर्च आम्ही भरण्यास तयार आहोत.

(सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार खाली बसून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

अध्यक्ष महोदय, मला ती बाब माहिती नाही. जे सत्य आहे, ते आपणास सांगितले आहे. गडचिरोली जिल्हा मला माहिती नाही काय? आपण लक्षलग्रत भाग ातील जनतेसाठी विजेची मागणी करीत आहात. परंतु मी नक्षलग्रस्त भागातील आहे. गडचिरोली हा नक्षलग्रस्त भाग आहे आणि त्या भागाशी माझा चांगला संबंध आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

डॉ. नितीन राऊत....

त्या भागाशी माझा संबंध आहे. तेथील भावना माझ्या लक्षात आहेत. त्यामुळे मी त्या ठिकाणी वीज दिली आहे. आताही त्याठिकाणी वीज देण्याची विभागाची तयारी आहे. परंतु दिवसाचा दर देण्याबाबत निर्णय करण्यात यावा. याकरिता संबंधित लोकप्रतिनिधींनी त्या भागातील लोकांशी चर्चा करावी. या चर्चेतून मार्ग काढावा. एक पाऊल त्यांनी पुढे यावे आणि एक पाऊल विभाग पुढे येईल. परंतु ज्या वाहिन्या सस्टेनेबल नसतील त्यावर देता येणार नाही. विभागाची तयारी आहे. याबाबतचा प्रस्ताव माझ्याकडे आणावा. मी एमईआरसीकडे याबाबत चर्चा करीन. सन्माननीय सदस्य श्री. राजेश पवार यांनी विद्युत सहायकाबाबतचा प्रश्न उपस्थित केला आहे. मी सांगू इच्छितो की, माननीय सर्वोच्च न्यायालय आणि माननीय उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार सर्व ऑर्डर काढल्या आहेत. उप केंद्र सहायक पदाच्या ५ हजार आणि सहायक पदांच्या २ हजार ऑर्डर काढण्यात आल्या आहेत.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, या चर्चेच्या निमित्ताने माननीय मंत्री श्री. गुलाबराव पाटील, माननीय मंत्री श्री. दत्तात्रय भरणे यांनी सकारात्मक उत्तरे दिली आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत माननीय ऊर्जा मंत्र्यांनी नागपूर जिल्ह्यासंदर्भातील पत्र वाचले आहे. गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात यापूर्वी १२ तास वीज देण्यात आली होती. गडचिरोलीमध्ये ज्या वाहिनीचे वहन करण्याची क्षमता नसेल त्याठिकाणी १२ तास वीज देऊ नये. परंतु इतर ठिकाणी १२ तास वीज द्यावी, असे माझे म्हणणे आहे.

डॉ. नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, मी देखील हे म्हणालो आहे. मी सांगितले की, लोकप्रतिनिधींनी संबंधितांशी चर्चा करावी. दिवसाच्या वीजेचे दर ठरविण्याचा अधिकार राज्य सरकारला नसून तो आयोगाला आहे. मी जे पत्र वाचले आहे ते आयोगाच्या निदेशानुसारच वाचले आहे. आयोगाचे निर्देश आपणास मान्य करावे लागतात. वीजेचा दर शासन ठरवित नाही. त्या दरानुसार काम करावे. यासाठी आमची हरकत नाही. त्या दरामध्ये काही सवलती देण्याची आवश्यकता असेल तर राज्य सरकार याबाबत निश्चितपणे विचार करेल.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री हे अधिकाऱ्यांनी दिलेली चुकीची माहिती वाचत आहेत. एमईआरसीला वीज दर ठरविण्याचा अधिकार असला तरी सरकार म्हणून जे निर्बल, दूर्बल, शोषित, वंचित आहेत त्यांना हव्या त्या दरामध्ये वीज देण्याचा अधिकार आहे. यासाठी सरकारला अनुदान द्यावे लागते. चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यामध्ये दरवर्षी साधारणपणे ३२ ते ३५ कोटी रुपयांचे अनुदान दिले जात असे. याचे कारण असे की ते जंगल क्षेत्र आहे. मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्य श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांचे पत्र हे नागपूरबाबत वाचून दाखविले आहे. मी नागपूर जिल्ह्याचा विषय मांडत नाही. हा भाग दूर्बल आहे.

अध्यक्ष महोदय, आपण ज्याला आवश्यकता आहे त्यांना सलाईन लावत असतो. सर्वांनाच सलाईन देत नसतो. मंत्री महोदय चुकीचे उत्तर देत आहेत. आदिवासी बांधवांना न्याय मिळावा, यासाठी मी विनंती करीत आहे. मंत्री महोदय हे केवळ त्यांच्या विभागापुरते उत्तर देत आहेत. सरकार म्हणून ते उत्तर देत नाहीत. मंत्री महोदयांनी गांभीर्यपूर्वक केलेल्या दृढ कथनानुसार त्यांना असे उत्तर देता येत नाही. सरकारचा प्रतिनिधी म्हणून उत्तर दिले पाहिजे. मी सांगू इच्छितो की, तो नक्षलग्रस्त भाग आहे. त्या भागाला १२ तास वीज द्यावयाची आहे. यात एमईआरसीचा विषय येत नाही. इतर शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या ८ तासांच्या विजेचा दर यात आकारावयाचा आहे. जो दर बारामती, पुणे, नागपूर येथे आहे तोच दर आकारावयाचा आहे. दुपारी १२ तास वीज द्यावयाची आहे. तसेच यासाठी नवीन वाहिनी लागणार नाही. या वाहिन्यांची क्षमता आहे. यातील गॅप (अनुदान) सरकार भरु शकते. आमच्या सरकारच्या काळात असा फरक आम्ही दिलेला आहे. गडचिरोली जिल्ह्याचा विषय असल्याने मी हे पोटतिडकिने सांगत आहे. मंत्री महोदय, गडचिरोली जिल्ह्यास न्याय देणार नाहीत काय ? नसल्यास, शेवटी सत्ता आपली आहे. निर्णय घेण्याचा अधिकार मंत्री महोदयांचा आहे. परंतु मी सांगू इच्छितो की, हे योग्य होणार नाही.

**तालिका सभाध्यक्ष :** सभागृहाची वेळ सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

असुधारित प्रत

डॉ. नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, मी नागपूर जिल्ह्याविषयी बोललो नाही. मी केवळ पत्र वाचून दाखविले आहे. नियामक आयोगाने ज्या सूचना केल्या होत्या त्या सूचनांच्या अनुषंगाने मंत्री महोदयांनी कसे उत्तरे दिलेली आहेत, ते मी वाचून दाखविले. गडचिरोली जिल्ह्यास मदत करण्याची माझी भावना आहे. मी यासाठी मदत करणार आहे. याकरिता बैठक आयोजित करण्यात येईल.

यानंतर श्री. चौधरी.....

असुधारित प्रत

श्री.रत्नाकर गुट्टे : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये प्रती गावठाण मीटर ७ हजार २०० रुपये याप्रमाणे वीज बिल वसुली सुरु आहे. तसेच ५ एच.पी., ७.५ एच.पी., १० एच.पी. क्षमतेच्या कृषी पंम्पांसाठी वेगवेगळया रकमा निश्चित करण्यात आल्या आहेत. माझ्या मतदारसंघातील ७० ते ७५ टक्के गावांमध्ये १०० टक्के वीज आकडे टाकून घेतली जाते. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, ज्या गावांमध्ये १०० टक्के आकडे टाकून वीज घेतली जाते त्यांच्याकडून प्रत्येकी ७ हजार २०० रुपये वीज बिल भरुन घेतल्यानंतर त्यांना मिटर देण्यात येईल का ?

श्री.हिरामण खोसकर : अध्यक्ष महोदय, ज्याप्रमाणे गडचिरोली जिल्हयाचे मुद्दे या ठिकाणी मांडण्यात आले त्याप्रमाणेच उत्तर महाराष्ट्रातील नाशिक जिल्हयातील ७ तालुके आदिवासी व दुर्गम आहेत. आमच्याकडे पावसाळयामध्ये चार महिने मोठया प्रमाणात पाऊस पडतो त्यामुळे पाण्याची अडचण येत नाही व विजेची देखील चणचण भासत नाही. परंतु उर्वरित आठ महिने पाण्याची कमतरता असते व पाणी ऊपसा करण्यासाठी वेळेवर वीज पुरवठा होत नाही. आदिवासी बांधवांना वन विभागाच्या जागेमध्ये सरकारकडून विहिरी मिळालेल्या आहेत परंतु विजेचे कनेक्शन नसल्यामुळे आजही तेथून पाणी ऊपसा करणे शक्य होत नाही. यासंदर्भात माननीय ऊर्जा मंत्री यांच्या दालनामध्ये दोन वेळा बैठका घेण्यात आल्या. परंतु अद्याप प्रश्न सुटलेला नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, ज्याप्रमाणे रस्ते तयार करण्यासाठी विशिष्ट लेखाशिर्षांतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येतो तसाच निधी वीज पुरवठयासाठी उपलब्ध करुन दिला तर आमच्या आदिवासी शेतकऱ्यांचे स्थलांतर थांबून ते आपापल्या गावातच शेती करतील.

अध्यक्ष महोदय, माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की आपण माननीय आदिवासी विकास मंत्र्यांशी चर्चा करुन त्यांच्याकडून निधी उपलब्ध करुन घ्यावा व हा विषय मार्गी लावावा.

डॉ.नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

**तालिका सभाध्यक्ष :** अर्धा-तास चर्चा संपली आहे.

---------

**पृ.शी. :** मुंबईतील पोयसर नदीचे पुनरुज्जीवन करण्याबाबत.

**मु.शी. :** मुंबईतील पोयसर नदीचे पुनरुज्जीवन करण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.अतुल भातखळकर यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम ९४ अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"मुंबईतील पोयसर नदीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने १४२८ कोटी रुपयांच्या प्रस्तावास माहे जानेवारी २०२२ च्या सुमारास मान्यता दिलेली असणे, परंतु वेळोवेळी खर्चाच्या अंदाजपत्रकात होणारे बदल व वाढीमुळे तसेच निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी होणाऱ्या विलंबामुळे सदर प्रकल्प मागील अनेक वर्षापासून रखडला असणे, त्यामुळे पोयसर नदीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम आखण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरातील आणि विशेषत: माझ्या मतदारसंघातून जाणाऱ्या पोयसर नदीच्या पुनरुज्जीवनाच्या संदर्भात मी सदर अर्धा-तास चर्चा उपस्थित केली आहे. सदर नदी बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये उगम पावते आणि माझ्या मतदारसंघातील हनुमाननगर, पोयसर या विभागातून पश्चिम द्रुतगती महामार्ग ओलांडून मालाडच्या खाडीमध्ये विसर्जित होते. मुंबई महानगरपालिकेला राष्ट्रीय हरित आयोगाने दंड आकारल्यामुळे आणि लोकांनी मागणी केल्यामुळे या नदीच्या पुनरुज्जीवनाचा प्रस्ताव महापालिकेने पारित केला आहे. परंतु प्रस्ताव पारित केला आहे म्हणजे काय केले आहे तर सुमारे १४०० कोटी रुपयांचे टेंडर महापालिकेच्या स्थायी समितीने मंजूर केले आहे. पुनरुज्जीवनाच्या अनुषंगाने मलनिस्सारण वाहिन्या टाकू, ५ ठिकाणी मल जल केंद्रे उभी करु, इत्यादी बाबी या दहा पानी प्रस्तावामध्ये नमूद आहेत.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. अतुल भातखळकर..

एखाद्या तिसऱ्या व्यक्तीने हे टेंडर आणि त्याचा प्रस्ताव वाचला तर त्यांना असे वाटेल की, या सर्व नदीच्या अवतीभवती पूर्णपणे मोकळी जागा आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की, शेकडो नव्हे तर हजारो झोपड्या या पोयसर नदीच्या दोन्ही बाजूने वर्षानूवर्षे वसलेल्या आहेत आणि या प्रस्तावामुळे स्वाभाविकपणे संभ्रमाचे आणि भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. कारण गेल्या पावसाळयात पोयसर नदीला आलेल्या पुरामुळे माझ्या मतदार संघातील हनुमाननगर भागामधील ७ पात्र झोपड्या पडल्या आणि पोयसरमधील पात्र ३ झोपड्या पडल्या. परंतु सरकारने आजतागायत त्यांचे सरकारने किंवा मुंबई महापालिकेने पुनर्वसन केलेले नाही. हा प्रस्ताव जेव्हा मुंबई महापालिकेने जेव्हा मंजूर केला... नदीचे पुनरुज्जीवन करतात, ही चांगली गोष्ट आहे. पण हे करीत असताना यामधील कळीचा जो मुद्दा आहे तो म्हणजे त्या ठिकाणी असलेल्या लोकांचे पुनर्वसन होणे. म्हणून माझे या निमित्ताने २-३ नेमके प्रश्न मंत्री महोदयांना आहेत की, महानगरपालिकेला किंवा राज्य सरकारला याची कल्पना आहे काय की या पोयसर नदीचे पुनरुज्जीवन करताना तेथील किती झोपड्या बाधित होणार आहेत, हा पहिला प्रश्न. दुसरे म्हणजे आपण या लोकांचे पुनर्वसन कुठे करणार आहात. उपनगरातील लोकांना मुंबई महापालिका पुनर्वसित करण्यासाठी माहूल येथे पाठविते आणि माहूलच्या लोकांना मालाडच्या आप्पापाड्यामध्ये पुनर्वसित करते. त्यामुळे माझा दुसरा प्रश्न असा आहे की, यामुळे जी लोकं बाधित होणार आहेत त्यांना त्याच भागामध्ये पुनर्वसन करण्याची व्यवस्था मुंबई महापालिका करणार आहे काय? तिसरा प्रश्न असा आहे की, महिंद्रा कंपनी यलो गेट ते पश्चिम द्रुतगती मार्गापर्यंत या पोयसर नदीला लागून एक सेवा रस्ता प्रस्तावित आहे. त्याकरिता मी स्थानिक आमदार म्हणून गेली २ पासून प्रयत्न करीत आहे. त्या संदर्भात गतीने पावले उचलली जातील काय, हा माझा तिसरा प्रश्न आहे. मिठी नदीची सुधारणा करण्याकरिता प्राधिकरण स्थापन केले होते, हजारो कोटी रुपये खर्च झाले. पण मिठी नदी आजही गाळातल्या गाळातच आहे. पोयसर नदी, दहिसर नदी, वालबाट नदी या सर्व नद्यांच्या

असुधारित प्रत

श्री. अतुल भातखळकर..

पुनरुज्जीवनाकरिता एखादे प्राधिकरण स्थापन करणार आहात काय ? या सर्व प्रश्नांचा विचार करण्याकरिता मंत्री महोदयांच्या दालनात महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घ्यावी. या संदर्भात विविध विधानसभा क्षेत्राचे जे जनप्रतिनिधी असतील त्यांनाही बोलाविण्यात यावे आणि मला देखील बोलाविण्यात यावे, असे माझे ४ स्पेसिफिक प्रश्न आहेत.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांच्या मतदार संघातून विशेषत: कांदिवली भागातून पोयसर नदी जवळपास १० कि.मी.चा प्रवास करुन अरबी समुद्राला मिळते. नदीपात्राच्या ठिकाणी क्रांती नगर, गोकूळनगर, दुर्गानगर, कुरार गाव, बिहार टेकडी इत्यादि बऱ्याच ठिकाणी झोपड्या आणि जनावरांची गोठी सुध्दा आहेत. त्या भागामध्ये आपल्या मलनि:सारण वाहिन्या नसल्याकारणाने निश्चितपणे दुषित पाणी त्या नदीला मिळते. विशेषत: पावसाळा नसताना त्याची तीव्रता खूप जास्त जाणवते. याबाबत वनशक्ती नावाची संस्था एन.जे.टी.मध्ये गेली होती. पण त्या आधी देखील एन.जे.टी.च्या काही मार्गदर्शक सूचना आल्या होत्या. त्या अनुषंगाने आयआयटी मुंबई, निरी (National Environmental Engineering Research Institute) आणि महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी यांची आपण एक बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये एन.जी.टी.चे जे नॉर्म्स आहेत ते अत्यंत स्ट्रीनजंट आहेत असे एन.जी.टी.ने सांगितले आहेत. आपणही सांगितले की, कोर्टामध्ये खूप मोठा दंड एन.जी.टी.ने मुंबई महानगरपालिकेला सूचविला आहे. आपण आता सुप्रीम कोर्टात जाऊन त्याला 'स्टे' घेतला आहे. म्हणून एन.जी.टी.ने सांगितलेले स्ट्रीनजंट नॉर्म्स पूर्ण करण्याकरिता सुरूवातीला आपण जे तंत्रज्ञान वापरत होतो त्यापेक्षा लेटेस्ट तंत्रज्ञान वापरण्याचा निर्णय घेतला आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

श्री. प्राजक्त तनपुरे..

कारण की, बाथींग स्टॅंडर्डचे पाणी असावे. १० किंवा ३ पर्यंत अत्यंत कमी बीओडी असावा, अशा प्रकारचे निर्देश एनजीटीने दिले होते. त्यामुळे एमबीआर Membraine Bio-Reactor Technology (MBR) बसविण्याचा निर्णय देखील घेतलेला आहे. याचे बरेच फायदे आपल्याला मिळणार आहेत. त्यामध्ये आपण शॉक लोडचे ५० टक्केपर्यंत शोषण करु शकतो. आपण जो झोपडपट्टीचा विषय काढला त्यामध्ये अत्यंत कमी जागेमध्ये देखील प्रक्रिया केंद्र उभारण्याचे शक्य होणार आहे. याचे वेगवेगळे बरेच फायदे असल्यामुळे आपण उच्चतम टेक्नॉलॉजी घेण्याचा विषय केला आहे. त्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया होऊन आता आपण वर्कऑर्डर देखील इश्यु केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले मुद्दे योग्य आहेत. यामुळे साधारणपणे १,६३३ झोपड्या बाधित होतील, असा अंदाज आहे. मुंबई महानगरपालिकेच्या पुनर्वसनाच्या धोरणाच्या अनुषंगाने लवकरात लवकर या सर्वांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी आहे. परंतु जसे शक्य होईल त्याप्रमाणे तिथल्या तिथेच त्यांचे पुनर्वसन होईल काय असे आपण विचारले तर ती शक्यता पहिल्या प्रथम पडताळून बघितली जाईल. त्या प्रमाणात त्यांचे जास्तीचे विस्थापन होणार नाही तसेच महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणाप्रमाणे आम्ही त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न करणार आहोत. यामध्ये काही मुद्दे राहिले असतील तर ते सर्व बैठकीमध्ये घेण्यात येतील.

श्री. अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांनी चांगले आणि सकारात्मक उत्तर दिले आहे. मी देखील त्यांना आश्वासन देतो की, तेथील लोकप्रतिनीधी या नात्याने त्या नदीचे पुनर्जिवन झालेच पाहिजे अशी सर्वांची भुमिका आहे. हे करीत असताना स्थानिक लोकांवर अन्याय होता कामा नये. त्यांना माहुल, चेंबुर किंवा कुठेतरी लांब राहायला पाठवले जाते. त्यामुळे माननीय अध्यक्षांमार्फत माझी आपल्याला विनंती आहे की, आपण एक बैठक बोलावून या संदर्भातील सर्व प्रश्न एकदा सोडवावेत. तसेच मी ज्या सेवा रस्त्याचा उल्लेख केला आहे तो तर

असुधारित प्रत

श्री. अतुल भातखळकर...

तात्काळ म्हणजे ६ महिन्यात पूर्ण होऊ शकतो. त्या दिशेने आपण संबंधीत अधिकाऱ्यांना बोलावून लवकरात लवकर एक बैठक आयोजित करावी.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे लवकरात लवकर एक बैठक आयोजित करुन या सर्व विषयांची सविस्तर चर्चा करता येईल.

श्री. दिलीप लांडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अतुल भातखळकर हे माझे अतिशय जवळचे आणि लाडके मित्र आहेत. त्यांनी मुंबई शहरातील नदीचा एक चांगला प्रश्न सभागृहाच्या माध्यमातून शासनासमोर आणलेला आहे. अशाच प्रकारे त्यांनी मिठी नदीचे नाव देखील घेतले आहे. या प्राधिकरणाच्या माध्यमातून आतापर्यंत ३,२०० झोपड्यांचे पुनर्वसन झालेले आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिका सक्षम आहे हे मला त्या माध्यमातून सांगायचे आहे. केंद्र शासन आणि महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून महानगरपालिकेकडून मिठी नदीच्या प्राधिकरणाचे काम धीमी गतीने सुरु आहे. कालीना ब्रिज ते सीएसएमटी ब्रिज यामधील राहिलेला काही भाग रुंदीकरण न झाल्यामुळे क्रांती नगर झोपडपट्टीमधील घरांमध्ये प्रत्येक वर्षी ५ ते ६ फुट पाणी भरते. आपल्या माध्यमातून माननीय मंत्र्यांना माझी एक विनंती आहे की, सदरचे काम तातडीने झाले तर गोरगरिबांच्या घरांवरुन पाणी जाणार नाही आणि यामुळे जी जिवित हानी होईल ती थांबू शकते. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर केमिकलचे काळे पाणी सोडले जात असल्यामुळे ते पाणी दुषित होते. यावर तातडीने कार्यवाही करुन शासनाने उपाययोजना करावी.

अध्यक्ष महोदय, तिसरा प्रश्न आहे की, कालीना ब्रिज ते क्रांतीनगर ब्रिज या

असुधारित प्रत

श्री. दिलीप लांडे....

सेवा रोडचे काम अर्धवट राहिलेले आहे. त्यामुळे पावसामुळे पाणी भरल्यानंतर लोकांना बाहेर येण्यासाठी जो रस्ता पाहिजे असतो तो मिळालेला नाही. माझी शासनाला विनंती आहे की, यावर कार्यवाही करुन तातडीने उपययोजना कराव्यात.

यानंतर श्रीमती करंदीकर.....

असुधारित प्रत

श्री. समाधान अवताडे : अध्यक्ष महोदय, पंढरपूर येथे लाखो भाविक येत असतात. पंढरपूरच्या चंद्रभागा नदीमधील पाण्यात शेवाळ आले आहे. पाणी साठून राहिल्यामुळे या पाण्यात किडे तयार झाले आहेत.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री.संजय शिरसाट ) :** आपण जो प्रश्न विचारत आहात तो स्कोपच्या बाहेरचा आहे. या करिता आपण मंत्री महोदयांना नंतर भेटू शकता. ही चर्चा वेगळया विषयावर सुरु आहे.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी मिठी नदीबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. आजची अर्धा तास चर्चा पोयसर नदीच्या पुनर्जीवनाबाबत आहे. मिठी नदीबाबत त्यांचे कन्सर्न थोडया फार प्रमाणात स्कोपच्या बाहेर जरी असतील, तरी देखील मुंबई महापालिकेला या बाबत उचित निर्देश देण्यात येतील.

--------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : शासकीय कृषी महाविद्यालय, मूल येथील नवीन इमारतीच्या बांधकामाकरिता प्रशासकीय मान्यता व निधी तातडीने देणे

**मु. शी.** : शासकीय कृषी महाविद्यालय, मूल येथील नवीन इमारतीच्या बांधकामाकरिता प्रशासकीय मान्यता व निधी तातडीने देणे, यासंबंधी श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री. सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम ९४ अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"शासकीय कृषी महाविद्यालय मुलच्या नविन इमारत बांधकामाचा १३३.३५ कोटींचा सुधारित आराखडा विद्यापीठाद्वारे कृषी परिषद पुणे यांच्या मार्फत शासनाच्या बांधकाम प्रस्ताव उच्चस्तर समिती मंत्रालय मुंबई यांच्याकडे अंतिम मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे. परंतु सदर महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी शासनाकडून प्रशासकीय मान्यता व निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. तसेच इमारत बांधकामाचे अनुदान व वेतनाचे अनुदान या बाबींकडे देखील शासनाचे दुर्लक्ष झाल्यामुळे कृषी शिक्षक व प्रशिक्षणाच्या प्रक्रियेत अनेक अडचणी निर्माण होणे. सदर कृषी महाविद्यालयाच्या इमारत बांधकामाला प्रशासकीय मान्यता व निधी तातडीने उपलब्ध करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर मी या ठिकाणी अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे. मी असा विचार करीत होतो की, गेले २६ वर्षे, ११ महिने २२ दिवस म्हणजेच ९,८५६ दिवस व २ लाख ३६ हजार ५४४ तास या सभागृहाचा मी सदस्य आहे. मी अनेक अधिकारी व विभाग पाहिले. संसदीय आयुधांचा उपयोग

असुधारित प्रत

श्री. सुधीर मुनगंटीवार......

अनेकदा केला व जनहिताचे निर्णयही केले. मात्र या प्रस्तावाच्या संदर्भात पहिल्यांदाच मी वाह्यातपणा, विचित्रपणा, वाईटपणा बघत आहे. खरे तर एका राज्यातील प्रमुख व्यक्तीने ' नॉटी ' या शब्दाचा अर्थ सांगितला. हा निर्णय पाहिल्यानंतर किती नॉटीपणा सुरु आहे हे मी आपल्या लक्षात आणून देतो. नादान, नाकर्तेपणा दुर्लक्ष, उदासीनता हे या नस्तीच्या बाबतीत झाले आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्याकडे नस्ती निपटारा कायदा आहे. अजगराने आत्महत्या करावी,त्याने म्हणावे की, माझ्यापेक्षा या फाईलवर निर्णय करणारे अधिक सुस्त आहेत. जनता त्रस्त आहे. सातवा वेतन आयोग घेऊन काही लोक मस्त आहेत. गेंड्याने देखील आत्महत्या करावी की, यांची माझ्यापेक्षा जाडी चमडी आहे. मी नस्ती निपटारा कायदा आपल्याला वाचून दाखवतो. कार्यालयीन कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध, असा कायदा केला आहे. आपण त्याशिवाय सुधारणार नाही. आपल्याला काही नैतिकता आहे. या ठिकाणी आपण कशाकरिता बसलो आहोत याचा आपण विचार केला पाहिजे. हे लोक मस्तीत राहतात, अहंकारात राहतात. त्यांना याची जाण नसते. म्हणून महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ केलेला आहे. महत्त्वाच्या विषयावरील नस्तींचा निपटारा झाला पाहिजे. अत्यंत दक्षतेने व शक्य तेवढया शिघ्रतेने पार पाडण्यास बांधील आहे. याचा अर्थ काय आहे ? एखाद्याला बुध्दी नसेल, त्याचे ब्रेन कमी जी.बी.चे असेल म्हणून नस्ती ठेवता येत नाही. तुमची बुध्दी १ जी.बी असेल तर नस्ती ठेवता येते काय ? सामान्यत: कोणतीही फाईल विभागातील किंवा कार्यालयातील कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याकडे कामाच्या ७ दिवसापेक्षा अधिक काळ प्रलंबित राहणार नाही.

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.सुधीर मुनगंटीवार ...

शेवटी ४५ दिवसांच्या आत निर्णय घेतला जाईल. काय विषय आहे, काय मागितले? राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. गुजरातमध्ये एकही आत्महत्या होत नाही. गुजरातची लोकसंख्या ६ कोटी आहे. आपल्या राज्याची लोकसंख्या १२ कोटी आहे. तेथे ४ कृषी विद्यापीठे आहेत. आपल्या राज्यात साडेबारा कोटी लोकसंख्येकरिताही ४ कृषी विद्यापीठे आहेत. त्यामुळे आम्ही ३-४ वर्षांपूर्वी निर्णय केला. शेती हा मजबुतीचा नाही तर मजबुरीचा व्यवसाय आहे. याचे कारण साधे होते. सन १९७०-१९७१ मध्ये आपली सरासरी शेती ४.२८ हेक्टर होती. ती सन २०१०-२०११ मध्ये १.४४ हेक्टर झाली. सन २०१९-२०२० मध्ये ती १.३४ हेक्टर झाली.

अध्यक्ष महोदय, येथेच आपल्या शेतकऱ्यांची अवस्था बदलत नाही. या राज्यामध्ये जेवढा रोजगार आहे त्या ४ कोटी ६० लाख इतक्या रोजगारामध्ये आमची जी कार्यकारी म्हणजे काम करणारी लोकसंख्या आहे त्यातील ५५ टक्के रोजगार शेतीवर आहे. त्यामध्येही २८.७ टक्के शेतकरी व २६.३ टक्के शेतमजूर अशी टक्केवारी आहे. याचा अर्थ काय तर कोणत्याही अधिकारी, कर्मचाऱ्याला हे समजले पाहिजे की, शेतीशी संबंधित, शेतीच्या ज्ञानाशी संबंधित कोणतीही नस्ती ही वेगाने गेली पाहिजे. रस्ते केले पाहिजेत त्यांची आवश्यकता आहे. परंतु, केवळ रस्ते केल्याने आपण पुढे जाणार नाही.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांच्या आयुष्यामध्ये बदल घडावा, त्यांना नवनवीन तंत्रज्ञान द्यावे. मला अजूनही आठवते की, ऑस्ट्रेलियातील कृषी मंत्री एकदा मला भेटायला आले. ते म्हणाले की, आमची सरासरी शेती २५ हजार एकर आहे. आम्ही १.३४ हेक्टरवर आहोत. त्यांची २५ हजार एकर शेती आहे. तेथे शेतकरी हेलीकॉप्टर घेतो. आम्ही २५ रुपयांचे हेलीकॉप्टरचे चित्र घेऊ शकत नाही.

अध्यक्ष महोदय, आमची अशी इच्छा होती की, आपल्या या शेतकऱ्यांमध्ये काही बदल व्हावा म्हणून कृषी महाविद्यालय केले. खरे तर आमच्या जिल्ह्यामध्ये सीमांतीक शेतकरी खूप मोठ्या संख्येने आहेत. राज्यात तर आहेतच. राज्यामध्ये सन

असुधारित प्रत

श्री.सुधीर मुनगंटीवार ....

२०१५-२०१६ मध्ये १ कोटी, ५२ लक्ष, ८५ हजार वहिवाटदार होते. यापैकी १ कोटी २१ लाख, ५५ हजार हे २ हेक्टरच्या आतील आहेत. अतिशय अल्प भूधारक अशा शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान प्राप्त व्हावे या दृष्टीने आम्ही एक कृषी महाविद्यालय सुरु केले. ३ वर्षे झाली. कृषी पदवीधर अभ्यासक्रमाची सुविधा निर्माण करणे. बदलत्या हवामानानुसार कृषी व्यवसाय, शेतीपूरक व्यवसाय व शेती उद्योग, कृषी तंत्रज्ञानाचा या भागामध्ये प्रसार करण्यासाठी ग्राम पातळीवरील विस्तार कार्यकर्त्यांचे ट्रेनिंग असे एक ध्येय्य होते.

अध्यक्ष महोदय, दि.२५ जुलै, २०१८ रोजी आम्ही याची मान्यता ही डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठा अंतर्गत 'मूल' येथे म्हणजे महाराष्ट्राची सेवा करणाऱ्या स्वर्गीय कन्नमवार जे या राज्याचे मुख्यमंत्री होते त्यांच्या मतदारसंघात.... त्यावेळेस हे वाक्य लोकप्रिय होते की, स्वर्गीय यशवंतराव चव्हाण हे हिमालयाच्या मदतीला धावले आणि याच मतदारसंघात जेथे हे कृषी महाविद्यालय आहे तेथील माजी मुख्यमंत्री व कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते स्वर्गीय कन्नमवारजी हे सह्याद्रीच्या मदतीला धावले. त्यांच्याच कर्मभूमीत त्यांची जी जन्मभूमी आहे, त्या गावाच्या बाजूला आम्ही हे कृषी महाविद्यालय सुरु केले.

अध्यक्ष महोदय, कृषी विभागाने काय केले तर एक षड्यंत्र रचले की, हे महाविद्यालय होताच कामा नये. या षड्यंत्राचा पहिला भाग काय होता ... अरे शेवटी तेथील विद्यार्थी एकलव्य आहेत का की, द्रोणाचार्यांचा फोटो लावला आणि पूर्ण शास्त्र शिकून घेतले? तेथे ११० पदे मंजूर झाली. त्यात शिक्षकवर्गाची ३२ पदे होती. त्यातील फक्त ३ पदे भरली आहेत. "जय जवान जय किसान" ऐसे रहेंगे ये कुछ अधिकारी शैतान.... तेथे ३२ पैकी ३ पदे भरली. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची ३७ पदे आहेत. त्यातील ३ पदे भरली. उर्वरित कॉंट्रॅक्टने भरणार असे सांगितले,ठीक आहे. तेथे सर्व जंगल क्षेत्र आहे. तेथे आसपास वाघ फिरतो. त्या कर्मचाऱ्यांनी सांगितले की, आम्हाला वॉल कंपाऊंड बांधून द्या. प्रशासकीय इमारत कधी मंजूर झाली?

नंतर श्री.शिंदे ...

श्री.सुधीर मुनगंटीवार ...

उच्चाधिकार सचिव समितीने दिनांक २० सप्टेंबर, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता कृषि महाविद्यालय, मूल करिता प्रशासकीय इमारतीच्या ६४.५९ कोटी रुपयांच्या प्रस्तावास मंजुरी दिली आहे. त्याबाबतचा आदेश अद्याप काढण्यात आला नाही. यास ५ महिने १८ दिवसांचा कालावधी पूर्ण झाला आहे. एखादा राजा ९ महिने ९ दिवसांनी येईल, त्याची वाट पाहण्यात येत आहे काय ? ही नस्ती आहे, मुलगा जन्म घेणार नाही. हे महाविद्यालय हटविण्याचे षड्यंत्र रचल्यास पाप लागेल. ज्या शेतकऱ्यांचे आपण अन्न खाता त्या शेतकऱ्याच्या तंत्रज्ञानाची नस्ती अडवून ठेवत आहात. आपणास पाप लागेल. हा पापी कोण आहे, त्याला शोधले पाहिजे, याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिले पाहिजे. हा कोण नॉटी आहे ज्याने ५ महिने १८ दिवस नस्ती थांबवून ठेवली आहे. मी २६ वर्षापासून या सदनाचा सभासद आहे, मला असे यापूर्वी कधी घडल्याचे आठवत नाही. शेतकऱ्यांच्या तंत्रज्ञानाचे महाविद्यालय दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करण्याचा प्रयत्न करु नये. हा आपल्या बापाचा पैसा नाही, तो यांनी कमविलेला पैसा नाही. हा शेतकऱ्यांच्या हक्काचा पैसा आहे. तो त्यांच्या ज्ञानासाठी, त्यांच्या इमारतीसाठी, त्यांच्या शास्त्रशुद्ध तंत्रज्ञानासाठी खर्च करावयाचा आहे. हे काटकसर करण्यासाठी बसले आहेत, असे वागत आहेत. आपण एक लक्षात ठेवा. त्यावेळी एक शुक्रचार्य जन्माला आला होता त्याचा डोळा दर्भाने फोडला होता. आम्ही विदर्भातील लोक आहोत. अशा पद्धतीचे शुक्राचार्य असतील तर लोकशाही दर्भाने त्यांची जागा दाखविल्याशिवार राहणार नाही. हे बदमाश, नॉटी, नादान, अजगरापेक्षा सुस्त कोण आहे, ज्याने शेतकऱ्यांना त्रस्त केले आहे. चंद्रपूर जिल्हा हा या राज्याच्या सीमावर्ती भागातील आहे. आम्ही प्रदूषण सहन करुन राज्याला वीज पाठवतो आणि आमच्या शेतकऱ्यांना त्रास देण्यात येत आहे.

अध्यक्ष महोदय, शासकीय कृषि महाविद्यालय, मूलच्या प्रशासकीय इमारतीस मान्यता देऊन निधी केव्हा उपलब्ध करुन देण्यात येईल ? मी आपल्या विभागाला अनेक वेळा फोन केले आहेत. तेथील लोकांनी खूप पाप केले आहे, ते भोगतील.

श्री.सुधीर मुनगंटीवार ...

महाविद्यालय हटविण्याचे षड्यंत्र कशासाठी ? आमचा शेतकरी अन्नधान्य पिकवत नाही काय, तो नांगरणी करीत नाही, मेहनत करीत नाही काय ? एक एकर शेती नांगरण्यासाठी तो साडे तेरा कि.मी. आडवे उभे चालतो. तो उन्हात नांगरणी व वखरणी करतो, पावसाळ्यात चिखल तुडवतो व थंडीमध्ये जागणी करतो. त्यांना शास्त्रशुद्ध तंत्रज्ञान व चांगले शास्त्र अवगत करील, उत्तम उत्पादन घेईल, उत्पादन खर्च कमी करील, यासाठी महाविद्यालय सुरु करण्याकरिता उवढी उदासीनता दाखविण्यात येत आहे. या गोष्टीचा मला राग अनावर होत आहे. अशा लोकांच्या ताटात कधी अन्न पडू नये. काही लोकांच्या स्मरणात राहत नाही, काही लोक एकपाठी असतात. त्यामुळे मी अनेक वेळा स्मरणपत्र पाठवतो. देवाने त्यांना बुद्धी दिली नाही, आपण उदारमतवादी धोरण ठेवले पाहिजे. कारण त्यांना स्मरण शक्ती नसते. त्याकरिता मी त्यांना फोन करीत असतो. माझी विनंती आहे की, सदरहू महाविद्यालय इतर ठिकाणी स्थलांतरीत करण्यात येणार नाही, प्रशासकीय मान्यता व त्यासाठी निधीबाबत मंत्री महोदयांनी आश्वासित करावे.

श्री.दादाजी भुसे (कृषि मंत्री) : अध्यक्ष महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाच्या अंतर्गत मूल-मरोडा कृषि महाविद्यालयाच्या इमारतीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. सन्माननीय सदस्य यांच्या भाषणाची एक शैली आहे. महाविद्यालयाच्या इमारतीसाठी प्रशासकीय मान्यता व त्यासाठी निधीची तरतूद एवढ्या पुरता हा विषय मर्यादित आहे. मी सन्माननीय सदस्य यांना आश्वस्त करु इच्छितो की, सदरहू महाविद्यालय स्थलांतरित करण्याचा शासनाचा विचार नाही व असे होऊ दिले जाणार नाही.

यानंतर श्री.तेलंग......

असुधारित प्रत

श्री.दादाजी भुसे......

सन २०१९ मध्ये उक्त विद्यालयास मान्यता देण्यात आलेली आहे. तात्पुरती व्यवस्था करुन ते विद्यालय सुरु करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत उक्त विद्यालयामध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षामध्ये १८८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यालयासाठी लागणारे इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करणे आवश्यक आहे. तसेच सदर विद्यालयामध्ये कर्मचारी वर्ग देखील कमी आहे, ही वस्तुस्थिती आहे. मी कोणताही संकोच न करता सांगू इच्छितो की, राज्यातील अनेक कृषी विद्यालयांमध्ये कर्मचारी वर्ग कमी आहे. पुढील काळामध्ये कंत्राटीपद्धतीने का होईना कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात येतील, असे मी आश्वस्त करतो. पूर्वी सादर करण्यात आलेला मूळ प्रस्ताव १६० कोटी रुपयांचा होता. उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने उच्च स्तरीय समितीने काही निर्णय घेतलेले आहेत. ज्या बाबींची तातडीची निकड आहे, अशा बाबींसाठी माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये ६४.५९ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, मागील दोन वर्षापासून जगामध्ये कोरोनाचे संकट आहे. त्यामुळे सर्व देशासह आपल्या राज्याचे आर्थिक स्त्रोत मंदावले होते. त्यामुळे या राज्याला मोठ्या प्रमाणावर आर्थिक फटका बसलेला आहे. अकोला कृषी विद्यापीठाअंतर्गत येणारी काही कामे या पूर्वी मंजूर करण्यात आली होती. आता ती कामे प्राधान्यक्रमाने पूर्ण करण्याचा निर्णय कृषी विभागाने घेतलेला आहे. उद्या सादर होणाऱ्या अर्थसंकल्पातून कृषी विभागाला प्राप्त झालेल्या निधीतून प्राधान्य क्रमाने मूलच्या नवीन इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देऊन आवश्यक निधीची तरतूद करण्यात येईल.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, दिनांक २० सप्टेंबर, २०२० रोजी प्रस्ताव सादर करण्यात आलेला असताना देखील आपण ५ महिने १८ दिवस त्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिली नाही. कोरोना काळामध्ये लग्न होऊ शकत नाही, हे मला माहिती आहे. परंतु लग्न जमवून ठेवण्यास काय हरकत आहे? तशी कोरोना काळामध्ये प्रशासकीय मान्यता देण्यास काय हरकत होती? सरकार आर्थिक अडचणीमध्ये आहे, हे आम्ही समजू शकतो. आता निधी देऊ नका.

श्री.सुधीर मुनगंटीवार......

परंतु उक्त प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यास काय अडचण होती. दिनांक २० सप्टेंबर, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता EPC चा निर्णय झाला. परंतु त्यानंतर पुढील ५ महिने १८ दिवस प्रशासकीय मान्यता दिलेली नाही. नियमानुसार ४५ दिवसांच्या आत प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक होते. आपण कायद्याचा भंग केला आहे. त्या फाईला देखील आत्महत्या करण्याची इच्छा होईल, इतके दिवस ती फाईल पडून आहे. तिच्याकडे कोणीही पाहण्यास तयार नाही. तेथील दगडांचा काही उद्धार करणार आहात की नाही? उद्या किंवा सोमवारी आपण उक्त प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणार आहात काय? तसेच यासंदर्भात आपल्या दालनामध्ये एक बैठक घेणार आहात काय?

श्री.दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, मी आताच सांगितले आहे की, मूलच्या नवीन इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देऊन निधीची तरतूद करण्यात येईल. फक्त वांझोटी प्रशासकीय मान्यता देऊन त्या मान्यतेला काहीही अर्थ नाही. यापूर्वीच्या काळामध्ये अनेक बांधकामांना ढीगभर प्रशासकीय मान्यता मिळालेल्या आहेत. परंतु उक्त कामास निधीची तरतूद केली नसेल तर त्या प्रशासकीय मान्यतेला काहीही अर्थ राहत नाही.

यानंतर श्री.कुलकर्णी......

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष :** सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी ०६ वाजून ३५ मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२१ च्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------

असुधारित प्रत